मराठी व्याकरणाची मूलतत्वे

लेखक
कै. ग. ह. केळकर
संपादक
डॉ. शं. गो. तुळपुळे

सिटी बुक स्टॉल, पुणे.

तिसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना

मराठी व्याकरणात आतापर्यंत नाव घेण्यासारखी दहा-पाच पुस्तके झालेली आहेत. दादोबा, रे. नवलकर, गोडबोलेशास्त्री, खरे, प्रो. मो. के. दामले, रामभाऊ जोशी, हे मराठीचे मुख्य व्याकरणकार. यांच्याखेरीज व्याकरणाच्या निरनिराळ्या अंगांसंबंधाने स्वतंत्र पुस्तके, निबंध, लेख, वगैरे लिहून व्याकरणशास्त्राच्या विकासाला मदत पुष्कळांनी केलेली आहे. कृष्णशास्त्री चिपळूणकर, गुंजीकर, परशराम बल्लाळ गोडबोले, आगरकर, लेलेशास्त्रीद्वय, पारखीशास्त्री इत्यादी माजी, व गो. कृ. मोडक, रा. दा. देसाई, पावशे, वे शा. बनहट्टीशास्त्री, वगैरे विद्यमान लेखकांचा यात अंतर्भाव केला पाहिजे.

वर निर्देश केला आहे त्यांपैकी दादोबा, गोडबोले, खरे, यांची पुस्तके आज दुर्मिळ झाली आहेत. प्रो. दामले यांचे शास्त्रीय व्याकरण विद्यार्थ्यांच्या आवाक्याबाहेरचे आहे. ही पुस्तके सोडून दिली म्हणजे रा. भि. जोशी यांचे प्रौढबोध व्याकरण हे एकच चांगले पुस्तक आज चालू आहे. पण, ते विविध विषयांनी भरलेल्या आजच्या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना अवजड वाटण्यासारखे आहे व वाटतेही. शिवाय, अलंकार आणि वृत्ते यांची माहिती त्यात नसल्यामुळे इतर बारीकसारीक पुस्तके पहावी लागतातच. या सर्व अडचणी दूर व्हाव्या, व अनेक विषयांच्या परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या हातात आटपशीर, पण मुद्देसूद रीतीने विषयांचे विवेचन केलेले पुस्तक असावे म्हणून हे पुस्तक लिहिले आहे. मॅकमिलन कंपनीने प्रसिद्ध केलेले माझे **निबंधलेखन** हे पुस्तक व प्रस्तुत पुस्तक या दोहोत मिळून **व्याकरण व लेखन** यांची जेवढी माहिती प्रौढ विद्यार्थ्यांना पाहिजे तेवढी सर्व आलेली आहे.

या पुस्तकाची रचना इतर व्याकरणांच्या रचनेप्रमाणेच आहे. ज्या ठिकाणी एखाद्या विषयाची तात्त्विक चर्चा जरासे खोलात जाऊन करावीशी वाटली तो मजकूर बारीक छापला आहे. तो आरंभी न वाचिला तरी चालेल.

ज्या ज्या ठिकाणी वादग्रस्त विषयांची चर्चा केली आहे तेथे दोन्ही बाजूंची साधकबाधक प्रमाणे पाहून माझे मत काय हे अखेरीस सांगितले आहे. माझी सर्वच मते सर्वांना पटतील असे नाही. पण, केलेल्या चर्चेचा उपयोग आजच्या वादविषयक प्रश्नांची माहिती नवीन अभ्यासकाला होण्यापुरता झाला तरी पुष्कळ झाले.

शेवटी, ज्या ज्या पुस्तकांचा, लेखांचा वगैरे हे पुस्तक लिहिताना मला उपयोग झाला त्यांच्या कर्त्यांचे आभार मानावयाचे. आतापर्यंत प्रसिद्ध झालेल्या बहुतेक सर्वच पुस्तकांचा किंवा लेखांचा थोडाफार उपयोग मी केलेला असल्यामुळे सर्वांचाच व्यक्तिशः निर्देश या ठिकाणी करणे शक्य नाही. पण, त्यातल्या त्यात रे. नवलकर, दामले, जोशी यांच्या पुस्तकांचा उपयोग मला बराच झाला. तसेच शेवटच्या दोन प्रकरणे लिहिताना **वृत्तदर्पण, अलंकारादर्श, अलंकारप्रकाश** यांसारख्या पुस्तकांचा मधून मधून उपयोग झाला हे सांगणे आवश्यक आहे.

शब्दालंकारांविषयीचा मजकूर माझ्या **निबंधलेखन** या पुस्तकातून जसाचा तसाच घेतला आहे.

ता. २० फेब्रुवारी, १९३७ ग. ह. केळकर

चौथ्या आवृत्तीची प्रस्तावना

प्रो. केळकरांचे 'मराठी व्याकरणाची मूलतत्त्वे' हे पुस्तक प्रथम इ. १९३३ मध्ये प्रसिद्ध झाले. त्यानंतर त्याच्या आणखी दोन आवृत्त्या लेखकाच्या हयातीतच निघाल्या. अलीकडे हे पुस्तक दुर्मिळ झाल्याने त्याची ही चौथी आवृत्ती प्रसिद्ध करण्यात येत आहे.

या आवृत्तीच्या संपादनाचे काम कै. केळकरांचे ज्येष्ठ चिरंजीव व माझे वर्गबंधू श्री. चिंतामणी उर्फ बाबूराव केळकर यांच्या सूचनेवरून मी हाती घेतले. ते घेण्यात माझा आणखीही एक हेतू होता. तो म्हणजे गुरुऋणातून अंशतः तरी उतराई व्हावे हा होय. प्रो. केळकर हे माझे विद्यालयीन गुरु होते. फर्ग्युसन कॉलेज सोडून वाडिया कॉलेज काढल्यावर तेथे ते बी. ए च्या वर्गाला इंग्रजी शिकवीत तेव्हां मी त्यांचा विद्यार्थी होतो. पुढे एम्. ए. च्या परीक्षेच्या अभ्यासातही त्यांची मला पुष्कळच मदत झाली. एम्. ए. झाल्यानंतर माझी पहिली नेमणूक धारवाडच्या कर्नाटक कॉलेजात झाली याचेही श्रेय त्यांच्याकडेच जाते. सारांश, प्रो. केळकर हे जसे माझे विद्यागुरु होते, तसेच हितकर्तेही होते. त्यांची विद्वत्ता आणि त्यांच्या स्वभावातील ऋजुता यामुळे माझ्या मनात त्यांच्याविषयी नेहमीच आदर वसत आला आहे.

वरील सर्व कारणांमुळे त्यांच्या व्याकरणाच्या या चौथ्या आवृत्तीचे काम मी हाती घेतले. त्याचे संपादन असे मात्र मी विशेष केलेले नाही. कारण एक तर प्रो. केळकर हे मराठी भाषेचे एक चांगले जाणकार व श्रेष्ठ प्रतीचे वैयाकरण होते. तसेच त्यांनी स्वतः आपल्या हयातीत या व्याकरणाचे दोनदा संस्करण केले होते. साहजिकच हे व्याकरण लिहिण्यातील त्यांचा हेतू लक्षात घेता त्यात नवीन लिहिण्यासारखे असे आता विशेष काही नव्हते. त्यामुळे पूर्वीच्या, म्हणजे तिसऱ्या आवृत्तीचे, काही किरकोळ स्वरूपाच्या दुरुस्त्या करून केलेले हे पुनर्मुद्रणच आहे असे म्हटल्यास चालेल. थोडासा बदल केला आहे तो परिशिष्टांत केला आहे. पैकी पहिल्या परिशिष्टात प्रो. केळकरांनी लिहिलेला मराठी भाषेच्या शुद्धलेखनाविषयीचा मजकूर पूर्वी-

अनुक्रमणिका

भाग पहिला

प्रकरण पहिले

प्रकरण दुसरे

प्रकरण तिसरे

प्रकरण चवथे

प्रकरण पाचवे

प्रकरण सहावे

प्रकरण सातवे

प्रकरण आठवे

प्रकरण नववे

प्रकरण दहावे

भाग दुसरा

प्रकरण अकरावे

शब्दघटना

भाग तिसरा

प्रकरण बारावे

वाक्यरचना

प्रकरण तेरावे

वाक्यपृथक्करण

प्रकरण चवदावे

विरामचिन्हे

प्रकरण पंधरावे

अलंकार

प्रकरण सोळावे

परिशिष्ट : १

परिशिष्ट : २

मराठी व्याकरणाची मूलतत्त्वे

प्रकरण पहिले

वाक्ये व त्यांचे घटक

भाषा म्हणजे काय ?

वाक्य

§ १ **वाक्य--वाचेने बोलावयाचे, बोलण्याजोगे जे, ते वाक्य.**

नुसते ध्वनी तोंडाने काढणे किंवा शब्द कसे तरी उच्चारणे याने वाक्य होत नाही. उदा०---(१) अ, आ, इ, ई (२) अ, ब, क, ड (३) काळा (४) बैल (५) येथून, तेथून (६) काळा बैल; येथून तेथून (७) घोडा बैल हसतो, ही वाक्ये नव्हेत. कारण ती बोलता येत असली, तरी बोलण्याजोगी नव्हेत; त्यांच्या अंगी बोलण्याची योग्यता नाही; किंवा हीच गोष्ट निरनिराळ्या शब्दांनी सांगावयाची म्हणजे त्या त्या शब्दांना रूढीने किंवा संकेताने काही अर्थ प्राप्त झालेला नाही. पण, रामा बोलतो, घोड्याने गवत खाल्ले, या शब्दसमुदायांना काही तरी अर्थ आहे. कारण त्यांत शब्दांच्या जुळणीसंबंधी काही तरी संगती आहे.

ही संगती कोणती, अशा विचार करू लागले तर असे दिसते की, ज्याला वाक्य म्हणतात, किंवा म्हणावयाचे, त्यात कशाविषयी तरी काही

तरी सांगितलेले असते. म्हणजे वाक्याचे निरनिराळे भाग सांगावयाचे, तर ते निदान दोन असले पाहिजेत. **ज्याविषयी काही तरी सांगितलेले असते** तो एक भाग, व **जे सांगितलेले असते** तो दुसरा भाग. वाक्याच्या दृष्टीने यांना अनुक्रमे **उद्देश्य व विधेय** अशी नावे आहेत.

उद्देश्य—उद्देश्यात, ज्या वस्तूविषयी बोलावयाचे त्या वस्तूचा प्रत्यक्ष नावाने, किंवा अप्रत्यक्षपणे, निर्देश केलेला असतो. वस्तूचे प्रत्यक्ष नाव असले तर त्याला व्याकरणात '**नाम**' असे म्हणतात; व ती वस्तू नामाच्या ऐवजी येणाऱ्या एखाद्या शब्दाने अप्रत्यक्षपणे सांगितलेली असते तेव्हा त्या अप्रत्यक्ष शब्दाला '**सर्वनाम**' म्हणतात.

विधेय—जे सांगितलेले असेल ते 'विधेय'; त्यालाच व्याकरणात '**क्रियापद**' असे नाव आहे. तेव्हा, वाक्यात निदान हे दोन भाग तरी असलेच पाहिजेत ही गोष्ट निर्विवाद झाली. काही वाक्यांत हे दोन्ही भाग शब्दांनी दर्शविलेले असतात, व काहीत फक्त विधेयच आलेले असून उद्देश्य गुप्तपणे असते. उदा०—'रामा थांबतो' यात उद्देश्य व विधेय ही दोन्ही स्पष्टपणे सांगितली आहेत; व '(तू) धाव', 'इकडे या (तुम्ही)', या वाक्यांत उद्देश्यपदे गुप्त आहेत. **एकंदरीत सांगावयाचे म्हणजे निदान उद्देश्य व विधेय ही असल्याशिवाय वाक्य होतच नाही.**

§ २ वाक्यात येणारे आणखी काही प्रकारचे शब्द.

पण, नेहमी बोलण्या-लिहिण्यात येणाऱ्या वाक्यांचे थोडेसे जास्त निरीक्षण केले तर असे दिसेल, की नुसते उद्देश्य व नुसते विधेय यांशिवाय इतर पुष्कळच गोष्टी बहुतेक वाक्यांत असतात, व असाव्या लागतातही. उदा०—घोड्याने **गवत** खाल्ले, या वाक्यात खाणारा घोडा व खाण्याची क्रिया यांखेरीज **काय** खाल्ले ते सांगितले आहे. कारण, नुसते घोड्याने खाल्ले असे म्हटल्याने अर्थ पुरा झाला असे वाटत नाही; काय खाल्ले ते समजण्याची आकांक्षा राहतेच व म्हणून ते सांगावे लागते. या शब्दाला वाक्यात **कर्म** असे म्हणतात. वरील वाक्यातील **कर्म** हे एका पदार्थाचे नाव, म्हणजे व्याकरणात नाम आहे. पण त्याचा उल्लेख एखाद्या वाक्यात अप्रत्यक्षपणे

नामाऱ्या प्रतिनिधिवाचक अशा एखाद्या शब्दाने झाला असला, तर कर्म हे सर्वनामही असू शकेल.

§ ३ **विशेषणे, क्रियाविशेषणे**

परंतु एवढ्याने तरी वाक्यांची मर्यादा संपते का ? मुळीच नाही. ज्या वस्तूंविषयी आपण बोलतो, त्यांच्या नुसत्या निर्देशाशिवाय आणखी काही तरी माहिती सांगणे हे पुष्कळदा जरूरच असते. त्या वस्तूंचे गुणधर्म, रंग, रूप, आकार वगैरे सांगावे लागतात; त्या वस्तूंविषयी काहीतरी विशेष असे म्हणावे लागते. **घोड्याने गवत खाल्ले,** या वाक्यात गवतापूर्वी **हिरवे, कोवळे,** असा काही तरी शब्द घातला, तर अर्थातच गवताविषयी थोडीशी जास्त माहिती सांगितल्यासारखे होईल. किंवा, **पांढऱ्या घोड्याने** असे म्हटले तर घोड्याविषयी जास्त काही तरी सांगितल्यासारखे होईल. आता घोडा, गवत, ही त्या त्या वस्तूंची प्रत्यक्ष नावे आहेत म्हणून जसे व्याकरणात त्यांना नामे म्हटले, तसे या किंवा अशा प्रकारच्या इतर **वस्तूंचे गुणधर्म दाखविणारी, त्यांच्याविषयी काही तरी विशेष सांगणारी, ती ' विशेषणे '** असे म्हणण्याला हरकत नाही. वाक्यात नामांना विशेषणांची जोड मिळाल्याने जसा अर्थाला अधिक खोलपणा किंवा स्पष्टपणा येतो, तसाच क्रियेच्या प्रकाराविषयी काही तरी जास्त सांगितल्यानेही येतो. पुष्कळशा वाक्यांत नुसती एखादी क्रिया घडली यापेक्षा काही तरी अधिक सांगितलेले असते, व ते जरूरही असते; ती क्रिया कोठे घडली, केव्हा, कशी, वगैरे गोष्टी सांगितलेल्या असतात. वस्तूंना गुणधर्म आहेत तसेच **क्रियांनाही प्रकार आहेत, व या प्रकारांचे निदर्शक जे शब्द त्यांना क्रियेची विशेषणे किंवा ' क्रियाविशेषणे '** असे म्हटले तर ते अन्वर्थकच आहे. विशेषणाचा व क्रियाविशेषणांचा उपयोग उद्देश्य, कर्म व क्रियापद यांचा अर्थ वाढविण्याकडे किंवा पुरा करण्याकडे होतो, म्हणून वाक्याच्या दृष्टीने त्यांना, प्रसंगभेदाप्रमाणे, ' उद्देश्यपूरक ', ' कर्मपूरक ', ' क्रियापदविस्तारक ' अशी नावे वाक्याविषयी बोलताना देता येतील.

§ ४ **शब्दयोगी अव्यये, उभयान्वयी अव्यये, प्रत्यय.**

वाक्यात येणाऱ्या मुख्य मुख्य शब्दांचा विचार येथपर्यंत झाला. पण, यांखेरीज आणखीही काही प्रकारचे शब्द वाक्यात लागतातच. नुसती नामे

किंवा नुसती क्रियापदे म्हणजे वाक्ये नव्हेत हे दाखविलेच आहे. वाक्य व्हावयाला शब्दांची योग्यता लागते; म्हणजे, ते एकमेकांशी योग्य रीतीने जुळविलेले पाहिजेत. एखाद्या यंत्रात, चाके, दांडे वगैरे जसे मुख्य भाग असतात तसेच हे मुख्य भाग जोडण्याकरिता खिळे, दुवे, वगैरे किरकोळ भागही लागतातच. भाषायंत्रातही अशाच प्रकारचे खिळे, दुवे, वगैरे लागतातच. यांना स्वतःचे अर्थ असोत किंवा नसोत, त्यांचे खरे कार्य म्हणजे मुख्य मुख्य शब्द एकमेकांशी योग्य रीतीने जोडणे हे असते. वाक्यातील शब्द एकमेकांशी जोडणे जसे जरूर आहे, तसेच वाक्येही एकमेकांशी जोडणे जरूर आहेच. या प्रकारच्या शब्दांना अनुक्रमे ‘शब्दयोगी अव्यये’ व ‘उभयान्वयी अव्यये’ अशी नावे व्याकरणकारांनी दिली आहेत. अव्यये म्हणण्याचे कारण, नाम, सर्वनाम, वगैरे शब्दांप्रमाणे त्यांचा व्यय होत नाही, त्यांच्या बाह्य रूपात फरक होत नाही, हे आहे. याचा जास्त खुलासा पुढे योग्य ठिकाणी करावयाचाच आहे. जोडणारे दुवे हे जेव्हा स्वतंत्र शब्द नसतील तेव्हा त्यांना प्रत्यय असे म्हणतात.

केवलप्रयोगी अव्यये

शब्दांच्या बहुतेक प्रकारांचा विचार येथे संपला. पण भाषेत याशिवाय काही शब्द असे आहेत की, त्यांच्या केवळ उच्चारण्यानेच, केवळ प्रयोगामुळेच, काही अर्थ व्यक्त होत असतात. उदा०—एखादी दुःखाची गोष्ट झाली, पाहिली किंवा ऐकिली म्हणजे सहजच आपल्या तोंडातून अरेरे! असा उद्गार निघतो. आश्चर्य वाटते ते अबबब! या शब्दाने व्यक्त होते. हे शब्द किंवा यांसारखे दुसरे शब्द अव्ययेच आहेत. बोलण्या-लिहिण्यात त्यांच्या केवळ प्रयोगानेच काही काही अर्थ व्यक्त होत असतात, म्हणून अशा शब्दांचा एक स्वतंत्र वर्ग असून त्यांना ‘उद्गारवाची’ किंवा ‘केवलप्रयोगी’ अव्यये असे नाव दिलेले आहे.

§ ५ शब्दांची स्थिती व गती

शब्दांच्या स्वभावावरून व भाषेत त्यांच्या होणाऱ्या उपयोगावरून त्यांचे निरनिराळे प्रकार कसे व किती करिता येतात हे वर थोडक्यात सांगितले.

या सांगण्यावरून एक गोष्ट वाचकांच्या ध्यानात आली असेलच. ती ही, की शब्दांकडे दोन रीतींनी पाहिले पाहिजे. त्यांच्या स्वभावाविषयी विचार करावयाचा त्या वेळी, तात्पुरते का होईना, ते जसेच्या तसे, स्थिर आहेत असे धरून चालले पाहिजे, व त्यांच्या उपयोगाचा विचार करिताना ते हालत-चालत आहेत, जिवंत आहेत, असे म्हटले पाहिजे. यंत्राचे उदाहरण पुन्हा एकदा घ्यावयाचे तर असे म्हणता येईल की, एखाद्या यंत्राची पुरी माहिती व्हावयाला ते दोन दृष्टींनी तपासावे लागते. एकदा ते उभे, स्थिर, असताना. या स्थितीत त्याचे भाग वेगवेगळे करून, सांधे, खिळे, जोड वगैरे तपासून ते कसे केलेले आहेत हे पाहावे लागते. या वेळी यंत्र चालू असून भागत नाही; ते स्थिरच असले पाहिजे. पण, एवढ्यानेच यंत्राचे खरे ज्ञान होत नाही. भागांची वेगवेगळी तपासणी झाली, म्हणजे यंत्र जोडून ते चालवून पाहिले पाहिजे. म्हणजे त्याच्या रचनेत काय फरक होतात, भाग आपापली कामे करण्याला समर्थ आहेत की नाहीत, ते चालतात, फिरतात कसे, अडतात की सुरळीत चालतात, या गोष्टी यंत्र चालत असतानाच कळावयाच्या. भाषायंत्राचीही अवस्था अशीच आहे. ते चांगले समजावयास त्याचा दोन प्रकारांनी अभ्यास करावा लागतो. एका प्रकारात, शब्द स्थिर असताना अभ्यास करणे शक्य असते. यांला आपण **शब्दस्थितिशास्त्र** म्हणू. दुसऱ्यात, शब्द व्यवहारात रुळत असतात त्या वेळी त्यांचा अभ्यास करावा लागतो, म्हणून त्याला **शब्दगतिशास्त्र** असे म्हणू.

आता ह्यापुढील प्रश्न म्हणजे भाषाशास्त्राच्या या दोन भागात कोणकोणत्या गोष्टी येतात ते तपशीलवार ठरविणे.

पुढे **शब्दविचारात (शब्दस्थिति-विचारात)** शब्दांचे **प्रकार**, त्यांची **उत्पत्ती**, ते तयार होतात कसे—म्हणजे **घटना**, या गोष्टी येतात; व **शब्दगतिविचारात** किंवा **वाक्यविचारात** शब्दांचे परस्परांशी येणारे **संबंध**, त्यांची **जुळणी**, व जुळणी होताना त्यांत होणारे **फरक**, शब्दांचे **अर्थ**, वगैरे विषय येतात.

§ ६ शब्द, ध्वनी आणि वर्ण

शब्द हे ध्वनींचे झालेले आहेत. ध्वनी मुख्यतः वाचेच्या वाटेने बाहेर

येतात व ते अनित्य आहेत. बोलणारा बोलून जातो न जातो तोच ध्वनी हवेत नाहीसे होतात. ते कायम टिकविण्याची काही युक्ती निघाली नसती, तर त्यांचा सावकाश व यथासांग अभ्यास करणे शक्य झाले नसते. पण मनुष्य हा कल्पक प्राणी आहे. गाण्याच्या यंत्रातील तबकडीवर गाणाऱ्याच्या आवाजाचे ठसे उमटविता येतात हे बहुतेकांना माहित असेलच. तशाच प्रकारच्या युक्तीने शब्दांच्या अनित्य ध्वनींनाही कायमचे स्वरूप देता येते. ध्वनी कानांनी ऐकावयाचे असतात, पण काही तरी डोळ्यांना दिसणाऱ्या खुणांनी त्यांचे रूप कायम करिता येते. या खुणा रंगांनी कशावर तरी लिहिता येतात म्हणून त्यांना **वर्ण**, किंवा खोदून विशेषच टिकाऊ होतात म्हणून त्यांना **अक्षरे** असे म्हणतात. शब्दांचा विचार करिताना यांचाही विचार करणे अवश्यच आहे. यंत्राचे उदाहरण पुन्हा एकदा घ्यावयाचे, तर त्याचे भाग, सांधे, खिळे कोणते व किती आहेत हे जसे पाहावे लागते, तसेच ते कशाचे केलेले आहेत, पितळेचे आहेत की तांब्याचे आहेत, लोखंडी आहेत की पोलादी आहेत, याही गोष्टी पाहाव्या लागतात. ध्वनी, व त्यांचे द्योतक वर्ण किंवा अक्षरे ही कच्च्या स्थितीतली सामग्री, हे साहित्य; याच्यापासून शब्द, वाक्ये वगैरे होतात. हा निराळ्या स्थितीतला पक्का माल; व यापासून पुढे भाषा. ती काव्य, नाटक, इतिहास या रूपांनी जगात वावरत असते. तेव्हा शब्दांच्या विचारात ध्वनि व वर्ण यांचा विचार येतोच.

याहीपेक्षा थोडेसे खोल जाऊन पाहू लागले, जास्त तपशिलात शिरले, तर ध्वनीच्या विचारात त्यांची उत्पत्ती, त्यांचे स्वभाव व प्रकार, त्यांचा परस्परांशी संबंध, त्याचप्रमाणे वर्णांची उत्पत्ती, प्रकार वगैरे; व शेवटी ध्वनी व वर्ण यांचा परस्पर संबंध, इतक्या गोष्टी येतात. यांचा विचार केला म्हणजे शब्दांचा विचार करावयाची पूर्ण तयारी झाली, किंवा भूमिका तयार झाली असे म्हणता येईल.

§ ७ शब्दविचार

पुढे शब्दविचारात (शब्दस्थिति-विचारात म्हणणे जास्त बरे) शब्दांचे प्रकार, त्यांची उत्पत्ती, ते तयार होतात कसे—म्हणजे

त्यांची घटना, या गोष्टी येतात; शब्दगति-विचारात (किंवा याला सोईकरिता वाक्यविचार असे म्हणू) शब्दांचे परस्परांशी येणारे संबंध, त्यांची जुळणी व जुळणी होताना त्यात होत असतील तेथे होणारे फरक, शब्दांचे अर्थ, वगैरे विषय येतात. या सर्वांचा विचार झाला म्हणजे व्याकरण संपले.

§ ८ व्याकरण व साहित्य

मात्र व्याकरण संपले म्हणजे भाषा संपत नाही. यंत्राचे भाग निरनिराळे पाहिले, ते जोडून यंत्र चालवून पाहिले, तरी त्याने काम काय होते हे देखील समजून घ्यावयास पाहिजेच. भाषेचा व्यवहारात उपयोग होऊ लागला, ती लिहिली-बोलली जाऊ लागली, तरी तीत काय लिहिले जाते त्याचे प्रकार वगैरे गोष्टी भाषेच्या अभ्यासकाला कळल्या पाहिजेत. त्या कळावयाच्या म्हणजे जे प्रत्यक्ष बोलले लिहिले जात असेल, ते पाहूनच काळवयाच्या. ही भाषागतिशास्त्राच्या अभ्यासाची उच्च पायरी होय. या पायरीवर चढून गेले म्हणजे भाषा व तिने व्यक्त होणारे विचार, यांच्या संबंधाची कल्पना येऊ लागते; व विचार स्पष्टपणे, व श्रोत्यावक्त्यांना आल्हाद होईल अशा रीतीने, आणि कार्यक्षमपणे, व्यक्त व्हावयाचे असतील, तर भाषा जे जे निरनिराळे उपाय करते, ज्या ज्या युक्त्याप्रयुक्त्या योजिते, त्यांचाही विचार करावा लागतो. त्याचप्रमाणे भाषेच्या व्यवहाराचे जे जे प्रकार होतात त्यांचा, म्हणजे वर्णन, कथन, विवेचन; गद्य, पद्य, काव्य, इतिहास, नाटक; इत्यादि प्रकारांचा विचार झाला पाहिजे. भाषेच्या अभ्यासाची ही नुसती रूपरेखा आहे. पण ती आता इतकीच पुरे.

प्रकरण दुसरे

ध्वनी व वर्ण

§ ९ ध्वनींच्या उत्पत्तीचे स्थान

ध्वनींचा बनविलेला व अर्थ असलेला गट म्हणजे शब्द अशी शब्दाची व्याख्या करिता येईल. ध्वनीतूनच शब्दाचा उगम होतो, म्हणून या ध्वनीची थोडीशी माहिती असणे जरूर आहे.

प्राणी जो श्वासोच्छ्वास करितात, त्यामुळे ध्वनी उत्पन्न होतात; ते कसे ते पाहू. फुप्फुसातून बाहेर येणारा उच्छ्वास * श्वास-नलिकेतून * कंठास्थींच्या पेटीतून तोंडावाटे किंवा नाकावाटे बाहेर पडतो. श्वासनलिका ही मणक्यांची बनलेली आहे व तिच्या खालच्या भागी दोन फाटे असून त्यांच्या योगाने ती फुप्फुसांशी जोडलेली आहे. हिच्या वरच्या टोकाला मोहरेच्या किंवा कोंदणाच्या आंगठीच्या आकाराचा, पुढे बारीक व मागील बाजूस रुंदावत गेलेला असा एक वर्तुलाकार अस्थी आहे. त्याला *क्रिकॉइड रिंग (Cricoid ring) असे म्हणतात. यावर टेकलेला एक दुसरा अर्धवर्तुलाकार अस्थी असतो, त्याला *थायरॉइड कार्टिलेज (Thyroid cartilage) असे म्हणतात. याला अर्ध-वर्तुलाकार म्हणण्याचे कारण, याला मागील भाग मुळीच नसतो. या अस्थीच्या पुढील भागाच्या मध्यभागी फाकलेल्या कडीसारखा (V) आकार असतो. हनुवटीखाली गळ्यावर हात फिरविला असता हाताला जो उंचवटा लागतो तोच हा. Thyroid cartilage. याला इंग्रजीत Adam's apple म्हणतात; मराठीत * **कंठमणी** म्हणू.

या दोन अस्थींची मिळून कंठातील पेटी तयार होते. या पेटीच्या वरच्या बाजूस डाव्याउजव्या बाजूंकडे आणखी दोन त्रिकोणाकृती अस्थी असतात. हे सर्व अस्थी मांसरज्जूंनी एकमेकांशी जोडलेले असतात व यांनी मिळून तयार झालेल्या पेटीवर पडद्यासारखे एक झाकण असते. याला * पडजीभ (Epiglotis) असे म्हणतात. पडजिभेचे वरचे टोक जिभेच्या मुळाशी जोडलेले असते.

वर सांगितलेल्या त्रिकोणाकृती अस्थीच्या खालील भागाच्या आत तेथून

कंठमण्याच्या मध्यभागाशी जोडलेले बंद असतात व यांना *ध्वनिरज्जू (Vocal cords) असे म्हणतात. यांच्यामध्ये मोकळी जागा असते. कंठातील नाद उत्पन्न करणाऱ्या पेटीचे हे अगदी स्थूल असे वर्णन आहे.

§ १० ध्वनी कसे उमटतात ?

आता या पेटीत नाद कसा उत्पन्न होतो ते पाहू. आपला श्वास संथपणे चालत असेल त्या वेळी या पेटीच्या वरील भोकातून तो बाहेर येतो व येत असताना ध्वनिरज्जू बाजूला लुल्या पडलेल्या असल्यामुळे त्यांना कंप होत नाही, व कंप नाही म्हणून नादही उत्पन्न होत नाही. या वेळी पडजिभेचा आकार लांबट त्रिकोणासारखा असतो. पण ध्वनिरज्जूंना ताण देऊन श्वास बाहेर सोडला तर त्यांना, वीण्याच्या तारा छेडताना जशा कापतात, तसा कंप होऊ लागतो व त्यामुळे नाद किंवा घोष उत्पन्न होतो. तेव्हा **नुसत्या उच्छ्वासाने उत्पन्न होणारे ते अघोष व ध्वनिरज्जूंच्या कंपाने नाद उत्पन्न होऊन त्यामुळे उत्पन्न होणारे ते घोष** असे दोन प्रकार ध्वनींचे साहजिकच होतात. हे ध्वनी तोंडातून बाहेर पडताना तेथील भाग—म्हणजे जीभ, दात, ओठ व टाळू यांच्या हालचालीमुळे त्यांचे आणखीही गौण प्रकार होतात. या **भागांशी घर्षण न होताच जर ध्वनी बाहेर पडले तर त्यांना स्वर असे म्हणतात.** अर्थातच **स्वर हे विवृत** म्हणजे **उघडे आहेत. सर्व स्वर घोषध्वनी आहेत. उलट, ध्वनी या भागांशी कोठे तरी कमीजास्त घर्षण होऊन बाहेर पडले, तर त्यांना व्यंजने किंवा परवर्ण म्हणतात;** कारण, त्यांचा उच्चार आपोआपच स्पष्ट होत नाही; तो व्हावयाला स्वरांचे सहाय्य लागते. व्यंजनांचे **स्पर्श** किंवा **ईषत्स्पृष्ट** असे दोन प्रकार आहेत. तसेच **व्यंजनेही घोष किंवा अघोष, अशा दोन्ही प्रकारची आहेत.**

तात्पर्यार्थ असा, की ध्वनी कंठातून बाहेर पडल्यावर तोंडातील कोणत्या ना कोणत्या तरी भागाच्या मदतीनेच त्याला त्याचे विशेष स्वरूप प्राप्त होते.

---

* **टीप**—यांची चित्रे सोबत जोडली आहेत ती पाहावी.

तो स्वर असेल, तर तोंडातील एखाद्या भागाने चिंचोळा होऊन त्याला बाहेर पडावयाला कमीजास्त वाट करून दिलेली असते. तो व्यंजन असेल तर कोणता तरी भाग फार चिंचोळा होऊन त्याच्याशी घर्षण होऊनच ध्वनी बाहेर पडलेला असतो. ध्वनी बाहेर येत असताना तोंडाच्या ज्या भागाचा उपयोग विशेष झाला असेल त्या भागाला त्या ध्वनीचे 'स्थान' असे म्हणतात.

§ ११ ध्वनींची स्थाने

ही स्थाने मुख्य पाच व गौण पाच अशी मिळून एकंदर दहा आहेत. त्यांची नावे :

मुख्य—कंठस्थान, मूर्धन्यस्थान, तालव्यस्थान, दंत्यस्थान, व ओष्ठ्यस्थान.

गौण--कंठतालव्यस्थान, कंठौष्ठ्यस्थान, दंततालव्यस्थान, दंतौष्ठ्यस्थान व अनुनासिकस्थान.

टीप—ज्याला आपण कंठस्थान म्हणतो ते खरोखर कंठस्थान नव्हे. कंठ्यध्वनी (अ, आ, क्, ख्, ग्, घ्, ङ्, ह्,) हे खरोखर वर सांगितलेल्या अर्थाने कंठात उत्पन्न होत नाहीत; तर जिभेचा सर्वांत मागील भाग थोडासा वर उचलून तो व समोरील टाळूचा भाग यांमधील अंतर कमी होते, किंवा क्षण-मात्र नाहीसेच होते, व यामुळे (१) अ, आ व (२) क्, ख्, ग्, घ्, ङ्, ह्, हे ध्वनी उत्पन्न होतात. हा जिभेचा भाग कंठाला सर्वांत जवळ असल्यामुळे या स्थानी उत्पन्न होणाऱ्या ध्वनींना कंठ्य असे म्हटले आहे इतकेच. खरे कंठ्य-ध्वनी फक्त आरबी भाषेत आहेत.

कंठस्थानाच्या पुढील स्थान मूर्धन्य. या ठिकाणी ऋ, ट्, ठ्, ड्, ढ्, ण्, र्, ष्, ळ् हे ध्वनी उत्पन्न होतात.


त्यापुढील स्थान तालव्य. तेथे इ, ई, च्, छ्, ज्, झ्, ञ्, य्, श् हे ध्वनी उत्पन्न होतात.

पुढे दंत्यस्थानी--लृ, त्, थ्, द्, ध्, न्, ल्, स्, व ओष्ठ्यस्थानी-उ, ऊ, प्, फ्, ब्, भ्, म्, हे उत्पन्न होतात.

कंठनाळ (Larynx)




पुढील बाजू




मागील बाजू, ध्वनि-रज्जूंसह

(Cartilage of the Larynx.)
कंठनाळाच्या अस्थींचा सांगाडा



कंठनाळ (Larynx)

पुढील भाग (Front)



मागील भाग (Back)

कंठतालव्य—ए, ऐ. कंठौष्ठ्य—ओ, औ.

दंतौष्ठ्य—ॺ् दंततालव्य—ॺ्. ज़्, झ़् (च्य, ज्य, झ्य)

§ १२ महाप्राण व अल्पप्राण ध्वनी

दुसऱ्या एका रीतीने पाहता यांतील काही ध्वनी ह्कारमिश्रित आहेत. त्यांना **महाप्राण**, व इतरांना **अल्पप्राण** म्हणतात.

महाप्राणध्वनी–ख्, घ्, ठ्, ढ्, छ्, झ्, थ्, ध्, फ्, भ्. **अनुनासिक** खरोखर पाहता एकच आहे. त्याच्यापुढे ज्या प्रकारचा ध्वनी येईल त्याप्रमाणे त्याचेही पाच वेगवेगळे उच्चार, ङ्, ण्, ञ्, न्, म्, होतात.

§ १३ ऱ्हस्व, दीर्घ व संयुक्त ध्वनी

स्वरांच्या वर्गीकरणाचा ज्यास्त विचार करिता ऱ्हस्व, दीर्घ व संयुक्त असे तीन प्रकार पडतात.

* ऱ्हस्व — अ, इ, उ, ऋ, ऌ

दीर्घ—आ, ई, ऊ, ॠ, ॡ

ए = (अ + इ, अथवा ई), ऐ = (आ + इ अथवा ई)

ओ=(अ + उ अथवा ऊ), औ = (आ + उ अथवा ऊ) हे संयुक्त.

ऱ्हस्व व दीर्घ हे स्वरांचे प्रकार त्यांना उच्चारावयास लागणाऱ्या वेळेच्या मानाप्रमाणे केले आहेत. उच्चारावयास लागणाऱ्या कालमानास **मात्रा** असे म्हणतात. **ऱ्हस्व स्वर उच्चारण्यास जो काल लागतो त्याची एक मात्रा धरली तर दीर्घ स्वर उच्चारण्यास दोन मात्रा लागतात.** संयुक्तस्वर हे अर्थातच दीर्घ आहेत.

अं हा स्वरपूर्वक अनुस्वार व अः हा **स्वरपूर्वक विसर्ग.**

---

* **टीप**–वास्तविक पाहता **आ** हा **अ**चा दीर्घ नव्हे. 'अ'चा लांबविलेला उच्चार अ (दीर्घ) व 'आ'चा लांबविलेला उच्चार आ (दीर्घ) असे दोन ध्वनी जास्त असावयास पाहिजेत. त्याचप्रमाणे ए, ए (दीर्घ), ओ, ओ (दीर्घ) यांकरिता वेगवेगळे वर्ण असते तर बरे. कानडीत ए, ए (दीर्घ), ओ, ओ (दीर्घ) हे वेगळे आहेत.

§ १४ ध्वनींच्या स्थानवारी वर्गीकरणाचे कोष्टक
स्वर व व्यंजने

स्थान	स्वर	व्यंजन			
	घोष	अघोष	घोष	अंतस्थ ईषत्स्पृष्ट	उष्मे
१ कंठस्थान	अ आ	क् ख्	ग् घ् ङ्		ह्
२ मूर्धन्यस्थान	ऋ ॠ	ट् ठ्	ड् ढ् ण्	(ळ) र्	ष्
३ तालव्यस्थान	इ ई	च् छ्	ज् झ् ञ्	य्	श्
४ दंतस्थान	ऌ	त् थ्	द् ध् न्	ल्	स्
५ ओष्ठ्यस्थान	उ ऊ	प् फ्	ब् भ् म्		
६ कंठतालव्य	ए ऐ				
७ कंठौष्ठ्य	ओ औ				
८ दंततालव्य		च् (च्य)	ज् (ज्य)		
९ दंतौष्ठ्य				व्	

§ १५ मराठींतील ध्वनी व अक्षरे :

कोष्टक १

स्वर—अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, ॠ, ऌ, ॡ, ए, ऐ, ओ, औ,
[अं, अः];

स्पर्शव्यंजने —(**कंठस्थ**)—क्, ख्, ग्, घ्, ङ्;
(**तालव्य**)—च्, छ्, ज्, झ्, ञ्;
(**मूर्धन्य**)—ट्, ठ्, ड्, ढ्, ण्;
(**दंत्य**) —त्, थ्, द्, ध्, न्;
(**ओष्ठ्य**) —प्, फ्, ब्, भ्, म्;

ईषत्स्पृष्ट { (**अंतस्थ**) —य्, र्, ल्, व्;
(**उष्मे**) —श्, ष्, स्, ह् ;

कोष्टक २

घोषध्वनी—(१) सर्व स्वर, (२) ग्, घ्, ङ्, ड्, ढ्, ण्, ज्, झ्, ञ्, द्, ध्, न्, ब्, भ्, म्, य्, र्, ल्, व्, ळ्.

अघोषध्वनी—क्, ख्, ट्, ठ्, च्, छ्, त्, थ्, प्, फ्, श्, ष्, स्, ह्.

कोष्टक ३

ऱ्हस्व, दीर्घ व संयुक्त स्वर

ऱ्हस्व (१) अ, इ, उ, ऋ, ऌ.

दीर्घ (२) आ, ई, ऊ, ॠ, ॡ.

संयुक्त (३) ए, ऐ, ओ, औ.

कोष्टक ४

सजातीय व विजातीय स्वर

अ, आ, हे परस्पर सजातीय; इ, ई, हे परस्पर सजातीय; तसेच उ, ऊ; ऋ, ॠ; ऌ, ॡ; ए, ऐ; ओ, औ.

टीप—सर्व स्वर जातीबाहेर विजातीय असतात.

शब्दास प्रत्यय लागताना, किंवा संधी होताना, स्वरांचा परस्परांशी जो संबंध येतो, किंवा त्यांचा एकमेकावर जो परिणाम घडतो, त्याचा विचार करिता स्वरांचे बलवान, मध्यम व दुर्बल असे तीन प्रकार केले पाहिजेत.

उ, ऊ; ए, ऐ; ओ, औ हे सर्वांत बलवान; अ, आ हे मध्यम व इ, ई हे दुर्बल.

बलवान, मध्यम व दुर्बल यांचा परस्परांशी संबंध आला असता जो जास्त जोरदार स्वर असेल तो बहुधा राहतो, व दुसरा जातो.

याची उदाहरणे :

(१) एक + एक = एकेक; एक + ओन = एकोण.

बायको + आंत = बायकोंत; एक + ऊन = एकूण.

जळू + आत = जळूत.

अपवाद—बायका + इ = बायकी

दिवस + ई = दिवशी; साठी; ठाई वगैरे.

§ १६ स्वर व व्यंजने

स्वरांचा उच्चार स्वतंत्रपणे होतो, व व्यंजनांचा होत नाही; हा भेद

दाखविण्याकरिता व्यंजनांचा पाय मोडून (्) ती लिहिण्याची रीत आहे. परंतु व्यवहारात त्यांचा उच्चार करताना त्यांत ‘ अ ’ हा स्वर मिळवून करितात. जसे क, ख, ग, घ, ङ ही व्यंजने आहेत. यांना क-कार, ख-कार, त्याचप्रमाणे स्वरांना अ-कार, आ-कार, इ-कार असेही म्हणतात.

टीप—क्ष्, ज्ञ्, ही जोडाक्षरे आहेत, त्यांचा मूळ अक्षरात अंतर्भाव करण्याची जरूरी नाही. जोडाक्षरे सांगताना देखील त्यांचा वेगळा निर्देश करण्याचे काही कारण असेलच, तर ते इतकेच की ती जोड दिसत नाहीत, साध्या अक्षरांसारखी दिसतात.

त्याचप्रमाणे ‘ ळ् ’ हे व्यंजन मराठीत आहे, संस्कृतात नाही; म्हणून मागील कोष्टकात त्याचे वर्गीकरण केले नाही.

२. मराठी लिपी

§ १७ वर्ण, अक्षरे

ध्वनी हे अनित्य आहेत हे वर सांगितलेच आहे. त्यांना नित्य रूप देण्याकरिता मराठीत जी चिन्हे योजितात त्यांना **वर्ण** (रंगाने लिहावयाची म्हणून) किंवा **अक्षरे** (खोदून लिहावयाची म्हणून) म्हणतात.

मराठीत बहुतेक ध्वनींना स्वतंत्र वर्ण आहेत व बहुतेक वर्णांना ठरीव ध्वनी आहेत. त्यामुळे अक्षरओळख झाली की काहीही वाचता येते. वर्ण जुळवून शब्द तयार करण्याची (Spelling) भानगड मराठीत नाही.

मराठी बालबोध लिपीला देवनागरी लिपी असे म्हणतात. ही आर्यांची लिपी, व आर्यांनी ती आपल्याबरोबर हिंदुस्थानात आणिली. प्राचीन आर्य हे त्या वेळच्या हिंदुस्थानातील मूळच्या द्रविडी रहिवाशांपेक्षा रंगाने गोरे व तेजस्वी होते म्हणून त्यांना देव (प्रकाशमान, तेजस्वी) म्हणत. अनार्य ग्रामांत रहात व आर्य नगरांत राहत, म्हणून त्यांच्या लिपीला देवनागरी असे नाव पडले. कानडी, तामीळ, तेलगू या द्रविडी भाषा, व आरबी, फारसी या सेमिटिक भाषा वगळल्या तर हिंदुस्थानातील इतर भाषा या देवनागरी लिपीतच लिहितात.

§ १८ लिपीविषयी काही विचार

ही लिपी बहुतांशी पूर्ण आहे, निदान इतर लिपींपेक्षा पुष्कळच वरच्या प्रतीची आहे. सर्वस्वी पूर्ण लिपी म्हणजे तीत भाषेत असतील तितक्या सर्व ध्वनींचे द्योतक वर्ण असले पाहिजेत. प्रत्येक ध्वनीला अनुरूप एक स्वतंत्र वर्ण, व प्रत्येक वर्णाला एकच ठरीव उच्चार अशी स्थिती असणे, म्हणजे लिपी व ध्वनी यांच्यांत संगती आहे असे म्हणता येईल. पण, मनुष्याच्या वाचेने निघणाऱ्या या वेगवेगळया ध्वनींत देखील इतक्या बारिक बारिक छटा आहेत की प्रत्येक छटा हा वेगळा उच्चार, वेगळा ध्वनी, असे म्हटले तर तितक्यांना वर्ण शोधून काढणे हे फारच भानगडीचे होईल व वर्णव्यवस्थेला बोजडपणा येईल. म्हणून कोणत्याच लिपीत अशा प्रकारचा पूर्णपणा दिसत नाही व दिसणे शक्य नाही. तरी पण इंग्रजी भाषेतील पाच स्वर व एकवीस व्यंजने (यांतही चार नकोतच), यावरच भाषेतील सर्व ध्वनींचे काम भागविण्यात जी तारेवरची कसरत करावी लागते, तितकी मराठीत मुळीच करावी लागत नाही. तथापि, **आ** हा **अ**चा दीर्घ म्हणण्यापेक्षा **अ** व **लांबट अ** (**घर** यात पहिला लांबट व दुसरा साधा अर्धोच्चारित) यांना वेगवेगळया, व याचप्रमाणे **अ** व **आ** यांना वेगवेगळया खुणा असत्या तर बरे झाले असते असे वाटते. त्याचप्रमाणे च्, ज्, झ्, यांचे जे दोन प्रकारचे वेगवेगळे उच्चार होतात त्यांनाही वेगवेगळे वर्ण असते तर बरे. त्यांच्या अभावी आज एखादा मराठी न समजणारा माणूस 'चार' (४) म्हणतो व 'मी जातो' याच्या ऐवजी 'मी ज्यातो' असे वाचतो. 'चमचा' चे 'च्यमच्या' असे विकृत रूप होते.

§ १९ अनुस्वार व अनुनासिक

अनुस्वार व अनुनासिक ही दोन्ही मराठीत एकाच (÷) चिन्हाने दाखविली जातात. वास्तविक हे उच्चार दोन वेगवेगळे आहेत. चंची, झांज, पंखा, पंडित, यांसारख्या शब्दांत उच्चार खणखणीत, स्पष्ट होतो, व (÷) च्या पुढे पहिल्या पाच स्थानांपैकी ज्या स्थानातील व्यंजन आले असेल त्या प्रकारचा होतो. त्याचे स्पष्ट रूप वर्णाने दाखवावयाचे असेल तर वरील शब्द, चञ्ची, झाञ्ज, पङ्खा, पण्डित असे लिहिले पाहिजेत.

शब्दात अनुस्वारापुढे एखादे अंतस्थ व्यंजन—(य् र् ल् व्), किंवा श् ष् स् ह् यांपैकी व्यंजन आले तर (ं) चा उच्चार खणखणीत होतो. त्याचे प्रत्यन्तर हेच की अशा शब्दात पुढील अक्षर जोड असते. उदा० :—संयोग, संरक्षण, संलग्न, संवर्धन, संशय, संसार, सिंह, हे शब्द जसे उच्चारतात तसेच लिहून दाखवावयाचे असतील तर ते संय्योग, संव्रक्षण, संव्लग्न, संव्वर्धन, सिंव्ह, संव्शय, संव्सार असे लिहावे लागतील. आता, अनुस्वार वं अनुनासिक यांतील फरक कसा उत्पन्न होतो ते पाहू. ते दोन्ही नाकातून उच्चारिले जातात हे उघड आहे. जेव्हा (ं) चा उच्चार स्पष्ट, खणखणीत होत असेल तेव्हा तो अनुस्वार, व जेव्हा ओझरता होत असेल तेव्हा तो अनुसासिक. उदा०—तारांबळ, मांजर हे अनुस्वार; व गांठ, घरें हे अनुसासिक. तसेच-तंव, जंव, घांस, डांस वगैरे निवळ मराठी शब्दांतील (ं) हा अनुसासिक आहे, अनुस्वार नव्हे.

§ २० अनुस्वार व अनुनासिक यांच्या उच्चाराविषयी काही आडाखे

(१) निवळ संस्कृत शब्दात (ं) चा उच्चार अनुस्वारासारखा होतो. उदा० :—शंख, पंडित, रंग, रंभा.

(२) निवळ मराठी शब्दांचे अंतीचा बिंदू; २ निवळ मराठी शब्दात (ं) चे पुढे ल्, व्, स्, ही अक्षरे आली असता; ३ विभक्तीच्या अनेकवचनी सामान्यरूपावरील (ं); हे तिन्ही अनुसासिकच उच्चारले जातात. उदा० :—१ गहूं, हें, घरें, तळें, बीं, असतां, केलें, साठीं...... २ कांसव, आम्हांला, जंव, तंव,.... ३ घोड्यांस, बायकांस.

(३) दीर्घ स्वरावर (ं) असून त्याच्यापुढे अघोष स्पर्शव्यंजन आले तर (ं) चा उच्चार अनुनासिक होतो. जसे :—कांकडी, कांटा, रांठ.

(४) दीर्घ स्वरावर (ं) असून त्याच्यापुढे जर स्पर्शनादव्यंजन आले तर उच्चार अनुस्वारासारखा होतो. उदा०:—गांजा, मांजर, तांदूळ, फांदी.

या शब्दांचे अनुसासिक उच्चार करण्याची चाल कोकण प्रांतात तेवढी दिसते. ती अर्थातच प्रांतीय समजली पाहिजे.

(५) अनुस्वार, विसर्ग व संयुक्त अक्षर पुढे आल्याने मागील ऱ्हस्व स्वराला दीर्घत्व येते, पण अनुनासिक आल्याने येत नाही. जसे:—

संपंन्न मित्र असते तरि येते संकटांत कामाते; सलील तइं मंदराख्यहि नग स्वपृष्ठीं धरा, प्रभुपणिं सहिष्णुत्व बरवें.

यात सं, मं, ही दीर्घ आहेत; इं, णिं, ही ऱ्हस्व आहेत.

३ आघात : अंत्य व उपांत्य

§ २१ अंगे व प्रत्यय

कोणत्याही वाढत्या भाषेतील पुष्कळसे शब्द कृत्रिम, किंवा साधित असतात. अगदी सिद्ध, म्हणजे ज्यांची उत्पत्ती लागत नाही, असे शब्द साधित शब्दांच्या मानाने अगदी कमी. साधित शब्द, भाषेचे अगदी अंतिम भाग असे ज्यांना म्हणता येईल अशा धातूंना किंवा नामांना वगैरे प्रत्यय, उपसर्ग इत्यादि लागून तयार होतात. **या अंतिम भागांना** (मग ते नामवाचक, गुणवाचक, क्रियावाचक कसेही असोत,) **आपण शब्दांचे बुंध किंवा बुडखे किंवा अंगे असे म्हणू.** या अंगांना निरनिराळे प्रत्यय, उपसर्ग वगैरे लागले म्हणजे त्यामुळे शब्दवृक्षाच्या फांद्या, डहाळ्या, पाने वगैरे विस्तार तयार होतो, असे या शब्दसिद्धीचे अलंकारिक वर्णन करिता येईल. या ठिकाणी मुख्य मुद्याची गोष्ट एवढीच आहे, की बहुतेक शब्द साधित असतात. तेवढीच घेऊन पुढे जाऊ.

§ २२ आघाताची उत्पत्ती

या साधित शब्दांचाच विचार करू लागले तर त्यांचे जे दोन भाग — अंगे—बुडखे, व प्रत्यय किंवा उपसर्ग,—यांपैकी जास्त महत्त्वाचे भाग बुडखे हेच होत. कारण, बोलणाराने शब्द उच्चारला म्हणजे त्यातील अर्थाची विशिष्ट छटा किंवा प्रकार, प्रत्यय—उपसर्गांनी कळतो असे म्हटले तर मूळ अर्थच बुडख्यांनी कळतो असे म्हटले पाहिजे. किंवा बुडखे हे शब्दांचे धड व प्रत्यय-उपसर्ग हे शब्दांची इंद्रिये असे म्हटले तरी चालेल. म्हणून बोलणाऱ्याने शब्द उच्चारताना बुडखा स्पष्ट उच्चारलाच पाहिजे; किंवा हीच गोष्ट वेगळ्या रीतीने सांगावयाची तर बोलणाराने बोलताना बुडख्यावर जास्त जोर (व अर्थातच

प्रत्यय-उपसर्गांवर कमी जोर) दिला पाहिजे. प्रत्येक भाषेत कमीजास्ती मानाने हा प्रकार आहे, व तो सयुक्तिकही आहे. भाषेत शब्दांच्या काही भागांवर आघात येत असतील, तर त्यांचा खरा उगम वर सांगितल्याप्रमाणे लाविता येतो. आघात कोणी मुद्दाम देत नाही; ते आपोआपच येतात; व ते प्रत्यय-उपसर्गांवर न येता बुडख्यांवर येतात, हा एक भाषाशास्त्रातला मूल सिद्धान्त म्हणून चालण्याला हरकत नाही.

§ २३ आघाताविषयी काही दंडक

रोजच्या व्यवहारात इतका खोल विचार कोणी करीत नाही. फक्त आमच्या मंत्रद्रष्ट्या ऋषींनी मात्र, देवांच्या संतोषाकरिता यज्ञाच्या वेळी मंत्र शुद्ध म्हटलेच पाहिजेत या विचाराने, शब्दातील आघाताकडे विशेष लक्ष पुरविलेले दिसते. इंग्रजी भाषेतही आघाताकडे विशेष लक्ष पुरविण्यात येते; बहुधा आघात बुडख्यावरच येतो, व तो तसाच उच्चारण्याकडे प्रवृत्ती दिसते. परंतु वर सांगितल्याप्रमाणे, सामान्य लोक भाषेच्या रोजच्या व्यवहारात इतकी दक्षता बाळगीत असतील असे वाटत नाही. भाषा बोलणारांची राहणी, जातिस्वभाव, परिस्थिती, यांचाही परिणाम भाषेवर, उच्चारावर होत असतोच. आणि म्हणूनच वर सांगितलेल्या मूळ सिद्धाताविरुद्ध दंडक किंवा आडाखे भाषेत तयार होत असतात. इंग्रजी भाषेतील अशा प्रकारचा दंडक म्हणजे आघात प्रतिगामी असतो, (The accent tends to shift backwards) हा होय. या दंडकामुळे फ्रेंच colou'r, Honou'r, यांचे इंग्रजी उच्चार col'our, Hon'our असे होतात; व advi'se धातूंतील उच्चार ad'vice या नामात मागे येतो. इंग्रजीत अशी उदाहरणे आणखीही देता येतील. फ्रेंच वगैरे दक्षिण युरोपातील भाषांत हा आघात पुरोगामी म्हणजे पुढे जाणारा आहे (It tends to shift forwards). आमच्या मराठीतही आघाताचा ओघ पुढेच आहे. तो शब्दाच्या शेवटाकडे येतो. शब्दाचे शेवट म्हणजे ऐकणारा व बोलणारा या दोघांच्याही दृष्टीने त्याचा सर्वांत महत्त्वाचा भाग अशी आमची कल्पना दिसते. याच कल्पनेचे आणखी एक उदाहरण सांगावयाचे तर ते आपण वाक्यात क्रियापद शेवटी घालतो हे आहे. क्रियापद वाक्यात शेवटी का घालतात ? तर मुख्य जे म्हणावयाचे तेच क्रियापदाने सांगितलेले असते म्हणून. तोच प्रकार शब्दाच्या अंत्य अक्षराच्या उच्चाराविषयी दिसतो.

§ २४ ऱ्हस्व स्वरांवरील आघात

आघाताविषयी आणखी एकच सामान्य गोष्ट सांगावयाची राहिली. ती ही, की आघातांचे विशेष महत्त्व ऱ्हस्व स्वरांच्या उच्चारात दिसते. दीर्घ स्वर उच्चारावयाला ऱ्हस्व स्वरापेक्षा दुप्पट वेळ लागतो. म्हणजे उच्चारणारा व ऐकणारा यांना उच्चारावयाला व समजावयाला ते तितके सोपे, स्पष्ट उच्चाराचे असे असतात. त्यांचे उच्चार गडबडण्याची भीती कमीच. त्यातल्या त्यात ई, ऊ, ए, ऐ, ओ, औ, हे उच्चाराला जास्त जोरदार, व आ हा त्यांच्या मानाने कमी जोरदार आहे. ऱ्हस्व स्वर मात्र जलदीने उच्चारले जात असल्यामुळे दीर्घ स्वरांच्याजवळ आले म्हणजे उच्चारात गडबडतात. त्यातल्या त्यात इ, उ, यांची गडबड कमी, व अ ची सर्वांत जास्त. इ, ई, उ, ऊ, ए, ऐ, ओ, औ, यांचा हा कणखरपणा सर्व ठिकाणी दिसतो. शब्दांच्या मूळ स्वरूपात ते गडबडले, गळले तरी सामान्य स्वरूपाच्या वेळी, लिंगवचनादी विकार होताना संधीच्या ठिकाणी ते आपला प्रभाव दाखविल्याशिवाय राहात नाही. उदा०— रीत (∠ सं. रीति) हा शब्द मराठीत अकारान्त असला, तरी त्याचे अनेकवचन व सामान्यरूप रीती असेच होते. इ, उ ह्यांना होणारे गुण, वृद्धी, आदेश हे याच नियमाचे दाखले म्हटले पाहिजेत.

फक्त त्यांवर अनुस्वार दिल्याने, किंवा स्त्रीलिंगी व नपुसकलिंगी नामांच्या व क्रियापदांच्या शेवटी आल्यामुळे हे कणखर स्वर देखील थोडेसे नरमतात. उदा० बायको—याची अनेकवचनी रूपे 'बायका' याने होतात. तळे याचे तळी किंवा तळयाला असे होते.

वर दिलेले नियम अगदी सामान्य आहेत, व ते मराठी शब्दांना लागू आहेत. परभाषेतून मराठीत आलेले शब्द जोपर्यंत मराठीत पूर्णपणे आलेले नाहीत व आपला परकेपणा राखू पाहतात, तोपर्यंत त्यांचे उच्चार मूळच्या भाषेतील उच्चाराप्रमाणे होतात. पण त्यांनी मराठीत कायमचे ठाणे दिले, ते पूर्णपणे मराठी बनले म्हणजे त्यांचेही उच्चार मराठीत वरील नियमाप्रमाणे होऊ लागतात. उदा०–गृह, धाम, गुरु, कवि, वगैरे संस्कृत शब्दांचे उच्चार संस्कृतातल्याचप्रमाणे होतात. म्हणजे, त्यांचे अंत्य स्वर पूर्णोच्चारित असतात. पण देव, राम, चोर, रीत (∠ रीति), गत (गति), मध (मधु), यांतील अंत्यस्वरांवर मराठीची छाप पडलेली उघड दिसते.

§ २५ **काही तपशीलवार नियम**

वरील सामान्य नियम एकंदरीत लक्षात घेऊन, त्यांवरून आघात, अंत्य व उपांत्य, यांविषयी काही ठोकळ नियम करावयाचे तर ते असे होतील.

(१) अंत्यस्वर दीर्घ व उपांत्य ऱ्हस्व असेल, तर आघात अंत्य स्वरावर पडतो, व उपांत्याचा उच्चार तोकडा होतो. उपांत्याच्या मागे आणखी एखादे अक्षर असेल, तर त्या उपांत्याचा तोकडेपणा विशेषच दिसतो. जसे :—

१ खरा', भली', घरे'.

२ चमूचा, बकरा, बोलणे, मारतो.

(२) अंत्य व उपांत्य दोन्ही दीर्घ असतील तर अशा शब्दांचे तीन प्रकार होतात, ते असे :–

१ उपांत्य व अंत्य दोन्ही सारखेच कणखर असणे, २ उपांत्य कमी कणकर व अंत्य त्या मानाने जास्त कणखर असणे, ३ उपांत्य जास्त कणखर व अंत्य कमी कणखर असणे.

१, २ } यांत आघात अंत्यावर असतो.

जसे :—१ गाडा, नगारा, फवारा, टोपी, मेथी, ऐदी, देवी, (ए. व.)
२ माशी, भाजी, गाडी, खादी, भाऊ, खाऊ, दारे टाहो, केळी, बोरे, बोरी.

अंत्यस्वराला लिंगवचनाने विकार किंवा सामान्यरूप होऊन होणारा दीर्घ स्वर स्पष्ट उच्चारण्याची जरूरी असल्यामुळे तो (२) मध्येच धरिला पाहिजे.

(३) कणखर उपांत्य व कमी कणखर अंत्य; उदा०--दोरा, फेरा, गोरा, घोडा, वेडा, पीडा वगैरे. यांत अंत्याकडे आघात झुकण्याची प्रवृत्ती लक्षात घेता आघात एकंदरीत समतोल पडतो. परंतु मराठीत पूर्णपणे आलेल्या शब्दात येथेही मराठीची छाप पडली आहे हे **पीडा** याचे **पिडा** असे जे मराठीत रूप होते यावरून दिसेल.

(४) दीर्घ उपांत्य व ऱ्हस्व अंत्य असतील, तर उपांत्य स्वरित होऊन पुढील अंत्य तोकडा किंवा कमजोर होतो. जसे:—गूळ, मूळ, विहीर, बकूळ, रेशीम, भाऊड, परटीण, झाड, ताड, रीत, नीत, जात.

पण अंत्याला लिंगवचनादी विकार होऊन दीर्घत्व आले तर उपांत्य तोकडा होतो. जसें:—गुळास, मुलाने, विहिरी, बकुळी, रेशिमे, भाण्डे, परिटिणीस, झाडास, झाडे, रितीने.

(५) ऱ्हस्व उपांत्य व ऱ्हस्व अंत्य असतील तर उपांत्यावर आघात येऊन अंत्य तोकडा होतो, किंवा कमजोर होतो. जसेंः—घ॑र, त॑र, ज॑र, व॑न, रीत (∠ रीति), ग॑त, म॑ध (∠ मधु).

पण अंत्याला लिंगवचनादी विकार होऊन त्याला दीर्घत्व आले तर आघात अंत्यावर येतो. जसेः—घरे, घरा॑ला, गतीला.

(६) अंत्य जोडाक्षरे, एकाक्षरी शब्द, ही स्पष्ट उच्चारली पाहिजेत.

(७) उपांत्यातील अनुस्वारामुळे पुढील अक्षराचा उच्चार पूर्णत्वाने होतो.

(८) सामासिक, अभ्यस्त वगैरे शब्दांतील आघात ठरविताना, त्यांतील अवयवांचे आघात लक्षांत घेतले पाहिजेत.

(९) संस्कृत तत्सम, त्याचप्रमाणे फारसी, आरबी, इंग्रजी, या परभाषांतून आलेले शब्द नवीन असेपर्यंत उच्चारात त्यांचा मूळपणा कायम ठेवण्याकडे प्रवृत्ती असते; पण दीर्घ परिचयाने ते घरच्यासारखेच वाटू लागले किंवा झाले तर त्यांना मराठीचे नियम लागू होतात. जसेः—दे॑व, री॑त, जा॑त, म॑ध, वन.

४ संधि-प्रकरण

§ २६ संधी म्हणजे काय ?

जवळ जवळ आलेले ध्वनी जोडणे याला संधी (= सांधणे) असे म्हणतात.

व्यंजनांचा स्वतंत्रपणे विचार करता येत नाही, म्हणून त्यांत स्वर मिळवून आपण बाराखड्या तयार करतो; त्या, किंवा एकापेक्षा अधिक व्यंजने जोडल्याने जोडाक्षरे तयार होतात, ती संधीचीच उदाहरणे म्हटली पाहिजेत. परंतु मराठी व्याकरणात संधी या शब्दाचा उपयोग इतक्या व्यापक अर्थाने करीत नाहीत. तर, **उपसर्ग, प्रत्यय, व निरनिराळे शब्द यांच्या योगाने जे नवीन शब्द तयार होतात, ते होताना जवळ जवळ येणारे ध्वनी**

एकत्र होण्याचे जे प्रकार आहेत, त्यांना संधी असे म्हणतात. विभक्तिप्रत्यय वगैरे लागून तयार झालेली शब्दांची रूपे, अव्यये, वाक्यात शेजारी आली असता त्यांचाही संस्कृतात संधी होतो, तसा मराठीत होत नाही. म्हणून त्या अर्थानेही मराठीत संधी नाहीतच.

§ २७ संधी तीन प्रकारचे आहेतः—

स्वरसंधी, व्यंजनसंधी, विसर्गसंधी. पहिल्या दोहोंना संस्कृतात अच् संधी व हल्संधी असे अनुक्रमे म्हणतात.

(१)	स्वर + स्वर	= स्वरसंधी.
(२)	व्यंजन + स्वर व्यंजन + व्यंजन	= व्यंजनसंधी.
(३)	विसर्ग + स्वर विसर्ग + व्यंजन	= विसर्गसंधी.

(अ) स्वरसंधी होताना कित्येक वेळा दुसरा स्वर मुळीच लुप्त होतो, व पहिला तेवढा राहतो, तेव्हा त्या संधीला पूर्वरूपसंधी असे म्हणतात.

(आ) स्वरसंधी होताना जेव्हा दोन्ही स्वरांच्या जागी मिळून दुसरा स्वर येतो, तेव्हा त्या संधीला पररूपसंधी असे म्हणतात.

(इ) दोन स्वजातीय स्वर एकत्र आले असता त्यांच्या जागी त्याच जातीचा दीर्घ स्वर होतो.

(ई) दोन विजातीय स्वर एकत्र आले असता त्यांचा संधी आदेशाने होतो. आदेशाचे तीन प्रकार आहेत ते असेः—

(१) संधी होणाऱ्या दोन्ही स्वरांच्या जागी दुसरा दीर्घ स्वर येणे याला आदेश-असेच म्हणतात. जसेः—

सदा + एव = सदैव, भव + औषधी = भवौषधी.

(२) संधी होणाऱ्या दोन स्वरांच्या जागी तिसराच एक स्वर येणे. याचे दोन प्रकार आहेत तेः —

अ, आ + इ, ई = ए	गुणादेश किंवा गुण
अ, आ + उ, ऊ = ओ	
अ, आ + ऋ, ॠ = अर्	
अ, आ + ऌ, ॡ = अल्	
अ, आ + इ, ई = ऐ	वृद्धी
अ, आ + उ, ऊ = औ	
अ, आ + ऋ, ऋ = आर्	
अ, आ + ऌ, ॡ = आल्	

यांची उदाहरणें :—

१ **गुण**

गण + ईश = गणेश
रमा + ईश = रमेश
वर + उपचार = वरोपचार
धारा + उष्ण = धारोष्ण
एक + ऊन = एकोन, एकूण
गंगा + ऊर्मि = गंगोर्मि
देव + ऋषि = देवर्षि
महा + ऋषि = महर्षि
क्लृप् + ना = कल्पना (गुण होऊन प्रत्यय लागतो.)

२ **वृद्धी**

स्व + ईर = स्वैर
अक्ष + ऊहिनी = अक्षौहिणी
प्र + ऊढ = प्रौढ
दश + ऋण = दशार्ण
सुख + ऋत = सुखार्त

३ **यणादेश**

इ, ई, उ, ऊ, ऋ, ऌ, यांच्या पुढे विजातीय स्वर आला असता अनुक्रमे य्, व्, र्, ल् असे आदेश होतात. जसे :—

प्रीति + अर्थ = प्रीत्यर्थ; नदी + अर्पण = नद्यर्पण; प्रति + उत्तर = प्रत्युत्तर; मनु + अंतर = मन्वंतर; हेतु + आभास = हेत्वाभास.

ए, ऐ, ओ, औ यांच्या जागी अनुक्रमे अय्, आय्, अव्, आव् असे आदेश होतात.

§ २८ वरील नियमांची तपशीलवार उदाहरणे

स्वर-संधी

(अ) **पूर्वरूपसंधी**—कुल + अट = कुलट; सीमन् + अंत = सीमंत; करतो + आहे = करतोहे.

लांबोडा, घामोळ, वसोत, करोत, केलेसे, विहिरीत (विहिरी + आंत).

(आ) **पररूपसंधी**—एक + एक = एकेक, रेघ + ओटी = रेघोटी.

तसेच मराठी शब्दास स्वरादी प्रत्यय लागून होणारी रूपे पररूपसंधीने होतात.

कर + ऊन = करून; चांगला + ई = चांगली; परभू + ईण + परभीण; घर + ई = घरी.

(इ) **सजातीय स्वरांचा संधी**—(स्वर + स्वर = दीर्घ स्वर)

१ सार + असार = सारासार; सुरासुर, वेदांत, धुळाक्षर, सूर्यास्त. २ देव +आलय = देवालय; दीपावली, कुंभार, झोपाळू. ३ विद्या + आरंभ = विद्यारंभ; राजाज्ञा, पोवाडा. ४ विद्या + अर्थी = विद्यार्थी; भाषांतर, गंगार्पण. ५ कवि + इच्छा = कवीच्छा; कवींद्र. ६ कवि + ईश्वर = कवीश्वर; अभीष्ट, अतीत.... ७ देवी + इच्छा = देवीच्छा. ८ मही + ईश = महीश; पार्वतीश. ९ भानु + उदय = भानूदय. १० भू + उद्धार = भूद्धार. ११ भू + ऊर्जित = भूर्जित.

(ई) १ **आदेश**

एक + एक = एकैक, देव + ऐश्वर्य = देवैश्वर्य, भव + औषधि = भवौषधि, बाल + औत्सुक्य = बालौत्सुक्य, सदा + एव = सदैव, विद्या + ऐश्वर्य = विद्यैश्वर्य, गंगा + ओघ = गंगौघ, रमा + औदार्य = रमौदार्य.

२ गुणादेश

ईश्वर + इच्छा = ईश्वरेच्छा, गण + ईश = गणेश, रमा + इच्छा = रमेच्छा, रमा + ईश = रमेश, सूर्य + उदय = सूर्योदय, समुद्र + ऊर्मि = समुद्रोर्मि, गंगा + उत्साह = गंगोत्साह, गंगा + ऊर्मि = गंगोर्मि, देव + ऋषि = देवर्षि.

वृद्धी—उदाहरणे मागे दिलीच आहेत.

३ यणादेश

प्रीति + अर्थ = प्रीत्यर्थ, नदी + अर्पण = नद्यर्पण, गौरी + आनंद, = गौर्यानंद, अति + उत्तम = अत्युत्तम, प्रति + एक = प्रत्येक, मति + ओघ= मत्योघ, मनु + अंतर = मन्वंतर, हेतु + आभास = हेत्वाभास, गुरु + इच्छा = गुर्विच्छा, अनु + एषण = अन्वेषण, पितृ + अर्थ = पित्रर्थ, मातृ + आनंद = मात्रानंद, मातृ + इच्छा = मात्रिच्छा, ऌ + आकृति = लाकृति, ने + अन = नयन, गै + आयन = गायन, गो + ईश्वर = गवीश्वर, नौ + इक = नाविक.

व्यंजन-संधी

(१) स्पर्श म्हणजे वर्गीय व्यंजनापुढे अनुनासिक व्यंजन आल्यास पहिल्याच्या जागी सवर्ग अनुनासिक येते.

स्पर्शव्यंजन + अनुनासिक = त्या वर्गाचे अनुनासिक येते.

दिग् + नाद = दिङ्नाद, षट् + मास = षण्मास, वाक् + मन = वाङ्मन, तत्+मन = तन्मन, भगवत् + नाम = भगवन्नाम, मृत् + मय = मृण्मय.

(२) घोषव्यंजन + अघोषव्यंजन, अघोषव्यंजन + अघोषव्यंजन, =अघोषव्यंजन येते.

उदा० :—शरद् + काल = शरत्काल, क्षुध् + तृषा = क्षुत्तृषा, क्षुध् + पिपासा = क्षुत्पिपासा, वाच् + पति = वाक्पति, मुद् + पालन = मुत्पालन, प्रावृष् + काल = प्रावृट्काल, सरित् + पति = सरित्पति.

घोषव्यंजन + घोषव्यंजन किंवा स्वर, अघोषव्यंजन + घोषव्यंजन = घोषव्यंजन येते.

उदा० :—क्षुद् + भय = क्षुद्भय, मृद् + बाहु =मृद्बाहु, शरद् + ऋतु शरदृतु, शरद् + उत्पल = शरदुत्पल, वाच् + गुरु = वाग्गुरु, दिक्, दिश् +

अंबर = दिगंबर, षट् + रिपु = षड्रिपु, सत् + आचार = सदाचार, दिक् + विजय = दिग्विजय, अप् + ज = अब्ज.

(३) तवर्गव्यंजन + चवर्गव्यंजन } = चवर्गातील व्यंजन येते.
चवर्गव्यंजन + चवर्गव्यंजन

उदा०--तत् + चरित्र = तच्चरित्र, तत् + छत्र = तच्छत्र, सत् + जन = सज्जन, शरत् + झंजावात = शरज्झंजावात.

(४) तवर्गव्यंजन + टवर्गव्यंजन } = टवर्गातील व्यंजन येते.
टवर्गअल्पप्रमाण+टवर्गव्यंजन

उदा० :—तत् + टीका = तट्टीका, भगवत् + डमरू = भगवड्डमरू. तवर्गव्यंजन + ल =ल्ल. भगवल्लीला, जगल्लय, सुहल्लाभ. तवर्गव्यंजन + श = च्छ. सत् + शिष्य = सच्छिष्य, उत् + शृंखल = उच्छृंखल, मत् + शर = मच्छर.

(५) न् + च्, छ् = अनुस्वारपूर्वक श्च, न् + ट्, ठ् = अनुस्वारपूर्वक ष्ट, त् + त् = अनुस्वारपूर्वक स्त; न् + ल् = अनुस्वारपूर्वक ल्ल.

उदा०--कस्मिन् + चित् = कस्मिंश्चित्, भवान् + तरति = भवांस्तरति, भवान्+लिखति=भवांल्लिखति.

(६) न् + शब्द } = न चा लोप होतो.
न् + प्रत्यय

उदा०:--राजन् + आज्ञा = राजाज्ञा, राजगृह, हस्तिदंत, प्राणिमात्र ही आणखी उदाहरणे समजावी.

(७) एकाच शब्दात न् मागे ष्, र, ऋ, ॠ आल्यास न् चा ण् होतो. दोहोंच्या मध्ये कवर्ग, पवर्ग यांतील व्यंजन, ह, य्, व् र, अनुस्वार किंवा स्वर आलेला असेल तरीही हाच विकार होतो.

उदा०--भाषण, रमण, चर्वण, विष्णु, प्रणाम, परिणत, रामायण.

किरकोळ नियम

संधीतील पहिले व्यंजन घोषअल्पप्राण (ग्, ज्, ड्, द्, ब्,) असेल तर व पुढील व्यंजन ह् असेल तर ह् बद्दल, विकल्पाने, त्याच वर्गातील घोषमहाप्राण (घ्, झ्, ढ्, ध्, भ्, यांपैकी) वर्ण येतो; जसे :--वाच् + हरि = वाग्हरि

किंवा वाग्घरि. उत् + हरण = उद्‌हरण, उद्धरण. ईषत् + हीन = ईषद्‌हीन, ईषद्धीन.

अ, आ, खेरीज कोणताही स्वर, कवर्ग, अंतस्थ + स्, ष् = ष्.

प्रति + संग = प्रतिषंग, नि + सिद्ध = निषिद्ध, अनु + संग = अनुषंग, वि + सम = विषम; परंतु वि + स्मरण = विस्मरण.

ऱ्हस्व स्वर + छ् = च्छ्. इक्षु + छाया = इक्षुच्छाया; आ + छ् = च्छ् आच्छादन, लक्ष्मीच्छाया.

अहन् + गण = अहर्गण, अहन् + मुख = अहर्मुख.

(अपवाद) अहन् + रात्र = अहोरात्र.

विसर्गसंधी

विसर्ग, स्.

(१) विसर्ग (अः) + अ, आ, घोषवर्ण व्यंजन = ओ.

उदा० —अधः + वदन = अधोवदन, रजः + गुण = रजोगुण, मनोरथ, मनोवृत्ती.

(अपवाद)–पुनर्जन्म, अंतर्गत.

(२) विसर्गाच्या मागे अ किंवा आ यांच्याशिवाय इतर स्वर असून पुढे घोषवर्ण आला असता विसर्गाचा र् होतो.

उदा० —बहिः + द्वार = बहिर्द्वार, दुः + आत्मा = दुरात्मा, निर्लोभ, निरंतर; पुनरुक्ती यातील विसर्ग मूळचा र् आहे. पण निः + रस = नीरस.

अः + स्वर = विसर्गाचा लोप होतो. **उदा०** अतः + एव = अतएव.

(३) विसर्गापुढे क्, ख्, प्, फ् आल्यास विसर्ग तसाच राहतो; **उदा०** रजःकण, अधःपतन, दुःख.

(४) विसर्ग + श्, ष्, स् } श्श्, ष्ष्, स्स्, किंवा विसर्ग तसाच राहतो.

उदा० —दुःशासन-दुश्शासन, अधःस्वस्तिक -अधस्स्वस्तिक, (१) विसर्ग + त्, थ् = स्त, स्थ् (२) विसर्ग + च्, छ् = श्च, श्छ् (३) विसर्ग + ट, ठ् = ष्ट्, ष्ठ्.

उदा०—अधः + तल = अधस्तल, शनैः + चर = शनैश्चर, अधः + च्छवि = अधश्छवि, रामः + टीकते = रामष्टीकते.

(३) **चे अपवाद** (१) इकार व उकार यांचेपुढे प्रत्ययभिन्न विसर्ग असून पुढे क्, ख्, प्, फ् आल्यास विसर्गाबद्दल प्रायः ष् होतो.

उदा० —निः + कारण = निष्कारण; निष्फल, दुष्कृत, दुष्प्रकृति. पण दुः + ख = दुःख. निः + पक्ष = निःपक्ष. (२) काही शब्दांत विसर्गाबद्दल स् होतो. **उदा०** —तिरस्कार, नमस्कार, भास्कर, यशस्कर.

प्रकरण तिसरे

नामविचार

§ २९ नाम म्हणजे काय ?

' नाम ' हे संस्कृत, त्याचे मराठी रूप नाव; नाम आणि नाव एकच. **कोणत्याही वस्तूचे नाव** (मग ती वस्तू खरी असो की काल्पनिक असो, जड पदार्थ असो की सूक्ष्म असो) **म्हणजे नाम,** असे नामाचे स्वरूप ढोकळ मानाने सांगता येईल. व्यवहाराला हे वर्णन पुरेसे आहे. पण शास्त्रीय रीतीने शुद्ध अशी नामाची व्याख्या करावयाची तर तीतून नाम व नाव हे दोन्ही शब्द वगळले पाहिजेत. ते वगळून, **कोणतीही वस्तू ज्या शब्दाने प्रत्यक्ष रीतीने दर्शविली जाते तो शब्द, वस्तू दाखविणारा शब्द, म्हणजे नाम** अशी नामाची व्याख्या केली असता चालेल. उदा० — रामा अभ्यासी मुलगा आहे; तो नियमाने शाळेत जातो. या वाक्यांत **रामा, मुलगा, तो** या शब्दांनी एकच पदार्थ दर्शविला जातो. पण **रामा, मुलगा** हे शब्द तो प्रत्यक्षपणे किंवा स्वतंत्रपणे दाखवितात. म्हणून त्यांना नामे असे म्हणावयाचे. उलट पक्षी **तो** या शब्दाला स्वतंत्र असा अर्थ नाही. **रामा, मुलगा** किंवा यासारखा दुसरा एखादा शब्द अगोदर आला असेल तेव्हा त्याच्या अनुरोधाने **तो** या शब्दाचा अर्थ समजतो. **तो** याने मुलगा ही वस्तू जरी दाखविली जाते, तरी ती अप्रत्यक्षपणे दाखविली जाते. अर्थातच **तो** हे नाम नव्हे.

टीपः—वरील व्याख्येतील वस्तू या शब्दाची थोडीशी जास्त फोड केली पाहिजे असे वाटते. वस्तू म्हणजे अस्तित्व जिला आहे ती. घोडा, तांबडेपणा, क्रौर्य या सगळ्या अशा अर्थाने वस्तूच आहेत; कारण त्यांना जड सृष्टीत किंवा मनःसृष्टीत कोठे तरी खरेपणा आहे. उलटपक्षी, क्षीरसागर, घोड्याचे शिंग, यांना वास्तविकपणा कोठेच नाही. ते केवळ कल्पनेचे तरंग आहेत. तरी देखील, त्यांनाही व्याकरणकार ' वस्तू ' च म्हणणार; कारण, व्याकरणकाराच्या दृष्टीने बोलणारा ज्यावेळी या पदार्थांविषयी बोलतो त्यावेळी तो, तात्पुरते का होईना, त्यांचे वास्तविकपण गृहीत धरून चालतो. तात्पर्य काय की, व्याकरणकाराच्या

दृष्टीने वस्तू खरोखरच डोळ्यांनी, कानांनी वगैरे समजणारी असो किंवा मनाने प्रतीत होणारी, समजणारी असो, ती वस्तूच, व ती दाखविणारा शब्द ते नाम.

नामांचे प्रकार

घोडा, लोखंड, हिमालय, मुंबई, कृष्णानदी, रामदास, तांबडेपणा, शहाणपण, क्रौर्य, क्षीरसागर.

§ ३० सामान्यनाम

वर सांगितलेले सर्व शब्द वस्तूंची नावे म्हणजे नामे आहेत हे सहजच लक्षात येण्यासारखे आहे. पण ती सर्व एकसारखी नाहीत. उदा०—घोडा हे एक प्राण्याचे नाव आहे, व त्या शब्दाने घोड्याच्या सर्व जातीचा बोध होतो; त्याचप्रमाणे या जातीपैकी कोणत्याही एका प्राण्याला, व्यक्तीला, ते नाव लागते. तसेच 'लोखंड' याने त्या सर्व धातूचा बोध होतो, व तो शब्द त्या धातूच्या कोणत्याही पदार्थाला, किंवा अंशाला लाविता येईल. तसेच यांसारखे आणखी काही शब्द घेतले (उदा० गाय, माणूस, कळप, सोने, पाणी) तरी असेच दिसेल की, यांपैकी प्रत्येक नाम त्या त्या जातीला लागते व त्या त्या जातींपैकी प्रत्येक व्यक्तीलाही लागते. अशा प्रकारच्या शब्दांनी सर्व जातीचा किंवा त्यातील कोणत्याही व्यक्तीचा बोध होतो. याचे कारण, त्या जातीच्या प्रत्येक व्यक्तीत, व अर्थातच सर्व जातीतही, काही समान किंवा सामान्य गुण असतात हे होय. उदा० –गाय म्हटली म्हणजे तिला चार पाय, शिंगे... दुभते वगैरे गुण असावयाचेच; माणूस म्हटले, की प्राण्यांची सामान्य लक्षणे त्याच्या ठिकाणी असून शिवाय विचार करण्याची शक्ती हा जो मनुष्याचा विशेष गुण तो असावयाचाच. तात्पर्य काय, तर माणूस, गाय, लोखंड, हे किंवा यांसारखे इतर शब्द, **त्यांच्यावरून सुचविल्या जाणाऱ्या सामान्य धर्मामुळे, काही व्यक्तींस व त्या व्यक्तींनी मिळून होणाऱ्या सर्व जातीस सामान्यपणे लागतात. म्हणून व्याकरणात त्यास सामान्यनामे म्हटले आहे.**

पदार्थवाचक
व
समुदायवाचक } नामे वेगळी मानावी की नाही ?

टीप—वरील विवेचनावरून दोन प्रकारच्या शंका सुचतात, त्या अशा:—
(१) गाय, माणूस, घड्याळ यांसारखे शब्द घेतले तर ते त्या त्या सर्व जातीला व जातीतील सर्व व्यक्तींना लागतात, हे समजणे सोपे आहे. पण लोखंड, पाणी, सोने, यांसारखे शब्द घेतले म्हणजे त्यांतील जाती कोणत्या व व्यक्ती कोणत्या? (२) त्याचप्रमाणे लोक, कळप, फौज यांसारख्या शब्दांनी त्या त्या जातीतल्या व्यक्तींचा, म्हणजे माणसे, मेंढ्या, हरिणे, शिपाई वगैरेंचा व्यक्तिशः निर्देश होत नाही; तर त्या त्या प्रकारच्या अनेक व्यक्ती मिळून जे समुदाय होतात त्या त्या समुदायांचा निर्देश होतो. तेव्हा या दोन प्रकारच्या शब्दांचा समावेश सामान्यनामात करावयाचा की नाही?

यांपैकी पहिल्या शंकेचे उत्तर असे:—लोखंड, सोने, पाणी, यांसारखे शब्द व्यक्तींना लागत नाहीत ही गोष्ट खरी; पण त्याचे कारण त्या शब्दांत काही उणेपणा आहे हे नसून त्या त्या जातीच्या व्यक्ती नाहीत हे होय. एक गाय किंवा एक माणूस दुसऱ्या गाईपासून किंवा माणसापासून वेगळे असे जसे गाय, माणूस यांच्यासंबंधाने म्हणता येते, तसे एक लोखंड दुसऱ्या लोखंडापासून निराळे असे म्हणता येत नाही; कारण, लोखंडाचे माप संख्येने करता येत नाही, परिमाणाने करावे लागते. परंतु ज्यावेळी आपण सामान्यनामाची व्याख्या करितो, त्यावेळी या नामाने दर्शविल्या जाणाऱ्या पदार्थांचे मोजमाप संख्येने करता येईल की परिमाणाने करता येईल, हे पाहून ती व्याख्या करीत नाही. खरोखर पाहता, तशा प्रकारे व्याख्या करण्याचे कारणच नाही. त्या त्या पदार्थांच्या सर्व भागांत किंवा शब्दाने दर्शविल्या जाणाऱ्या व्यक्तींत काही गुण सारखे सापडतात, सामान्यपणाने असतात—मग त्या पदार्थांचे माप संख्येने करता येवो किंवा परिमाणाने करता येवो—म्हणून त्या त्या पदार्थांचे वाचक जे शब्द त्यांना आपण सामान्यनामे म्हणतो. सर्व माणसांत मनुष्यत्व हे सामान्यत्वाने असते म्हणून माणूस हे सामान्यनाम. त्याचप्रमाणे लोखंडात सर्वत्र लोखंडीपणा किंवा लोहत्व असते म्हणून लोखंड हेही सामान्यनामच. लोखंडाच्या एखाद्या मोठ्या राशीला जसे आपण लोखंड म्हणतो, तसेच एखाद्या तुकड्यालाही लोखंडच म्हणता येते.

पाणी नदीत असले काय किंवा भांड्यात असले काय, त्याला पाणीच म्हणतात. एखाद्या पदार्थात जे गुण असतील, ते साधारणपणे ज्या पदार्थांत दिसतील त्याचे दर्शक, व त्या गुणांच्या सामान्यत्वामुळे—त्यांच्या द्वाराने—

त्या पदार्थांची ओळख करून देणारे ते सामान्यनाम. अशा अर्थाने माणूस, गाय, पाणी, लोखंड या सर्वांना सामान्यनामेच म्हटले पाहिजे.

लोखंड, पाणी इत्यादि प्रकारच्या शब्दांना पदार्थवाचक नामे म्हणावे असे काहींचे म्हणणे आहे. इंग्रजी भाषेत अशा नामांच्या मागे उपपद येत नाही, व सामान्यनामाच्यामागे ते यावेच लागते, असा फरक असल्यामुळे तेथे दोन निराळे प्रकार करण्याची जरुरी वाटते, तशी मराठीत जरूर नाही. म्हणून पदार्थवाचक नामे हा एक वेगळा भेद मराठीत करू नये.

वरील विचारसरणी लक्षात ठेविली म्हणजे कळप, फौज, लोक ... अशा प्रकारच्या शब्दांनाही सामान्यनामे का म्हटले पाहिजे हे लक्षात येण्यासारखे आहे. ‘ फौज ’ हा शब्द घ्या. फौजेतल्या प्रत्येक व्यक्तीला फौज म्हणता येत नाही, तर शिस्तीने व जुटीने वागण्याची तयारी, लढाऊपणा, इत्यादि गुणांमुळे एखाद्या माणसांच्या समुदायाला फौज म्हणतात; व हे सामान्यगुण ज्या ज्या समुदायात आढळतात त्या सर्व समुदायांना फौज हे नाव व्यक्तिशः (म्हणजे समुदायाला) व सर्व जातीला (म्हणजे फौजांना) लागते. ‘ इंग्रजी फौज ’, ‘ अफगाण फौज ’ या प्रयोगांत फौज हा शब्द एकेक समुदायाला लावलेला आहे. ‘ सर्व फौजा रणांगणावर सज्ज झाल्या ’ या उदाहरणात तो जातीला लावलेला आहे. अशा प्रकाराने ‘ फौज ’ हे सामान्य नामच ठरते. त्याच रीतीने पाहिले म्हणजे लांडग्यांचे कळप, हरिणांचे कळप, या कळपजातीच्या व्यक्तींना व सर्व कळपजातीला, म्हणजे त्या सर्व ‘ वस्तु ’ला कळप हा शब्द लागतो. राष्ट्र, लोक, मंडळी, सभा, थवा वगैरे सर्व समुदायवाचक शब्दांचाही उपयोग अशाच रीतीने होतो. म्हणून ही सर्व सामान्यनामे म्हटली पाहिजेत.

इंग्रजीतील (Collective noun)च्या धर्तीवर मराठीत समुदायवाचक नाम हे वेगळे मानावे असे काहीजण म्हणतात, त्या मताचे निराकारण वर केलेच आहे. इंग्रजीत (Collective noun) समुदायवाचक नामाचा उपयोग दोन प्रकारांनी होतो. एखाद्या समुदायाविषयी एकत्रपणे बोलावयाचे असेल, तेव्हा त्याच्यासंबंधी येणारे क्रियापद एकवचनी असते; पण त्याच समुदायातील घटकांसंबंधी व्यक्तिशः बोलावयाचे असेल, तर क्रियापद अनेकवचनी असते. सामान्यनाम व समुदायवाचक नाम, यांच्या उपयोगात हा सूक्ष्म भेद इंग्रजी भाषेत असल्यामुळे तेथे

समुदायवाचक नामे वेगळी मानण्याची जरूरी असेल; मराठीत असा काहीच संप्रदाय नसल्यामुळे नामांचा एक नवीन प्रकार करण्याची जरूरी नाही.

§ ३१ **विशेषनामे**

आता दुसऱ्या एका प्रकारचे शब्द घेऊ. अहमदनगर, हिमालय, अकबर, गंगानदी, शिवाजी, कृष्ण, कालिदास. यांपैकी कित्येकांना मूळचे काही अर्थ असतात.उदा०—हिमालय म्हणजे बर्फाचे घर; कृष्ण = काळा; कालिदास = काली देवीचा भक्त. परंतु आजची या व अशा इतर शब्दांची स्थिती काय आहे ! बर्फाच्या कोणत्याही घराला आपण हिमालय म्हणत नाही. किंवा ज्या ज्या पर्वतावर नेहमी बर्फ पडते, अशा सर्व पर्वतांनाही हिमालय म्हणत नाही. तर एका अमुकच पदार्थाला ते नाव लावितो. पहिल्याने ज्यांनी त्याला हिमालय म्हटले, त्यांच्या मनात ते बर्फाचे किंवा थंडीचे घरच आहे, असा अर्थ असलाच पाहिजे. पण आज प्रत्येक वेळी आपण ते नाव वापरताना त्या शब्दाचा तो अन्वर्थकपणा आपल्या लक्षात असतोच असे काही नाही. आपण आज ते नाव एका अमुकच पदार्थाला—पर्वताला—**खुणेकरिता** देतो. त्याप्रमाणे, कृष्ण = काळा हे नाव मूळचे एखाद्या काळ्या माणसाला ठेवलेले असले, तरी आजचे सर्व कृष्ण काळेच असतात असे थोडेच आहे ! काही 'कृष्ण' उजळ गोरे असतात, तर काही 'कृष्णा गोरे', काळे किंवा गोरे काहीच नसून, सावळे असतात. तसेच पुष्कळशा लक्ष्मीबाई अगदी दरिद्री, शांताबाई रागीट चिडखोर, आणि सरस्वतीबाई अगदी मूर्ख असतात की नाही ! त्याचप्रमाणे, आज एखाद्या गावात वडाचे एकही झाड नसले तरी त्याला जे कधी **वडगाव** हे नाव मिळाले असेल ते तसेच चालते. ह्यावरून दिसते ते हे, की अशा प्रकारच्या शब्दांचा उपयोग बहुधा खुणेकरिताच होतो. एखाद्या ठिकाणी या नामाला सार्थकता असेलही. एखादी शांताबाई खरोखरच शांत स्वभावाची असेलही पण सार्थकता असणे किंवा नसणे ही काही या शब्दांच्या संबंधाने महत्त्वाची बाब नाही. अमुकच तो पदार्थ असे त्यांनी दाखविले म्हणजे त्यांचे काम झाले. **तेव्हा अशा प्रकारची जी केवळ खुणेकरिता दिलेली नावे—ज्यांना सार्थकता मुळीच नसते किंवा असली तरी ती गौण असते—ती त्या त्या वस्तूंची विशेष नामे.** म्हणून त्यांना व्याकरणात **विशेषनामे** असे म्हटले आहे.

§ ३२ भाववाचक नामे

आता, आणखी एक प्रकारचे शब्द विचारात घेऊन हा नामाच्या प्रकाराचा विचार संपवू. पिवळेपणा, निळेपणा, क्रूरपणा, औदार्य....ही नांवे कोणत्याही व्यक्तीची नसून मुख्यतः गुणांची आहेत हे उघड आहे. पण गुण किंवा धर्म स्वतंत्र वेगळे राहत नाहीत. ते कोणत्या तरी, रंगरूप असलेल्या, जड वस्तूंच्या आश्रयानेच राहतात. पिवळेपणा दाखवा म्हटले तर कोणत्यातरी पिवळ्या रंगाच्या वस्तूकडेच बोट दाखवावे लागते. तसेच, क्रौर्य, औदार्य हे गुण क्रूर किंवा उदार स्वभावाच्या माणसांच्या किंवा तशा प्रकारच्या कृत्यांच्या आश्रयानेच असावयाचे; त्यांना जड, भौतिक सृष्टीत वेगळे अस्तित्व नाही. मनःसृष्टीत मात्र ते राहणारे; त्यांचा विचार करता येतो, किंवा कल्पनेने ते जाणता येतात. तेव्हा त्यांचे अस्तित्व, मनःसृष्टीत का असेना, ते आहे; व त्यांच्या योगाने कोणत्याही पदार्थांचा किंवा व्यक्तीचा बोध न होता, व्यक्तीच्या आश्रयाने राहणाऱ्या गुणांचा बोध होतो. म्हणून त्यांना गुणवाचक किंवा **भाववाचक** नामे असे म्हणतात.

भाववाचक नामांचा सामान्यनामांप्रमाणे उपयोग

टीप—भाववाचक नामांचा उपयोग सामान्यनामांप्रमाणे कधीच होत नाही, म्हणजे त्यांनी व्यक्ती कधीच दाखविल्या जात नाहीत, असे मात्र नाही. ही गोष्ट उदाहरणाने स्पष्ट करून दाखावतो. तांबडेपणा, पिवळेपणा, हे रंगाचे प्रकार घेतले तर ते प्रकार म्हणजे ‘ व्यक्ती ’ व रंग ही त्या व्यक्तींची मिळून झालेली ‘ जात ’ असे म्हणता येईल. तेव्हा ‘ तांबडेपणा, हिरवेपणा, हे रंग आहेत ’, अशा वाक्यात रंग हे सामान्यनामासारखे समजले पाहिजे.

भाववाचक नामे कशी होतात ?

सामान्यनामे, विशेषणे व धातू यांना प्रत्यय लागून भाववाचक नामे तयार होतात. ते प्रत्यय लिंगभेदाने खाली दिले आहेत व ते लाविताना मूळच्या शब्दाला जर काही फेरफार करावयाचे असले तर त्यांचे स्वरूपही थोडक्यात सांगितले आहे.

भाववाचक नामांचे प्रत्यय

पुल्लिंगी—या, इमा—लघिमा, महिमा, गरिमा (मोठेपणा).

पणा—शहाणपणा, मोठेपणा, चांगुलपणा.
वा—गारवा, ओलावा, थंडावा,
स्त्रीलिंगी—ईक, इकी—सोयरीक, आगळीक, गिऱ्हाइकी. } (पररूपसंधीने)
ई—ग़रिबी, श्रीमंती.
की—पाटिलकी, गावकी.
गिरी—सोदेगिरी, भामटेगिरी.
ता—समता, सरलता.
नपुसकलिंगी—अ-गौरव, मार्दव, लाघव (मूळ विशेषणाला वृद्धी होऊन)
पण—शहाणपण, भलेपण.
त्व—लघुत्व, गुरुत्व.
य—शैत्य, क्रौर्य (मूळ विशेषणाला वृद्धी होऊन)

§ ३३ नामांचे उपयोग

(१) क्रियेचा कर्ता किंवा क्रियेचे कर्म हे नामाचे दोन मुख्य उपयोग आहेत; उदा०—**घोडा** पळाला; **रामाने रावण** मारला.

(२) काही क्रियापदांच्या अर्थाला पूर्णपणा येण्यासाठी त्यांचा कर्ता व त्यांचे कर्म यांशिवाय आणखी काही शब्दांची जरुरी असते. अशा वेळी पूरक शब्द म्हणून नामांचा बहुधा उपयोग होतो.

राम **राजा** झाला. शिवाजी शहाजीचा **पुत्र** होता. मुंबई हे व्यापारी **शहर** आहे. या वाक्यांत राजा, पुत्र, शहर हे पूरक शब्द म्हणून योजिले आहेत.

(३) नामांना विभक्ति-प्रत्यय लागून किंवा शब्दयोगी-अव्यये लागून होणाऱ्या रूपांवरून क्रियेचे निरनिराळे प्रकार व्यक्त होतात. जसे :—

मी **मुंबईस** गेलो. मुलगा **लेखणीने कागदावर** लिहितो. रामा **गावाहून** आला. मी **पायात** जोडा घालतो.

या वाक्यांत त्या त्या क्रियांचे निरनिराळे प्रकार मुंबईस, लेखणीने, कागदावर, गावाहून, पायात या नामांच्या रूपांमुळे व्यक्त झाले आहेत.

(४) नामांना षष्ठी विभक्तीचे प्रत्यय लागले म्हणजे किंवा सामासिक शब्दांत, त्यांचा उपयोग विशेषणासारखा होतो. जसे :—

सोन्याची आंगठी, **वाघाची** शिकार, **वायु**वेग, **नेत्र**सुख—या उदाहरणांत सोन्याची, वाघाची, वायू, नेत्र, या शब्दांचा उपयोग विशेषणांसारखा झालेला आहे.

(५) दुसऱ्या नामांचा अर्थ विशेष स्पष्ट करण्यासाठी किंवा वाढविण्यासाठी नामांचा केव्हा केव्हा उपयोग होतो.

शिवाजीचा पुत्र संभाजी हा राजा झाला. तुकाराम, **देहू येथील वाणी**, हे भगवद्भक्त होते. **शककर्ता** शालिवाहन हा दक्षिणेत होऊन गेला. या उदाहरणांत, शिवाजीचा पुत्र, देहू येथील वाणी, शककर्ता, या नामांनी अनुक्रमे संभाजी, तुकाराम, शालिवाहन यांचे अर्थ वाढविले आहेत.

(६) कित्येक वेळा नामांचा उपयोग क्रियाविशेषणांसारखा होतो; जसे:— तो काय **दगड** लिहितो! यात **दगड** हे क्रियाविशेषण आहे.

§ ३४ नामांच्याबद्दल येणारे शब्द

१ सर्वनामे नामांच्या जागी येतात. रामा काल गावाहून आला. **तो** काही दिवस येथे राहणार आहे. यात तो हे सर्वनाम रामाच्या जागी आले आहे. गर्जेल **तो** पडेल काय ?

२ मराठीत केव्हा केव्हा विशेषणाचा उपयोग नामासारखा होतो; जसे:— **शाहण्या**स शब्दाचा मार; **आंधळ्या**सि जन अवघेचि आंधळे.

३ धातुसाधितांचा उपयोग नामाच्या ऐवजी होतो; जसे:—**बोलणे** सोपे, **करणे** अवघड आहे.

४ क्रियाविशेषणांचा उपयोग केव्हा केव्हा नामांच्या जागी होतो; जसे: — **कधीच्या कधी, का, कसे,** अशा सबबी सांगू नको.

५ केवलप्रयोगी अव्ययांचा उपयोग नामासारखा होतो; जसे:—त्याची **वाहवा** झाली.

६ केव्हा केव्हा सबंध वाक्याचा उपयोग नामाऐवजी करता येतो; जसे:—**उडावे** हा पक्षांचा जातिस्वभावच आहे. **मी काय करावे,** हे तुम्ही सांगा. **जर पैसा असेल तर** (पैशाने) सर्व गोष्टी साध्य होतात.

७ बोलण्यात काय किंवा लिहिण्यात काय, तोच तोच शब्द अनेक वेळा आला, तर त्याचा कंटाळा येतो; म्हणून एका नामाच्या जागी त्याच अर्थाची दुसरी नामे घालून लेखनाला विविधपणा व सौंदर्य आणता येते हाही नामांचा एक उपयोग आहेच.

———

प्रकरण चौथे

लिंगविचार

§ ३५ नामांना होणारे विकार

शब्दास अर्थ आहेत. पण बोलणाराच्या किंवा लिहिणाराच्या मनातील अर्थ नुसत्या शब्दांनीच नेहमी व्यक्त होत नाही. शब्दांची योग्य रीतीने जुळणी करून ते वाक्यात योग्य ठिकाणी घालावे लागतात. आता शब्दांची योग्य प्रकाराने जुळणी करावयाची ती देखील नुसत्या शब्दांची, म्हणजे त्यांच्या मूळ रूपांचीच होत नाही. आगगाडीचे डबे एकमेकांशी जोडावयाचे म्हणजे त्याला आकडे, साखळ्या अशी काही तरी साधने लागतात, तोच प्रकार शब्दांचा आहे. शब्दांची एकमेकाशी जुळणी व्हावयाला केव्हा केव्हा इतर शब्दांचे, प्रत्ययांचे वगैरे सहाय्य घ्यावे लागते, व असे विकार झाल्यानंतर शब्द एकमेकांशी जोडण्याजोगे होतात. अशा प्रकारचे विकार काही प्रकारच्या शब्दांना होतात, काहींना होत नाहीत, ही गोष्ट पूर्वी सांगितलीच आहे. प्रस्तुत ठिकाणी नामांना जे विकार होतात त्यांचा विचार करावयाचा आहे.

§ ३६ लिंग, वचन व विभक्ती

हे विकार तीन प्रकारचे आहेत व त्यांना लिंग, वचन आणि विभक्ती असे म्हणतात. यांपैकी लिंगाचा विचार या प्रकरणात करून पुढील दोन प्रकरणांत अनुक्रमे वचन व विभक्ती यांचा विचार केला आहे.

§ ३७ लिंग म्हणजे काय ?

सजीव प्राण्यांमधील स्त्रीपुरुषभेदास लिंग म्हणतात. **व्याकरणातील लिंगभेद हा तत्त्वतः या नैसर्गिक लिंगभेदावरच रचिलेला आहे.**

परंतु मूळच्या लहानशा नदीच्या प्रवाहाचा ज्याप्रमाणे पुढे इतर ओहोळ, नद्या, प्रवाह वगैरे मिळून व कालवे, पाटबंधारे यांच्या द्वाराने विस्तार होत जातो, किंवा मार्ग बदलत जातो, तशीच या व्याकरणातील लिंगभेदाचीही स्थिती झालेली आहे. नैसर्गिक लिंगभेद हा सजीव प्राण्यात तेवढा आहे, तर व्याकरणातील लिंगभेद हा सर्व वस्तूंना लागू आहे. पण त्याने मूळचा पाया अगदीच सोडलेला नाही. कसे ते आता आपण पाहू.

§ ३८ पुल्लिंग, स्त्रीलिंग

सजीव प्राण्यांपैकी जे पुरुषजातीचे असतील त्यांचे पुल्लिंग, व जे स्त्रीजातीचे असतील त्यांचे स्त्रीलिंग व्याकरणात मानले पाहिजे व ते तसे मानतातही.

पण मराठीत या नियमालाही एक अपवाद दिसतो. अपवाद नसेल, तर नियम कसचा! स्त्रियांच्या संबंधाने मर्यादेने परक्याशी बोलताना पुरुष त्यांचा उल्लेख सामान्य नावाने—माणसे या शब्दाने—करितात; जसेः—आमची 'माणसे' आली आहेत. यावरून 'बायकामाणसे' [= बायका] याचे लिंग नपुसकलिंग झाले. त्याचप्रमाणे क्षुद्रत्व दर्शविण्याकरिता [उदा०—१. ते काय बायको माणूस आहे झाले! २. रांडरू = वाईट चालीची (स्त्री)-] नपुसकलिंगी उपयोग पुल्लिंगी व स्त्रीलिंगी नामांचा करितात. याशिवाय **दार** = स्त्री [पु०] **मित्र** [नपु०], वगैरे मूळचे संस्कृत शब्द—यांचा उपयोग मराठीत संस्कृतातल्याप्रमाणे होतो.

[१] आमंत्रुनि सत्येने सर्व **श्री-कृष्णदार जेवविले.**
[२] छळिले दशाननें परि झालें **प्रभुदार** काय कातर **तें.**
[३] संपन्न **मित्र असतें** तरि **येतें** संकटांत कामातें.

§ ३९ नपुसकलिंग

आता सजीव प्राण्यांपैकी ज्यांचे लिंग सांगता येत नसेल किंवा विवक्षित नसेल, म्हणजे ते **सांगण्याची जरूरी नसेल ते, व निर्जीव पदार्थ, या सर्वांचे मिळून व्याकरणापुरते एक निराळे लिंग** (पुल्लिंग व स्त्रीलिंग यांहून वेगळे असे) असावे, ही व्याकरणापुरती स्वाभाविक व्यवस्था दिसते व इंग्रजी, कानडी, या भाषांत लिंगभेद अशाच प्रकारचा आहे. पण संस्कृत, ग्रीक, लॅटिन; व यांपासून प्रत्यक्ष—अप्रत्यक्ष रीतीने उत्पन्न झालेल्या फ्रेंच, वगैरे युरोपियन; गुजराती, मराठी, वगैरे हिंदी; या भाषांतील लिंगभेद यापेक्षा अधिक कृत्रिम, व अधिक विस्तृत अशा प्रकारचा आहे. निर्जीव पदार्थांच्या ठिकाणी त्यांच्या वेगवेगळ्या गुणधर्मांप्रमाणे पुरुषत्व, किंवा स्त्रीत्व, किंवा नपुसकत्व कल्पून त्याप्रमाणे त्या त्या नामांना व्याकरणात कोणते तरी एक लिंग या भाषांत दिलेले आहे. अशा रीतीने निरनिराळ्या नामांना ज्या वेळी लिंगे प्राप्त झाली त्यावेळी त्यात युक्तीचा किंवा तर्कांचा भाग कदाचित

असावा असे वाटते. पण आजच्या मराठीतील लिंगे पाहिली, तर त्यात युक्तीचा किंवा तर्कांचा भाग फारसा दिसत नाही. मराठीतील शब्द, निरनिराळ्या काळांत, निरनिराळ्या भाषांतून आलेले आहेत, याचा हा एकंदरीत परिणाम असू शकेल. ते कसेही असले, तरी व्याकरणकाराने वस्तुस्थितीशी भांडण्यात अर्थ नाही. त्याचे काम म्हणजे आहे ती व्यवस्था सांगणे, व तिचे विवरण करणे हे मुख्यतः आहे. ती सांगावयाची म्हणजे मराठीतील लिंगभेद अतिशय कृत्रिम व अनियमित आहे, असेच थोडक्यात सांगितले पाहिजे. एखाददुसरा नियमच करावयाचा, तर तो असा करता येईल:—

सजीव प्राण्यांपैकी जे नर असतील त्यांचे पुल्लिंग, ज्या माद्या असतील त्यांचे स्त्रीलिंग, व सर्व निर्जीव पदार्थ, आणि सजीवांपैकी ज्यांचे लिंग विवक्षित नसेल त्यांचे पु० स्त्री० नपु० यांपैकी कोणते तरी एक लिंग. क्षुद्रत्व, तिरस्कार, लघुत्व यांचे दर्शक नपुसकलिंग; व मोठेपणाचे दर्शक पुल्लिंग; कोमलता वगैरे गुणांचे दर्शक स्त्रीलिंग.

हा नियम अगदी ठोकळ असला, तरी बराचसा उपयोगी आहे असे आढळेल; जसेः—

(१) मोर, लांडगा, पुरुष, वाघ, उंट—पुल्लिंग.

(२) लांडोर, लांडगी, बायको, वाघीण, सांड—स्त्रीलिंग.

(३) वाघरू, लोखंड, झाड, कणीस—नपुसकलिंग.

(४) दगड, फत्तर, आंबा, वृक्ष—पुल्लिंग; कदाचित कठीणपणा, मोठेपणा, दार्ढ्य या गुणांमुळे.

(५) लता, वेल, नदी—स्त्री०—कोमलता....वगैरे गुणांमुळे.

(६) किरडू, वाघरू, मूल, पुस्तक—नपु०; अविवक्षित किंवा क्षुद्रत्वदर्शक.

§ ४० लिंगभेदाचा कृत्रिमपणा

मराठीतील हा लिंगभेद खरोखरच इतका कृत्रिम आहे की, व्याकरणकारांनी याचे वर्णन करिताना हात टेकलेले दिसतात. काही व्याकरणकारांनी तर ज्या नामांच्या पूर्वी 'तो' [पु०] हे दर्शक सर्वनाम लागते त्यांचे पुल्लिंगी; ज्यांच्यापूर्वी 'ती' [स्त्री०] लागते त्यांचे स्त्रीलिंग; व ज्यांच्यापूर्वी 'ते' लागते त्यांचे नपु० असे ठोकळच सांगून टाकले आहे. आता, हे सांगणे म्हणजे

पुल्लिंग ते पुल्लिंग, स्त्रीलिंग ते स्त्रीलिंग, व नपुसकलिंग ते नपुसकलिंग, असे सांगण्यासारखेच आहे.

§ ४१ काही ठोकळ आडाखे

लिंगासंबंधाने मराठीत व्यवस्थित नियम करणे शक्य नाही. त्यांच्या अभावी व्याकरणकारांनी काही आडाखे बसविले आहेत ते येथे देतो:—

(१) अकारान्त नामे कोणत्याही लिंगाची असतात; जसे:—बाप, चोर (पु०); रीत, चिंच (स्त्री०); वन, रान (नपु०).

(२) आकारान्त संस्कृत पु० नामे व आकारान्त शुद्ध मराठी शब्द पु० आहेत. उदा०, पिता, घोडा, दरवाजा. मूळची संस्कृत आकारान्त स्त्री० नामे मराठीत स्त्री० राहतात व त्यांपासून झालेली मराठी नामेही स्त्री० असतात. उदा०, कथा, गाथा, यात्रा, जत्रा.

(३) इ व उकारान्त शब्द बहुतेक सं० आहेत व त्यांची लिंगे मुळातल्या प्रमाणे असतात:—हरि, गुरु (पु०); मति, तनु (स्त्री०); अस्थि, दारू (नपु.).

(४) ईकारान्त मराठी, धंदे दाखविणारे शब्द पुल्लिंगी असतात—-धोबी, माळी. ईकारान्त इतर शब्द पुल्लिंगी किंवा स्त्रीलिंगी असतात;—-पक्षी, हत्ती, मणी (पु०); गाडी, वडी (स्त्री०).

(५) ए, ऐ हे स्वर ज्यांच्या शेवटी असतात अशी नामे स्त्री० असतात. सवे, तिवे; हे शब्द सवई, तिवई, असेही लिहितात.

(६) ओ, औ हे स्वर ज्यांच्या शेवटी आहेत अशी नामे मराठीत थोडीच आहेत व ती बहुतेक पु० आहेत. बायको (स्त्री०) हा अपवाद.

(७) अनुस्वारान्त नामे नपु० असतात; जसे—-मोती, केळे, किरडू... अपवाद—गहू.

(८) फारशी, इंग्रजी, वगैरे परकी भाषांतून आलेल्या शब्दांबद्दल असे म्हणता येईल, की त्यांस त्याच अर्थाच्या मराठी शब्दांचे लिंग प्राप्त होते.

उदा:—-क्लास (वर्ग), बूट (जोडा),–पु०
कंपनी (मंडळी), कमेटी (सभा),–स्त्री०
बुक (पुस्तक), स्टेशन (ठिकाण),–नपु०

पण हा नियम सर्वत्र लागू नाही. पुष्कळ फारसी व आरबी शब्दांचे मूळचे लिंगच कायम राहते. उदा०:—अब्रू, फसला, इनसाफ.

(९) काही शब्द पुल्लिंगी व स्त्रीलिंगीही मानिलेले आहेत.

१. पुल्लिंगी व स्त्रीलिंगी—वेळ, काळ, सकाळ, दुपार, संध्याकाळ, मध, संधी, तारा, जागा, बाग, तंबाखू, मजा, व्याधी, वीणा, जिन्नस, कसूर.

२. पुल्लिंगी व नपुसकलिंगी—ढग, उंट, हरिण, मोहो, जन्म.

३. स्त्रीलिंगी व नपुसकलिंगी—शिकरण, दुकान.

(१०) काही मराठी शब्दांचे लिंग मूळातील संस्कृत शद्बांच्या लिंगापेक्षा भिन्न आहे. मराठी लिंग तेवढे येथे दिले आहे :—

१. पुलिंग—अश्रु, स्मश्रू, अलि, खड्ग, मित्र.

२. स्त्रीलिंग—वस्तु, शाक, शपथ, हनु, राशि.

३. नपु.—स्वप्न, विघ्न, खड्ग.

टीप :—यांची मूळची लिंगे संस्कृत कोशात पाहावी.

(११) भाववाचक नामांची लिंगे

१. इमा, पणा, वा—हे प्रत्यय लागून होणारी भाववाचक नामे पुल्लिंगी असतात. महिमा, गरिमा, शहाणपणा, चांगुलपणा, थंडावा, ओलावा.

२. ईक, इकी, गिरी, ता—हे प्रत्यय लागून होणारी भाववाचक नामे स्त्री० असतात—सोयरीक, गिऱ्हाइकी, भामटेगिरी, सरलता, कोमलता.

३. अ, त्य, त्व, पण, य—हे प्रत्यय लागून होणारी भाववाचक नामे नपु० असतात—गौरव, लाघव, कृत्य, नृत्य, क्रूरत्व, लघुत्व, भलेपण, मूर्खपण, जाड्य, शौर्य.

(१२) १. सामासिक नामाचे लिंग त्यातील शेवटच्या पदावरून बहुधा ठरते. उदा० :—भाजीपाला (पु०.), आईबाप (पु०.).

२. द्वंद्व समासातील पदे वेगवेगळ्या लिंगांची असतील, तर सर्व समासाचे मिळून नपु० होते. उदा० :—आईबापे.

(१३) धातूंपासून व इतर शब्दांपासून होणाऱ्या नामांना लागणारे प्रत्यय पुष्कळच आहेत व त्यांची लिंगेही सर्व प्रकारची आहेत. त्यांच्याविषयी नियम देऊ लागलो तर नियम आणि अपवाद सांगता सांगता पुरेवाट होईल. म्हणून निरनिराळे प्रत्यय, त्यांची लिंगे, व त्यांपासून होणाऱ्या नामांची उदाहरणे दाखविणारे कोष्टक खाली दिले आहे.

टीप—या कोष्टकात प्रत्ययांचा निर्देश केवळ लिंगभेदापुरताच केला आहे. प्रत्ययांची जास्त माहिती पुढे शब्दघटना या प्रकरणात येईल.

प्रत्यय	उदाहरणे	टीप
अ (सं.)	मद, मोर, देव, सर्प, मेष, हर, नद, दीप.	संस्कृत धातूंपासून झालेली नामे.
अ (सं.)	भार्गव, यादव, कौरव, पांडव.	संस्कृत नामांपासून झालेली नामे, विशेषणे. ही विशेषणे, पांडव = पंडूपासून झालेला, त्या कुळातला, अशा अर्थी मराठी.
अ (म.)	कर, डर, मेरू, फूट, तूट, जोड, झोक, ऊब-	क्रियापदांपासून साधलेली नामे.
अक (सं.)	कारक, घातक, लेखक, नायक, पालक, जनक, रक्षक, मीमांसक, नैयायिक.	मूळची विशेषणे तयार होतात व त्यांचा नामांप्रमाणे प्रयोग होतो.
न—ना (सं.)	(१) मदन, नंदन, रावण, (२) स्नान, दान, दर्शन, पालन, साधन, पचन, (३) वेदना, रचना, घटना.	[१] पु०. कर्तृवाचक नामे, [२] नपु०. क्रियावाचक नामे [३] क्रियावाचक स्त्री० नामे.
आ (सं. म.)	(१) इच्छा, कथा, शिक्षा, पीडा, (२) वेढा, ठेवा, ठोका, झरा, (३) ताठा, चिकटा, गारठा.	१. सं. धातूंपासून झालेली नामे. २ मराठी ,, ,, ,, ३ मराठी विशेषणांपासून ,,
आई (म)	[१] खोदाई, पुंडाई, घडाई, चराई, [२] धिटाई, मलाई, बंडाई, मोंगलाई.	[१] क्रियापदे, [२] विशेषणे व नामे यांपासून झालेली नामे. [१] क्रियादर्शक [२] स्थितिदर्शक.

आट आटा आडा आंडी } (म.)	[१] कलकलाट, भरभराट, सुळसुळाट, गोंगाट, चिपाट, चिपाड. [२] हाकाटा, बोभाटा. [३] नासाडा, चुराडा. [४] नासाडी, झुकांडी, चिळकांडी.	क्रियेचा भाव दाखविणारी नामे.
आडी—आडे	पाणाडी, नावाडी, वाटाडी, धुराडे.	
आणा (दाणा)	फुटाणा, सोलाणा, भिजाणा.	दाणा या अर्थाने.
आणू	जिवाणू.	
१ आर, २ आरी ३ आरा (म.)	[१] कुंभार, लोहार, सुतार, कासार. [२] पिंजारी, रंगारी, मापारी. [३] उतारा, फुगारा.	१—२ कर्तृवाचक नामे. ३ क्रियावाचक नामे.
आरा (म.)	पिसारा, डोलारा, लिंबारा, बुंधारा, भपकारा.	आधिक्य किंवा विस्तारदर्शक प्रत्यय.
आव आवा } (म.)	(१) चढाव, रिघाव, पाडाव, टिकाव, जमाव, जडाव, (२) बोलावा, वाढावा, देखावा.	(१) क्रियावाचक नामे. (२) भू. काळवाचक कृदंताच्या अर्थाची नामे
आळ (म.)	(१) विटाळ, नवाळ (२) घड्याळ, घंगाळ, भडाळ.	(१) स्थितिवाचक नामे. (२) ∠ आलय — घटि + आलय.
आळी (म.)	डरकाळी, कागाळी, बंडाळी.	आरोळी या अर्थी नामे.
आळे (म.)	ओगराळे, दिवाळे, खुंटाळे, विटाळे, उन्हाळे.	आलय या संस्कृत नामापासून......

प्रत्यय	उदाहरणे	टीप
ई (म.)	(१) उडी, चोरी, बुडी, बोली, (२) खुरपी, कातरी, (३) थुंकी, सांगी, कढी, पोळी, (४) गरिबी, श्रीमंती, तेजी, मंदी, (५) वाढपी, मोरपी, (६) बत्तिशी, चाळिशी (७) अंगी, बंडी, पैठणी, पार्वती.	(१) क्रियावाचक (२) साधनवाचक (३) भूतकालवाचक....नामे (४) भाववाचक नामे (५) कर्तृवाचक नामे (६) समुदायवाचक अर्थाची नामे (७) विशेषणे, नामाप्रमाणे उपयोग.
इमा (सं.)	महिमा, गरिमा.	भाववाचक नामे.
ईव (म.)	जाणीव, नेणीव.	भाववाचक नामे
ईक (म.)	सोयरीक, आगळीक, मोकळीक.	भाववाचक नामे
उक (सं. म.)	(१) भिक्षुक, कामुक, (२) चिंधुक, काटुक.	मूळची विशेषणे—नामाप्रमाणे उपयोग होतो.
ऊ (म.)	लुटारू, उतारू, गरजू, भिडू.	
ऊं (म.)	पारडूं, शेरडूं, किरडूं,	स्वार्थी प्रत्यय.
ए	(१) खुरपे, वल्हे, ढापे, (२) हसे, रडे (३) घोडे, बकरे, कुत्रे.	(१) साधनदर्शक (२) क्रियावाचक (३) नपुसकलिंगी नामे.
एण, एर, एरे ओटी ओळी ओळ (म.)	(१) भातेण, जुनेर, पोतेरे, फणेरे, चिंधोटी, लंगोटी, धांदोटी; .... (२) फांसोळी, चिरटोळी (३) आजोळ, पणजोळ.	(१–२) लघुत्वद्योतक प्रत्ययाने झालेली नामे. (३) ∠ आलय.

एल	तिळेल, एरंडेल, खोबरेल.	'तेल' या नामाबरोबर समास होऊन झालेली नामे.
क (म.)	अटक, अडक, धडक, पंचक, सप्तक.	
कर, करी, करू(म.)	(१) विणकरी, बसकर (२) देणेकरी, घेणेकरी वारकरी (३) यात्रेकरू, होतकरू.	(१) क्रियावाचक (२) समुदायवाचक (३) कर्तृवाचक नामे.
का, के, गे } म.	(१) चुळका, ओंडका, मेंढका, मणका (२) बिंडके, होडके, पेंडके, वाडगे (३) अडीचके, (४) कपटा.	१—२—४ अल्पत्वदर्शक नामे (३) स्थितिदर्शक नामे.
टा		
कार	(१) देकार, होकार, पुढाकार, नकार (२) होकारा.	क्रियावाचक नामे.
की (म.)	उनाडकी, फुशारकी, फिरकी, पाटिलकी, गावकी, टिमकी, खोडकी.	क्रिया, स्थिती, वगैरे दाखविणारी नामे.
गत (म.)	फसगत, धडगत, कलागत.	'गति' संस्कृत, याचे मराठी रूप.
गा (म.)	सोडगा, बडगा, खळगा, मुलगा.	स्थूलत्वार्थी नामे.
गिरी (म.)	शिपाईगिरी, मुत्सद्देगिरी, सोदेगिरी, सावधगिरी	स्थिती किंवा धंदा दाखविणारी नामे.
टा-टी (म.)	(१) घरटा, दिवटा, बाहुटा, (२) चिकटा,	[१] अल्पत्वार्थक [२] भाववाचक.
डा-डी-डे-ढे (म.)	बापडा, गघडा, पोतडी, चामडी, छकडी, पंचकडी, अंगडे, टोपडे, गांवढे.	[३] विविध प्रकारची नामे;
ण } (सं. व न } मराठी)	तारण, पोषण, गाळण, चाळण, लोळण, जेवण, झाकण, लागण, भवन, साधन.	क्रिया, स्थिती, साधन यांची दर्शक नामे.
ण (म.)	तेलंगण, बागलाण, कुंपण.	स्थानवाचक नामे.

प्रत्यय	उदाहरणे	टीप
णा (म.)	पाळणा, रमणा, भरणा, उगाणा.	कर्तृ, कर्म, व भाववाचक नामे.
णार, णारा (म.)	करणार, देणार, खाणार, खाणारा.	विशेषणे. नामाप्रमाणेही उपयोग होतो.
णावळ (म.)	खानावळ, चरणावळ, धुणावळ.	मोल किंवा मजुरी या अर्थी धातूपासून नामे होतात. कर्म, साधन, लघुत्व, स्थान,—वगैरेंची वाचक नामे.
णी (म.)	(१) करणी, पाहाणी, टेहळणी, कापणी (२) ओवाळणी, पेरणी, लावणी (३) तासणी, लेखणी, किसणी (४) चांदणी (५) दुधणी.	
णे (म.)	(१) बोलणे, लिहिणे, करणे; (२) लाटणे चोपणे, गाळणे.	(१) क्रियावाचक (२) करणवाचक } नामे
णूक (म.)	करमणूक, वागणूक.	
त	उगवत, मावळत.	
त्व	(१) गुरुत्व, पुरुषत्व	भाववाचक नामे
तव्य	कर्तव्य, भवितव्य.	
ता (सं.)	(१) कर्ता, दाता, पिता (पु०) [२] गुरुता, नवीनता, बंधुता.	(१) कर्तृवाचक नामे [२] भाववाचक नामे
ति (सं.)	कृति, गति, मति, स्मृति, नीति, भक्ति.	(१) क्रियावाचक नामे.

ती (म.)	(१) गणती, भरती, बढती (२) खणती.	(१) क्रियावाचक नामें (२) करणवाचक नामें.
ते, थे (म.)	गळते, पायते, पायथे.	
त्र (सं.)	नेत्र, मित्र, पात्र, गात्र, पत्र.	
थळ (म.)	पाणथळ.	
प (म.)	वाढप, कांडप, दळप, रांधप, वाटप.	क्रियावाचक नामे.
पण, पणा (म.)	शाहाणपण, वेडेपणा, भलेपणा, वाईटपण, मनुष्यपण, देवपणा.	भाववाचक नामे.
पट्टी (म.)	खरडपट्टी, उधळपट्टी.	तिरस्कारदर्शक नामे.
पे (म.)	जोडपे.	
बा (म.)	खोळंबा, पाठिंबा, अचंबा.	
य } (सं.)	जाड्य, ब्राह्मण्य, सैनापत्य, स्वास्थ्य.	} भाववाचक नामे.
या (स्त्री.) } (सं.)	विद्या, चर्चा, क्रिया, शय्या.	} भाववाचक नामे.
र (म.)	(१) सासर, माहेर. (२) ठोकर, फुंकर.	(१) ∠ गृह = घर (२) क्रियावाचक नामे
रू (म.)	लेकरू, म्हसरू, वाघरू, शिंगरू.	क्षुद्रत्वदर्शक नामे.
रूड (म.)	म्हसरूड, मिसरूड.	कुत्सितार्थी नामे.
ल	(१) तांबुल, डोंबल, [२] नवल.	(१) लघुत्वदर्शक (२) स्थितिदर्शक नामे.
व (सं. म.)	(१) केशव, अर्णव, राजीव, विषुव (२) देवघेव.	१ नामे व विशेषणे. २ क्रियावाचक नाम.
वट, वटा (म.)	१ मसणवट, २ भागवटा, भोगवटा, फुगवटा, दुखवटा, पाणवटा.	स्थानदर्शक.

प्रत्यय	उदाहरणे	टीप
वटी (म.)	फुगवटी.	स्थितिदर्शक.
वड (म.)	लागवड, धुळवड	
वडा (म.)	१ आठवडा, पंधरवडा, म्हारवडा, पोरवडा, धिंडवडा, रांडवडा.	१ कालबोधक. २ कुत्सितार्थी नामे.
वडी [म.]	१ मिलवडी.	स्थलदर्शक. ∠ वटी.
वाडी [म.]		
वणी [म.]	पेजवणी, चिंचवणी, उन्हवणी, ताकवणी.	∠ पाणी.
वय्या [म.]	लढवय्या, बजवय्या.	कर्तृवाचक.
वळ (म.)	गुंतवळ.	∠ वळणे यापासून.
वला (म.)	कान्हुवला, गव्हला.	१ स्थितिदर्शक } नामे
वळा } म.	(१) लेकवळा, गोतवळा, अंगवळा, तोंडवळा	२ क्रियावाचक } नामे
वाळी } म.	(२) न्हाणवली, करवली, लेकरवळी.	
	(३) उखिरवळी.	
वा (म.)	थकवा, बोलवा, रुसवा, ठेवा, देवा, लेवा, गारवा, ओलावा.	भाववाचक नामे.
वाईक (म.)	नातेवाईक, धंदेवाईक,	

वान, वाला / वाली (म.)	(१) गाडीवान, बागवान, (२) भाजीवाला, कोठीवाला, फळवाला, भाजीवाली.	
वी (म.)	ठाणवी, थोरवी.	
वे (म.)	जोडवे.	
शा (म.)	दपटशा.	
स (म.)	टिपूस, तडस, आईस (= आई). बापूस = बाप	स्वार्थी ' स ' प्रत्यय लघुत्वदर्शक.
ळी (म.)	मासळी, फासळी, गुठळी, गठळी.	

§ ४२ अरबी व फारशी प्रत्यय

याशिवाय, फारशी व आरबी भाषेतून आलेली प्रत्ययघटित नामे मराठीत बरीच आहेत. त्यांची पूर्ण यादी येथे देणे शक्य नाही. पण, त्यांतील मुख्य मुख्य प्रत्यय व त्यांपासून झालेल्या नामांची उदाहरणे खालील कोष्टकात दिली आहेत.

प्रत्यय			उदाहरणे	शेरा
पु०	स्त्री०	नपु०		
आ	—	—	गरमा.	
	ई		नेकी, खुशी, खुबी, हमाली.	
ईचा	—	—	बगीचा, गालिचा.	
गर } गार			सौदागर, जिनगर, गुन्हेगार, खिदमतगार.	
	गी		ताजगी, रवानगी.	
		खत	खरेदीखत, गहाणखत.	
खाना			कारखाना, दवाखाना.	
	गिरी		गुलामगिरी, सौदागिरी.	
ची, जी			मशालजी.	
जादा			शहाजादा, हरामजादा.	
	दाणी		अत्तरदाणी, गुलाबदाणी.	
		दान	कलमदान, शामदान.	
नामा			हुकूमनामा, करारनामा.	
बाद			औरंगाबाद, हैदराबाद.	
माल			रुमाल.	
	शाही		बेबंदशाही, गुलामशाही.	
		स्तान	हिंदुस्तान, अरबस्तान.	

§ ४३ लिंगविकरण

नामाच्या मूळ रूपावरून प्रत्ययांच्या साहाय्याने मराठीत वेगवेगळ्या लिंगांची नामे तयार करिता येतात. यांपैकी मुख्य मुख्य प्रत्यय व त्यांवरून होणारी उदाहरणे यांचे कोष्टक खाली दिले आहे, त्यावरून त्या त्या प्रत्ययांचा उपयोग कसा होतो हे कळून येईल.

स्त्रीलिंगी प्रत्यय	कोठे लागतो	स्त्री० उदाहरणे
आ	अकारान्त पु. ना.	बाला, प्रिया, क्षत्रिया.
ई	आकारान्त पु ना.	बकरी, कोल्ही, घोडी, लांडगी, काकी, मामी, दासी, शूद्री.
	आकारान्त ,, ,,	दात्री, कवयित्री.
	अ. पु. सं. ,, ,,	नदी, गौरी, पुत्री.
	न्‌कारान्त पु. ,, ,,	राज्ञी, युवती, विदुषी, शुनी.
ईण	अकारान्त पु.	वाघीण, सिंहीण.
	,, ,, ई उपांत्य असलेली ना०	परटीण, परिटीण, पाटलीण, शाहिरीण, शायरीण.
	उ उपांत्य असलेली ,,	बुरडीण, बुरुडीण, बेडकीण, ठाकरीण, गवतीण.
	ई–ऊ उपांत्य ,, व [परकी शब्द]	फकीरीण, फकिरीण. वकीलीण, वकिलीण.

§ ४४ कित्येक पुल्लिंगी नामांना अनुरूप अशी स्त्री० नामे वेगवेगळ्या शब्दांनीच झालेली आहेत. त्यांची यादी येथे दिली आहे.

पु.	स्त्री.	
नर	मादी.	
पुरुष	स्त्री, बायको	
वर	वधू.	
नवरा	बायको, सामान्य अर्थाने.	
	नवरी, विशेष अर्थाने.	
भाऊ	बहीण.	
	भावजय = भावाची बायको.	
पिता	माता.	
बाप	आई.	
पुत्र	कन्या.	
दीर	जाऊ.	
सासरा	सासू.	
विधुर	विधवा.	
बाव्या	मुरळी.	
राजा	राणी.	
साहेब	मडम.	
बैल	गाय.	
रेडा	म्हैस.	
बोकड	शेळी.	
बोका	भाटी, मांजर, मांजरी.	
मोर	लांडोर.	
खोंड	कालवड.	
एडका	मेंढी.	
उंट	सांड.	

§ ४५ काही शब्द केवळ स्त्रियांसच लागू पडणारे आहेत, यामुळे त्यांच्या अनुरूप पुल्लिंगी नामे मराठीत नाहीतच. अशा शब्दांची उदाहरणे:—विटाळशी, गर्भारशी, बाळंतीण, सवाशीण, सासुरवाशीण, कुवार, कुवारीण, पाठराखणी, न्हाणवली, करवली.

§ ४६ **लिंगासंबंधी काही ठळक नियम**

मराठीत लिंगासंबंधाने लक्षात ठेवावयाजोगे असे ठळक नियम सांगता येतात ते असे:—

[१] एखाद्या वस्तूच्या स्थूलत्वासंबंधाने, व विशेषतः विनोदार्थी, बोलावयाचे असले तर मूळचे नाम स्त्री० असले तर त्यापासून पु० नाम तयार करून त्याचा उपयोग करितात; जसे:—पळी–पळा, भाकरी–भाकरा, पोळी-पोळा, गाडी–गाडा.

[२] अल्पत्व, ममत्व, किंवा तिरस्कार यांपैकी कोणत्याही अर्थी नामाचे नपुसकलिंगी रूप योजितात; जसे:—मेंढरू, करडू [अल्पत्वदर्शक], लेकरू, गायरू [ममत्वदर्शक], वाघरू [तिरस्कारदर्शक]

[३] पुल्लिंग किंवा स्त्रीलिंग विवक्षित नसता नपुसकलिंगाचा उपयोग करितात; जसे:—हे मांजर खादाड आहे.

[४] स्त्रियांसंबंधी आदराने बोलावयाचे असेल, तेव्हा त्यांच्या नावाचा आकारान्त प्रयोग करितात व तिरस्काराने बोलावयाचे असेल तर ईकारान्ती प्रयोग करितात. मूळचे नाव ईकारान्त असले, तर त्याचा आकारान्ती प्रयोग आदराने करण्याची खेडवळ लोकांची रीत दिसते. उदा०—यमुना हे आदरार्थी आहे. यमुनी, गंगी, अशी रूपे तिरस्कारद्योतक आहेत.

टीप:—भागीरथीबाई, आनंदीबाई, यांसारख्या ईकारान्त नावांचे प्रयोग खेडवळ लोक आदरार्थी भागिरथाबाई, आनंदाबाई, असे करितात. **(रे. नवलकर)**

§ ४७ **लिंगासंबंधी काही आडाखे**

१ [अ] जाती, कृती किंवा वृत्ती, यांवरून पडलेली जी आकारान्त पुल्लिंगी नामे, त्यांची स्त्री० रूपे दोन प्रकारांनी होतात:—

(१) ई प्रत्यय लागून (२) ईण प्रत्यय लागून; जसे:—

भाटया	भाटी, भाटीण.
देशपांडा-ड्या	देशपांडी, देशपांडीण.
वाघमारे-ऱ्या	वाघमारी, वाघमारीण.
आगलाव्या	आगलावी, आगलावीण.
गोडबोले	गोडबोली-गोडबोलीण.

यांपैकी ई० रूपाचा प्रयोग त्या शब्दाचा सार्थपणे उपयोग करावयाचा असेल तेव्हा होतो. ही बाई गोडबोली (= गोड बोलणारी) आहे.

ईण प्रत्ययान्त रूपांनी तद्वाचक पु० नामांचे स्त्रीरूप दर्शविले जाते. जसे:— वाघमारे—वाघमारीण = वाघमाऱ्याची बायको. आचार्य—१ आचार्या = वेदमंत्र शिकविणारी, २ आचार्यांनी = आचार्यांची स्त्री. क्षत्रिय—१ क्षत्रियाणी = त्या वर्णाची स्त्री, २ क्षत्रियी = क्षत्रियाची बायको. हे शब्दही वरील नियमांतच येऊ शकतील.

प्रकरण पाचवे

वचनविचार

§ ४८ वचन

सविभक्तिक शब्दाच्या रूपावरून जसे त्याचे लिंग समजते, तसेच त्या शब्दाने दाखविली जाणारी वस्तू एक आहे की तशा वस्तू अनेक आहेत हेही समजते. हा जो शब्दांचा व त्यांच्या रूपांचा धर्म त्याला वचन असे म्हणतात.

§ ४९ **एकवचन**

सविभक्तिक शब्द ज्यावेळी एक ही संख्या दाखवितो, तेव्हा त्याचे एकवचन आहे, किंवा तो एकवचनी शब्द आहे, एकवचनी आहे असे म्हणतात. जसे :—बकरा, कुत्रा, घोडा...... इत्यादि. अशा शब्दांनी, त्या त्या शब्दांनी दाखविल्या जाणाऱ्या एक एक वस्तूचा बोध होतो.

टीप:—मराठीत नामाचे मूळचे रूप प्रथमा विभक्तीत एकवचनी असते.

§ ५० **बहुवचन, अनेकवचन**

शब्दांच्या रूपावरून एकापेक्षा अधिक वस्तूंचा बोध होत असेल तेव्हा तो शब्द बहुवचनी आहे, किंवा त्याचे बहुवचन आहे असे म्हणतात. जसे:—रामाने **कागद आणिले.** गोविंदा **आंबे** खातो. **मुले गातात.** या वाक्यांत कागद, आंबे, मुले, ही नामे आणि आणिले, खातो, गातात, ही क्रियापदे बहुवचनी आहेत.

बहुवचन यास अनेकवचन असेही म्हणतात.

टीप :—१. संस्कृत व्याकरणात द्विवचन बहुवचनापेक्षा निराळे मानितात, व त्याने दोन वस्तूंचा बोध होतो. अशा प्रकारे एक नवीनच वचन मानण्यापासून तादृश फायदा दिसत नाही; उलट, एकवचन व बहुवचन यांच्याहून वेगळी द्विवचनाची तितकी रूपे वाढून भाषेत गोंधळ मात्र वाढतो. मराठीत द्विवचन मानीत नाहीत हे ठीकच आहे.

टीप २ :—बहुवचन बहुधा सामान्य नामाचेच होते. विशेषनामे व भाववाचक नामे ही अमुकच पदार्थांची नामे किंवा गुणदर्शक नामे म्हणून त्यांचे बहुवचन करण्याची जरूरी फारशी दिसत नाही. याला अपवाद आहेत ते पुढे सांगितले आहेत.

§ ५१ **बहुवचन कसे होते ?**

नामाचे बहुवचन करिताना अंत्य स्वर व लिंग या दोन गोष्टी लक्षात घ्याव्या लागतात. त्या घेऊन, एकवचनी व बहुवचनी रूपे कशी तयार होतात हे पुढील कोष्टकात दर्शविलेले आहे. कोष्टकात दर्शविलेले विकार बहुतेक नामांस होतात; त्यांचे विवेचन व अपवाद वगैरे असतील त्यांचा निर्देश या गोष्टी कोष्टकाखाली दिलेल्या टीपांत केल्या आहेत.

नामे	अनेकवचनी प्रत्यय	उदाहरणे
१ (१) पु. आकारान्त	ए	आंबा-आंबे, घोडा-घोडे, चुलता-चुलते, पिता-पिते, भ्राता-भ्राते.
(२) इतर सर्व	——	खांब, पुरुष, दिवस (अकारान्त);
	ई	हरी, गुरू, (इकारान्त व उकारान्त); पक्षी, तेली, धोबी, (ईकारान्त);
	ऊ	लाडू, पेरू, गहूं, (ऊकारान्त)
		लाहो, डोहो,....(ओकारान्त) नामे.
२ आकारान्त स्त्री.	——	कथा, गाथा, बाला, सभा....
इकारान्त स्त्री.	ई	गति, मति, रीति,....गती, रीती....
उकारान्त स्त्री.	ऊ	धेनू , तनु, रज्जु—धेनू,....
३ एकारान्त स्त्री. ऐकारान्त स्त्री.	आ	आते—आता, सवे—सवा, वन्सै—वन्सा (व वन्सं), तिवै किंवा तिवई (= तिवया) जिल्है (जिल्हई)—जिल्हया.
४ ओकारान्त स्त्री.	आ	बायको—बायका.
५ अकारान्त	आ	माळ—माळा, शीर—शिरा.
	ई	भिंत—भिंती; वेल—वेली.
	आ किंवा ई	वागणूक—वागणुका—की, ढाल-ढाला-ढाली, चोच—चोचा-चोची.
ईकारान्त	आ	[१] भाकरी—भाकऱ्या, जाळी—जाळ्या, कातरी—कातऱ्या.

नामे	अनेकवचनी प्रत्यय	उदाहरणे
	—	[२] गोपी–गोपी, देवी–देवी, दासी–दासी, सुवासिनी–सुवासिनी
ऊकारान्त	आ	सासू–सास्वा–सासवा, बाजू–बाज्वा–बाजवा किंवा सासू, बाजू वगैरे.
६ नपु. अकारान्त	ए	वन–वने, घर–घरे, फळ–फळे.
ईकारान्त	ए	मोती–मोत्ये, बी–बिये.
ऊकारान्त	ए	लेकरू–लेकरे, पाखरू–पाखरे. तारू–तारवे, आसू–आसवे–आस्वे.
एकारान्त	ई	तळे–तळी, कुत्रे–कुत्री.

§ ५२ काही तपशीलवार नियम

१ पुल्लिंगी नामे

१ आकारान्त नामे वगळून बाकी सर्व प्रकारच्या पुल्लिंगी नामांचे अनेकवचन होताना शेवटचे अक्षर बदलत नाहीं.

यात प्रश्न एवढाच उरतो, की जी इकारान्त व उकारान्त संस्कृत नामे मराठीत आली आहेत त्यांची रूपे कशी लिहावी? यासंबंधाने आजची प्रवृत्ती पाहिली तर अशी दिसते:—एकवचनी मूळच्या संस्कृताप्रमाणे* ती ऱ्हस्व इ, उकारान्त लिहावी, व अनेकवचनी ऱ्हस्व किंवा दीर्घ कशीही लिहावी. पण

*टीप:—इ, उ-कारान्त नामांचे अंत्यस्वर दीर्घ लिहिण्याकडे प्रवृत्ती वाढत आहे. यासंबंधात इ–उ–कारान्त पु. नामांविषयी मागे लिहिले आहे ते पहावे.

मराठी भाषेची एकंदरीत प्रवृत्ती संस्कृतातून आलेल्या नामांचे ऱ्हस्व स्वर दीर्घ करण्याकडे आहे व तीच अखेरीस जोरावणार असे वाटते. संस्कृतज्ञ विद्वानांचा पगडा लेखनावर फार दिवस टिकेल असे वाटत नाही.

२ आकारान्त नामाचे अनेकवचन–एकारान्त होते; आंबा–आंबे, घोडा–घोडे, भाचा–भाचे, काका–काके, चुलता–चुलते, पिता–[पितृ]–पिते.

अपवाद १–बहुमानार्थक किंवा प्रतिष्ठावाचक आकारान्त पुल्लिंगी नामाचे अनेकवचन होताना त्याचे मूळरूप बदलत नाही. जसे :—तुमचे बाबा, काका, दादा, आले का ?

२–आकारान्त पुल्लिंगी विशेषनामाचे अनेकवचन क्वचित् होते; ते होताना मूळरूप बदलत नाही. जसे:—या गावात दहा रामा आणि पाच गोविंदा आहेत. रामा = रामा नावाचे पुरुष, गोविंदा = गोविंदा नावाचे पुरुष.

३–याकारान्त नामाचे अनेकवचन होताना विकल्पेकरून यकार गळतो:–

भाट्या— भाट्ये, भाटे.
वाघमाऱ्या– वाघमाऱ्ये, वाघमारे.
देशपांड्या—देशपांड्ये, देशपांडे.

यांपैकी य-काररहित रूपे उच्चारावयास जास्त सोपी म्हणून जास्त प्रचारात आहेत.

२ स्त्रीलिंगी नामे

(१) आ–इ–उ-कारान्त नामांचे अनेकवचन होताना (मूळची ऋकारान्त स्त्री. सं. नामे यात येतात–माता (मातृ) मूळच्या रूपात काही फरक होत नाही.

(२) ए–ऐ–ओ–कारान्त नामे यांचे अनेकवचन–आकारान्त होते. (उदाहरणे मागे दिलीच आहेत.)

एकवचन — अनेकवचन

पै— पै–पया अशी दोन रूपे होतात व त्यांत अर्थाचा थोडासा फरकही होतो.

सहा आणे चार पै (अनेकवचन), यात पै = त्या किंमतीची एकंदर नाणी.

पण, माझ्यापाशी चार पया आहेत, यात पया = पैची नाणी, ती चार आहेत असा अर्थ होतो.

(३) (दीर्घ) ईकारान्त व (दीर्घ) ऊकारान्त नामांची अनेकवचने विकल्पाने, –ईकारान्त व याकारान्त, व ऊकारान्त आणि वाकारान्त अशी अनुक्रमे होतात.

	एकवचन	अनेकवचन
ईकारान्त—	श्री	श्रिया, श्री, वगैरे
	आई	आया, आई......

टीप :—ही अनेकवचने होताना ईस य, ऊस व, असे आदेश होतात हे लक्षात ठेवावे.

अपवाद—स्त्री व बी यांची स्त्रिया व बिया अशीच रूपे होतात.

ऊकारान्त—सासू–सास्वा, सासवा, वगैरे.

अपवाद १. मूळ अकारान्त पु. नामांपासून किंवा, व्यंजनान्त पु. नामापासून ' इ ' प्रत्ययाने साधिलेल्या स्त्री० नामांचे अनेकवचन होताना त्यांच्या रूपात फरक होत नाही; जसे :—

पु. ना.	स्त्री. एकवचन	स्त्री. अनेकवचन
नर	नारी	नारी
दास	दासी	दासी
ब्राह्मण	ब्राह्मणी	ब्राह्मणी
युवन्	युवती	युवती
सुवासिन्	सुवासिनी	सुवासिनी

अपवाद २. सन्मानार्थी योजलेल्या –ईकारान्त नामांचे अनेकवचन होताना मूळच्या रूपात बदल होत नाही. जसे :—

रमाबाई म्हणाल्या......

अपवाद ३. सती, साध्वी, पृथ्वी, भागीरथी, अटवी इत्यादि प्रौढ संस्कृत शब्दांची अनेकवचने होताना मूळरूपात बदल होत नाही.

आजच्या मराठीत अकारान्त स्त्री० नामांचे अनेकवचन तीन प्रकारांपैकी कोणत्या तरी एका प्रकाराने होते. कसे ते खालील कोष्टकात दाखविले आहे.

अकारान्त स्त्री० नामांचे अनेकवचन

नामे कोठून किंवा कशी आली ?	मराठीतील एकवचनी रूप	अनेकवचनी रूप
(i) आकारान्त स्त्री. सं. नामे. (माला, बाला, शाला)	माळ, भाख, जट,	माळा, जटा......
ऊ-कारान्त स्त्री. नामे पाचू, खर्जू	पाच , खाच,	पाचा, खाजा
इतर काही सं. नामे.	शाक, लवंग, काच	शाका, लवंग, काचा
धातूंपासून झालेली	अटक, चटक,	अटका, चटका
अकारान्त स्त्री. नामे	भीड, चीड	भिडा, चिडा
अव्युत्पन्न अ. स्त्री. नामे.	खारीक, टांग	खारका, टांगा
(ii) इ-ई-कारान्त स्त्री. सं. नामांपासून झालेली अकारान्त स्त्री. मराठी नामे	रीत, नीत भिंत, गोपी, देवी	रीती, नीती भिंती, गोपी, देवी इ-कारान्त अनेकवचन होते
वनस्पतींची नावे	बोर, तगर	बोरी, तगरी
ईण-प्रत्ययान्त स्त्री. नामे	कोळीण	कोळिणी, कोळणी
काही इतर नामे	ओळख, विहीर, खटपट	ओळखी, विहिरी, खटपटी
(iii) णूक प्रत्ययान्त नामे	करमणूक	करमणुका, करमणुकी आकारान्त किंवा ईकारान्त रूपे विकल्पाने होतात

३ नपुसकलिंगी नामे

ईकारान्त व ऊकारान्त नामांची अनेकवचने होताना कित्येक नामांना अनुक्रमे 'य', 'व' असे आदेश विकल्पाने होतात. जसे:—

कुणी—कुणे, कुण्ये
केंबरी—केंबरे, केंबऱ्ये
मिरी—मिरे, मिऱ्ये
कुसू—कुसे, कुस्वे
सुकाणू—सुकाणे, सुकाण्वे
जिवाणू – जिवाणे, जिवाण्वे

कित्येक ऊकारान्त नामांस विकल्पाने 'व' किंवा 'अव' असे आदेश होतात. जसे:—तारू–तारवे, तार्वे...

अळू, कुंकू, असू, आसू, गळू हे शब्द या वर्गात येतात.

§ ५३ वचनांच्या उपयोगाविषयी काही सामान्य नियम व आडाखे

(१) ज्यांचे माप संख्येने करता येत नाही, तर परिमाणाने करावे लागते अशी—पाणी, लोखंड, यांसारखी सामान्य नामे, त्या त्या वस्तूंचे प्रकार दाखवावयाचे असतील, तर अनेकवचनी येतात. जसे:—बाजारात किती प्रकारची तेले मिळतात ?

(२) जी धर्मवाचक नामे सामान्य नामांसारखीच झाली आहेत, त्यांचे अनेकवचन होते. जसे:—

तांबडा व पिवळा हे रंग मिसळले असता नारिंगी रंग होतो.

(३) वस्तूंविषयी समग्रतेने बोलावयाचे असता तद्वाचक नामाचा एकवचनी उपयोग करितात. जसे:—वाघ हे क्रूर **जनावर** आहे. यंदा **गहू** चांगला मिळेल.

(४) पदार्थांचे बाहुल्य दाखविण्याकरिता एकवचनाचा उपयोग करितात.

जसेः— या गावात **पांचशे घर** असेल.
यात्रेस **दहा हजार माणूस** गेले होते.

(५) आपल्यापेक्षा वयाने, मानाने वगैरे थोर माणसांविषयी बोलावयाचे असेल, तर बोलणाराने सन्मानार्थी बहुवचन योजावे. जसेः -- **बाबा म्हणाले, गोविंदराव उद्या येणार आहेत.**

टीप—अशा प्रकारे अनेकवचन करताना पु. व स्त्री. नामांपुढे सन्मानदर्शक शब्द घालतात; त्यांची यादी येथे देतो.

पुल्लिंगी नामांपुढे येणारे शब्दः—राव, पंत, पंडित, शास्त्री, आचार्य, बुवा, बोवा, भट, भटजी, शेट, शेटजी, भाई, दास, नाना, अण्णा, तात्या, दादा, काका, भाऊ, साहेब, बा, वगैरे—त्यांचे अर्थ स्पष्टच आहेत.

स्त्री. शब्द—आई, माई, बाई, ताई, काकू, जिजी.

(६) आडनावे बहुधा अनेकवचनी योजितात. जसे :–गोविंदराव **साठे**, वामन **साठे**.

कोकणी लोकांच्या बोलण्यात आडनावाचा एकवचनी प्रयोग होतो. जसे :— गोविंदा साठा, हरी पळसुला.

(७) १ ऐतिहासिक व्यक्तीविषयी बोलताना, २ तिरस्काराने, क्षुद्रत्वार्थी, किंवा, ३ परिचयाने निर्देश करताना एकवचन असे प्रयोग होतात. जसे :—

तुकाराम मोठा साधू होता. **शिवाजीने** मराठ्यांचे राज्य स्थापिले.	ऐतिहासिक पुरुष
दामुअण्णा गेला वाटते ?	परिचयद्योतक
गोविंदराव काय लबाड आहे हो !	तिरस्कार

(८) काही नामांचा प्रयोग बहुतेक अनेकवचनीच होतो. जसे :–मिशा, खडावा, जोडे, देवी, रोमांच, कांजिण्या, आळेपिळे, आढेवेढे........

पण केवळ एकाच वस्तूविषयी बोलावयाचे असेल तर एकवचनीही प्रयोग करावयाला हरकत नाही. जसे:- एक एक **देवी** (देवीचा एक एक फोड) चिंचोक्याएवढी होती. उजव्या पायातील **खडाव.**

प्रकरण ६ वे

विभक्तिविचार

१ विभक्तींची संख्या व नावे

§ ५४ विभक्ती म्हणजे काय?

नामे आणि सर्वनामे यांचे वाक्यातील इतर शब्दांशी येणारे संबंध ज्या विकारांच्या योगाने दाखविले जातात त्या विकारांना विभक्ती असे म्हणतात.

वाक्यात मुख्य गोष्टी दोन; विधेय किंवा काय सांगावयाचे ते व दुसरी उद्देश्य, म्हणजे ज्या वस्तूविषयी सांगावयाचे ती. विधेय आणि उद्देश्य ज्या शब्दांनी व्यक्त होतात त्यांना अनुक्रमे क्रियापद व उद्देश्य-पद म्हणतात. या दोन प्रकारच्या शब्दांशिवाय वाक्यात आणखी तीन प्रकारचे शब्द असतात; त्यांपैकी काही उद्देश्यासंबंधाने अधिक माहिती देणारे असतात, काही क्रियेविषयी जास्त माहिती देणारे असतात व काहींचे कार्य शब्द किंवा वाक्ये जोडणे एवढेच असते. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे वाक्यातील बहुतेक इतर शब्दांचा संबंध प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे क्रियापदाकडेच येतो. या संबंधाला, **नामे व सर्वनामे यांचा क्रियेशी जो संबंध येतो त्याला, व्याकरणात कारक हे पारिभाषिक नाव आहे.** कारकासंबंधी या ठिकाणी लिहिण्याचे कारण, कारक हे विभक्तीला आवश्यक आहे, किंबहुना कारक म्हणजे विभक्ती, असे काही व्याकरणकार म्हणतात हे होय. या म्हणण्यास आधार एवढाच दिसतो की वाक्यात शब्दांचे

परस्परांशी येणारे संबंध बहुतेक कारकाच्या स्वरूपाचे असतात. पण, बहुतेक संबंध म्हणजे सर्व संबंध नव्हेत. कारकाव्यतिरिक्त असे काही संबंध वाक्यात असतात. उदा०, उद्देश्याचा गुणधर्म दाखविणाऱ्या शब्दांचा उद्देश्याशी जो संबंध येतो, तो अशा प्रकारचा, म्हणजे कारकेतर संबंध आहे व हा संबंधही केव्हा केव्हा विभक्तींच्या प्रत्ययांनी दाखविला जातो ही गोष्ट ध्यानात ठेवली म्हणजे विभक्तीला कारकाची अगदी जरूरच आहे असे नाही हे लक्षात येईल. उदाहरणांनी हीच गोष्ट अधिक स्पष्ट करून सांगतो. ‘मला **सोन्याची** आंगठी सापडली; वाटसराने **पैशांची** थैली उचलली; तो **डोळ्यांनी** अधू आहे; **अंतरीं** निर्मळ **वाचेचा** रसाळ;’ या प्रयोगांत, **सोन्याची, पैशांची, डोळ्यांनी, अंतरीं, वाचेचा** या सविभक्तिक शब्दांचा संबंध अनुक्रमे **आंगठी, थैली, अधू, निर्मळ, रसाळ,** या शब्दांशी आहे हे अगदी स्पष्ट आहे. **म्हणून विभक्तीची व्याख्या करिताना, तिला कारक आवश्यक आहे व कारकाशिवाय विभक्ती नाही असे म्हणण्याचे कारण नाही.** तेव्हा विभक्तीची वर केलेली व्याख्या—**नामांचे व सर्वनामांचे वाक्यात इतर शब्दांशी येणारे संबंध ज्या विकारांनी दर्शविले जातात त्यांना विभक्ती असे म्हणावे,** हीच बरोबर आहे.

§ ५५ विभक्ती कोणत्या व किती मानाव्या ?

आता यापुढील प्रश्न म्हणजे विभक्ती कोणत्या व किती मानाव्या हा होय. याचे केवळ तात्त्विक उत्तर द्यावयाचे म्हणजे वाक्यात नामाचे जितक्या प्रकारांनी इतर शब्दांशी संबंध येतात तितक्या व त्या विभक्ती मानाव्या असे सरळ देता येईल. पण थोडासा खोल विचार केला तर असे दिसेल, की हे सरळ दिसणारे उत्तर व्यावहारिक दृष्टीने पाहता निरुपयोगी आहे. कारण हे संबंध फारच विविध व संख्येने पुष्कळच आहेत; तसेच, ते ज्या साधनांच्या साहाय्याने दाखविले जातात ती साधने—प्रत्यय व शब्द—इतकी आहेत की, जितके व जितक्या प्रकारचे संबंध तितक्या विभक्ती, किंवा जितके संबंध-दर्शक शब्द तितक्या विभक्ती, यांपैकी कोणतीही व्यवस्था पत्करिली तरी विभक्तींची संख्या बेसुमार वाढेल. ती तशी न वाढविता, शब्दांचे परस्परांशी जे संबंध येतात त्यांचे प्रकार करून, ते प्रकार आणि तद्वाचक शब्द व प्रत्यय यांची

सांगड घालून व त्यांचे वर्गीकरण करून, **थोड्या मर्यादित पण जरूर तेवढ्याच विभक्ती मानाव्या.**

§ ५६ विभक्ती ठरविण्यात महत्त्व कशाचे? प्रत्ययांचे किंवा अर्थाचे?

अशा रीतीने विभक्तींची व्यवस्था लावण्यात मुख्य सोय अशी आहे की, यामुळे विभक्तींचा विचार करताना प्रत्यय महत्त्वाचे मानावे, की अर्थ महत्त्वाचे मानावे, प्रत्यय गौण की अर्थ गौण, **विभक्ती प्रत्ययांवरून ठरवाव्या की अर्थावरून ठरवाव्या,** हा सर्व वादच आपोआप नाहीसा होतो. वास्तविक पाहता या वादात फारसा अर्थ नाही. कारण, शब्द व अर्थ यांचा परस्पर-संबंध शरीर व आत्मा यांच्या संबंधासारखाच आहे. आत्म्याशिवाय शरीराला शोभा नाही, नुसते कलेवर काय कामाचे, असे मनात आणून आत्माच श्रेष्ठ असे म्हणावे, तर शरीराशिवाय आत्म्यास स्थितीच नाही हा उलट विचार मनात येऊन श्रेष्ठ कोण, शरीर की आत्मा, हे कोडे उलगडत नाही. प्रत्यय व अर्थ यांची स्थिती अशीच आहे. **अर्थाशिवाय प्रत्यय नाहीत** आणि **प्रत्यय किंवा अव्यये यांच्या मदतीशिवाय अर्थ व्यक्त करता येत नाही.** शब्द व अर्थ हे परस्परांवर अवलंबून राहणारे आहेत. तेव्हा आधी फळ की आधी झाड, कोंबडे आधी की अंडे आधी, हे प्रश्न जसे सुटण्या-सारखे नाहीत, तसाच आधी शब्द की आधी अर्थ, शब्द जास्त महत्त्वाचा की अर्थ जास्त महत्त्वाचा, हा प्रश्नही सुटण्यासारखा नाही. **आपण मात्र विभक्ती या अर्थाच्या भेदामुळे उत्पन्न होतात असे म्हणून, व प्रत्यय हे अर्थद्योतक, तेव्हा प्रत्ययांवरून विभक्ती मानाव्या, असेच म्हटले पाहिजे. कारण प्रत्यय हेच विभक्तीविभक्तीतला रूपाचा फरक दाखवावयाला समर्थ आहेत.**

§ ५७ टीपा :—

(१) निरनिराळ्या विभक्तींत सारखे दिसणारे प्रत्यय का येतात?

(२) एकच अर्थ वेगवेगळ्या प्रत्ययांनी व्यक्त होतो तो का?

आता या ठिकाणी अशी शंका येते की, जर प्रत्ययांवरून विभक्ती

मानावयाच्या असे म्हटले, तर एकच **प्रत्यय दोन दोन विभक्तींत दिसतो याची व्यवस्था कशी करावयाची?** दुसरीही एक अडचण आहे. ती अशी की जर प्रत्ययांना अर्थ आहेत, तर अमुक अर्थ अमुक प्रत्ययानेच व्यक्त व्हावयाचा अशी व्यवस्था का नसावी? **एकच अर्थ निरनिराळ्या प्रत्ययांनी व्यक्त होतो हे कसे?** या दोन मुळातल्या शंकांची उत्तरे देऊन मग विभक्ती किती आणि कोणत्या मानाव्या या मुख्य प्रश्नाकडे वळू.

उत्तर १. वास्तविक पाहिले तर व्यक्त करावयाचे जितके अर्थ तितके प्रत्यय असावे, व त्याचप्रमाणे प्रत्ययाला एकच ठरीव अर्थ असावा, म्हणजे प्रत्यय व अर्थ यांची किंवा विभक्तीची व्यवस्था पूर्ण झाली.

पण अशी व्यवस्था कोणत्याही भाषेत नाही, व मराठीत तर ती नाहीच. एखादी भाषा नवीनच बनवावयाची असेल, तर तीत अशी व्यवस्था आरंभी करणे शक्य आहे. पण ज्या भाषा शेकडो वर्षे व शेकडो मैलांच्या विस्तारात, लाखो लोकांच्या बोलण्यालिहिण्यात चालू होत्या व आहेत, त्यांत कालभेदाने, प्रांतभेदाने, व्यक्तिभेदाने निरनिराळे अर्थ व्यक्त करावयाचे प्रकार होणारच. जरी त्यांची मूळची व्यवस्था पूर्ण व दोषरहित एकदा केव्हा तरी होती असे मानले, तरी ती तशी कायमची टिकणे अशक्य हे कोणीही सांगेल. मराठीत अशी परिपूर्ण व्यवस्था केव्हाच नव्हती. विभक्तीपुरतेच बोलावयाचे म्हणजे, त्यांचे प्रत्यय संस्कृत प्रत्ययांपासून प्राकृताच्या द्वाराने येऊन त्यांना हळूहळू आजचे स्वरूप आलेले आहे. **मूळच्या संस्कृतातही दिसावयाला एकसारखे प्रत्यय वेगवेगळ्या विभक्तींत होतेच. तेव्हा वाटेने येता येता त्यांतले काही प्रत्यय गळले, काही नवीन येऊन मिळाले, काहींचे कार्य दुसऱ्यांनी उचलले, काही आपले कार्य विसरून दुसरेच करू लागले, काहींची बाह्यरूपे बदलली, व ते मूळचे एकमेकांपासून वेगवेगळे असले तरी आज दिसावयाला सारखेच दिसतात, असे विविध प्रकारचे फरक त्यांत झालेले आहेत; व त्यांना आजचे स्वरूप आलेले आहे.** व्याकरणाचे काम एवढेच की, एकच प्रत्यय अनेक ठिकाणी दिसत असेल, किंवा एकाचीच वेगवेगळी रूपे झाली असली, तर ती ती गोष्ट योग्य ठिकाणी सांगावयाची; निरनिराळ्या प्रत्ययांच्या मुळांचा शोध करावयाचा, व त्यांना आजचे

स्वरूप केव्हा आणि कसे आले हे शक्य असेल तर सांगावयाचे; आणि आज त्यांचे कार्य कोणते, त्यांचा उपयोग कसा होतो, हेही सांगावयाचे.

उत्तर २. आता दुसरी शंका विचाराकरिता घेऊ. एकच अर्थ निरनिराळ्या प्रत्ययांनी, विभक्तींनी, व्यक्त होतो हे कसे अशी शंका आहे. हिचे उत्तरही वरील चर्चेतच आहे. पण ते आणखी एकदा स्पष्टपणे देतो. मुळात निरनिराळ्या विभक्तींना निरनिराळे अर्थ होते असे मानिले, तरी स्थलकालभेदाने, भाषा बोलणारे व लिहिणारे यांच्या प्रकृतिभेदानुरूप व नवीन नवीन अर्थांची गरज भागविण्याचे काम करण्यासाठी, मूळच्या वेगवेगळ्या विभक्तींच्या रूपांना नवीन अर्थ उत्पन्न झाले. मूळचे अर्थ कायम राहिलेच, पण आपापल्या मगदुराप्रमाणे नवीन अर्थ व्यक्त करण्याची कामेही सर्वांना थोडीफार अंगावर घ्यावीच लागली. अशा रीतीने आज थोडे प्रत्यय असले, तरी ते जास्ती प्रकारची कामे करितात, अशी स्थिती भाषेला आलेली आहे. कदाचित् नवीन अर्थांबरोबर नवीन प्रत्यय किंवा अव्ययेही आली असतील. व्याकरणकाराने जे काय असेल ते जेथल्या तेथे सांगितले म्हणजे झाले.

२. विभक्तींचे प्रकार

विभक्तींचे प्रकार अर्थांवरून करावयाचे; व व्यवहारात अर्थांचे द्योतक प्रत्यय म्हणून प्रत्ययांवरून विभक्ती मानावयाच्या असे एकदा ठरल्यानंतर विभक्तींचे एकंदर प्रकार किती करावयाचे ही केवळ तपशीलाची बाब राहिली. प्रत्येक अर्थाची एक एक वेगळी विभक्ती, किंवा प्रत्येक प्रत्ययाची एक एक वेगळी विभक्ती, असे करावयाचे तर विभक्तींची संख्या बेसुमार वाढेल असे वर सांगितलेच आहे. तेव्हा अर्थांच्या धोरणाने प्रत्ययांचे वर्गीकरण करून जरूर तेवढ्याच विभक्ती मानाव्या हा एक मार्ग शिल्लक राहतो. तो स्वीकारून मराठीत किती विभक्ती होतात ते पाहू.

§ ५८ स्वामित्व-संबंध

कारकाखेरीज नाम-सर्वनामांचे इतर नाम-सर्वनामांशी जे संबंध येतात, त्यांपैकी एक मुख्य संबंध स्वामित्वाचा किंवा मालकीचा दिसतो. यातही कारक आणि निष्क्रिय असे दोन प्रकार केले म्हणजे त्यांत कोठे तरी इतर संबंधांचा समावेश करता येईल. उदा०, आम**ची** मुंबई**ची** सफर चांगली

झाली, हा दागिना **सोन्याचा** आहे, **पैशाची** खडीसाखर दे, **खडी-साखरेचा** एक पैसा झाला; इत्यादि वाक्यांत **चा** या प्रत्ययाने दाखविले जाणारे नामानामांचे संबंध अगदी सारखेच आहेत असे म्हणता येत नाही. **आमची सफर, आमची गाडी,** येथे हा संबंध स्वामित्वाचा असे म्हणता येईल. पण **वाघाची शिकार** यात वाघ हा शिकारीचा स्वामी असे दिसत नाही. थोडासा अर्थ ताणला, तर शिकार व वाघ यांचा कर्मणि, कर्मवाचक स्वरूपाचा संबंध आहे असे दिसेल. शिकार होते ती वाघाची; वाघ सोसणारा किंवा भोगणारा. तसेच **घोड्याची गाडी** आणि **गाडीचा घोडा** यांत घोडा गाडी ओढणारा, गाडी ओढली जाणारी, म्हणून एक संबंध कर्तृवाचक, कर्तरि, व दुसरा कर्मवाचक, कर्मणि, असे म्हणता येईल. यांचेही आणखी गौण प्रकार करता येतील; पण तूर्त तरी, **हा संबंध नामासर्वनामांचा इतर सविभक्तिक शब्दांशीच होतो, एवढ्यावरच लक्ष देऊन याचा एक वेगळा वर्ग करावा, आणि याच्या द्योतक प्रत्ययांची एक वेगळी विभक्ती मानावी एवढेच पुरे.**

§ ५९ कारकसंबंध

नाम-सर्वनामांचे क्रियापदाशी येणारे संबंध यापेक्षा जास्ती व विविध आहेत. एखाद्या **क्रियेविषयी बोलावयाचे म्हणजे ती करणारा कोण,** व **ती घडली कोणावर,** या दोन गोष्टी मुख्यतः सांगितल्याच पाहिजेत. यांखेरीज **ती केव्हा घडली, कोठे घडली, तिचा आरंभ कोठून झाला, ती कोणत्या साधनांनी घडवून आणिली गेली** व **तिचा हेतू, रोख कोणता होता;** वगैरे वगैरे गोष्टी सांगितल्या पाहिजेत. हे सर्व क्रियेचे प्रकार आहेत व त्यांचा वर निर्देश करताना त्यांचे थोडक्यात वर्गीकरण करूनच तो केला आहे. यांपैकी **क्रियेचा कर्ता व क्रियेचे कर्म हे दोन संबंध महत्त्वाचे असल्यामुळे त्यांना प्रत्येकी एकेक वेगळी विभक्ती असावी व कर्ता आणि कर्म ही दोन मुख्य कारके मानावी असे म्हणणे वावगे होणार नाही.** यांखेरीज बाकीची कारके हे क्रियेचे प्रकार आहेत, तेव्हा त्यांचा एका विभक्तीतच समावेश करावयाचा, किंवा त्या प्रकारांनाही वेगवेगळ्या विभक्ती द्यावयाच्या, हा प्रश्न आवडीनिवडीचा आहे.

इंग्रजी व्याकरणात या सर्वांचे एकच कारक करून त्याला (objective case) असे म्हटले आहे. मात्र क्रिया कर्मावर घडते, म्हणजे कर्माकडेच तिचा रोख असतो, अशा दृष्टीने कर्माचाही अंतर्भाव इंग्रजी व्याकरणकारांनी या (objective case) मध्येच केला आहे. ही बारकाई जरा बेसुमार झाली असे वाटते. तेवढी नसती, व कर्माची विभक्ती वेगळी आणि इतर सर्व कारकांकरिता एक विभक्ती वेगळी असा प्रकार असता, म्हणजे इंग्रजीची विभक्तिव्यवस्था ही देखील एक प्रकारे तर्कशुद्ध सोयीची आहे असे म्हणता आले असते. * प्रस्तुत, मराठीचा विचार करता, क्रियेच्या वेगवेगळ्या प्रकारांना आमच्या व्याकरणकारांनी, संस्कृतातल्याप्रमाणे, वेगवेगळ्या विभक्ती दिल्या आहेत, व त्यांचे चार मुख्य वर्ग केले आहेत. **क्रियेचा आरंभ कोठे झाला ही बाब इतरांपेक्षा वेगळी म्हणून तिची एक वेगळी विभक्ती, तिचे नाव अपादानकारक; क्रिया कोठे, केव्हा घडली, तो काळ व ते स्थळ यांची एक विभक्ती, ते अधिकरणकारक; क्रिया कोणत्या उद्देशाने, कोणत्या रोखाने झाली, तो हेतू, तो रोख यांचे एक वेगळे कारक ते संप्रदान; व साधनांचे एक वेगळे कारक ते करणकारक;** अशी चार वेगळी कारके मराठीत सांगितलेली आहेत. याशिवाय नामाचा वाक्यात येणारा एकच उपयोग राहिला तो **संबोधन** हा होय. **त्याचाही विभक्तीत** समावेश केला असता खालील विभक्ती तयार होतात.

		प्रत्यय
प्रथमा	१ कर्तृकारक	(१) प्रत्यय नाहीत.
द्वितीया	२ कर्मकारक	(२) प्रत्यय नाहीत, किंवा स, ला, ते–स, ला, ना, ते
तृतीया	३ करणकारक	(३) ने, ई, शी–नी, ही, ई, शी
चतुर्थी	४ संप्रदानकारक	(४) स, ला, ते–स, ला, ना, ते
पंचमी	५ अपादानकारक	(५) ऊन, हून,–ऊन, हून
षष्ठी	६ संबंध	(६) चा, ची, चे–चे, च्या, ची
सप्तमी	७ अधिकरणकारक	(७) त, ई, आ–त, ई, आ
संबोधन	८ संबोधन	(८) —, नो

(* नवीन इंग्रजी व्याकरणकार कर्मविभक्ती वेगळी करितात.)

§ ६० टीप १ :— **कर्मकारकाची स्वतंत्र विभक्ती का पाहिजे ?**

काही मराठी व्याकरणकारांना या आठ विभक्ती व त्यांची वर दिलेली नावे पसंत आहेत. काहींचे मत यांतून वेगळे कर्मकारक हे मुळीच गाळून टाकावे असे दिसते, ते कितपत सयुक्तिक आहे ते पाहू. त्यांच्या मते, कर्मपदाला विभक्तीचे प्रत्यय लागतात तेव्हा ती रूपे संप्रदानकारकाच्या रूपांसारखीच असतात; व जेव्हा प्रत्यय लागत नाहीत, तेव्हा ती कर्तृ॰ कारकाच्या रूपांसारखी असतात; म्हणून या दोन विभक्तींत कर्मविभक्तीचे काम विभागून दिले म्हणजे एक विभक्ती कमी होते ती करावी. शास्त्रीय व्याकरणाचे कर्ते कै. मोरो केशव दामले या मताचे दिसतात; त्यांनी आपल्या व्याकरणात द्वितीयेला फाटा दिला आहे. असे करण्याला दोन हरकती आहेत, असे मला वाटते. **कर्मासारखे महत्त्वाचे कारक, त्याला पूर्वीच्या व्याकरणकारांनी एक वेगळी विभक्ती दिली ती काढून घेण्यात काय अर्थ ?** शिवाय, तिला प्रत्यय नसल्यामुळे तिची रूपे प्रथमेच्या रूपांसारखी दिसावी, किंवा प्रत्यय असताना ती चतुर्थीच्या रूपांसारखी दिसावी, या गोष्टी आकस्मिक कारणांनी, केवळ यदृच्छेने, घडून आलेल्या आहेत. मराठीत विभाक्तिप्रत्यय जेथून आणि ज्या प्रकाराने आले त्या प्रकारचा तो एक अवांतर परिणाम आहे. पण कर्मपदाची रूपे यदृच्छेने कर्तृपदाच्या रूपांसारखी किंवा आणखी कशासारखी दिसली, म्हणून कर्मकारक हे स्वतंत्र व एक महत्त्वाचे कारक आहे ही गोष्ट नाहीशी होत नाही. तेव्हा द्वितीयेला कात्री लावण्यात रा. दामल्यांची जरा घिसाडघाईच झाली असे म्हटले पाहिजे. **दुसरी अडचण, इतके करून रा. दामल्यांनी मिळविले काय ?** आठ विभक्तींच्या सात केल्या एवढेच. अगोदर, आठ या फार जास्ती आहेत असेही नाही; आणि कात्री चालवायचीच, तर ती इंग्रजी व्याकरणातल्याप्रमाणे चालवून तेथील objective case सारखे एक बडे पोतडे तरी तयार करता आले असते, व एकंदर आठाच्या तीन–चारच विभक्ती होऊन बचत तरी बरीचशी झाली असती तर एक गोष्ट वेगळी होती. एकंदरीत काय, द्वितीया किंवा कर्माविभक्ती ही वेगळी मानणे हेच प्रशस्त दिसते.

टीप २—षष्ठीचा संबंध हे कारक नाही, सबब ते विभक्तींत गणू नये, या मताला उत्तर पूर्वीच, विभक्तीची व्याख्या करताना, दिलेले आहे. तेव्हा त्याचे

येथे वेगळे खंडन करण्याची जरूरी नाही. थोडक्यात बोलावयाचे तर विभक्तींची संख्या यापेक्षा कमी करण्यात अर्थ नाही.

§ ६१ विभक्तींची नावे

शेवटी, या विभक्तींना नावे काय द्यावी हा एकच महत्त्वाचा मुद्दा उरला. त्याचे विवेचन करून पुढे विभक्तींचे प्रत्यय, त्यांचे मूळ व त्यांनी आज होणारी कार्ये यांची माहिती सांगू.

वर दिलेली कर्तृकारक, कर्मकारक, ही नावे सार्थ आहेत व ती तशीच ठेवावीत, व निरनिराळ्या विभक्तींना कर्तृविभक्ती, कर्मविभक्ती, अशी नावे द्यावी, असे रे. नवलकारांचे म्हणणे आहे. तरी देखील ही नावे रूढ न होता प्रथमा, द्वितीया, तृतीया, अशी सप्तमीपर्यंत सात नावे, व संबोधन हे आठवे यांचाच प्रचार जास्त दिसतो. तत्त्वतः पाहता, जोपर्यंत विभक्ती आपआपली कामे करीत आहेत, तोपर्यंत त्यांना सार्थ नावे दिली काय, किंवा नुसती खुणेकरिता काही तरी दिली काय, सर्व सारखेच. तरी पण प्रथमा, द्वितीया, अशी नावे देण्यात एक प्रकारची दूरदृष्टी दिसते ती अशी :—

वर ज्या प्रकारे विभक्तिकार्यांचे वर्गीकरण केलेले आहे त्या प्रकाराने विभक्तीची कार्ये एकेका विभक्तीकडूनच होतात असा प्रकार भाषेत असता, म्हणजे कर्त्याचे रूप नेहमी एकाच प्रकाराने होते, कर्माचे एकाच प्रकाराने होते वगैरे, असा प्रकार असता, तर सार्थ नावे देण्यात काही तरी संगती आहे असे झाले असते. पण, मराठीत विशेषतः कर्त्यासंबंधाने तरी असा प्रकार नाहीच. कर्तृपद काही प्रयोगांत विभक्तिप्रत्यय न लागताच तयार होते, व काही प्रयोगांत त्याला ने, ए, शी हे प्रत्यय लावावे लागतात. तेव्हा कोणत्याही एका विभक्तीला कर्त्याचे सर्व काम करता येणार नाही. मग कोणत्याही विभक्तीला कर्तृविभक्ती म्हणण्यात तरी अर्थ काय ? इतर विभक्तींचीही थोडी-फार अशीच स्थिती आहे. म्हणजे करणाच्या अर्थाचे कार्य ने, ए, शी या प्रत्ययांनी होते; संप्रदानाच्या अर्थाचे कार्य स, ला, ते या प्रत्ययांनी होते. अशी जरी बहुधा स्थिती आहे तरी ती निरपवाद, अबाधित नाही. कारण, हीच कार्ये इतर प्रत्ययही थोडीबहुत करतातच; वर जे प्रत्ययांचे गट केलेले आहेत त्यांना आपापली मुख्य कामे—करण, संप्रदान ही—सांभाळून केव्हा केव्हा

इतर अर्थ व्यक्त करण्याचे कामही करावे लागतेच. भाषेचा संप्रदाय पाहिला तर बहुधा कोणत्याही एकाच अर्थाचे कार्य एकच विभक्ती करते असे दिसत नाही. अशा स्थितीत सार्थ नावे देण्याने भाषेच्या व्यवस्थेचे खरे चित्र निघते असे कसे म्हणता येईल ? उलटपक्षी, सार्थ नावे देणे व प्रत्येक ठिकाणी अपवाद, प्रत्यपवाद सांगत बसणे म्हणजे गोंधळाचाच प्रकार नव्हे काय ? तो करण्यापेक्षा, प्रथमा, द्वितीया......अशी केवळ खुणेकरिता नावे ठेवून, त्या त्या विभक्तीचे अर्थ सांगताना, प्रथमेचे मुख्य कार्य अमुक, तिची गौण कार्ये अमुक अमुक —असे वर्णन करणे बरे असे वाटते. आणि म्हणूनच मराठी व्याकरणातली प्रथमा, द्वितीया....सप्तमी हीच नावे एकंदरीत ग्राह्य वाटतात. यात, एक अपवाद आहेच. संबोधनाचे कार्य हे इतके विशेष प्रकारचे आहे की ते एकाच रीतीने होते म्हणून त्या विभक्तीला केवळ खुणेकरिता काही नाव न ठेविता 'संबोधन' असेच म्हटले आहे. यावरून एक अनुमान निघते ते असे की, इतर अर्थांची कार्ये अशा रीतीने एकेकाच विभक्तीने केली असती तर त्यांनाही सार्थ नावे मिळाली असती. **आजची नावे सार्थ नाहीत, पण व्यावहारिक सोईची आहेत.**

३ मराठीतील आजचे विभक्ति-प्रत्यय व त्यांची पूर्वपीठिका

§ ६२ आजचे प्रत्यय

	एकवचन	अनेकवचन
प्रथमा	....	(वचन हे प्रकरण पाहावे)
द्वितीया	(i)...........	,, ,,
	(ii) स, ला, ते	स, ला, ना, ते.
तृतीया	ने, ए, शी	नी, ही, ई, शी.
चतुर्थी	स, ला, ते	स, ला, ना, ते.
पंचमी	ऊन, हून	ऊन, हून.
षष्ठी	चा, [ची, चे]	चे, [च्या, ची].
सप्तमी	त, ई, आ	त, ई, आ.
संबोधन	....	नो.

टीप :-या प्रत्ययांशिवाय ते ते अर्थ दर्शविणारी स्वतंत्र अव्ययेही आहेत. यांचे विवेचन या प्रकरणातच एका वेगळ्या कलमात केलेले सापडेल.

§ ६३ **प्रत्ययांची मूळपीठिका—प्रथमा**

प्रथमेच्या एकवचनी प्रत्यय नाहीत, मूळ शब्दांचे जे अनेकवचन तेंच प्रथमेचे अनेकवचन, म्हणजे अनेकवचन हे प्रत्ययांच्यामुळेच होते असे मानिले पाहिजे. संस्कृत भाषेतील प्रथमेचे एकवचनी व अनेकवचनी प्रत्यय खाली दिले आहेत.

	एकवचन		अनेकवचन	
	सं.	प्रा.	सं.	प्रा.
पु.	स्	ओ	अस्,	ओ
स्त्री.	स्	ओ	अस्	ओ उ.
नपु.	म् इ		आनि इ	इं–इ.

टीप—यांपैकी पुल्लिंगी स् किंवा विसर्ग (:) यापासून प्राकृतात व जुन्या मराठीत अकारान्त नामात ओ झाला, व ओ दुर्बल होऊन त्याचा उ झाला. ही रूपे ज्ञानेश्वरीत आढळतात. आजच्या मराठीत 'उ' चाही लोप होऊन शब्दाचे मूळचे रूपच सर्व ठिकाणी प्रथमेचे रूप झाले आहे. नपु. नामांचे ए. व. अनुनासिक रूप हे 'म्' वरून झाले. इकारान्त व उकारान्त नामांची अनेकवचनी रूपे 'य', 'व' असे आदेश होऊन 'इं' प्रत्ययाने झाली. स्त्री. ए. व. 'आ' व पु. स्त्री. अनेकवचनी 'ओ' लुप्त होऊन आजच्या मराठीतील स्त्री. नामांचे ए. व. व पु. स्त्री. नामांची अनेकवचने झाली आहेत.

द्वितीया

संस्कृतप्राकृत प्रत्यय

	एकवचन	अनेकवचन	
	सं. प्रा.	सं.	प्रा.
पु.	म् (म्)	आन् न्	आ, ई ऊ
स्त्री.	म् (म्)	अस्	ओ > ऊ
नपु.	म् (म्)	आनि	आ

टीप—फक्त नपु. नामांची अनुनासिक रूपे मात्र मूळच्या 'म्' व 'आनि' यांचे अवशेष दाखवितात. पु. व स्त्री. नामांत सर्व प्रत्ययांचा लोप होऊन प्रथमेच्या रूपांसारखीच प्रत्ययरहित रूपे झाली.

सप्रत्यय द्वितीया

आता जिला सप्रत्यय द्वितीया म्हणतात तिचा विचार करू. हिचे प्रत्यय स, ला, ते—स, ला, ना, ते असे वर कंसात दिले आहेत. माझे मते ही मूळची द्वितीया नव्हेच, व आजही ज्या ठिकाणी ती मानावी म्हणतात यांपैकी बहुतेक ठिकाणी ती संप्रदानार्थी चतुर्थीच मानली पाहिजे व काही अगदी थोड्या ठिकाणीच ती द्वितीया असे मानणे योग्य होईल. संस्कृतात कर्मणी प्रयोगात 'रामेण' ही करणार्थी तृतीया होते व तो सर्व प्रयोग पुराच करावयाचा तर 'रामेण (रामाकडून) रावणो हतोऽस्ति' '(रावण मारला गेलेला आहे' अशा रीतीनें तो करावा लागेल. पण, मराठीत मात्र या प्रयोगाच्या मूळ रूपाकडे दुर्लक्ष होऊन मारला हेच क्रियापद ठरले व रामाने रावण मारिला असा कर्मणी प्रयोग झाला. उलट पक्षी, 'रामाने रावणास मारिले' अशा वाक्यात मारणे याचा सकर्मक अर्थाने उपयोग विवक्षित आहे असे दिसत नाही. अमुक एक क्रिया झाली असा अर्थ विवक्षित नसेल व केवळ ती क्रिया घडली किंवा घडते एवढाच सामान्य अर्थ विवक्षित असेल तर सकर्मक क्रियापदाचा अकर्मक क्रियापदाप्रमाणे प्रयोग होतो. उदा०—हे मूल बोलते का हो ? अशासारख्या वाक्यात मूल **काय** बोलते हे विवक्षित नाही, व 'बोलते' हे सकर्मक क्रियापदही नव्हे; तर मुलाला बोलता येते की नाही, ही सामान्य गोष्ट विवक्षित आहे, व क्रियापद अकर्मक आहे. याचप्रमाणे रामाने रावणास मारिले, कुत्र्यास मारिले, या वाक्यांत 'मारण्याची क्रिया केली' एवढाच सामान्य अर्थ विवक्षित आहे, व ती रावणाच्या किंवा कुत्र्याच्या दिशेने किंवा रोखाने केली असे सांगितले आहे. तेव्हा वास्तविक पाहता हे अकर्मक भावे प्रयोग असे म्हटले पाहिजे. सूत शौनकास सांगतात, या वाक्यातही सांगण्याची क्रिया शौनकाच्या दिशेने त्याला उद्देशून होते, म्हणून 'शौनकास' याची संप्रदानार्थी चतुर्थी. 'सूत शौनकाप्रत सांगतात' असे प्रयोग जेव्हा आपण करितो, तेव्हा ही गोष्ट आपण अप्रत्यक्षपणे मान्य करतो असेच म्हटले पाहिजे.

मी या कामास पंचवीस रुपये वर्गणी देईन, राजाने ब्राह्मणास भूमी दान दिली, किंवा भूमिदान दिले, या वाक्यांत देणे या सकर्मक धातूची कर्मपदा-विषयी अपेक्षा काय दिले हे सांगितल्याने पूर्ण होते. म्हणजे भूमी, वर्गणी, भूमिदान, ही कर्मे केली असता अर्थ पुरा होतो, व 'या कामास' या शब्दांनी जसा देण्याचा एक प्रकार सांगितला जातो, तसाच 'ब्राह्मणास' या शब्दानेही देण्याचा प्रकारच सांगितला जातो. तेव्हां 'ब्राह्मणास' याचीही संप्रदानार्थी चतुर्थी मानली म्हणजे झाले.

हा झाला तात्त्विक विचार. चालू मराठीतील प्रत्यक्ष व्यवहार पाहिला तर तो अगदी वेगळा दिसतो. राजाने ब्राह्मणास भूमी दिली; भूमिदान दिले, अशा वाक्यांत ज्या शब्दांशिवाय क्रियेच्या अर्थाची पूर्णता होतच नाही. अशा—भूमी, भूमिदान—शब्दांस कर्मे म्हणणे हे प्राप्तच आहे. पण ब्राह्मणास यालाही कर्मच (अप्रत्यक्ष कर्म) म्हणावे अशी नवीन व्यवस्था बहुतेक अर्वाचीन व्याकरणकारांना मान्य आहे असे दिसते. ही कल्पना अर्थातच इंग्रजी व्याकरणावरून घेतलेली आहे. इंग्रजी व्याकरणाला ती आवश्यकही आहे. तेथे कर्तृविभक्ती, संबोधन व स्वामित्वसंबंध एवढ्याच वेगळ्या विभक्ती मानून कर्त्रेतर कारके (कर्मासुद्धा) एका objective case मध्ये कोंबलेली आहेत. कर्म व इतर objects यांच्यामध्ये फरक इतकाच की कर्मपदापूर्वी कोणतेही शब्दयोगी अव्यय येत नाही व इतर पदांपूर्वी ते येते. अशा ठिकाणी काही कारणाने एखाद्या पदापूर्वी शब्दयोगी अव्यय आले नाही (Rama gave me rupees) म्हणजे त्याची विभक्ती कशी सांगावयाची याची पंचाईत पडते व प्रत्यक्ष किंवा पुरुषवाचक कर्म यासारखे काही तरी नाव त्याला द्यावे लागतेच. पण, हा झाला अनिर्वाह पक्ष. फिरून यातही विसंगती आहेच; कशी ती पहा. Rama gave *Govinda* ten Rupees ; Rama gave ten Rupees to *Govinda* अशा एकाच अर्थाच्या दोन वाक्यांत Govinda हा शब्द ten Rupees याच्या आधी आला की तो 'give' याचे कर्म होतो. पण, 'to Govinde' असे त्याचे शब्दयोगी अव्ययपूर्वक रूप झाले की तोच to याचे कर्म (object) होतो, व to Govinda हे सर्व अप्रत्यक्ष कर्म होते. आहे की नाही मौज! पण या इंग्रजी भाषेच्या भानगडीत शिरण्याचे आपल्याला कारण नाही. मराठीत कर्माची स्वतंत्र विभक्ती आहे, व ज्यांच्या

धोरणाने, दिशेने, क्रिया होतात अशा अर्थांचीही एक स्वतंत्र विभक्ती आहेच. (कारण रोखाने, उद्देशाने, क्रिया होणे हाही एक क्रियेचा प्रकारच आहे). तेव्हा, मराठीत ही अप्रत्यक्ष कर्माची भानगड हवी कशाला ? सरळ संप्रदानाने काम भागते तसे ते भागवून घ्यावे म्हणजे झाले.

रामाने रावणास मारले......अशा वाक्यातही तात्त्विक रीत्या 'रावणास' याची संप्रदानार्थी चतुर्थी करून सर्व प्रयोग अकर्मक भावे करावा, हाच मार्ग मला पसंत दिसतो. पण रूढीने, रामाने रावणास मारिले व रामाने रावण मारिला, यांच्या अर्थातील मूळचा फरक नाहीसा केला आहे असे वाटते. अशा स्थितीत 'प्रयोगशरणा वैयाकरणाः' या न्यायाने 'रावणास' याची द्वितीया करून असे प्रयोग सकर्मक भावेप्रयोग मानावेत असेच म्हटले पाहिजे. वास्तविक पाहता, सकर्मक भावेप्रयोग ही एक अजब चीज आहे. पण, तिचे विवरण या ठिकाणी नको.

शेवटी, या प्रकारच्या प्रयोगात येणाऱ्या क्रियापदांपैकी 'कर' या एकाच क्रियापदाचा थोडासा वेगळा विचार करणे जरूर वाटते. **न्यायाधीश अपराध्यास शिक्षा करतो, रामाने बिभीषणास लंकेचा राजा केले,** वगैरे प्रयोगांत **अपराध्यास, बिभीषणास,** यांची विभक्ती कोणती ? या प्रश्नाचे उत्तर देताना प्रथम ही गोष्ट सांगितली पाहिजे, की या दोन वाक्यांत करणे या क्रियापदाचा अर्थ सारखाच नाही. एका वाक्यात करणे = बनविणे असा अर्थ आहे. हा अर्थातील फरक स्पष्ट केला म्हणजे दोन्ही वाक्यांत सप्रत्ययान्त नामांची चतुर्थीच कशी मानावी लागते हे चटकन कळेल. एका वाक्यात शिक्षा करण्याचा प्रकार सांगितला आहे. शिक्षा अपराध्याला, त्याच्या रोखाने, केली. तसेच रामाने राजा बनविला—कोणाचा ? बिभीषणाचा; किंवा राजा बनविले, केले—कोणाला ? बिभीषणाला. हाही राजा बनविण्याचा एक प्रकारच. तेव्हा दोन्ही ठिकाणी, अपराध्यास व बिभीषणास—यांची संप्रदानार्थी चतुर्थी केली म्हणजे झाले.

थोडक्यात सांगावयाचे तर, द्वितीयेत अप्रत्यक्ष कर्माची मराठीत जरूरी नाही.

रामाने रावणास मारिले, गोविंदाने कुत्र्यास मारिले—वगैरे प्रयोगांत

संप्रदानी चतुर्थीनेच प्रयोग उकलून सांगता येतो; पण रूढीने अशा प्रयोगात द्वितीया मानून ठेविल्यामुळे तेथून आता द्वितीयेचे उच्चाटन करणे कठीण आहे. शिवाय, रामाने रावण मारिला, व रामाने रावणास मारिले, या दोन प्रयोगांतील तात्त्विक फरक रूढीनेच नाहीसा केल्यामुळे व्याकरणकारालाही आता रावणास याची द्वितीया मानलीच पाहिजे. रूढी पडली त्या वेळी चुकीची पडली. पण ती आता आहे. तेव्हा व्याकरणकाराने तिची व्यवस्था केलीच पाहिजे, व तेवढ्यापुरती सप्रत्यय द्वितीया मानणे ओघानेच प्राप्त आहे-

तृतीया

	एकवचन सं.	प्रा.	अनेकवचन सं.	प्रा.
पु.	इन,	(इण)	ऐः,	एहिं
	ना,	(णा)	भिः,	हिं
स्त्री.	आ,	(ई)	भिः,	आहिं
नपु.	ना,	(आ, इ, ए)	भिः,	हिं

टीप—यांपैकी-इण-णा, या प्राकृत प्रत्ययांपासून जुन्या मराठीतील एन-एनि-प्रत्ययान्त तृतीया होत असे. अद्यापि कोकणी भाषेत या प्रकारची, पण अस्पष्ट प्रत्ययांची रूपे—त्याणन्, रामान्-आढळतात. रूप स्पष्ट होण्या-करिता शेवटच्या अक्षरावर आघात येऊन जाणतेन—जाणत्याने असे रूप झाले असावे, किंवा, एण या पु. व नपु.—प्रत्ययाला—ए हा स्त्री. प्रत्यय लागून एणे—आने असे जोड प्रत्ययान्त रूप झाले असावे. पुढे 'शी' च्या ठिकाणीही असेच जोड प्रत्यय लागून रूप होते, यावरून या दुसऱ्या अनुमानालाच बळकटी येते. 'भिः' पासून प्राकृत हि, ई, या प्रत्ययान्त रूपे झाली. 'एं' कारान्त रूपे 'एण' प्रत्ययापासून झाली. शी हे सह + ई असे जोड रूप दिसते. संस्कृतात 'सह' या अव्ययाचा उपयोग नेहमी तृतीयेशीच करतात. मराठीतही 'शी' बद्दल 'निशी' असेही रूप होते. त्यावरून 'शी' हे मूळच्या सहपासूनच आले असावे, या अनुमानाला बळकटी येते. उदा०, तो एका वस्त्रानिशी बाहेर पडला. 'शी' हा प्रत्यय बरोबरच्या वस्तू दर्शविण्यासाठी येतो हेंही एक प्रमाण वरील उत्पत्तीला पोषकच आहे.

चतुर्थी

टीप:–प्राकृतात चतुर्थीचा लोप होतो व तिचे कार्य संस्कृत षष्ठीच्या रूपांनी होत असे. संस्कृतातील षष्ठीचा प्रत्यय ' स्य '. त्यावरून प्राकृतात स्स, व मराठीत स झाला. ला प्रत्ययाच्या उपत्तीबद्दल बराच मतभेद दिसतो; पण त्यातल्या त्यात लागी–लागणे यापासून त्याची उत्पत्ती असावी. संस्कृत ' णाम् ' पासून मराठीत ना प्रत्यय आला, व अन्ते या नामाच्या रूपापासून तो आला असावा.

पंचमी

संस्कृत—प्राकृत पंचमीचे एकवचनी व अनेकवचनी प्रत्यय अनुक्रमे–त् (हिंतो, सुंतो), भ्यस् (हिंतो, सुंतो) असे आहेत. त्यांपैकी हिंतो, सुंतो, या प्राकृत अनेकवचनी प्रत्ययांपासून—हून व सून हे मराठीतील पंचमीचे प्रत्यय झाले अशी काहीजण व्युत्पत्ती करितात. पण याहिपेक्षा सुसंगत व प्रमाण-सिद्ध उपपत्ती ते ' **होऊन** ' या मराठी कृदंतावरून निघाले अशी दिसते. जुन्या मराठीत होऊन – नि या कृदंताच्या उपयोगाने केलेल्या पंचमीची उदाहरणेच सांपडतात. उदा०—

सुवर्णा होऊनि आनें । लेणीं गमती भिन्नें,
मग पाहिजे तव सोनें । अवघेंचि ॥

यात—**होऊनि = ती गोष्ट झाली तेथून. मी मुंबईहून** निघालो म्हणजे **मुंबई होऊन = मुंबई झाली आणि तेथून**, निघालो असा अर्थ. तसेच, **असून यापासून ' सून ' हा पंचमीचा (प्रांतिक) प्रत्यय झाला.** (मी मुंबईहून निघालो).

त्याप्रमाणे जुन्या वाङ्मयात, म्हणून, बोलून....यांची रूपे देखील म्हणौनि, बोलौनि अशी सापडतात. तशीच पंचमीची रूपेही त्याच प्रकारची सांपडतात. उदा०–मेघौनि=मेघापासून. मेघौनि हे अर्थातच 'मेघ होऊनि' यापासून झालेले संक्षिप्त रूप दिसते. एकंदरीत विचार करिता **होऊन, असून** या ऊन प्रत्ययान्त अव्ययांवरून आजचे ऊन, हून प्रत्यय झाले असे मानणेच प्रशस्त वाटते.

षष्ठी

प्राकृतात चतुर्थीचा लोप होऊन षष्ठीच्या प्रत्ययांनी चतुर्थीचे कार्य होत असे ही गोष्ट मागे चतुर्थीच्या स, ला,....प्रत्ययांची उत्पत्ती सांगताना सांगितलेलीच आहे. तेव्हा प्राकृतात षष्ठीचे कार्य करण्याकरिता वेगळे प्रत्यय लागू लागले. ते कार्य विभक्तीच्या प्रत्ययांनी न होता, त्य, ईय, या प्रत्ययांपासून झालेल्या तद्धित विशेषणांच्याकडून होऊ लागले. या तद्धित प्रत्ययांपैकी 'त्य' या लिंगभेदाप्रमाणे फिरणाऱ्या प्रत्ययापासून प्राकृतात च-कारान्त, व पुढे मराठीत चा, ची, चे हे शेवटी असलेली रूपे तयार झाली. संस्कृतातील त्य च्या जागी प्राकृतातच च्च येतो. उदा०—सत्य-सच्चा. हा संस्कृतातील तद्धित 'त्य' मूळच्या षष्ठीच्या स्य प्रत्ययापासूनच निघाला असे संस्कृतभाषाकोविदांचे मत आहे. तेव्हा स्य > त्य > च्च > च अशी ही व्युत्पत्ति-परंपरा जुळते व यामुळेच चा, ची, चे-या प्रत्ययांना विभक्ति-प्रत्यय म्हणून, यांपासून तयार झालेल्या रूपांना विभक्तीची रूपे म्हणता येते. काही मराठी व्याकरणकार या च-प्रत्ययान्त शब्दांना विशेषणे असे नाव देतात, त्याची जरूर नाही असे वरील विवेचनावरून दिसेलच.

टीप—चा, ची, चे—यांना विभक्तीचे प्रत्यय मानावे की नाही, याविषयीचा वाद दामले यांच्या शास्त्रीय व्याकरणात ३४६—३५१ या पानांवर सविस्तर दिला आहे.

सप्तमी

	एकवचन	अनेकवचन
पु.	इ औ	सु (पु.)
स्त्री.	याम् आम्	”
नपु.	इ	”

प्राकृतात सप्तमीची एकवचनी रूपे पु. नपु. वच्छम्मि (वृक्षात), अग्निम्मि (अग्नीत) अशी होतात. या 'म्मि'पासून मराठीतील ई, व स्त्री. याम्, आम्

यांपासून आ हे प्रत्यय झाले, व 'अन्ते' या शब्दयोगी अव्ययांपासून संक्षेपाने 'त' हा नवीन प्रत्यय तयार झाला. सु, षु, या अनेकवचनी प्रत्ययांचा मुळीच लोप झालेला दिसतो.

संबोधन

एकवचनी रूपे प्रत्ययाशिवाय होतात. अनेकवचनी नो हा प्रत्यय लागतो. तो संस्कृत राजानः, करिणः इत्यादि रूपांतील अन्त्य अक्षराचे रूपांतराने झाला असावा असे वाटते.

§ ६३ विभक्तिप्रत्ययांबद्दल येणारी शब्दयोगी अव्यये

विभक्तिप्रत्ययांची कामे कित्येक वेळा शब्दयोगी अव्ययांनी होतात. निरनिराळ्या विभक्तींच्या प्रत्ययांच्या जागी येणाऱ्या अव्ययांची यादी येथे दिली आहे. शब्दयोगी अव्ययांच्या उपयोगाविषयी नियम वगैरे असतील ते त्या अव्ययांचा विचार करतांना सांगण्यात येतीलच.

प्रथमा	अव्यये नाहीत.
द्वितीया	” ”

तृतीया——करून, करवी, कडून, जवळून, द्वारा, द्वारे, मुळे, पाशी, योगे, सह, बरोबर, निशी, पाशी, प्रमाणे, बरहुकूम, वतीने, सकट, संगती, संगे, सन्निध, समवेत, सरसा, सरशी, सरसे, सह, सहवर्तमान, हाते, सवे, मेले, पाडे.

टीप—यांपैकी सह, बरोबर हीच काय ती खरोखर मूळची अव्यये दिसतात. 'करून' हे धातूवरून बनलेले आहे; सकट, सन्निध वगैरे मूळचे नामापासून किंवा धातूपासून बनलेले शब्द आहेत; व पायी, पाशी... वगैरे बहुतेक ई किंवा ए प्रत्ययाने नामांपासून झालेली तृतीयेची रूपेच आहेत.

चतुर्थी—प्रत, लागी, करिता, साठी, स्तव, अर्थे, अर्थी, कडे, ऐवजी, कडेस, खातर, प्रीत्यर्थ, बद्दल, बदला, मोबदला, कारणे, प्रति, निमित्त, निमित्ते, परते, लागून, वारी ... .

टीप—यांत प्रत, प्रति, खातर, बद्दल ही मूळची अव्यये; बाकीची मूळची नामापासून किंवा धातूपासून तयार झालेली.

पंचमी—पेक्षा, पासून, वाचून, विना, खेरीज, शिवाय, उपरान्त, कडून, नंतर, वरून, विरहित, वेगळे, व्यतिरिक्त, विणे, वीण, परीस, अंगी, नरते,.......

षष्ठी—संबंधी, विषयी, विशी.........

सप्तमी—मध्ये, ठायी, येथे, खाली, तेथे, पुढे, पलीकडे, पूर्वी, पोटी, पैकी, भोवती, विषयी, समोर, सभोवार, माजी, माझारी, अभ्यंतरी, भीतरी, मधी, उपरी, ऐवजी.

संबोधनाचे ऐवजी नव्हे, पण त्याचे बरोबर, काही अव्ययांचा उपयोग होतो. ती येणेप्रमाणे....

	एकवचन	अनेकवचन
नपु. पु.	अरे, गा, हे, हा, रे	अहो, हे, अजी
स्त्री.	अग, गे, ग, गो (कोकणी)	

ही सर्व संबोधनापूर्वी येतात. जसे...अरे मुला, अहो मुलांनो, ए माळणी....इ.

पण रे, गे, ग, गो, हो, ही संबोधनामागूनही येतात. जसे...देवा रे, आई ग, मित्र हो.

(४) सामान्यरूप

§ ६४ सामान्यरूप

मराठी शब्दांच्या विभक्तिप्रत्यय लावलेल्या रूपांकडे पाहू लागले असता असे दिसते की, काही शब्दांची रूपे नुसते प्रत्यय लागूनच झालेली असतात; म्हणजे, प्रत्यय लागताना त्या शब्दांच्या मूळच्या रूपात काही बदल होत नाही, निदान झालेला दिसत नाही; व उलटपक्षी **काही शब्दांची रूपे होताना त्यांच्या मूळच्या स्वरूपात फरक होतो. हा जो फरक किंवा विकार होतो, याला सामान्यरूप असे म्हणतात.**

हा विकार शब्दातील शेवटच्या अक्षरातील स्वरास होतो. मराठीत शब्द उच्चारताना उपांत्य अक्षरावर आघात किंवा जोर देण्याकडे प्रवृत्ती आहे ही

गोष्ट मागे अंत्योपांत्य अक्षरांचा विचार करताना सांगितलेली आहे. विभक्ति-प्रत्यय शेवटी लागला म्हणजे मूळ शब्दातील शेवटचे अक्षर उपांत्य होतेच. तेव्हा उपांत्य अक्षरास लागणाऱ्या सामान्य नियमाप्रमाणे त्यातील स्वरावर आघात येऊन तो स्वर लांबट उच्चारला जातो. मूळ शब्दातील अंत्य स्वर ऱ्हस्व असेल तर तो लांबट होतो, दीर्घ होतो; व मूळचाच दीर्घ असेल तर दीर्घच राहतो, किंवा त्याला विकार होऊन दुसरा एखादा दीर्घ स्वर त्याच्या जागी येतो. सामान्यरूपाचे अंती नेहमी दीर्घ स्वर असतो. काही नामांचे सामान्यरूप दोन्ही वचनी एकच असते, काहींची दोन वचनांची रूपे वेगवेगळी होतात.

§ ६५ सामान्यरूपाचे प्रकार

सामान्यरूपाचे हे नुसते दिग्दर्शन आहे. त्याचे खरे स्वरूप काय, ते का व कसे होते, वगैरे प्रश्नांचा तात्त्विक विचार तूर्त बाजूला ठेवून पहिल्याने सामान्य रूपांचे चालू भाषेत कोणते व किती प्रकार दिसतात, व प्रत्येक प्रकारात कोणती नामे वगैरे येतात, ती कशी चालतात, या बाबींचा विचार करू.

काही शब्दांच्या अंत्य स्वरांना प्रत्यय लागताना काही विकार होत नाही, असे वर सांगितले आहे. **तेव्हा, अविकृतांग-सामान्यरूप हा एक प्रकारच धरिला पाहिजे.** आता ज्यांना विकार होतो, त्यांचे प्रकार करू लागले तर जितके विकार तितके प्रकार, या न्यायाने मुख्य प्रकार पाच होतात. ते असे :—**आ-कारान्त, ई-कारान्त, ऊ-कारान्त, ए-कारान्त व ओ-कारान्त**; दीर्घ ॠ व ॡ शेवटी येणारे मराठी शब्दच नाहीत.

या-कारान्त, **वा** कारान्त, **अवा**-कारान्त, वगैरे प्रकार हे य-पूर्वक आणि व-पूर्वक आकार–एकारान्त धरून गौण काल्पिले म्हणजे झाले. आणि तत्त्वतः पाहू लागले तर ते गौण आहेतही. निरनिराळ्या संधि-नियमांप्रमाणे त्यांचे विवरण करता येतेच. तेव्हा, मुख्य प्रकार वर सांगितलेले पाच धरू; व बाकीचे गौण, पोटातले, असे मानून पुढे चालू.

I **आ–कारान्त सामान्यरूप.** –याचे पोटभेद होतात ते असे:—

(१) निवळ आ-कारान्त सामान्यरूप

यांत खालील नामे येतात—

(१) अ-कारान्त पु. व नपु. लिंगी नामे.
(२) उ-कारान्त पु. काही नामे.
(३) ऊ-कारान्त नपु. नामे.
(४) पणा-प्रत्ययान्त पु. भाववाचक नामे.
(५) मूळच्या संस्कृत आ-कारान्त स्त्री. नामांपासून झालेली मराठी आकारान्त स्त्री. नामे. बायको हे नाम; विकल्पाने पिसू हे नाम.

'वन्से' याचे फक्त अनेवचनी आ–कारान्त सामान्यरूप होते.

उदाहरणे (१) दिवस, खांब, घर

	एकवचन	अनेकवचन
प्रथमा—	दिवस.	दिवस.
द्वितीया—	दिवस	दिवस
	दिवसास-ला-ते	दिवसांस-ला-ना-ते.
तृतीया—	दिवसा-ने-शी	दिवसांनी-ही-शी
संबोधन—	दिवसा	दिवसांनो.

घरः—प्रथमा–घर-घरे (तृ.) घराने-शी, घरांनी-ही-शी.

संबोधन-घरा, घरांनो.

अपवाद—एकाक्षरी नामे, देशग्रामवाचक नामे (विकल्पेकरून), सन्मानार्थी आ-कारान्त नामांचे संबोधन.

पण, स आणि त, या प्रत्ययांपूर्वी सर्व नामांचे सामान्यरूप अवश्य होते. जसे:—इंग्लंडास, नागपुरात, मद्रासेस.

(२) तट्टू, परभू, वाटसरू, यात्रेकरू........हे शब्द तट्ट, परभ, वाटसर, यात्रेकर....... असेही चालतात. जसे—तट्टूस, तट्टास, तट्टूचा, तट्टांनी, तट्टूंनी.

(३) ऊ–कारान्त नपु. नामे. जसे :– (प्र.) गुरू, गुरे; (तृ.) गुराने, गुरांनी–शी; (सं.) गुरा, गुरांनो. कुसू, सुकाणू, जिवाणू, वासरू, मेंढरू,

कोकरू, शिंगरू...वगैरे या रीतीने चालतात. कुसू, सुकाणू, जिवाणू, यांची विकल्पाने वा–अवा अंतरूपेही होतात. म्हणजे एकंदर रूपे तीन;–सुकाणाने, सुकाण्वाने, सुकाणवाने.

(४) शाळा, कथा, माळ, यांची अनेकवचनी रूपे–शाळांस, कथांनी, माळांचा....अशी होतात.

पिसू—पिसांनी, पिसांस, पिसांचा...

पिसवांनी, पिसवांचा } अशीही रूपे आहेत.
पिस्वांनी, पिस्वांचा }

बायको—बायकांस, बायकांचा.....

(२) **या–कारान्त रूपे**–यात खालील नामे येतात :—

(१) आ-कारान्त पु. नामे.
(२) ई-कारान्त पु. नामे.
(३) ई व एं-कारान्त नपु. नामे.
(४) काही ई-कारान्त स्त्री. नामे (फक्त अनेकवचनी)

उदाहरणे :— (१) प्र. घोडा, घोडे; (तृ.) घोड्याने–शी, (२) घोड्यांनी–शी; (संबो.) घोड्या, घोड्यांनो........

अपवाद—राम्या, नाऱ्या, यांसारखे मूळचे ऱ्या-कारान्त शब्द,यांस आणखी एक या-कार होत नाही.जसेः—नाऱ्यास, नाऱ्यांचा....पणा-प्रत्ययान्त भाववाचक नामांचे अनेकवचन आ-कारान्तच होते. जसेः–देवपणाचा;.... दादा, काका, यांसारखे शब्द; (फक्त सन्मानार्थी उपयोग असेल तेव्हा). तिरस्कारार्थी उपयोगाच्या वेळी दाद्यांनी, काक्यांना अशी रूपे होतात.

राजा हा शब्द—(प्रथमेचे अनेकवचन खेरीज करून) (प्र.) राजा, राजे; (तृ.) राजाने, राजांशी; (सं.) राजा, राजांनो.

(२) ई-कारान्त पु. नामे–तेली, माळी, गवळी ... उदा०–(प्र.) तेली, तेली; (तृ.) तेल्याने, तेल्यांनी; (सं.) तेल्या, तेली,–तेल्यांनो.

अपवाद—करी, हस्ती, नदी, दंती, वगैरे अगदी अपरिचित शब्द; मौलवी, फिर्यादी, असामी, मुनशी, काची, मोची, मशालजी, इत्यादि फारशी व आरबी शब्द;—जी—प्रत्ययान्त मराठी सन्मानार्थक शब्द; उदा., भटजी, दाजी, देवजी वगैरे; वादी, प्रतिवादी, हत्ती, हे शब्द; यांची रूपे अविकृतांग होतात.

प्रत्यपवाद—दर्जी हा शब्दाला ' तेली ' यासारखाच चालतो.

(३) ई-कारान्त नामे

पाणी } पाण्यास, पाण्यांनी, पाण्यांचा.
मोती } मोत्यास, मोत्यांचा.

एं-करान्त नामेः—तळ्यांस, तळ्यांनी, तळ्यांचा.

अपवाद—बी या शब्दाला इय (बियास) आदेश होतो.

(३) इया-कारान्त सामान्यरूपे

' बी ' हा एकच शब्द; रूपे (प्र.) बी, बिये; (तृ.) बियाने, बियांनी, शी; (संबोधन) बिया, बियांनो.

(४) वा-कारान्त रूपे

यांत खालील नामे येतात :

(१) ऊ-कारान्त पुं. काही नामे.
(२) ऊं-कारान्त नपु. नामे.
(३) ऊ-कारान्त स्त्री. नामे (फक्त अनेकवचनी).

उदाहरणे—(१) गहू (प्र.) गहू—गहू; (तृ.) गव्हाने, गव्हाने; गव्हास, गव्हांस; भाऊ (प्र.) भाऊ, भाऊ; (तृ.) भावाने, भावांनी; (सं.) भावा, भावांनो. याचप्रमाणे लाडू, नारू, साडू, वगैरे इतर शब्द चालतात.

अपवाद—१ नातू, लागू, वगैरे विशेषनामे, जसे—लागूस.

टीप—लाडू, नारू, झाडू, नातू, पणतू, विंचू यांची अविकृतांग रूपेही होतात.

अपवाद—२ चाकू, गडू, खाऊ, झाडू, बोरू, खडू, इत्यादि मराठी शब्द, व स्वयंभू, वर्षाभू, प्रतिभू, इत्यादि संस्कृत कृदंते, ही अविकृतांगच राहतात.

(५) उवा–प्रत्ययान्त सामान्यरूपे

(१) सर्व एकाक्षरी ऊकारान्त पु. नामे यात येतात. उदा०—पू-पुवाने, पुवास, पुवाचा.

(६) अवा–प्रत्ययान्त सामान्यरूपे

यात खालील नामे येतात.

(१) लाडू, नारू, झाडू....वगैरे शब्द. (२) तारू, कुंकू, गळू, अवाळू.

II ई–कारान्त सामान्यरूप

यात पुढील नामे येतात.

(१) ऱ्हस्व इ-कारान्त सर्वलिंगी नामे (मूळची संस्कृत).
रूपे—कवी, कवीने, कवींनी, कवीस........
मती, मतीला, मतींचा, मतींना........
दधी, दधीने, दधींस, दधींचा........

(२) सं. इन् प्रत्ययापासून झालेली मराठी ई-प्रत्ययान्त पु. नामे.
रूपे—करी, करीने, करींस, करींचा....हत्ती, यती, जती, केसरी, नंदी, वगैरे शब्द या वर्गात येतात.

(३) जी प्रत्ययान्त मराठी सन्मानार्थी नामे.
भटजी—भटजीस, भटजींना, भटजींचा....

(४) परभाषेतून आलेली ई-कारान्त नामे.
काजी, गाजी, मौलवी, फिर्यादी, मोची, मशालजी........वगैरे.

(५) मूळच्या सं. इ-कारान्त नामांपासून झालेली अ-कारान्त मराठी नामे. उदा०—रीत, गत....गतींचा, रीतींस.

(६) ई-कारान्त स्त्री० नामे—नदी, विठी, सती, भाकरी.

(७) ऐ-कारान्त स्त्री० नामे—तिवै, सरै....ही वास्तविक ई (आ + ई) कारान्तच आहेत.

(८) य–कारान्त स्त्री० नामे–गाय, चोय, डोय–ई वगैरे.

(९) णूक–प्रत्ययान्त भाववाचक स्त्री० नामे.

(१०) शाल, ढाल, मशाल, परात, पखाल, कट्यार, तरवार, सुरवार, चकमक, टकमक, तसबीर, वरात, येरझार, उघडीक, तशरीफ, आगळीक, इजार, चोच, कोरडीक, भरताड, खसखस, वखार, खाच, तजवीज, हुरमुंज, सोयरीक; बंदूक, संदूक, खबर.

या नामांची सामान्यरूपे ई-कारान्त होतात.

टीप—यांची अनेकवचनी सामान्यरूपे आ-प्रत्ययान्तही होतात. जसे—शालांस, ढालांस, चकमकांस.

III ऊ–कारान्त सामान्यरूप

यात खालील नामे येतात.

(१) मूळची संस्कृत उ-कारान्त सर्वलिंगी नामे.

(२) तट्टू, परभू, वाटसरू, यात्रेकरू वगैरे....(विकल्पेकरून)

(३) चाकू, चमू, गड्डू, खाऊ, बोरू; स्वयंभू, वर्षाभू....वगैरे, संस्कृत कृदंते; टेकू, झकू, कौलू, पाचू, शेपू, तराजू, अफू, अब्रू....

(४) सासू, टाळू, ऊ, सू, जाऊ, वाळू, वेळू, वाजू, दारू, जळू.

(५) सुकाणू, जिवाणू.

IV ए-कारान्त सामान्यरूप—

मूळच्या आ-कारान्त सं. नामांपासून झालेली मराठी अ-कारान्त स्त्री० नामे. उदा०, जांभ, भूक, लाज.

मूळची इतरलिंगी नामे; पण मराठीत स्त्रीलिंगी झालेली.

ए–कारान्त स्त्री. नामे–विल्हे, सवे, आते. या सर्व प्रकारच्या नामांचे सामान्यरूप एकवचनी ए-कारान्त होते, व अनेकवचनी आ-कारान्त होते.

इय आदेश होणारे शब्द, बी, स्त्री हे दोनच आहेत. रूपे–बी-बिया, बिये, बियांनी, बियेस, बीस, बियांस.

वे–कारान्त रूप—

सासू, जळू वगैरे विकल्पाने.

टीप—यांची अविकृतांग, व अवे असा आदेश होऊनही रूपे होतात.

अवे–आदेशाने होणारी–विकल्पाने सासू, जळू ....

उवे–आदेशाने होणारी–ऊ, सू, (विकल्पाने);

V **ऐ–कारान्त सामान्यरूप**—ई-कारान्त पहा.

VI **ओ–कारान्त सामान्यरूप**

सर्व ओ—कारान्त नामे यात येतात.

यांपैकी स्त्री. नामांचे अनेकवचनी सामान्यरूप आ-कारान्त होते.

(५) सामान्यरूपाची उत्पत्ती

§ ६६

सविभक्तिक शब्दांस विभक्तिप्रत्यय लागताना विकार होतो ते विकृत रूप म्हणजे सामान्यरूप, अशी सामान्यरूपाची व्याख्या केलेली आहे.

हे सामान्यरूप का करावे लागते असा प्रश्न विचारून, कै. रा. रा. भि. जोशी यांनी त्याचे उत्तर ते उच्चारसौकर्याकरिता अंत्याक्षरावर आघात देऊन करितात, असे दिलेले आहे. वास्तविक पाहता, **विभक्तीचे प्रत्यय लागण्यापूर्वी** प्रातिपदिकेचे रूप तयार होते, किंवा करावे लागते, असे म्हणणे म्हणजे सामान्यरूप हे कृत्रिम रीतीने, मुद्दाम व्याकरणकारांनी अगोदरच घालून दिलेल्या नियमाप्रमाणें होते असे म्हणण्यासारखे आहे. ही गोष्ट (कृत्रिम रीतीने रूप बनविणे) मुद्दाम तयार केलेल्या एस्पेरंटोसारख्या भाषांत कदाचित शक्य असेल. पण लोकांच्या बोलण्या-लिहिण्यात असलेल्या, व पिढ्यान्‌पिढ्या वाढत, बदलत जाणाऱ्या भाषांत अशा कृत्रिम रीतीने कोणी सामान्यरूपे तयार करीत नाही. आधी भाषा व मागाहून व्याकरण, हा सिद्धांत येथेही लक्षात ठेविला पाहिजे.

मराठीत निरनिराळ्या प्रकारच्या नामांची सविभक्तिरूपे पाहताना व्याकरणकारांना असे आढळते की, शब्दांचे त्यातील रूप (म्हणजे विभक्ति-प्रत्ययाबरोबर, पूर्वी येणारे रूप) व मूळरूप ही एकच नसतात, भिन्न असतात. हा फरक सर्व प्रकारच्या नामांसंबंधाने व इतर सविभक्तिक शब्दांसंबंधाने

दिसतो, व याला काही तरी साधारण असे नाव व्याकरणात द्यावयाला पाहिजे, म्हणून त्याला सामान्यरूप असे म्हणतात. म्हणजे सामान्यरूप कोणी मुद्दाम करीत नाही; ते होते. अर्थातच, त्याचे मूळ शोधावयाचे, तर ते भाषेच्या अगदी मूलभूत अशा सिद्धांतापर्यंत पोचविले पाहिजे. रा. जोशी यांनी ' उच्चार सुलभ व्हावा ' म्हणून सामान्यरूप करावे लागते हे जे कारण दिले आहे, त्यात थोडाफार सत्याचा भाग आहे, हें कबूल केले पाहिजे, परंतु, केवळ तेच कारण पुरेसे असते, तर नदी, नदीस, नदीचा अशी रूपे होतात तशीच नदींस, नदींचा, किंवा घोड्यास, रीतेस, आतेस अशी रूपे होऊन काम भागले असते. म्हणजे सामान्यरूपाचा प्रश्न फक्त ऱ्हस्व स्वरांपुरताच राहिला असता; आणि [दीर्घ अंत्यस्वर उच्चारावयाला नेहमीच सोपा असतो व प्रत्ययातील अक्षर मूळ **अंगातील** अक्षरापेक्षा कमी जोरदार असते असा प्रकार असल्यामुळे] दीर्घस्वरात नामांच्याविषयी सामान्यरूपाची भानगडच राहिली नसती. पण, मराठीत अंत्य स्वर ऱ्हस्व असो की दीर्घ असो, सर्वच नामांची सामन्यरूपे होतात, व ती लिंगभेद, वचनभेद यांच्या अनुरोधाने काही सारखी तर काही वेगवेगळी, अशा प्रकारांनी होतात. तेव्हा हा केवळ उच्चारसौकर्याचा प्रश्न नसून, याचे मूळ आणखी कोठे तरी शोधले पाहिजे हेच ठरते.

मराठी ही संस्कृत व प्राकृत यांपासून निघालेली भाषा आहे; अर्थातच तिच्या बाबतीत हे मूळ या दोन भाषांत सविभक्तिक शब्दांची रूपे कशी होतात ते पाहून त्यांपर्यंत भिडविण्याचा प्रयत्न केला तर ते मुळीच गैर होणार नाही. वास्तविक आपण तसे करतोंही. उदा० **रामू , भावो** अशा प्रकारची प्रथमेची एकवचनी रूपे सांगतांना ती संस्कृतातील **रामः**, **भावः** यांची **रामो**, **भावो**, अशी रूपे होतात, व त्यांपासून अंत्य स्वर दुर्बल होउन **राम**, **भाव** अशी रूपे तयार होतात, असे सांगतो. म्हणजे '**भाव**' या नामाचे '**भाव**' असे अंग तयार करून त्याला प्रथमेच्या एकवचनाचे **प्रत्यय** लाविले असे म्हणत नाही; तर '**भाव**' या संस्कृत शब्दापासून **भावः > भावो >** (प्राकृत) **भावू–भाव** अशी रूपे परंपरेने तयार होत गेली असे म्हणतो. **इतर विभक्तींच्या रूपांसंबंधानेहि तोच प्रकार झाला असे समजले पाहिजे.** म्हणजे **संस्कृतप्राकृतातील द्वितीया, तृतीया, चतुर्थी यांची रूपे पर-**

परेने तयार झाली असे म्हटले पाहिजे. म्हणजे संस्कृत '**स्य**' या प्रत्ययापासून मराठीतील **स** हा प्रत्यय तयार होऊन, तो वृक्ष याला लागून '**वृक्षास**" असे रूप तयार झाले, असे म्हणण्यापेक्षा संस्कृत **देवस्य** याचे **देवस्स** असे झाले असे म्हणणे हे जास्त सयुक्तिक आहे. तेव्हा आता हीच विचारसरणी पुढे चालवून मराठीतील सामान्यरूपाचा काही शोध मागेपर्यंत लागतो की काय हे पाहू. हे करिताना अगदी अलीकडच्या काळात नवीन झालेल्या विभक्तिप्रत्ययांचा किंवा शब्दयोगी अव्ययांचा कांही विचार करण्याची जरूरी नाही; तर, जे प्रत्यय संस्कृतप्राकृतांत होते व मराठीतही आहेत, तेवढ्यांच्या उपयोगानेच ही गोष्ट पाहिली पाहिजे हे उघड आहे.

मूळचे संस्कृत व प्राकृत प्रत्यय खालीलप्रमाणे आहेतः—

	एकवचन				अनेकवचन		
	पु.	स्त्री.	नपु.		पु.	स्त्री.	नपु.
प्र.	(स्)	—	(म्)	प्र.	(अस्)	अस् [ओ, इ]	आनि इं
द्वि.	(म्)	(आम्)	म्	द्वि.	आन् न्	अस् इस् [ओ, उ]	आनि इं.
तृ.	इन (नां)	(आ) [ए]	इन (आ)	तृ.	ऐः भिः	भिः हिं	ऐः हिं
च.	य ए	ए [ऐ]	य	च.	भ्यस्	भ्यस्	भ्यस्
पं.	आम् अत्	अस् [ए]	आत्	पं.	भ्यस्	भ्यस्	भ्यस्
ष.	स्य अस्	अस् [अस्]	स्य	ष.	नाम् [णम्]	नाम् [ण]	नाम् [ण]
स.	इ औ	आम्	इ औ	स.	षु	सु	षु [सुं]
संबो..............				संबो.	असू. इ		आनि इं

प्राकृतातील प्रत्यय [ ] अशा कंसात दिले आहेत. प्राकृतात चतुर्थीचा लोप झाला म्हणून त्या प्रत्ययांना { } हा कंस घातला. त्याचप्रमाणे प्राकृतात ज्यांचा लोप झाला ते इतर प्रत्ययही { } या कंसात दाखविले आहेत. मराठीत ज्यांचा लोप झाला त्यांना ( ) हा कंस केला आहे. **संस्कृतातून प्राकृतात प्रत्यय येताना काहींचा लोप झाला** व अशाच प्रकाराने पुढे मराठी भाषेतही लोप होऊन मराठी भाषेतील विभक्तीचे प्रत्यय तयार झाले, ही गोष्ट प्रत्ययांची मूळपीठिका सांगताना स्पष्ट केली आहे. आता प्राकृतातील विभक्ति-प्रत्ययान्त रूपे घेऊन त्यांपासून मराठी रूपे कशी साधतात ते पाहू. मराठीत पूर्वीचे पंचमीसप्तमींचे प्रयय गेले (आणि पंचमीसप्तमींची कार्ये निराळ्या नवीन प्रत्ययांनी किंवा शब्दांनी होऊ लागली), तसेच द्वितीयेचे दुर्बल प्रत्यय जाऊन प्रत्ययरहित द्वितीया तयार झाली (म्हणजे प्रत्ययरहित कर्माची प्रथमा का मानू नये याचा उलगडा झालाच). त्याच-प्रमाणे, चतुर्थीचा प्राकृतात मुळीच लोप झाला, आणि षष्ठीने तिचे कार्य होऊ लागले. किंबहुना षष्ठी ही सर्वसामान्यसंबंधदर्शक विभक्ती असल्यामुळे प्रथमा व संबोधन या विशेष विभक्तीखेरीज इतर कोणत्याही विभक्तीचे कार्य तिने होऊ लागले. एकंदरीत सांगावयाचे तर प्राकृतात प्रथमा, अप्रत्यय द्वितीया, तृतीया व षष्ठी याच काय त्या विभक्ती चालू होत्या. म्हणजे प्राकृतातील षष्ठी व तृतीया यांची सविभक्तिक रूपे घेतली असता सामान्यरूपाचे मूळ शोधायला ती पुरेशी आहेत असे दिसते. त्यातल्या त्यात षष्ठीचा उपयोग तृतीयेपेक्षा पुष्कळच जास्त ठिकाणी होत असल्यामुळे तिच्या प्रत्ययांपूर्वी शब्दांच्या मूळ अंगांना होणारे विकारच लिहिणार-बोलणारांच्या लक्षात विशेष ठळकपणे येत असले पाहिजेत. प्राकृतातील पु. नपु. नामांची षष्ठीच्या ए. व. रूपे **देवस्स** ∠ **देव; आंबअस्स** ∠ **आम्रक; आग्गिस्स** ∠ **अग्नि; मधुस्स** ∠ **मधु;** अशी होतात. मराठीत ही रूपे येताना मूळ अंगाच्या अंत्यावर, म्हणजे सविभक्तिक रूपाच्या उपांत्यावर स्वराघात येऊन त्यामुळे स्वराला दीर्घत्व येते, व मागील आणि पुढील स्वर उच्चाराला तोकडे, दुर्बल होतात. **आंबअस्स** यापासून **आंबिअस्स** ∠ **आंबिआस** ∠ **आंब्यास** अशी रूपे झाली. तसेच **अग्गिस्स** > आगीस झाले. षष्ठीच्या (व द्वितीयेच्याही) अनेकवचनी

रूपांत [**वृक्षाणं, अग्गीं, अग्गीणं, मालाणं**] अनुस्वार आहे त्यावरून अनेकवचनी प्रत्ययपूर्वीचा मराठीत अनुस्वार आला. कित्येक ठिकाणी विभक्तींचे प्रत्यय दोनदा लागून [**रामाने = रामान् + एं (स्त्री); (रामेण + एं); वृक्षांस = वृक्षाणं + स (ए. व. प्रत्यय)**] **रूपे तयार झाली.** या प्रकारच्या रूपांत विभक्तिप्रत्ययापूर्वी नामांची जी रूपे येतात त्यांना सामान्यरूपे असे म्हणतात.

विशेषणाचे सामान्यरूप—मराठीतील सामान्यरूपाचा विचार करताना विशेषणांच्या सामान्यरूपाविषयी काहीतरी लिहिल्याशिवाय त्या विषयाची पूर्तता होतच नाही. मराठीतील विशेषणाचा विकास या दृष्टीने पूर्ण झाला नाही असेच म्हटले पाहिजे. संस्कृतात विशेषणांना नामाप्रमाणे लिंग, वचन व विभक्तिप्रत्यय ही होऊन ती आपल्या विशेष्यांप्रमाणे चालतात. पण अप्रत्यय विशेषणांचा प्रघातही जुन्या संस्कृतात होता असे वाटते. उलटपक्षी चालू इंग्रजीसारख्या भाषेत विशेषणाला लिंगवचनादि कोणतेच विकार कधीच होत नाहीत. तर, ज्या विशेष्यांजवळ ती येतील त्यांचे विकार त्यांना होतात असे नुसते मानून चालावयाचे असते. मराठीतील विशेषणे या दोन टोकांपैकी कोणत्याच टोकाला नसून मध्यंतरी कोठे तरी आहेत. अ-कारान्त व उ-कारान्त विशेषणांना कोणताच विकार होत नाही; आ-कारान्त विशेषणांना मात्र लिंगवचनादि विकार होतात. [चांगला-ली-ले, चांगले-ल्या-लीं] व त्यांची सामान्यरूपेही होतात. म्हणजे यांच्या विभक्तिप्रत्ययांचा केव्हातरी लोप झाला असला पाहिजे एवढेच अनुमान निघते.

थोडक्यात सांगावयाचे, तर असे म्हणावयाला पाहिजे की सामान्यरूप मुद्दाम कोणी पूर्वी अगाऊ करून ठेवलेल्या नियमांप्रमाणे करीत नाही. मराठीतील सामान्यरूप हे त्या त्या शब्दास प्राकृतात विभक्तिप्रत्यय लागून होणाऱ्या रूपांची मराठीत भाषाशास्त्राच्या सहज नियमांनी उत्क्रांति होत असता त्यांना प्राप्त झालेले आहे.

§ ६७ **विभक्तींचे अर्थ**

वाक्यात शब्दांचे परस्परांशी येणारे संबंध विभक्तिप्रत्यय किंवा शब्दयोगी अव्यये यांनी दाखविले जातात ही गोष्ट पूर्वी सांगितलीच आहे. या संबंधाने काही प्रकार आहेत, व प्रत्येक प्रकार सामान्यतः एका विभक्तीने दर्शविला जातो. त्याचप्रमाणे, रूढी व संप्रदाय यांच्यामुळे विभक्तींचे अनेक गौण अर्थही होतात. या कलमात या अर्थांची वर्गवारी करून त्यांची उदाहरणे दिली आहेत.

प्रथमा विभक्ती

(१) **कर्ता**–क्रियापदाचा कर्ता मुख्यत्वेकरून या विभक्तीत असतो.

टीप—प्रथमेत कर्ता असलेले सर्व प्रयोग कर्तरिप्रयोग (सकर्मक किंवा अकर्मक) असतात.

उदा०—**घोडा** धांवतो. **घोडा** गवत खातो.

(२) **विधान**–अपूर्णार्थक क्रियापदांचा अर्थ पूर्ण होण्याकरिता वाक्यात येणारे पूरक शब्द या विभक्तीत येतात.

जसे—घोडा **तांबडा** आहे. झाडांची पाने **हिरवी** असतात. बाजीराव **पेशवा** झाला.

(३) **उद्देश**–कर्त्याला उद्देशून, त्याच्याविषयी माहिती देणारे जे नाम-वाचक शब्द वाक्यात प्रथमेत येतात त्यांचा उद्देशार्थी प्रयोग होतो. जसे :—

रामा व मनी ही **भावंडे** आहेत.
शिवाजी हा शूर **सेनापती** होता.

(४) **प्रमाण** किंवा **मान**–

याचे वेगवेगळे प्रकार प्रथमेने दर्शविले जातात. जसे :—

१ मुंबईहून पुणे सवाशे **मैल** आहे.
२ उत्तम आंबे दहा **रुपये** शेकडा मिळतात.
३ पुण्याहून मुंबईचे भाडे पाच **रुपये** पडते.

द्वितीया विभक्ती

(१) या विभक्तीचा अर्थ **कर्म** आहे. जसे :—

घोडा **गवत** खातो; वाघाने **गाय** धरिली;
रामाने **रावणास** मारिले.

तृतीया विभक्ति

(१) **कर्ता** (i) कर्मणि व भावेप्रयोगांत, (ii) विध्यर्थी व (iii) शक्यार्थक क्रियापदांच्या प्रयोगात कर्ता तृतीयेत येतो. जसे :—

(१) **घोड्याने** गवत खाल्ले; **मुलाने** शाई सांडिली; **रामाने** रावणास मारिले.

(२) **मुलांनी** आईबापांचे ऐकावे.

(३) **रामाने** मुंबईस गेले पाहिजे.

(४) **तुझ्याने** इतका भात खाववेल का ?

(२) **करण, साधन, साहित्य—**

तो एका **वस्त्राने** बाहेर पडला.
चाकूने लेखणी करितात.
बोरूच्या **लेखणीने** मोडी चांगले लिहिता येते.
बैलगाडीने फार सावकाश प्रवास करता येतो.
तो **पायांनी** आला, **पायी** आला.
सर्वांशी गोड बोलावे.
प्रवाशाला **मोहरांनी** भरलेली पिशवी सापडली.

(३) **निमित्त** किंवा **हेतू, कारण —**

त्याने **लाजेने** मान खाली घातली.
राजकन्या **प्रवासाने** थकून गेली.
धरणीकंपाने हजारो लोक मेले.
तो **तापाने** आजारी आहे.
ईश्वरी संकेताने मनुष्याला संकटे येतात.
तो **गर्वाने** फुगलेला आहे.

(४) **विरोध व अनुरोध—**

तुझी **त्याच्याशी** बरोबरी कशी होईल ?
मराठ्यांची **टिपूशी** लढाई झाली.

मांजराचे **कुत्र्याशी** वैर असते.
कायद्याने वागावे.
हिंदुधर्मशास्त्राने (प्रमाणे) मद्यपान हे पाप समजले पाहिजे.

(५) **रीत** किंवा **स्थिती**—

मोठ्याने **वाचण्यामुळे** इतरांना त्रास होतो.
घाईने काम करू नये.
त्याने **निराशेने** प्राण सोडिला.
गोड **बोलण्याने** पुष्कळ कार्ये होतात.

(६) **मान, प्रमाण**—

हा सामान्य अर्थ धरून येथे अनेक प्रकारची उदाहरणे देता येतील. जसे :—

मला त्यागें झाला **शरीरें** निर्मळ ।
घोडा **स्वभावाने** तापट आहे.
माझा भाऊ माझ्यापेक्षा चार **वर्षांनी** लहान आहे.
बाजरी दहा **शेरांनी** मिळते.
मी आठ **दिवसांनी** परत येईन.
कवी कोमल पायांची **कमलांशी** तुलना करितात.

(७) **सांनिधी**—

तो **लोडाशी** टेकून बसला.
माझे घर त्याचे **घराशीच** आहे.
आईने मुलाला **पोटाशी** धरिले.

चतुर्थी विभक्ति

(१) **संप्रदान**—ज्याच्या उद्देशाने किंवा रोखाने क्रिया झाली असेल त्याची चतुर्थी विभक्ती.

घोडा **गाडीस** जोड.
मी **मुंबईस** जाणार आहे.

औषधाने **रोग्याला** गुण आला.
कोणी **कोणाला** हसू नये.
दोन्ही मुलगे मोठे झाले तेव्हा **राण्यास** धास्ती पडली.

(२) उद्देश, हेतू, प्रयोजन--

मला **जेवावयास** जावयाचे आहे.
तो **लग्नाला** गेला.
घोडा **चरण्याकरिता** कुरणात गेला.

(३) योग्यता--

कपडे **धुवावयास** झाले आहेत.
हा मुलगा शाळेत **घालावयास** झाला आहे.

याच अर्थाचे वेगवेगळे प्रकार केले, तर पुष्कळच होतात; त्यांची उदाहरणे येथे दिली आहेत.

आंबा **रसाला** चांगला नाही.
पिकलेल्या फळाचा रंग **दिसावयास** मोहक असतो--(अपेक्षा)
चारांस आठ तसे **पाचांस** दहा-- (प्रमाण)
पैशाला चार केळी मिळतात-- (विनिमय)
श्रीकृष्ण **रुक्मिणीला, श्रीकृष्णा**-रुक्मिणी जशी आता।
दमयंतीस नळ **नळा,** दमयंती, आयकों जनीं गाता ॥

(४) (i) नाते, (ii) स्वामित्व, (iii) अंगांगीभाव, (iv) संबंध, वियोग.

(i) **रामाला** तीन भाऊ आहेत.
राजाला दोन मुलगे होते.
(ii) **त्याचेपाशी** पुष्कळ पैसा आहे.
(iii) **सशाला** शिंगे नसतात.
(iv) **डोक्याला** टोपी घाल.
(v) तो **आप्तेष्टांस** मुकला.

(५) **मर्यादा**—

तो पाचशे **रुपयांस** बुडाला.

तो **येण्याला** दोन तास अवकाश आहे.

उद्या **चोहोला** या.

काल **रात्रीस** तू कोठे गेला होतास ?

(६) कित्येकांचे मते **मला वाटते, मला कळमळते,** अशा वाक्यांत कर्ता चतुर्थीत येतो.

पंचमी विभक्ती

(१) **अपादान**—

तुम्ही **मुंबईहून** केव्हा याल ?

वाडवडिलांपासून चालत आलेल्या रीतीभाती माणसे सहसा टाकीत नाहीत.

(२) **तुलना, सापेक्षता, तारतम्य**—

जड **पदार्थापेक्षा** हलक्या पदार्थांना हवेचा प्रतिबंध अधिक होतो.

राजाराम **संभाजीहून** लहान होता.

षष्ठी विभक्ती

या विभक्तीने संबंधाचे वेगवेगळे प्रकार दाखविले जातात. जसे—

१ **सोन्याची** आंगठी; **आंगठीचे** सोने. (कार्यकारणभावसंबंध)

२ **रुपायाचे** तूप; **तुपाचा** रुपाया. (मूल्य किंवा मोल)

३ **स्नानाची** खोली; **गाडीचा** घोडा. (हेतू , प्रयोजन)

४ **पाण्याची** विहीर; **गव्हाचे** पेव. (आधार—आधेयसंबंध)

५ **घोड्याची** गाडी; **गाडीचा** घोडा. (वाह्यवाहक संबंध)

६ **खुर्चीचा** पाय; **पायांचा** पशू. (अंगांगीभावसंबंध)

७ **घरचा** धनी; **माझे** घर. (स्वस्वामीभावसंबंध)

८ **मुलाचा** बाप; **माझा** मामा. (नात्याचा संबंध)

९ **नीतीचा** माणूस; **माणसाची** नीती. (धर्मधर्मीसंबंध)

१० **चोरीचा** गुन्हा; **पोळीचे** खाणे. (प्रकार)

षष्ठीचे गौण अर्थ

हेतू–त्याच्या **बोलण्याचा** मला राग आला.

योग्यता–**लग्नाची** मुलगी.

अपादान–तो **कालचा उपाशी** आहे.

अपेक्षा–**तोंडाचा** फटकळ, **कानाचा** हलका.

अधिकरण–तो **दिवसाचा** निजतो.

साकल्य–**गावचा गाव** उठून गेला.

टीप—प्राकृतात प्रथमा, द्वितीया, व संबोधन, यांखेरीज इतर सर्व विभक्तींचे कार्य षष्ठीने होत असे. मराठीतील वर दिलेली उदाहरणे त्याच प्रकारची आहेत हे सांगणे नकोच.

सप्तमी विभक्ती

हिचा मुख्य अर्थ **अधिकरण.**

(१) **यंदा** पाऊस चांगला पडला.
सकाळी लवकर उठावे.
अंगात अंगरखा घाल.
तो **खेळण्यात** प्रवीण आहे.

(२) **गौण अर्थ**

हेतू-प्रयोजन —या **कामात** माझा फार तोटा झाला.

साहित्य—तो समारंभ मोठ्या **थाटात** पार पडला.

संबोधन—**रामा,** तू हे काम कर.

प्रकरण सातवे

सर्वनामे

§ ६८ सर्वनाम म्हणजे काय ?

सर्वनाम या मूळ संस्कृत शब्दाचा अर्थ ‘ सर्वम् ’ या शब्दाप्रमाणे चालणारे शब्द असा आहे. संस्कृत भाषेत ‘ सर्वम् ’ याची रूपे अनियमित होतात; त्यासारखीच, म्हणजे अनियमित रूपे होणारी जी नामे त्यांचा एक गट करून खुणेकरिता संस्कृत वैय्याकरणांनी त्याला सर्वनामे अशी संज्ञा दिली आहे. मराठीत त्या संज्ञेचा अर्थ वेगळा आहे.

“ **सर्व नामांबद्दल येणारे जे नाम, किंवा जो शब्द, तो सर्वनाम** ” असा एक अर्थ सुचविलेला आहे तो कौतुकास्पद आहे, इतकेच फार तर म्हणता येईल. **वस्तूंची प्रत्यक्ष नावे पुन्हा पुन्हा उपयोगात आली तर कंटाळवाणी वाटतात. म्हणून, त्यांचे जागी जे खुणेचे शब्द घालतात, व ज्यांच्यामुळे वस्तूंचा बोध अप्रत्यक्ष रीतीने होतो, त्या शब्दांना सर्वनामे म्हणावे.** या व्याख्येने वस्तूंची प्रत्यक्ष नावे वगळली जातात. ‘ घोडा ’ या शब्दाबद्दल ‘ अश्व ’ हा शब्द योजिला, तर अश्व हे घोड्याचे सर्वनाम होणार नाही. कारण, घोडा या शब्दाने जसा त्या प्राण्याचा प्रत्यक्षपणे बोध होतो, तसाच तो अश्व यानेही होतो. म्हणजे, नामांना स्वतंत्र अस्तित्व व अर्थ ही आहेत. सर्वनामांचा प्रकार तसा नाही. त्यांना स्वतंत्र अस्तित्व असले, तरी स्वतंत्र अर्थ नाही. ती एकाच किंवा ठरींव वस्तूस लागत नाहीत; किंवा नुसती आपण होऊन एखादा अर्थही दर्शवीत नाहीत. एखाद्या वस्तूचा निर्देश आधी प्रत्यक्ष नावाने झालेला असेल, तेव्हाच या खुणेच्या शब्दांनी तिचा पुन्हा बोध होतो. **तो, हा, जो, कोण,** या शब्दांविषयी हे उघड उघड खरे आहे; तितकेच ते **मी, आम्ही, तू, तुम्ही,** या शब्दांसंबंधानेही खरे आहे. मी, आम्ही, तू, तुम्ही, आपण या शब्दांनी दाखवावयाच्या वस्तूंचे अस्तित्व ऐकणाराला स्वतंत्रपणे वेगळ्या शब्दांच्या योगाने

अगोदरच माहित असल्याखेरीज या शब्दांना खरा अर्थच नाही. एकंदरीत **वस्तूंचा अप्रत्यक्षपणे बोध करून देणारा खुणेचा शब्द म्हणजे सर्वनाम** हीच बरोबर व्याख्या दिसते, व याच अर्थाने मराठीत सर्वनाम हा शब्द योजिलेला आहे.

टीप—भाववाचक नामाने वस्तूचा बोध अप्रत्यक्षपणे होतो. काळेपणा म्हटला की एखाद्या काळ्या वस्तूचे स्मरण होतेच. पण काळेपणा हा स्वतंत्र आहे, त्याला स्वतःचे अस्तित्व व अर्थ आहेत. तसा प्रकार सर्वनामांचा नाही. सर्वनामे हे केवळ खुणेचे शब्द आहेत. हा फरक लक्षात ठेवावयाला पाहिजे.

§ ६९ सर्वनामांचे प्रकार—पुरुष

बोलणारा किंवा लिहिणारा याच्या दृष्टीने सर्व सृष्टीचे तीन भाग करावे लागतात. एक, तो स्वतः; दुसरा, तो ज्या कोणाशी बोलत असेल तो; व तिसरा, तो ज्याच्याविषयी बोलत असेल तो विषय. बोलणारा स्वतः हा पहिला, ज्याशी बोलावयाचे तो दुसरा, व ज्याविषयी बोलावयाचे तो तिसरा. व्याकरणात या त्रिविध भेदाला **पुरुष** हे पारिभाषिक नाव आहे. **हे पुरुष तीन आहेत; प्रथमपुरुष, द्वितीयपुरुष व तृतीयपुरुष.**

उदा०—	
मी, आम्ही (मी व इतर) * आपण	प्रथमपुरुष
तू—तुम्ही (तू व इतर) * आपण	द्वितीयपुरुष
तो, ती, ते; ते, त्या, ती हा, ही, हे असा, अशी, असे	तृतीयपुरुष

* **टीप—१ आपण** याचा अर्थ संदर्भाप्रमाणे आम्ही किंवा तुम्ही यांपैकी कोणताही होतो. तो प्रसंगाप्रमाणे जसा होईल तसे त्या त्या ठिकाणी आपण हे प्रथमपुरुषवाचक सर्वनाम किंवा द्वितीयपुरुषवाचक सर्वनाम समजले पाहिजे.

टीप—२ तसेच **आपण, स्वतः** या दोन शब्दांचा उपयोग आत्मत्व दाखविण्याकरिता, दुसऱ्याला वगळण्याकरिता, होतो. अशा अर्थाने उपयोग होत असेल तेव्हा आपण व स्वतः ही सर्व पुरुषी चालतात.

(i) पुरुषवाचक सर्वनामे

प्रथम व द्वितीय पुरुषी मी, आम्ही; तू, तुम्ही; यांची भिन्न लिंगी निरनिराळी रूपे नाहीत. मात्र ज्या मूळ वस्तूकरिता ते सर्वनाम येत असेल, त्या वस्तूच्या लिंगाप्रमाणेच सर्वनामाचेही लिंग समजावयाचे. तृतीयपुरुषी मात्र तीन लिंगांची तीन निराळी रूपे होतात. या सर्वांची विभक्तिप्रत्ययान्त रूपे खाली देतो.

रूपेः —–मी– आम्ही (प्रथमपुरुष)

	एकवचन	अनेकवचन
प्रथमा	मी	आम्ही
द्वितीया	मला, (मज), [मजला]	आम्हांस, आम्हांला, (आम्हांते)
तृतीया	मी, (म्या), [मजशी]	आम्ही, आम्हांशी, [आमच्याशी]
चतुर्थी	मला, (मज), [मजला]	आम्हांस, आम्हांला, (आम्हांते)
पंचमी	(मजहून), [माझ्याहून]	आम्हांहून, [आमच्याहून]
षष्ठी	माझा–झी–झे	आमचा–ची–चे
	माझे, माझ्या, माझी	आमचे, आमच्या, आमची
सप्तमी	माझ्यात	[आमच्यांत] आम्हांत

टीपः—( ) या प्रकारच्या कंसात दिलेली रूपे जुन्या भाषेत कवितेत वगैरे येतात. चालू मराठीत ती प्रांतिक आहेत.

[ ] या प्रकारच्या कंसात दिलेली रूपे षष्ठ्यन्त रूपांना इतर विभक्तींचे प्रत्यय लागून झालेली आहेत.

याव्यतिरिक्त रूपे नेहमीच्या बोलण्यालिहिण्यात येणारी आहेत.

तू–तुम्ही (द्वितीयपुरुष)

	एकवचन	अनेकवचन
प्र.	तू	तुम्ही
द्वि.	तुला, (तुज), [तुजला]	तुम्हांस, तुम्हांला (तुम्हांते)
तृ.	तू (त्वा), [तुजशी, तुझ्याशी]	तुम्ही, तुम्हांशी, [तुमच्याशी]
च.	तुला [तुजला, तुज], (तूते)	तुम्हांला, तुम्हांस, तुम्हांते
पं.	तुजहून [तुझ्याहून]	तुम्हांहून, [तुमच्याहून]
ष.	तुझा–झी–झे	तुमचा–ची–चे
	तुझे, तुझ्या, तुझी	तुमचे–च्या–ची
स.	तुझ्यात	[तुमच्यांत], तुम्हांत

तो, ती, ते; ते, त्या, * ती. (तृतीय पुरुष)

	एकवचन			अनेकवचन		
	पु.	स्त्री	नपु.	पु.	स्त्री.	नपु.
प्र.	तो	ती	ते	ते	त्या	ती
द्वि.	त्याला–स, [त्याजला],(त्याते)	तिला–स, [तिजला], (तीते)	त्याला - स [त्याजला][त्याते]	त्यांस,	त्यांना	(त्यांते)
तृ.	त्याने, त्याशी	तिने–शी	त्याने–शी	त्यांनी, [त्यांजशी]	त्यांही [त्यांच्याशी]	त्यांशी
च.	त्यास, त्याला, [त्याते]	[तीस],तिला, [तीते]	त्यास–ला, (त्याते)	त्यांस,	त्यांना	(त्यांते)
पं.	त्याहून, [त्याजहून]	तीहून, [तिजहून]	त्याहून, [त्याजहून]	त्यांहून	[त्यांजहून]	
ष.	त्याचा, त्याची, त्याचे	तिचा, तिची, तिचे	त्याचा, त्याची, त्याचे	त्यांचा,	त्यांची,	त्यांचे
स.	त्यात	तीत	त्यात	त्यांत		

* **टीप**—त्यां, त्या, ही सामान्यरूपे.

आपण

	एकवचन	अनेकवचन
प्र.	आपण	आपण
द्वि.	आपणास–ला–ते	आपणांस–ला–ते
तृ.	आपण, [आपणे]*	आपण
च.	आपणास–ला–ते	आपणांस–ला–ते
पं.	आपणाहून	आपणांहून
ष.	आपला.......	आपलें........
स.	आपणात	आपणांत

* टीप—आपणे हे रूप कवितेत आढळते.
" राजाज्ञा नसतां तुम्हांसि मिथिले नेऊं नये आपणें. "

स्वतः

प्र.	स्वतः	'स्वतां' असेही रूप प्रचारात आहे.
द्वि.	स्वतः, स्वतःस–ला	
तृ.	स्वतः	
च.	स्वतः स–ला	
पं.	स्वतःहून	
ष.	स्वतःचा	
स.	स्वतात	

सामान्यरूप स्वतः

(ii) दर्शक सर्वनामे—(१) तो, हा, असा; (२) ती, ही, अशी; (३) ते, हे, असे; यांची रूपे:—

तृतीयपुरुषवाचक––तो, ती, ते याजसारखी होतात. अनेकवचन––हे, ह्या, ही; असे, अशा, अशी.

टीप १—दर्शक सर्वनामे–ज्या सर्वनामाच्या योगाने दूरचा किंवा जवळचा पदार्थ दाखविला जातो ते दर्शक सर्वनाम. हा, असा, एवढा, असला, इतका, ही जवळचा पदार्थ दाखवितात.

टीपः—२ 'हा, हे,' यांच्या विभक्तीच्या रूपांत 'ह्या' बद्दल 'या' असा आदेश होतो, व 'ही' बद्दल 'इ' असा आदेश होतो. **जसे:**—ह्याने, याने; ह्याचा, याचा; हिने, इने; हिला, इला.

(iii) संबंधी सर्वनामे

जो, जी, जे; जे, ज्या जी—याची रूपे पुरुषवाचक तो, ती, ते; ते, त्या, ती, यांच्या रूपांसारखी होतात.

(iv) प्रश्नार्थक सर्वनामांची रूपे

कोण

	एकवचन	अनेकवचन
प्र.	कोण	कोण
द्वि.	कोणास—ला—ते	कोणांस—ला—ते
तृ.	कोणी	कोणी
च.	कोणास—ला—ते	कोणांस—ला—ते
पं.	कोणाहून	कोणांहून
ष.	कोणाचा	कोणांचा
स.	कोणात	कोणांत

सामान्यरूप—कोणा—कोणां.

कोणता, कोणती, कोणते; कोणते, कोणत्या, कोणती; यांची रूपे तृ. पुरुषवाचक सर्वनामांच्या रूपांसारखीच होतात.

काय

	एकवचन	अनेकवचन
प्र.	काय	काय
द्वि.	कशास—ला—ते	कशांस—ला—ते
तृ.	कशाने—शी	कशांनी—शी

च.	कशास–ला–ते	कशांस–ला–ते
पं.	कशाहून	कशांहून
ष.	कशाचा	कशांचा
स.	कशात	कशांत

सामान्यरूप–कशा–कशां.

किती

(प्र.)	किती	(द्वि. च.)	कितींस, कितींना–ला–ते
(तृ.)	कितींनी–शी	(पं.)	कितींहून
(ष.)	कितींचा	(स.)	कितींत

सामान्यरूप–किती.

(v) **सामान्य सर्वनामे.**

एकवचनी—

कोण, कोणी, कोणीएक, कोणीतरी, कोणसा एक; अमका, तमका; कांहि अन्य, आणिक, कोणता तरी; फलाणा; अवघा, सर्व, सगळा.

अनेकवचनी—

कैक, कोणीतरी; अमके, तमके, फलाणे, कित्येक, काही एक, काहीक, काही काही; अन्योन्य, परस्पर; इतर, वरकड; अवघे, सर्व, सगळे.

यांची रूपे—ही त्या त्या अंतांच्या नामांप्रमाणे चालतात.

§ ७० सर्वनामांचा उपयोग

१ पुरुषवाचक सर्वनाम

प्रथमपुरुष—मी, आम्ही, आपण

(१) बोलणारा ज्या वेळी इतर लोक वगळून आपल्या एकट्याविषयीच बोलत असेल तेव्हा तो प्रथमपुरुषी एकवचनी 'मी'चा उपयोग करितो. पण ज्या वेळी त्याची इतरांना वगळण्याची इच्छा इतकी स्पष्ट नसते त्या ठिकाणी एकवचनाच्या ऐवजी अनेकवचन घालितात. उदा०—**मला** वाटते आज थंडी चांगली पडेल. तुम्ही या किंवा न या, **आम्ही (मी)** जाणार. (**आपण** जाणार असाही प्रयोग होईल.)

(२) वडील किंवा वरिष्ठ दर्जाच्या माणसाशी, आपणाकडे लीनपणा घेऊन बोलावयाचे असता, बोलणारा प्र० पु० ए० व० **मी** चा उपयोग करितो.

बाबा, **मला** क्षमा करा.
साहेब, **मला** दोन दिवसांची रजा पाहिजे.

(३) बोलणारा ज्या वेळी आपल्याकडे खरा किंवा काल्पनिक थोरपणा घेऊन बोलत असेल, त्यावेळी अनेकवचन योजितात. लडिवाळपणाने बोलावयाचे असता मी बद्दल आम्हीही येते. जसेः—

आम्ही आपल्या सर्व नोकरांस व प्रजाजनांस असे फर्मावितो की, त्यांनी **आमच्याशी** व **आमच्या** पुत्रपौत्रांशी नेकीने व इमानाने वागावे.

आमचे (= लेखकाचे) मत असे आहे की....

टीप—यात लेखक आपणाकडे काल्पनिक थोरपणा घेऊन लिहीत आहे.

आम्ही नाही बोलत तुमच्याशी जा. (लडिवाळपणा)

आम्ही व **आपण** (अस्मादिक)

आम्ही = मी व माझ्याबरोबरचे इतर.

आपण = मी व तूं, मी व तुम्ही, आम्ही व तुम्ही....

बोलणारा जेव्हा आपल्या बरोबरच्या इतरांच्या वतीने, त्यांना न वगळता, व तात्पुरते त्यांच्याशी आपले तादात्म्य कल्पून बोलत असेल त्यावेळी **आम्ही** याचा उपयोग करावा. **आपण** याचा उपयोग वर दिलेल्या अर्थांवरून कळण्यासारखा आहेः—

आम्ही (हिंदूंनी) मुसलमानांस सांगावे की, **आपण** (हिंदू व मुसलमान) एकदिलाने वागू.

अस्मादिक (=आम्ही व मी) याचाही उपयोग आम्ही या अर्थी विनोदाने करितात. जसेः—अस्मादिक आले आहेत = (मी आलो आहे.) स्वतःविषयी लीनपणाने बोलावयाचे असता वक्ता **आपण** म्हणतो. जसे :— आपण याचा विचार करू = मी याचा विचार करीन.

द्वितीय पुरुषवाचक—तू, तुम्ही, आपण—
(विनोदार्थी, खुद्द, स्वतः, स्वारी)

अ. (१) एकाच व्यक्तीविषयी बोलावयाचे असता, (२) ज्याच्याशी बोलावयाचे त्याचा कमीपणा, हीनपणा दाखविण्याचा असेल तेव्हा, (३) जिव्हाळ्याने बोलावयाचे असेल तेव्हा, (४) तिरस्कार दाखविण्याकरिता व (५) देवाला उद्देशून बोलताना एकवचन.

आ. याच्या उलट, (१) अनेकांशी बोलताना, (२) शिष्टाचाराने बोलताना किंवा (३) देवाला उद्देशून बोलताना अनेकवचन.

इ. आपण व तुम्ही—आपण हे तुम्ही यापेक्षा अधिक आदरार्थी आहे.

उदाहरणे : अ. (१) मुला, **तू** इकडे ये.
(२) **तू** येथून चालता हो
(३) आई, **तू** रागावू नको.
(४) मला **तू** चांगला माहीत आहेस.
(५) देवा, **तूच** या संकटातून आमचे रक्षण कर.

आ. (१) मुलांनो, मी **तुम्हाला** एक गोष्ट सांगतो.
(२) मी **तुम्हाला** (= तुला) एक विनंती करावयास आलो आहे. (आदरार्थी)
(३) '**तुम्ही** बहुत चांगले '... (मोरोपंत—देवाला उद्देशून)

इ. मी **आपल्याला** एक विनंती करणार आहे. (= तुम्हांला, पण जास्त आदरार्थी)

टीप—याच अर्थी **रावसाहेबांना, रावसाहेबांच्या पायांशी** एक विनंती करणार आहे, असेही प्रयोग आदरातिशय दाखविण्याकरिता करितात.

ई. अतिशय तिरस्कार दाखवावयाचा असेल तर तू, तुम्ही, यांच्याबद्दल **आपण** याचा उपयोग करितात.

उदा०—**आपण** फार शहाणे आहा.

तृतीय पुरुषवाचक : तो, ती, ते; ते, त्या, ती.

१. (१) एकाच वस्तूविषयी बोलताना, (२) तिरस्कारार्थी, (३) ऐतिहासिक व्यक्तींचा निर्देश करावयाचा असेल तेव्हा, एकवचन;

उदा० (३) कालिदास कवीने रघुवंश हे काव्य रचिले आहे.

२. आदरार्थी अनेकवचन. उदा०, रामदासांचा दासबोध.

२. आत्मत्वदर्शक सर्वनामे.

आपण, स्वतः—बोलणारा दुसऱ्याला वगळून बोलत असेल तर तशा अर्थी आपण, स्वतः, यांचा तिन्ही पुरुषी उपयोग होतो. याच अर्थी आपल्या आपण, आपण होऊन, स्वतः होऊन, वगैरे शब्दांचाही उपयोग करितात. ' आपआपले ' याने अनेकांपैकी प्रत्येकाने स्वतःचे असा अर्थ व्यक्त होतो.

उदाहरणे:—

(१) मी **आपणच** येतो.

(येथें **आपण होऊन, स्वतः, स्वतःच** यापैकी कोणतेही चालेल.)

(२) ज्याने त्याने **आपापले** पुस्तक घ्यावे.

(३) मोर **आपला (स्वतःचा)** पिसारा उभारतो.

(४) त्यांनी-तुम्ही-आपणच हे मनावर घेतले पाहिजे.

पुरुषवाचक आपण व आत्मत्वदर्शक आपण यांतील फरक—

(१) पुरुषवाचक ' आपण ' प्र. पु. व द्वि. पु. अनेकवचनी मात्र येते. आत्मत्ववाचक सर्व पुरुषी, दोन्ही वचनी, येते.

(२) पुरुषवाचक ' आपण ' याचा स्वतंत्र उपयोग होतो. आत्मत्ववाचकाचा उपयोग त्या त्या पुरुषवाचक सर्वनामाबरोबर होतो; स्वतंत्र नाही.

३. दर्शक सर्वनामे

(१) मुख्य दर्शक सर्वनामे दोन आहेत; **हा** व **तो**. बाकीचे शब्द असा असला; इतका, एवढा; तितका, तेवढा; हे या दोहोंचे वेगवेगळे प्रकार आहेत. म्हणून हा व तो यांविषयी जे जे सांगावयाचे ते ते बाकीच्यांनाही लागू आहे असे समजले पाहिजे. हा = जवळचा, तो = दूरचा; उदा०— दोन आंब्यांपैकी मला **हा** पाहिजे, **तो** नको.

आर्या आर्यांसि रुचे, ईंच्या ठायीं अशी असे गोडी।
आहे इतरां छंदीं गोडी परि या परीस ती थोडी ॥

(२) हा व तो यांचा उपयोग तुलना करण्याकरिता केला जातो. जसे :—

हा घोडा **त्याच्या**हून उमदा आहे.
हा आपला व **तो** परक्याचा हा भेद साधूपाशी नसतो.
तो हा = पूर्वी सांगितलेला.
लांब मिशांचा बागुलबुवा **तो** काय बाई **हा** नव्हे ग।

तो व इतर रूपे—यांचा उपयोग (१) जुन्या गोष्टींचे स्मरण करण्याकरिता, किंवा (२) ' प्रसिद्ध ' या अर्थी होतो. जसे:—

लहानपणी जे खेळलो **ते** खेळ, **ते** सवंगडी, कोठे आहेत आता ! **त्या** आंबराया, **ते** बाग, सर्व गेले. (२) **ते** राईमधले फिरणे.

ती रम्य नगरी, **तो** वैभवशाली राजा,....**ते** दिवस आठवले म्हणजे मन दुःखित होते.

हा व इतर रूपे यांचे विशेष उपयोग

(१) ज्या नामाबद्दल ' हा ' हे सर्वनाम योजावयाचे असेल ते नाम पूर्वी येऊन गेले नसेल तर ते प्रथम योजून लगेच त्यापुढे 'हा' चे जरूर ते रूप घालितात.

जसे:—**घोडा हा** उमदा प्राणी आहे.

चांगलेपणा, भलाई, ही भाववाचक नामे आहेत.

टीप:—वरील प्रकारच्या वाक्यांत एखाद्या वस्तूचे वर्णन किंवा विवरण असते.

(२) अनेक वस्तूंविषयी मिळून एकदम बोलावयाचे असेल तेव्हा, किंवा कर्तृपदात एकापेक्षा अनेक शब्द असतील तेव्हा त्या सर्वांच्या पुढे ' हा ' किंवा ' असा ' याचे जरूर ते रूप येते. जसे:—

राम आणि लक्ष्मण हे भाऊ होते. आंबा आणि केळे **ही** फळे खावयास गोड लागतात.

पुढे एक म्हातारा माणूस व एक मुलगी **अशी** दोन माणसे चालली होती.

गोविंदराव लेले **हे** आले होते. बैल व घोडे **यांस** चारा घाला. (सविभाक्तिक रूप).

टीपः—हा याने संख्या, व **असा** याने प्रकार दाखविले जातात.

(३) एखादे संबंध वाक्य आधी घालून लगेच शेवटी त्याच्या अर्थाने **हे** किंवा **असे** याचे जरूर ते रूप घालितात. जसेः—

तू करतोस हे बरे नाही. मी असे बोललो **हे** (किंवा **असे**) तुला कोणी सांगितले ?

टीप:—या वाक्यांत ‘ हे ’ च्या जागी ही गोष्ट, अशी गोष्ट असेही म्हणता येईल.

(४) ज्या वेळी अनेक विधानांपैकी प्रत्येकाकडे ऐकणाराचे लक्ष वेधावयाचे असेल त्यावेळी त्या प्रत्येक वाक्यापुढे ‘ तो ’ चे जरूर ते रूप व सर्व वाक्याच्या पुढे मिळून ‘ हा ’ किंवा ‘ असा ’ याचे रूप घालितात. जसेः—

त्याने दारू लाविताना केस भाजून घेतले, **तो** अपराध, (**ती** गोष्ट), दिवाणखान्यातला आरसा फोडिला **ते**, गाडी मोडिली **ते**, **हे** सर्व (किंवा **या** गोष्टी, **हे** सर्व अपराध) मी त्याला माफ केले.

(५) **हा—लगेच, आताच.** क्रियाविशेषणाप्रमाणे उपयोग होतो. जसेः—मी **हा** आलोच.

४. संबंधी सर्वनामे

मराठीतील मुख्य संबंधी सर्वनाम **जो. जसा, जसला, जितका, जेवढा** वगैरे त्यापासून तयार झाली आहेत. त्यांचे प्रतियोगी शब्द तो, तसा, तसला, तितका, तेवढा हे आहेत.

एखाद्या नामाची व्याख्या किंवा वर्णन करावयाचे असेल किंवा त्याच्या गुणधर्माविषयी काही विधान करावयाचे असेल तर संबंधी सर्वनामाच्या योगाने गौण वाक्याने ते करिता येते. ज्यात संबंधी सर्वनाम आहे ते गौण वाक्य; त्याचे प्रतियोगी वाक्य हे मुख्य वाक्य असून त्यात प्रतियोगी दर्शक सर्वनाम असते; जसे:—

ज्याला तुम्ही बोलाविले होते **तो** हा मनुष्य; **जसे** काम **तसा** दाम.

(१) ज्या नामाशी संबंधी-सर्वनामाचा संबंध येतो ते नाम त्याच्या जवळच गौण वाक्यात घालितात, किंवा दर्शक सर्वनामाबरोबर मुख्य वाक्यात घालितात. जसे :– ज्या मनुष्याला तुम्ही बोलाविले होते तो हा; ज्याला तुम्ही बोलाविले होते तो मनुष्य हा; ज्या मनुष्याला तुम्ही बोलाविले होते तो हा मनुष्य.

(२) मराठीत संबंधी सर्वनाम प्रतियोगी शब्दाच्या आधी येते. इंग्रजीत ते मागाहून येते. हा दोन भाषांतील फरक लक्षात घेण्याजोगा आहे. अगोदर प्रतियोगी दर्शक व मागाहून संबंधी सर्वनाम योजणे ही पद्धत मराठीला संमत नाहीं. उदा०–**बोका, ज्यास जेवावयास बोलाविले होते..** असा प्रयोग मराठीत करीत नाहीत.

(३) प्रतियोगी शब्द प्रथमपुरुषी किंवा द्वितीयपुरुषी सर्वनाम असेल तेव्हा, त्याच्या अर्थावर जोर देण्याकरिता, त्याच्याबरोबर संबंधी-सर्वनामाचा उपयोग करितात. जसे :— **मी जो** तुला बोललो तो तुझ्या हिताकरिता बोललो.

ज्या माझी तुमच्या पायांशी लागण्याची देखील योग्यता नाही तो मी तुमची बरोबरी कशी करीन ?

ज्या तुला अक्षरओळखही नाही त्या तुला पुस्तकाचा काय उपयोग ?

(४) संबंधी सर्वनाम कधी कधी अध्याहृत असते. जसे :– (जो) गर्जेल तो पडेल काय ? (जो) करील तो भरील.

(५) ज्या वस्तूविषयी बोलावयाचे असेल तिचे साकल्य दाखविण्याकरिता संबंधी व दर्शक सर्वनामांचा मिळून उपयोग करितात. याचे बरेच प्रकार आहेत ते उदाहरणांनी स्पष्ट करून दाखवितो. जसे :—

जो उठतो **तो** पुढारी.

जो जो येतो तो आपलेच घोडे दामटतो.

जो जो उशीर करील **त्याला त्याला** शिक्षा होईल.

जो (जो) कोणी (किंवा, म्हणून) उशीर करील **त्याला त्याला** शिक्षा होईल.

ज्याला त्याला श्रीमंतीची हाव असते.

(६) संबंधी सर्वनामाने जोडले जाणारे वाक्य विशेषणात्मक असते त्या वेळी मुख्य वाक्यात येणारे प्रतियोगी दर्शक सर्वनाम ' हा ' किंवा ' असा ' याचे कोणतेही रूप असू शकते. जसे :--

आपला पूर्वज **जो** नामांकित संग राजा **त्याच्या** वंशातील हा शेवटचा पुरुष होता.

जिच्या हाती पाळण्याची दोरी। **तीच** जगाते उद्धरी ॥

(७) कवितेत वगैरे संबंधी वाक्य मुख्य वाक्याच्या मागूनही येते. जसे :--

जो धीरवीर-हीर-प्रवर-प्रकरें करोनिया खचिला ॥

तिसरे दिवशीं चक्रव्यूह सुदुर्भेद्य, युक्तिनें रचिला।

५ प्रश्नार्थक सर्वनामे-कोण, कोणता, काय, कसे, किती.

एखाद्या वस्तूचे ठिकाणी काल्पनिक किंवा खरा सजीवपणा, थोरपणा, वगैरे कल्पून बोलावयाचे असेल तर '**कोण**' किंवा '**कोणता**' याचा उपयोग होतो, व इतर ठिकाणी '**काय**' याचा उपयोग होतो. कोण व कोणता यांपैकी ' कोणता ' याने ' अनेक वस्तूंपैकी एक ' असा अर्थ दर्शविला जातो.

(१) **कोण** व **काय** यांचा परस्परांच्या जागी खालील अर्थी उपयोग करितात.

(i) आश्चर्य दर्शविण्याकरिता.

(ii) विवक्षित वस्तूचे असामान्यत्व दर्शविण्याकरिता.

जसे :--(i) हा **कोण** मूर्खपणा! **काय** मूर्ख मनुष्य आहे हो !

(ii) **काय** हे धैर्य !

(२) कोण, काय, कोणता यांच्या द्विरुक्तीने अनेकत्व, पृथकत्व, फरक, अंतर, हे अर्थ दर्शविले जातात. जसे :--

सभेस **कोण कोण** लोक आले आहेत ?

गोधन हरावयास्तव आले भट **कोण कोण** पाहूं दे !

बाबांनी आम्हांला **काय काय** खेळणी आणली आहेत !

काय काय=पुष्कळ व अनेक प्रकारची.

तू **कोण,** तो **कोण,** याचा काहीतरी विचार कर. (अंतर)

कोण=अज्ञात व्यक्ती, अशा सामान्य अर्थांने नपु. उपयोग करितात.
उदा०—वाजे पाऊल आपुलें। म्हणे मागे **कोण** आलें॥

कोण व काय यांचा उपयोग संबंधी-सर्वनामाप्रमाणेही होतो.

जसे:—**कोण** येईल तो येवो. कोण=जो.

काय म्हणशील ते खरे. काय=जे.

कोणता=अनेक वस्तूंपैकी एक. तांबडा व हिरवा यांपैकी तुला **कोणता** रंग आवडतो?

दोन वस्तूंची तुलना करिताना दोहोत अंतर नाही हे दाखविण्याकरिता 'काय' याचा उपयोग करितात. जसे :—

रामा **काय,** गोविंदा **काय,** सारखेच.

६ सामान्य सर्वनामे.

यांतील मुख्य मुख्य घेऊन त्यांचे तेवढे उपयोग सांगतो.

कोण, कोणी—

जेव्हा पुरुष किंवा स्त्री यांपैकी कशाविषयी बोलावयाचे हे विवक्षित नसेल त्यावेळी नपुसकलिंगी 'कोण', 'कोणी,' याचा उपयोग करितात जसे:—

बाहेर **कोण** आले? **कोणी** काही म्हणो...

'कोणी' याचा उपयोग द्विरुक्तीनेही होतो; जसे:—

जगात **कोणी** शहाणी असतात, **कोणी** वेडी असतात.

कोणी वंदा **कोणी** निंदा.

निषेधार्थी वाक्यात द्विरुक्तीने उपयोग—उदा०:—

न कोणी कुणाचा बंदा। न **कोणी कुणाचा** वाली.

काय, काही-साकल्यार्थी उपयोग.—उदा०—तो **काय** करील ते खरे. **काहीही** करा, पण हे काम हातचे टाकू नका.

———

प्रकरण आठवे

विशेषण

(१)

§ ७१ विशेषण म्हणजे काय ?

नामाचा गुण दाखवून त्याच्या अर्थाची व्याप्ती मर्यादित करणारा जो सविकारी शब्द त्याला विशेषण म्हणतात. उदा०, 'आंबा' या नामाने आंब्याचे कोणतेही फळ किंवा झाड दर्शविले जाते. पण 'पिकलेला आंबा' या शब्दांपैकी 'पिकलेला' याने त्या प्रकारापेक्षा इतर, म्हणजे न पिकलेले सर्व आंबे वगळले जाऊन, 'आंबा' याची व्याप्ती मर्यादित होते. गुणधर्मवाचक आणखी एक शब्द येऊन **पिकलेला पायरी** आंबा, असे म्हटले तर 'पायरी'––किंवा, पायरीचा–या शब्दाने आंब्याचा आणखी एक गुण दाखविला जाऊन त्या नामाची व्याप्ती आणखीही मर्यादित होते; कारण पायरीशिवाय इतर सर्व आंबे [पिकलेले असले तरी] वगळले जातात. या उदाहरणावरून विशेषणाचे कार्य व त्याची वर दिलेली व्याख्या, यांची कल्पना येईलच.

विशेषणाने गुणाचा किंवा धर्माचा बोध होत असला तरी ते वाक्यात एकटे स्वतंत्रपणाने येत नाही. त्याचा उपयोग नामाचे बरोबर पूर्वी किंवा मागाहून होतो; म्हणजे ते नामाच्या आश्रयाने रहाते. ज्या नामाच्या आश्रयाने विशेषणाचा उपयोग होतो त्याला, त्या वेळापुरते त्या विशेषणाचे **विशेष्य** असे म्हणतात. विशेष्य हा शब्द अर्थातच, सापेक्ष आहे. म्हणजे एखाद्या नामापूर्वी विशेषण असेल तेव्हाच ते नाम त्या विशेषणाचे विशेष्य होते; एरवी नाही.

§ ७२ विशेषणाचे मुख्य दोन **प्रकार** आहेत.

गुणविशेषण, आणि **संख्याविशेषण**. यांचे पोटभेदही आहेत. ते असे :—

I **गुणविशेषणे** (i) सर्वनामांपासून झालेली, [सार्वनामिक].
(ii) इतर.

II **संख्याविशेषणे**
(iii) निवळ संख्या दाखविणारी.
(iv) क्रमवाचक.
(v) आवृत्तिवाचक.
(vi) भेदवाचक.
(vii) अनिश्चित संख्या दाखविणारी.

§ ७३ **सार्वनामिक विशेषणे**

ही गुण-विशेषणांतच घालावयास हरकत दिसत नाही. उदा०— तो घोडा, माझा घोडा, जसे काम तसा दाम—ही वाक्ये घ्या. यांत **तो**, **माझा**, **जसे**, **तसे** यांनी त्यांच्या विशेष्यांचा गुण प्रत्यक्ष कोणताच दाखविला जात नाही असे कदाचित् वाटण्याचा संभव आहे व ते थोडेसे खरेंही आहे. म्हणजे–**काळा**, **तांबडा**, या स्वतंत्र अर्थाच्या प्रत्यक्ष गुणदर्शक शब्दांनी नामाचा गुण जसा चटकन व निर्विवादपणे लक्षात येतो, तसा तो, **तो**, **माझा**, **जसे**, **तसा**, यांसारख्या शब्दांनी येत नाही हे खरें. पण, **तो** घोडा म्हणजे विवक्षित घोडा, ज्याच्याविषयींच बोलणाराला या क्षणी बोलावयाचे आहे तो; **माझा** घोडा = ज्यावर बोलणाराचे स्वामित्व आहे तो; हा त्या घोड्याचा एक प्रकारे गुणच दाखवल्यासारखे आहे. **जसे काम तसा दाम**, यात तर (जसे = ज्या प्रकारचे बरे किंवा वाईट तसे = त्या प्रकारचे) त्या मानाने गुणधर्मवाचकत्व जास्तच स्पष्ट आहे. म्हणजे एकंदरीत सार्वनामिक विशेषणांच्या योगाने गुणधर्म प्रत्यक्ष नाही तरी अप्रत्यक्षपणे दाखविले किंवा सुचविले जातातच. म्हणून गुणधर्म ह्याचा अर्थ जरासा सढळपणाने केला म्हणजे सार्वनामिक विशेषणांचाही समावेश गुणधर्मवाचक विशेषणांत करावयाला काहीच हरकत नाही.

संख्यावाचक विशेषणे किंवा **संख्याविशेषणे यांचे** प्रकार हे केवळ सोईकरिता केलेले आहेत.

§७४ ' अंकानां वामतो गतिः ' असे म्हटले आहे. म्हणजे संख्या मोजताना ती डावीकडून उजवीकडे मोजितात. पहिल्या दहा अंकांना अर्थातच हे लागू नाही, पण पुढे एकादश > अकरा (एक + दश), द्वादश, त्रयोदश—तेरा (त्रि + दश), अशा रीतीने डावीकडून उजवीकडे मोजितात. एकोणीस (= एक उणे वीस), एकोणतीस (= एक उणे तीस), या संख्या जराशा निराळ्या रीतीने सांगितल्या आहेत. पण, मोजण्याची रीत एकच. म्हणजे, डावीकडून उजवीकडे. शंभरानंतर मात्र मोजण्याची रीत बदलते. शेकडा, हजार, दहा हजार, लक्ष, वगैरे मोठ्या संख्या मोठ्यापासून शेंकडयापर्यंत क्रमाने सांगून शंभराच्या आतील संख्या तेवढ्या डावीकडून उजवीकडे या नियमाने मोजितात. संख्येचा अंश किंवा अपूर्णांक सांगावयाचा असेल तर तोही मुख्य नियमाप्रमाणे सांगितला जातो :—

सवा = सपाद, दीड = द्विअर्ध, अडीच = अर्ध तृतीय, साडेचार=सार्ध—चार, वगैरे.........

अपूर्णांक सांगताना अंशाने किंवा आणेवारीनेही सांगतात. जसे :—

$\frac{१}{४}$ = एक चतुर्थांश, $\frac{१}{२}$ = एक द्वितीयांश.

दोन आणे (= रुपयातले दोन आणे) = $\frac{१}{८}$

चार आणे = $\frac{१}{४}$ ....

$\frac{१५}{१६}$ = (रुपयातील) १५ आणे....

क्रमवाचक विशेषणे :—पहिला, दुसरा, तिसरा, चवथा; पाचपासून पुढे '**वा**' हा प्रत्यय लागून तयार होतात. जसे :—

पाचवा, सहावा, आठवा, नववा... ....

आवृत्तिवाचक विशेषणे :— '**पट**' हा प्रत्यय लागून तयार होतात. जसे :—एकपट, दुप्पट, तिप्पट, चौपट.

(कापड, दोरा, इ० वस्तूंस '**री**' असा प्रत्यय लागतो. जसे, एकेरी, दुहेरी

पदरी, सुती, घडी, पेडी, गुणित, या शब्दांच्या साहाय्याने याच अर्थाचे सामासिक शब्द तयार होतात. जसेः—

एकपदरी, दुपदरी, दोसुती, चौघडी, दोनपेडी....

पृथकत्ववाचक विशेषणेः—(१) **दर, प्रति,** हे उपसर्ग, किंवा (२) **ला** हा प्रत्यय लागून तयार होतात. जसेः—

(१) दर एक, दर दोन; प्रत्येक, हरेक, हरएक, दरक्षणी, प्रतिक्षणी, दरमहा....

(२) अर्धाला, सगळाला.

अनिश्चित अर्थाची—यांनी संख्येचा सामान्यपणे बोध होतो; पण, कोणतीही निश्चित संख्या समजत नाहीं.

फार, थोडा, अल्प, सर्व, सगळा, अवघा, अन्य, इतर, वरकड, परस्पर, अन्योन्य, काही एक, कित्येक....

२ विशेषणांचे विकार

§ ७५ विशेषणांना सविकारी शब्द असे म्हटलें आहे. त्याचे कारण-नामसर्वनामांप्रमाणेच त्यांना लिंग, वचन, विभक्ती हे विकार होतात. मराठी, तील विशेषणांना त्यांच्या विशेष्याचे लिंगवचन असते. पण, त्यांना विभक्ति-प्रत्यय लागत नाहीत. मात्र, त्यांचे सामान्यरूप होते.

आकारान्त विशेषणे खेरीज करून इतर विशेषणांची रूपें विशेष्यांच्या लिंगवचनांप्रमाणे बदलत नाहीत, व आकारान्त विशेषणांपैकी संख्यावाचक विशेषणांचीही बदलत नाहीत. फक्त आ—कारान्त गुणविशेषणांची रूपे तेवढी विशेष्यांच्या लिंगवचनांप्रमाणे बदलतात. ती अशीः—

पु.	स्त्री.	नपु.	सामान्यरूप
आ	ई	ए	या

या नियमाप्रमाणे चालणाऱ्या आकारान्त विशेषणांची यादी—

(१) गुणवाचक—तांबडा, हिरवा, जाडा....

(२) क्रमवाचक—पहिला, दुसरा, तिसरा, वगैरे.

(३) षष्ठयन्त——माझा, कालचा, कोठचा, आपला....

अपवाद—संख्यावाचक विशेषणे—सहा, अकरा, बारा, तेरा, चौदा, पंधरा, सोळा, सतरा...

संख्यावाचक विशेषणांपैकी पाचपासून पुढील आकारान्त विशेषणे अकारान्त नामांप्रमाणे चालतात.

एक, दोन, तीन, चार ही अनियमित आहेत. त्यांची रूपे:——

एक	पु., नपु.	एकास एकाने...
	स्त्री.	एकीस, एकीचा.
दोन	पु., नपु.	दोहोंचा, दोघांचा...
	स्त्री.	दोहींस, दोघींस...
तीन	पु., नपु.	तिहींस
	स्त्री.	तिहींस, तिघींस
चार	पु., नपु.	चोहोंस,
	स्त्री.	चौहींस, चौघींस

दोघे, तिघे, चौघे...ही 'घ' ने होणारी रूपें माणसांस लागतात.

एक—पासून नऊ-पर्यंत विशेषणांची एका, दोहो...नवा....अशी विकल्पे-करून सामान्यरूपे होतात. किंवा त्यांच्या मूळ रूपांचाच उपयोग नामाबरोबर होतो. जसे:——

रामा एक दिवस मजकडे आला.
रामा एके दिवशी मजकडे आला.
मी चार जणांस भेटलो.
मी चौघा जणांस भेटलो.

मी आठ दिवसांनी परत येईन.

मी आठा दिवसांनी परत येईन.

टीप—सर्वच विशेषणांना कवितेत केव्हा केव्हा लिंग, वचन, विभक्ती हे विकार होतात.

३ विशेषणांचा उपयोग

सामान्य नियम

§ ७६ विशेषणाचा उपयोग नामापूर्वी व त्याचा गुण दाखविण्याकरिता, त्याचा अर्थ मर्यादित करण्याकरिता, करितात; त्यावेळी त्याला गुणविशेषण असे म्हणतात. जसे :—तो **पिकलेला** आंबा झाडावरून खाली पडला. **विद्वान** माणसाला लोक मान देतात.

होणे, शोभणे, करणे, समजणे, वाटणे, यासारख्या अपूर्णार्थक धातूंचा अर्थ पुरा करण्याकरिता त्यांच्याशी विशेषणांचा विशेष्यांचे नंतर उपयोग होतो, तेव्हा त्या विशेषणांना विधिविशेषणे असे म्हणतात.

नियम—(१) या दोन्ही **प्रकारच्या** उपयोगात आ-कारान्त विशेषणाचे रूप विशेष्याच्या लिंगवचनाप्रमाणे बदलते. मात्र विभक्तिप्रत्यय न लागता सामान्यरूप होते. उदा०—**म्हातारी** माणसे ही **पिकलेल्या** पानांप्रमाणे आहेत.

(२) एकच गुणविशेषण एकापेक्षा आधिक विशेष्यांना लागत असेल तर त्यांपैकी सर्वांत जवळच्या विशेष्याप्रमाणे त्याचे लिंग व वचन ही बदलतात. जसे :—

मला एक **पिकलेला** आंबा व केळे पाहिजे.

हिमालय पर्वतावर सर्व **हवेतले** प्राणी व झाडेझुडपे आढळतात.

(३) विधिविशेषणाची विशेष्यनामे जर एकाच लिंगाची असली तर विशेषणाचे लिंगही तेच असते; पण, विशेष्ये भिन्न लिंगी असतील तर विशेषणाचे लिंग नपुसकलिंग असते.

उदा०—रामा व गोविंदा हे मुलगे फार **शहाणे** होते. रामा व मनी **शहाणी** होती.

(४) पण, विशेष्यवाचक नामे जर निर्जीव पदार्थांची नावे असली तर विधिविशेषण शेवटच्या नामाप्रमाणे चालते.

उदा०—त्या पक्ष्याचे डोके व चोच **मोठी** आहे; किंवा, त्या पक्ष्याचे डोके व चोच **ही मोठी** आहेत.

(५) एकाहून अधिक विशेषणांचा एकाच विशेष्याशी संबंध आला तर त्या सर्वांच्या शेवटी '**असा**' या दर्शक विशेषणाचे योग्य ते रूप घालून सर्व जोडून घेतात. जसे :—

१ मी एक काळा व उमदा **असा** घोडा पाहिला.

(किंवा), मी एक उमदा, काळा घोडा पाहिला.

(६) सर्व विशेषणांचा नामांप्रमाणे उपयोग होतो :

खरे बोलावे, **खोटे** बोलूं नये.

शहाण्यास शब्दाचा मार.

(७) कर्मणिप्रयोगात कर्मपूरक विधिविशेषण कर्माप्रमाणे चालते. जसे :—तिने कोळशाने भिंत **काळी** केली.

पण, भावेप्रयोगात कर्म सप्रत्यय द्वितीयेत असते; त्यावेळी कर्माबरोबर येणारे पूरक विधिविशेषण नपुसकलिंगी असते. जसे :—वैद्याने तिला **बरे** केले.

४ तारतम्य किंवा तुलना

§ **७७.** संस्कृत व इंग्रजी या भाषांत तुलना किंवा तारतम्य याचे द्योतक वेगळे प्रत्यय आहेत. संस्कृतात ईयस्, तर, या प्रत्ययांनी दोन वस्तूंमधील कम-जास्तीपणा व्यक्त होतो; व इष्ठ, तम, या प्रत्ययांनी अनेक वस्तूंपैकी एक श्रेष्ठ आहे असा अर्थ दर्शविला जातो. (संस्कृतातील या 'तर' व 'तम' प्रत्ययांपासूनच तारतम्य हा शब्द तयार झालेला आहे.)

मराठीत मात्र तारतम्यदर्शक निराळे प्रत्यय नाहीत. पण तोच अर्थ, एका वस्तूच्या संबंधाने किंवा अपेक्षेने दुसरी बरी, अशा रूपाने व्यक्त केला जातो. उदा ०—रामा**पेक्षा** गोविंदा हुशार आहे.

यामुळेच दोन वस्तूंची तुलना करावयाची तर, पंचमी विभक्तीचे प्रत्यय किंवा तदर्थक शब्दयोगी अव्यये (पेक्षा, पासून) यांपासून तयार झालेल्या रूपांच्या मदतीने ती करिता येते.

उदा०—सोने **रुप्याहून** जड आहे.

तेल **पाण्यापेक्षा** हलके असते.

दोहोंपेक्षा अधिक वस्तूंतील एकीचा श्रेष्ठपणा दाखवावयाचा असेल तर तोही पंचमीच्या रूपांनी दाखविता येतो. उदा०—

रामा वर्गातील इतर सर्व **मुलांपेक्षा** हुशार आहे.

किंवा, संस्कृतातल्याप्रमाणे सप्तमीच्या साहाय्याने तोच अर्थ सांगता येतो.

रामा वर्गातील सर्व मुलांत (मुलांमध्ये) हुशार आहे.

किंवा, **अगदी, अति, अतिशय, मोठा, चांगला** या क्रियाविशेषणांच्या साहाय्यानेही श्रेष्ठत्व दाखविता येते. जसे :—

रामा (वर्गातील मुलांत) **अतिशय हुशार** आहे.

राम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न, यांत शत्रुघ्न हा **अगदी लहान भाऊ** होता.
रामाचा **अगदी लहान भाऊ** शत्रुघ्न हा होता.

वस्तूत एखादा गुण विशेषच प्रमाणाने आहे अशा अर्थी विशेषणाची पुनरुक्ती करितात, किंवा दोन समानार्थी विशेषणे जोडून तो अर्थ व्यक्त करितात. जसे :—

गवत अगदी **हिरवे गार** आहे.

गवत अगदी **हिरवे हिरवे** आहे.

सूर्यबिंब **तांबडे लाल** दिसत होते.

आंबा पिकून **पिवळा धमक** झाला आहे. ......

वस्तूंतील साम्य, **इतका, एवढा, सारखा, प्रमाणे** या शब्दांनी दर्शविले जाते. जसे —

आईने मुलाला सुपारी **एवढा (इतका)** गूळ दिला.

वाघ हा सिंह**प्रमाणे** क्रूर व हिंस्र पशू आहे.

विशेषणाच्या द्विरुक्तीने खालील अर्थ व्यक्त होतात.

(i) अनेकत्व

त्या शहरात **मोठमोठ्या** हवेल्या आहेत.

उंच उंच वृक्षांच्या राजीने ते वन भरून गेले.

(ii) गुणाधिक्य

तो रागाने **लाल लाल** झाला.

(iii) चढ किंवा उतार

सकाळची सावली **आखूड आखूड** होते व दुपारची **लांब लांब** होत जाते.

(iv) पृथक्पणा, प्रकार

सर्व मुलांस **एक एक** लाडू द्या.

त्याने जमलेल्या गरिबांस **एक एक** रुपया बक्षीस दिला.

ती गोष्ट **कशी कशी** झाली तें सांग.

विरुद्ध अर्थांची दोन विशेषणे जोडली असता ती वस्तूचे साकल्य दाखवितात. जसे :—

लहानथोर मिळून दहा हजार लोक यात्रेस जमले होते.

बरेवाईट पाच हजार आंबे या बागेत यंदा निघतील.

५ किरकोळ नियम

§७८ या सदरात वेगवेगळ्या शब्दांचे विशेष नियम किंवा आडाखे काय असतील ते सांगितले आहेत.

ला प्रत्यय लागून झालेल्या विशेषणावरून प्रकाराचा बोध होतो. जसे:— तुम्हाला **कसले** पुस्तक पाहिजे ? मला **असला** (= या प्रकारचा) लोचटपणा आवडत नाही. तुला **कसले** कागद पाहिजे असतील **तसले** आण. **ला-लाला** प्रत्ययान्त विशेषणांनी वस्तूचे प्रकार व पृथक्पणा हे गुण दाखविले जातात. जसे :—

एक एक पेरू **असलाला** होता.

इतका, एवढा, तेवढा, जेवढा व यांवरून झालेल्या इतर विशेषणांनी संख्या किंवा प्रमाण ही दर्शविली जातात. जसे :—

मला **इतकी** साखर नको. मला **तितके** (**तेवढे**) रुपये पुरेत.

जसा तसा } = सामान्य, साधारण प्रतीचा.
असा तसा

जसे :—ती रूपाने **अशीतशीच** आहे.

त्याने **जसेतसे** पोटापुरते पैसे मिळविले.

(जसे तसे = अगदी सामान्य रीतीने, काही तरी करून.)

जसा तसा } यांनी वाढते न्यूनाधिक्य समजते.
जितका तितका

मनुष्य **जसजसे** (**जितके**) श्रम करील **तसतसे** (**तितके**) त्याला फळ मिळते.

जशाचे तसा = पूर्ववत, अविकृत. तो दहा वर्षे शाळेत जाऊन **जशाचा तसा** राहिला.

जशास तसा = योग्य.

दांडग्या माणसांशी **जशाचे तसेच** वागले पाहिजे.

कोण, कोणता, यांपैकीं '**कोणता**' याने प्रकार किंवा अनेक वस्तूंपैकी एकाची निवड हे अर्थ दर्शविले जातात. जसे :—

१ तुम्हाला असे करण्याने **कोणता** लाभ होणार आहे ?

२ तुला यांपैकी **कोणती** अंगठी पाहिजे ?

केवढा } आश्चर्यदर्शक
किती

गोपाळरावांचा **केवढा** (**किती**) लौकिक !

कसला-कसचा (तुच्छता)—रामा परीक्षेत **कसचा** उतरतो ?

६ **संख्यावाचक विशेषणे**

§ ७९ (i) द्विरुक्तीने वाटणीची कल्पना उत्पन्न होते. जसे :—

प्रत्येक मुलाला **एक एक** रुपाया द्या.

(ii) साकल्यवाचकाशिवाय इतर संख्यावाचक शब्दांच्या समासाने अंदाज किंवा सुमार या अर्थाचा बोध होतो. जसे :—

त्या सभेस **दहा–पाच** लोकच काय ते हजर होते.

एकंदर **हजार–पाचशे** वर्गणी जमेल.

(iii) स्थूल संख्यांचे वाचक जे शेकडा, हजार...वगैरे शब्द त्यांस ‘ ओ ’ प्रत्यय लागून मोठ्या संख्यांचा अजमास सांगता येतो. जसे :—

बाजारात **शेकडो** आंबे आले आहेत.

याच अर्थी विशेषणांची तृतीयान्त रूपे करितात, किंवा ‘अवधी’ या शब्दाने समास करून तो अर्थ व्यक्त करितात. जसे :—

(i) यात्रेस लोक **शेकड्यांनी** आले होते.

(ii) दिपवाळीत रोषणाई करण्यात **लक्षावधी** रुपये खर्च होतात.

‘ एक ’ या संख्यावाचकाचे विशेष उपयोगः—

(i) नामाप्रमाणे अनेकवचनी प्रयोग होतो. जसे :—

एक गजावरि **एक** हयावरि **एक** रथावरि बैसुनि आले.

एक असे म्हणतात, **एक** दुसरेच म्हणतात.

एक = कोणी, काही.

याच अर्थाने **कोणी एक, किती एक,** या शब्दांचा उपयोग करितात.

प्रकरण नववे

क्रियापदविचार

§ ८० पूर्वी वाक्याचे विवेचन करिताना सांगितलेच आहे, की वाक्य होण्याला मुळात दोन गोष्टी लागतात. बोलणाराने **कशाविषयी तरी** व **काही तरी** म्हटलेले असल्याशिवाय वाक्य होत नाही. या दोन गोष्टींपैकी जिच्याविषयी काही तरी म्हटलेले असते तिला **उद्देश्य** म्हणतात असे सांगून उद्देश्यात येणारे जे निरनिराळ्या प्रकारचे शब्द, म्हणजे नाम, सर्वनाम, विशेषण,

यांचे विवेचन आतापर्यंत केले. यापुढे, जे काही म्हटलेले असते, म्हणजे **विधेय,** त्याचे विवेचन करावयाचे आहे. **विधेय ज्या शब्दाने किंवा शब्दांनी सांगितले जाते त्या शब्दांना क्रियापदे म्हणतात,** कारण ती क्रियावाचक आहेत. उदा०—**मी जातो, तो शहाणा आहे, शिवाजी राजा झाला.**

आता, या वरील तीन वाक्यांपैकी **मी जातो** यात प्रत्यक्षपणेच क्रिया सांगितलेली आहे; पण दुसऱ्या दोन वाक्यांतही ती अप्रत्यक्षपणे सांगितलेली आहे असेच दिसेल. **'शिवाजी राजा झाला'** या वाक्यात सांगितलेली, राजा होणे, ही एक क्रियाच आहे. फक्त ती क्रिया करणारा कोण हे विवक्षित नसल्यामुळे केवळ ती क्रिया झाली एवढेच, अप्रत्यक्षपणे, सांगितले. तसेच, **'तो शहाणा आहे'** या वाक्यातही क्रिया गर्भित आहेच. 'त्या 'ला शहाणा करणारे कोणी तरी असलेच पाहिजे. पण, ते विवक्षित नसल्यामुळे, फक्त ती क्रिया घडलेली आहे, अशी तिची स्थिती मात्र **'तो शहाणा आहे'** या वाक्यात सांगितलेली आहे. म्हणजे **क्रियापदात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतींनी क्रिया दाखविणारे सर्व शब्द येतात. तेव्हा क्रियापद म्हणजे " ज्या विकारी शब्दाच्या योगाने एखाद्या वस्तूविषयी काही तरी पूर्णपणे सांगता येते तो शब्द "** अशी व्याख्या केली म्हणजे झाले.

वरील व्याख्येत आलेल्या **पूर्णपणे** या शब्दाची थोडीशी छाननी करणे जरूर वाटते. उदा०——**तो काम करीत आहे; मी निजून उठलो; तो धावताना पडला;** या वाक्यांत **करीत, निजून, धावताना,** या शब्दांनी क्रियेचा बोध होतो खरा; पण, तो पूर्णपणे मात्र होत नाही. म्हणून त्यांना **क्रियापदे** असे न म्हणता काही तरी वेगळे पारिभाषिक नांव द्यावे हे सोईचे वाटते. **क्रियावाचक मूळ शब्दांना—मग ते क्रिया पूर्णपणे सांगोत किंवा अपूर्णपणे सांगोत——धातू असे म्हणतात;** व यावरून अपूर्णक्रियावाचक शब्दांना **धातुसाधिते** ही संज्ञा देतात. संस्कृत व्याकरणात यांना **कृदन्त** असे म्हणतात. **कृदन्त** म्हणजे कृत् (=करित) यासारखा अपूर्णक्रियावाचक शब्द. मराठी व्याकरणात **धातुसाधित** व **कृदन्त** या दोन्ही संज्ञा रूढ आहेत.

टीपः—**क्रियापद** या पारिभाषिक शब्दातील उणेपणा वैय्याकरणांच्या लक्षात आलेला आहे, व व्याख्या करिताना ज्याने त्याने आपल्या परीने तो दूर करण्याचा प्रयत्नही केलेला आहे. उदा०,-**रे.नवलकर** म्हणतात:—'क्रियापद हा वाक्यातील मुख्य शब्द असून त्याच्या योगाने एखाद्या 'वस्तू'ची स्थिती, क्रिया, किंवा भोग या गोष्टी दाखविल्या जातात.' उदा०—**मी जातो (क्रिया), शिवाजी राजा झाला (भोग), रामा शहाणा आहे (स्थिती).**

ही व्याख्या एकंदरीत समाधानकारक दिसते. पण, याच्या पुढील कलमात रे. नवलकर म्हणतातः—क्रियापदाने क्रियेचा, व विशेषेकरून **मानसिक** क्रियेचा, बोध होतो. **रा. दामले** यांनी आपल्या'**शास्त्रीय मराठी व्याकरणा**'त याच मताचा अनुवाद केला आहे. ते म्हणतात :—

"क्रियापद हा शब्द इतका रूढ झाला आहे कीं, " त्याचे जर कोणत्या तरी दृष्टीने समर्थन करिता येईल तर बरे. स्थूलदृष्टीने क्रियापद हा शब्द यथार्थ दिसत नाही. तथापि, एका दृष्टीने त्याचे समर्थन करणे शक्य आहे. वाक्यामध्ये काही तरी विधान करण्यात येते; म्हणजे दोन वस्तूंमधील साधर्म्य किंवा वैधर्म्य व्यक्त करण्यात येते. दोन वस्तूंमध्ये साधर्म्य आहे किंवा वैधर्म्य आहे हेच प्रत्येक वाक्यात सांगितलेले असते. यासच विधान करणे असे म्हणतात. 'विधान करणे' हा मनाचा व्यापार, म्हणजे **मानसिक क्रिया** आहे. आणि ही क्रिया क्रियापदाचे उपयोगानेच नेहमी व्यक्त होत असल्यामुळे क्रियापद ही संज्ञा या मानसिक क्रियेचे दृष्टीने अन्वर्थक आहे असे म्हणण्यास हरकत नाही."

क्रियापद या संज्ञेचे कसे तरी समर्थन करण्याकरिता इतका अट्टाहास करण्याची जरुरी मला तरी दिसत नाही. एखाद्या वस्तूचे सर्व गुणधर्म जिने दाखविता येतील अशा तऱ्हेची, पूर्णपणे निर्दोष, व्याख्या कशाचीच करता येणार नाही. पूर्वी सर्वनामाची व्याख्या करिताना ही गोष्ट दर्शविलीच आहे. पुढेही क्रियाविशेषण, उभयान्वयी अव्यय....यांच्या व्याख्या करिताना ती आणखीही स्पष्ट होईल. तशीच, क्रियापदाची व्याख्याही सर्वांशी पूर्ण नसली तरी चालेल. शिवाय रे. नवलकर व रा. दामले यांची मानसिकक्रियावाचक शब्द म्हणजे क्रियापद ही व्याख्या क्रियापदाच्या इतर व्याख्यांपेक्षा पुष्कळच सदोष आहे. **शिवाजी राजा**

झाला, देव आहे, रामा जातो, या वाक्यांनी कोणत्या मानसिक क्रिया दर्शविल्या जातात? किंवा **देव आहे, रामा जातो,** या वाक्यांत 'दोन वस्तू-मधील साधर्म्य किंवा वैधर्म्य' यांपैकी काय सांगितलेले आहे? अगोदर, यांपैकी एकाही वाक्यात दोन वस्तूच नाहीत, मग साधर्म्य किंवा वैधर्म्य सांगणार कसे? तसेच, **रामा जातो,** याने रामाची कोणतीच मानसिक क्रिया दर्शविली जात नाही. जर या वाक्याने कोणाची मानसिक क्रिया दर्शविली जाते असे म्हणावयाचे तर ती क्रिया ते विधान करणाराची असली पाहिजे. म्हणजे, **रामा जातो** याचा अर्थ बोलणारा, अस्तिपक्षी विधान करून, म्हणतो की, 'जाण्याची क्रिया व रामा यांचा संबंध आहे'. पण, बोलणारा विधान करतो की....यात तरी क्रियापद येतेच. तेव्हा या नवीन क्रियापदाची व्याख्या करावयाला आणखी एक क्रियापद घ्यावे लागणार. म्हणजे **मानसिक क्रियेची** भानगड उपस्थित केल्यामुळे क्रिया-पदाची व्याख्या निर्दोष तर होत नाहीच; पण मुळी व्याख्याच होत नाही. या-करिता, मानसिक क्रियेचा हा चक्रव्यूह टाकून देऊन, 'क्रिया' म्हणजे करणे किंवा करू देणे, होऊ देणे, भोगणे, असा जरासा व्यापक अर्थ केला म्हणजे झाले.

§ ८१ धातूंचे वर्गीकरण

धातूंचे वेगवेगळ्या दृष्टींनी वेगवेगळे प्रकार करिता येतात. त्यांपैकी एक प्रकार म्हणजे **सकर्मक** व **अकर्मक** धातू. क्रियेला ज्याप्रमाणे कोणी तरी करणारा किंवा **कर्ता** लागतो, त्याचप्रमाणे प्रत्येक क्रिया कोणावर तरी घडत असते. ज्या वस्तूवर क्रिया घडते तद्वाचक शब्दाला वाक्यात **कर्म** असे म्हणतात. काही धातूंच्या अर्थांच्या क्रिया त्या त्या कर्त्यांवरच घडत असतात, व अशा धातूंचे प्रयोग करिताना वेगळे कर्म लागत नाही. उदा०—**रामा जातो** या वाक्यात क्रिया करणारा, व ज्याच्यावर क्रिया घडली तो हे एकच आहेत म्हणून कर्म निराळे सांगितलेले नाही, व सांगण्याची जरुरी नाही. पण, **घोडा गवत खातो** या वाक्यात गवत किंवा तशासारखा दुसरा काहीतरी शब्द असल्याशिवाय अर्थ पूर्ण होत नाही. **घोडा खातो, घोड्याने खाल्ले,** अशी वाक्ये घेतली तर काय खातो, काय खाल्ले, हे समजण्याची अपेक्षा राहतेच; व तद्वाचक शब्द वाक्यात सांगितल्याशिवाय अर्थ पूर्णपणे व्यक्त झालासे वाटत नाही. अशा क्रियापदांना सकर्मक क्रियापदे म्हणतात.

टीप--उभयविध धातू--यांशिवाय **उभयविध** (म्हणजे सकर्मक व अकर्मक) अशा दोन्ही प्रकारची क्रियापदे असा एक क्रियापदांचा प्रकार करितात; पण तो करण्याची मला तरी काही जरुरी दिसत नाही. एकच धातू एकाच वेळी सकर्मक व अकर्मक असणार नाही. तेव्हा ज्यावेळी त्याचा सकर्मक म्हणून उपयोग असेल त्यावेळी त्याला सकर्मक म्हणावे व ज्यावेळी जो अकर्मक असेल त्यावेळी त्याला अकर्मक म्हणावे हे बरे. **उभयविध धातू** हा धातूंचा तिसरा वेगळा प्रकार नव्हे; तर काही धातू दोन्ही रीतींनी चालतात हे सांगण्याचा तो एक प्रकार आहे इतकेच.

क्रियापदांचे त्यांच्या उपयोगाप्रमाणे आणखी वेगळे प्रकार करिता येतात. काही क्रियापदे सर्व काळीं, सर्व अर्थीं (अर्थ व काळ यांचे विवेचन पुढे येईल) चालतात. त्यांत किरकोळ थोडेसे फरक असले तरी तूर्त ते बाजूला ठेवून या धातूंना आपण **पूर्ण धातू** असे म्हणू, व काही धातूंची सर्व रूपे नियमित होत नाहीत, त्यांना **अपूर्ण धातू** असे म्हणू. या अपूर्ण (किंवा अनियमित) धातूंची रूपे कोणती होतात, कोणती होत नाहीत हे सांगण्यापेक्षा जी होतात ती एका ठिकाणी सांगितली म्हणजे झाले. ती तशी योग्य ठिकाणी पुढे सांगितली आहेत.

काही धातूंचा उपयोग दुसऱ्या धातूंचे काळ, अर्थ, वगैरे बदलण्याकडे होतो म्हणून त्यांना **सहाय्यक धातू** असे म्हणतात. काही धातु इतर धातूंपासून किंवा शब्दांपासून तयार केलेले असतात; य वर्गात **प्रयोजक** व **शक्य क्रियापदांचा** समावेश होतो. काही धातूंची रूपे फारच अनियमित होतात. यांना **विधिभंजक धातू** असे म्हणतात. यात **भावकर्तृक** धातूंचाही समावेश होतो.

§ ८२ आख्यातप्रत्यय

क्रियापदांची रूपे मूळ धातूंस प्रत्यय लागून सिद्ध होतात असे मागे सांगितलेच आहे. या प्रत्ययांना **आख्यातप्रत्यय** असे म्हणतात. संस्कृतात क्रियापदाला आख्यात असे नांव आहे; त्यावरून आख्यात-प्रत्यय म्हणजे क्रियापदांना लागणारे प्रत्यय असा पारिभाषिक शब्द तयार केलेला आहे.

नाम--सर्वनामांना लागणाऱ्या प्रत्ययांना जसे विभक्तिप्रत्यय म्हणतात, तसेच **क्रियापदांना लागणाऱ्या प्रत्ययांना आख्यात-प्रत्यय म्हणतात.**

§ ८३ अर्थ

आता, या आख्यात-प्रत्ययांवरून होणाऱ्या **क्रियापदांच्या रूपांचे प्रकार किती व कसे होतात** ते पाहू. वक्त्याच्या मनातील भाव क्रियापदाच्या रूपाने श्रोत्याला कळला पाहिजे. म्हणजे वक्ता साधे विधान करीत आहे, किंवा त्याच्या मनात श्रोत्याला प्रश्न करावयाचा आहे, किंवा इच्छा, आशा, संशय, वगैरे एखादा भाव प्रगट करावयाचा आहे, किंवा त्याला एखादी आज्ञा करावयाची आहे---वगैरे **जो काही भाव वक्त्याच्या मनात असेल तो श्रोत्याला कळला पाहिजे. प्रत्ययातील ज्याच्यामुळे या गोष्टी घडतात त्याला व्याकरणात अर्थ हे पारिभाषिक नाव आहे. अर्थाचे पाच प्रकार आहेत ते, स्वार्थ, आज्ञार्थ, विध्यर्थ, संकेतार्थ,** व **संशयार्थ.** यांची तपशीलवार माहिती व उपयोग योग्य ठिकाणी पुढे देण्यात येईल.

§ ८४ काळ

क्रियापदाच्या रूपावरून ज्याप्रमाणे वक्त्याच्या मनातील भाव कळावा लागतो व कळतो, त्याचप्रमाणे ती **क्रिया केव्हा घडली** हेही कळावयाचे साधन म्हणजे रूप हेच आहे. **ज्या प्रत्ययांवरून ही गोष्ट कळते त्यांना त्या त्या काळाचे प्रत्यय असे म्हणतात.** काळ मुख्यतः तीन आहेत; ते **भूत, भविष्य** व **वर्तमान** हे होते. पण, यांपैकी प्रत्येकाचे गौण प्रकारही होतात. क्रिया ज्या काळी घडली त्या काळी ती कशी घडली, म्हणजे पूर्णपणाने घडली की अपूर्णपणाने घडली, एकच घडली की दुसऱ्या क्रियेच्या बरोबर आगेमागे घडली, वगैरे गोष्टीही कळाव्या लागतात. याप्रमाणे **प्रत्येक काळाचे गौणप्रकार,--अपूर्ण, पूर्ण, रीतिवाचक** असे--मूळच्या रूपा-खेरीज वेगळे तीन होतात.

§ ८५ प्रयोग

क्रियापदाला स्वतःचे लिंगवचन नाही. वाक्यात कर्ता, किंवा कर्म, यांवरून त्याचे रूप बदलते, किंवा कित्येक वाक्यांत नपुसक रूप येते, त्याप्रमाणे

कित्येक प्रयोगांत कर्त्याच्या **पुरुषा**प्रमाणे क्रियापदाचे रूप फिरते. क्रियापदाचा याप्रमाणे कर्त्याशी किंवा कर्माशी लिंग, वचन, पुरुष या बाबतीत संबंध येतो, त्याला **संवाद** म्हणतात. व या संवादाला अनुरूप असे जे भाषेचे निरनिराळे प्रकार होतात त्यांना **प्रयोग** असे म्हणतात. **प्रयोग चार आहेत. कर्तरी, कर्मणी, भावे व भावकर्तरी. कर्तरिप्रयोगात कर्त्याचा अधिकार क्रियापदावर चालतो, म्हणजे त्याच्या लिंगवचनाप्रमाणे क्रियापदाचे लिंग व वचन ही फिरतात. कर्मणिप्रयोगात कर्माचा अधिकार क्रियापदावर चालतो. भावे प्रयोगांत क्रियापद नपुसकलिंगी असते व कर्ता तृतीयेत असतो. भावकर्तरिप्रयोगात क्रियेचा भाव किंवा अर्थ हाच खरा कर्ता असून त्याप्रमाणे क्रियेचे रूप फिरते व ते नपुसकलिंगी असते.**

वर सांगितलेले वेगवेगळे काळ व अर्थ याप्रमाणे तयार होणारी क्रियापदाची रूपे पुढील प्रकरणात दिली आहेत.

§ ८६ धातू चालविणे

धातूंना आख्यात–प्रत्यय लागून त्यांपासून वेगवेगळे काळ व अर्थ यांची क्रियापदरूपे तयार करणे याला **धातू चालविणे,** किंवा रूपे चालविणे असे म्हणतात. धातूंना प्रत्यय लागण्यापूर्वी त्यांचे जे स्वरूप तयार होते (मूळचे किंवा विकृत) त्याला अंग असे म्हणतात. या दृष्टीने (म्हणजे धातूच्या मूळाला विकार होतो कीं नाही या दृष्टीने) पहाता धातूंचे दोन प्रकार होतात, व ते संस्कृतातील आत्मनेपद–परस्मैपद यांसारखेच आहेत. यांना सोईकरिता आपण पहिला गण व दुसरा गण असे म्हणू.

१ पहिला गण (आत्मनेपद)–**यात धातूला विकार होत नाहीं. यात येणारे धातूः—**

१ सर्व अकर्मक धातू.

२ शक्य क्रियापदे.

३ अनियमित धातू.

२ दुसरा गण (परस्मैपद)—यातील धातूंना 'इ' लागून अंग होते व त्याला प्रत्यय लागतात. **यात येणारे धातू—**

१ सर्व सकर्मक क्रियापदे (नियमित)

२ सर्व ह–कारान्त क्रियापदे.

§ ८७ आख्याते, प्रत्यय व रूपे

काळ व अर्थ मिळून एकंदर सात वेगवेगळी आख्याते आहेत; म्हणजे सात प्रकारचे प्रत्यय लागून क्रियापदाची रूपे सिद्ध होतात. यापैकी (I) काही आख्यांताचे प्रत्यय मराठी ही स्वतंत्र भाषा झाल्यानंतर तयार झालेले आहेत व त्यांना मराठी व्याकरणाचे नियम पूर्णपणे लागतात; त्यांची रूपे सर्व लिंगी बदलतात. (II) पण काहींचे प्रत्यय मूळच्या संस्कृतातील प्रत्ययांपासून निघाले आहेत व संस्कृतात कर्त्याच्या लिंगाप्रमाणे क्रियापदाचे लिंग बदलत नाही, म्हणून मराठीतही या आख्यातात सर्व लिंगांची रूपे सारखीच आहेत. यांची वर्गवारी—

(I)	(II)
वर्तमानकाळ	**भविष्यकाळ**
भूतकाळ	**रीतिभूतकाळ**
संकेतार्थ	**आज्ञार्थ**
विध्यर्थ	

टीपः— २ रूपे चालविताना सोईकरिता वर्तमानकाळ, भूतकाळ, रीतिभूतकाळ, भविष्यकाळ, आज्ञार्थ, विध्यर्थ व संकेतार्थ असा अनुक्रम धरिला आहे.

वर्तमानकाळ

प्रत्यय

परस्मैपद व आत्मनेपद

एकवचन **अनेकवचन**

	पु.	स्त्री.	नपु.	
प्र. पु.	तो	ते त्ये ती	ते	तो
द्वि. पु.	तोस	तेस, त्येस, ती	तेस	ता
तृ. पु.	तो	ते, त्ये, ती	ते	तात

टीपः— या प्रत्ययांच्या मूळासंबंधाने वाद आहे. रे. नवलकरांच्या मते **तो** या दर्शक सर्वनामाला रीतिभूतकाळाचे प्रत्यय (हे पुढे दिले आहेत लागून हे प्रत्यय तयार झाले. जसे:—

तो + एं = तों   तो + एस = तोस

रा. दामले व रा. जोशी यांचे मते मराठी चालू वर्तमानकाळाचे प्रत्यय संस्कृत **अत्** प्रत्ययान्त व्ययी कृदंताला **अस्** या धातूची रूपे लागून झालेले आहेत. जसे:—

करित + आहे > करिताहे, करितोहे, करितोय्, करतो...
करित + आहेस > करिताहेस, करितोहेस, ...करितोस

ही दुसरी उत्पत्तीच जास्त सयुक्तिक दिसते. हिच्या समर्थनार्थ रा. रा. भि. जोशी म्हणतातः—"संस्कृतातील निरनिराळ्या काळांची रूपें फार कठीण असल्यामुळे, लोकव्यवहारात त्यांचे जागी त्या विवक्षित अर्थाचे कृदंत घालून त्यापुढे **अस्** धातूचे पूर्ण रूप (विकल्पाने) घालून वाक्य करीत. उदा०-चाकर गावाला गेला=किंकरो ग्रामं गतः (अस्ति). हीच रीत पुढे देशी भाषेत आली. अशा प्रकारे **मराठीत व इतर देशभाषांत पूर्ण क्रियापदाचे काम कृदंतांनी होऊं लागले** प्रौढबोध व्याकरण

रूपे

अकर्मक ' बस ' धातू

मी बसतो.......	आम्ही बसतो
तू बस–तोस, त्येस–तेस–तीस, तेस	तुम्ही बसता
तो बसतो ती बस–ते–त्ये–ती ते बसते	ते त्या बसतात. ती

सकर्मक ' कर ' धातू

मी करितो–करतो.......	आम्ही करितो
तू करितोस–करतोस,–करितेस– करतेस–त्येस–तीस,–तेस	तुम्ही करिता–करता

तो करितो - करतो		ते	करितात
ती करिते—त्ये—ती		त्या	
करते—त्ये—ती			करतात
ते करिते — करते		ती	

मी—पितो, तू पितोस, तो पितो— ते पितात.........वगैरे.

टीप : स्त्री. **ते**-(बसते, बसतेस)-**कारान्त रूपे चालू मराठीत लिहितात.** विकल्पाने त्ये—कारान्तही लिहितात. पण, त्ये—कारान्त रूपे कोकणी भाषेत व ती—कारान्त रूपे देशावर बोलण्यात रूढ आहेत. त्याचप्रमाणे **अस** धातूच्या रूपाचे अवशेष असलेली रूपे देखील (बसतोहे, बसतोय्) बोलण्यात रूढ आहेत.

अपवाद—सांग, माग, बघ या सकर्मक धातूंस ई असा आदेश होत नाही. **सांगतो, बघतो, मागतो..........वाह, पाह**··· **वहातो, पाहतो**.......

प्रत्यपवाद—पण, **लिह लिहितो, मोह मोहितो.**

भूतकाळ—प्रत्यय—(आत्मनेपद)

	एकवचन			अनेकवचन
	पु.	स्त्री.	नपु.	
प्र. पु.	लो	ले	ले	लो
द्वि. पु.	लास	लीस	लेस	ला, लात
तृ. पु.	ला	ली	ले	ले, ल्या, ली

अकर्मक बस धातू

मी बसलो, ले—(ल्ये), ले आम्ही बसलो

तू बसलास—लीस—लेस तुम्ही बसला—बसलेत,—ल्यात, लीत

तो बसला	ते बसले
ती बसली	त्या बसल्या
ते बसले	ती बसली

याप्रमाणे सर्व अकर्मक धातू व अनियमित धातू (**आचर** गण व **उमज** गण यांतील) चालतात.

टीप—हे व पुढील परस्मैपदी प्रत्यय संस्कृत भूतकालवाचक त-प्रत्ययान्त कृदंतापासून झाले आहेत. या ‘ त ’प्रत्ययाबद्दल संस्कृतात न,—ण, ही येतात. जसे—कृत, गत, भिन्न, पूर्ण....व प्राकृतात द, ड, ल, येतात. त्यांवरून मराठीत‘ ल ’ असा प्रत्यय झालेला आहे.

भूतकाळ – (परस्मैपदी)–प्रत्यय (यांनी कर्मणी प्रयोग होतो.)

	एकवचन			**अनेकवचन**
	पु.	स्त्री.	नपु.	
प्र. पु.	ला	ली	ले	ले, ल्या, ली
द्वि. पु.	ला-लास,	ली-लीस,	ले-लेस	ले-लेत, ल्या-ल्यात, ली-लीत
तृ. पु.	ला	ली	ले	ले, ल्या, ली

सकर्मक ‘ मोड ’ धातू

म्या, मी	मोडला—ली, ले	मी	मोडले, ल्या, ली
आम्ही	मोडला—ली, ले	आम्ही	मोडले, ल्या, ली

त्वा, तू	मोडला, मोडिली, मोडिले—	स
तुम्ही	मोडला, मोडिली, मोडिले—	त

तू, त्वा	मोडिले, ल्या, ली
तुम्ही	मोडिलेत, ल्यात, लीत

त्याने तिने त्याने त्यांनी	मोडिला, मोडिली, मोडिले	त्याने तिने त्याने त्यांनी	मोडिले, ल्या, ली

उत्पत्ती—मागील आत्मनेपदी प्रत्ययांच्या खाली दिलेली टीप पहा.

रीतिभूतकाळ

प्रत्यय मूळ संस्कृत आख्यात-प्रत्ययांपासून आल्यामुळे सर्व लिंगी सारखेच आहेत.

	एकवचन आत्मनेपद	एकवचन परस्मैपद (सकर्मक)	अनेकवचन
प्र. पु.	ए	ई	ऊ, ओ
द्वि. पु.	स	स	आ, आ
तृ. पु.	ए	ई	त

अकर्मक बस धातू

मी बसे	आम्ही बसू, बसो
तू बसस	तुम्ही बसा, बसा
तो—ती—ते बसे	ते—त्या—ती बसत

सकर्मक कर धातू

मी करी	आम्ही करू, करो
तू करीस	तुम्ही करा, करा
तो—ती—ते करी	ते- त्या—ती करीत

टीप :— आचर गणातील पहिल्या दहा धातूंस प्र. पु. व तृ. पु. ए. व. प्रत्यय विकल्पेकरून दोन्ही लागतात. जसे :—

मी आचरे—री तो आचरे—री

सांग, माग, व उमजगण—प्र. पु. व तृ. पु. एकवचनी एं व ए हे प्रत्यय लागतात.

मी स्मरे, तो स्मरे, सांगे, मागे, वगैरे.

आकारान्त, ईकारान्त, ऊकारान्त व एकारान्त धातूंस प्र. पु. व. तृ. पु. एकवचनी, ईं व ई हेच प्रत्यय लागतात. मग ते सकर्मक असोत किंवा अकर्मक असोत. जसे :—

मी जाई, तो जाई; मी भिई, तो भिई;

मी धुई, धुवी; तो धुई, धुवी; मी घेई; तो घेई

अकारान्ताखेरीज इतर धातूंस स प्रत्ययांपूर्वी इ असा आगम विकल्पेकरून होतो. जसे :—जास—जाईस; येस—येईस.

भविष्यकाळ—प्रत्यय लिंगभेदाप्रमाणे बदलत नाहीत.

	एकवचन			**अनेकवचन**
	अकर्मक		सकर्मक	
प्र. पु.	एन	—	ईन	ऊ
द्वि. पु.		शील		आल
तृ. पु.	एल		ईल	तील

अकर्मक बस धातू

मी बसेन	आम्ही बसू
तू बसशील	तुम्ही बसाल
तो, ती, ते बसेल	ते, त्या, ती बसतील

आचर गणांतील धातू ‘ जिंक ’

मी जिंकीन	आम्ही जिंकू
तू जिंकशील, जिंकिशील	तुम्ही जिंकाल
तो, ती, ते जिंकील	ते, त्या, ती जिंकतील, जिंकितील

उमजगणातील धातू ‘ उमज ’

मी उमजेन; तो उमजेल

ऊ–कारान्त धू धातू

मी धुईन; धुवीन	आम्ही धुऊ, धुवू
तू धुशील	तुम्ही धुवाल, धुआल
तो, ती, ते धुवील, धुईल	ते, त्या, ती धुतील

आकारान्त, ईकारान्त व एकारान्त धातू V

मी जाईन, तो भिईल, तू येशील, आम्ही येऊ

आज्ञार्थ—प्रत्यय लिंगभेदाप्रमाणे बदलत नाहीत.

	एकवचन	अनेकवचन
प्र. पु.	ऊ [ओ]	ऊ [ओ]
द्वि. पु.	[ई, ए]	आ
तृ. पु.	ऊ, ओ	ऊत, ओत

रूपे

मी लिहू	आम्ही लिहू
तू लिही	तुम्ही लिहा
तो, ती, ते लिहू, लिहो	ते, त्या, ती लिहूत, लिहोत

एकाक्षरी धातूंना तृ. पु. ओ, ओत, यांचे जागी वो, वोत असे प्रत्यय लागतात.

तो जावो, ते पिवोत, ते घेवोत, तो येवो [यो]

* [ ] या कंसात दिलेल्या प्रत्ययांचा उपयोग कवितेत मात्र होतो. जसे:—

भले केले देवराया। आम्ही लागो तुमच्या पाया
घेई घेई माझे वाचे। गोड नाम विठोबाचे
करी मस्तक ठेंगणा। लागे संतांच्या चरणा
उपजला भावो। तुझे कृपे सिद्धी जावो

विध्यर्थ

प्रत्यय मूळ संस्कृत **तव्य** प्रत्ययान्त कृदंतापासून झाले आहेत व लिंगाप्रमाणे बदलतात.

आत्मनेपद व परस्मैपद

	एकवचन	अनेकवचन
प्र. पु.	आवा—वी—वे	आवे—व्या—वी
द्वि. पु.	आवास—वीस—वेस	आवे—व्या—वी आवेत—व्यात—वीत
तृ. पु.	आवा—वी—वे	आवे—व्या—वी आवेत—व्यात—वीत

सकर्मक कर धातू

[म्या] मी	करावा—वी—वे	मी	करावे—व्या—वी
आम्ही	करावा—वी—वे	आम्ही	
[त्वा] तू	करावास—वीस—वेस	त्वा, तू	करावे—व्या—वी
तुम्ही	करावा—वी—वे	तुम्ही	करावेत—व्यात—वीत
त्याने, तिने, त्याने, त्यांनी	करावा—वी—वे	त्याने, तिने, त्याने, त्यांनी	करावे—व्या—वी / करावेत—व्यात—वीत

ईकारान्त धातूंस य् आदेश होतो. जसेः—प्यावे, म्यावे.
ऊकारान्त धातूंस उव् आदेश होतो. जसेः—धुवावे.
एकारान्त धातूंस य् आदेश होतो. जसेः—घ्यावा, घ्यावे.
संकेतार्थ—प्रत्यय लिंगानुसार बदलतात.

आत्मनेपद व परस्मैपद.

	एकवचन			अनेकवचन		
	पु.	स्त्री.	नपु.	पु.	स्त्री.	नपु.
प्र. पु.	तो,	ते-त्ये,	ते	तो		
द्वि. पु.	तास,	तीस,	तेस	ता-तेत,	त्यात,	तीत
तृ. पु.	ता,	ती,	ते	ते,	त्या,	ती

अकर्मक बस धातू

मी बसतो, बसत्ये-ते, बसते आम्ही बसतो

तू बसतास, बसतीस, बसतेस तुम्ही { बसता, बसतेत; तीत (न०) / बसत्यात, बसतीत

तो बसता	ते बसते
ती बसती	त्या बसत्या
ते बसते	ती बसती

सकर्मक कर धातू

मी	करितो, करतो		आम्ही	करितो, करतो
त्ये—ते, ते				
त्ये—ते, ते				
तू	करितास—तीस—तेस, करतास—तीस—तेस		तुम्ही	करिता, करता; करितेस, करतेस; करित्यात, करत्यात; करितीत, करतीत
तो	करिता, करता		ते	करिते, करते
ती	करिती, करती		त्या	करित्या, करत्या
ते	करिते, करते		ती	करिती, करती

धातूंस आख्यात—प्रत्यय लागताना साधारणपणे खालील नियम उपयोगी पडतात.

१ स्वराने आरंभ होणारे प्रत्यय लागताना अ—कारान्त धातूंना बहुधा पररूप संधि होतो. जसे :—धर + ऊ = धरू, कर + ईल = करील. पण अकर्मक धातूंना गुण होतो. उदा०, मरेल, सरेल.

२ व्यंजनाने आरंभ होणारे प्रत्यय लागताना (i) अकर्मक धातू व (ii) अ-कारान्त व्यतिरिक्त सकर्मक धातू, यांस काही विकार होत नाही.

जसे :—पड + तो = पडतो, घे + तो = घेतो.

३ व्यंजनादी प्रत्ययांपूर्वी आकारान्त धातूंच्या अंत्य 'अ' चे ठिकाणी 'इ' येतो.

अपवाद (१) विकल्पाने इ येणारे धातू (२) मुळीच इ न येणारे.

४ धातूंतील अंत्य किंवा उपांत्य इ व उ यांचे पुढे दीर्घ अक्षराचा प्रत्यय आला असता किंवा पूर्णोच्चारित अ आला असता ते ऱ्हस्व होतात. नीघ + ला = निघाला.

यांपैकी विकल्पाने इ च्या जागी अ होऊन येणारी—करतो, करतास वगैरे रूपे बोलण्यात मात्र येतात. लिहिण्यात करितो, करितास—हीच रूपे शुद्ध मानण्याची प्रवृत्ती आहे.

आता एक अकर्मक व एक सकर्मक असे धातू सर्व आख्यातांत चालवून दाखवितो.

अकर्मक अस धातू

१ वर्तमानकाळ

मी अस--तो;--ते--त्ये;--ते	आम्ही असतो
तू अस--तोस,--तेस,--त्येस,--तेस	तुम्ही असता
तो असतो	ते, त्या, ती } असतात
ती असते	
ते असते	

२ भूतकाळ

मी अस--लो,--ले--ल्ये, ले,	आम्ही असलो
तूं अस--लास,--लीस,--लेस	तुम्ही अस--ला,--लात
	तुम्ही अस--लेत,--ल्यात,--लीत
तो असला	ते असले
ती असली	त्या असल्या
ते असले	ती असली

३ रीतिभूतकाळ

मी असे	आम्ही असू, असो
तू असस	तुम्ही असा,--सा
तो, ती, ते } असे	ते, त्या, ती } असत

४ भविष्यकाळ

मी असेन	आम्ही असू
तू असशील	तुम्ही असाल

तो ती ते	} असेल	ते त्या ती	} असतील

५ **आज्ञार्थ**

मी असू	आम्हीं असू
तू अस	तुम्ही असा
तो, ती, ते असो	ते, त्या, ती असोत

६ **विध्यर्थ**

मी असावे	आम्ही असावे
तू असा–वास,–वीस,–वेस	तुम्हीं असावेत,–व्यात,–वीत
तो असावा	ते असावे–वेत
ती असावी	त्या असाव्या–व्यात
ते असावे	ती असावी–वीत

७ **संकेतार्थ**

मी अस–तो,–ते–त्ये,–ते	आम्ही असतो
तूं अस–तास,–तीस,–तेस	तुम्ही असता अस–तेत,–त्यात,–तीत

तो असतो ती असती ते असते	}	ते असते त्या असत्या ती असती

पी धातू

५ **आज्ञार्थ**

मी	पिऊ	आम्ही	पिऊ
तू	पी	तुम्ही	प्या
तो, ती, ते	पिऊ, पिवो	ते, त्या ती	पिवोत

६ विध्यर्थ

मी प्यावा,–वी,–वे	आम्ही प्या–वे,–व्या,–वी
तू प्यावास,–वीस,–वेस	तुम्ही प्या–वे,–व्या–वी –वेत–व्यात,–वीत
तो प्यावा	ते प्यावे,–वेत
ती प्यावी	त्या प्याव्या–व्यात
ते प्यावे	ती प्यावी–वीत

७ संकेतार्थ

मी पि–तो,–ते–त्ये,–ते	आम्ही पितो
तू पि–तास,–तीस–तेस	तुम्ही { पिता / पि–तेत,–त्यात,–तीत
तो पिता	ते पिते
ती पिती	त्या पित्या
ते पिते	ती पिती

अकर्मक हो धातू

१ वर्तमानकाळ

मी हो–तो,–ते–त्ये,–ते	आम्ही होतो
तू होतास,–तेस–त्येस–तीस,–तेस	तुम्ही हो–ता,–ता,–तेत
तो होता / ती होते–त्ये–ती / ते होते	ते, त्या, ती } होतात

२ भूतकाळ

मी झा–लो, ले–ल्ये–ली–ले	आम्ही झालो
तू झा–लास,–लीस,–लेस	तुम्ही } झाला–झालात / झालेत,–ल्यात,–लीत

तो झाला	ते झाले
ती झाली	त्या झाल्या
ते झाले	ती झाली

३ रीतिभूतकाळ

मी होई, होय	आम्ही होऊ
तू होस	तुम्ही व्हा
तो, ती, ते, होई,—होय	ते, त्या, ती होत

४ भविष्यंकाळ

मी होईन	आम्ही होऊ
तू होशील	तुम्ही व्हाल
तो, ती, ते, होईल	ते, त्या, ती, होतील

५ आज्ञार्थ

मी होऊ	आम्ही होऊ
तू हो	तुम्ही व्हा
तो, ती, ते, होऊ,-होवो	ते, त्या, ती होऊत, होवोत

६ विध्यर्थ

मी व्हावा,—वी,—वे	आम्ही व्हावे,—व्या,-वी
तूं व्हावास,-वीस, वेस	तुम्ही व्हावे,-व्या,-वी वेत,—व्यात,—वीत
तो व्हावा	ते व्हावे,—वेत
ती व्हावी	त्या व्हाव्या—व्यात
ते व्हावे	ती व्हावी,—व्हावीत

७ संकेतार्थ

मी हो—तो,—ते—त्ये,—ते	आम्ही होतो

तूं हो-तास,–तीस,–तेस   तुम्ही } हो–ता
हो–तेत,--त्यात,--तीत

तो होता } ते होते
ती होती } त्या होत्या
ते होते } ती होती

§८७ अनियमित क्रियापदे

काही धातू अनियमित असून सर्व आख्यातांत चालत नाहींत. त्यांस गौण क्रियापदे म्हणतात. मराठीत ही क्रियापदे सात आहेत. तीः–**आहे, नाही, नव्हे, पाहिजे, नको, नये, नलगे.**

१–२ आहे, नाही

टीप—मूळच्या संस्कृत अस् धातूच्या तृ. पु. एक व. अस्ति > अत्थि (प्रा.) या रूपापासून 'आहे' हे रूप झाले आहे. नाहीं = < न अत्थि-नाथी-नाही.

वर्तमानकाळ

मी आहे   आम्ही आहो
तू आहेस   तुम्ही आहा,--हा,--हात
तो, ती, ते } आहे   ते, त्या, ती } आहेत

मी नाही   आम्ही नाही
तू नाहीस   तुम्ही नाही
तो, ती, ते } नाही   ते, त्या, ती } नाहीत

टीप—कवितेत **नाही** याबद्दल पुष्कळदा **नोहे** असे रूप येते

३ नव्हे < नहो

वर्तमान काळ

मी नव्ह–तो–ते–त्ये,–ते	आम्ही नव्हतो
तू नव्ह–तास,–तीस–तेस	तुम्ही नव्ह-ता–तेत, त्यात–तीत
तो नव्हता	ते नव्हते
ती नव्हती	त्या नव्हत्या
ते नव्हते	ती नव्हती
मी नव्हे	आम्ही नव्हो
तू नव्हस, नव्हेस	तुम्ही नव्हा, नव्हा
तो, ती, ते, नव्हे	तो, त्या, ती नव्हत, नव्हेत

४ पाहिजे (< पाह) पह्यावे = इष्ट आहे: पाहिजे हें कर्मणिरूप आहे. याची उदाहरणे ज्ञानेश्वरीत सांपडतात. उदा० ‘ का **पाहिजे** तेंचि देखिजे, दर्पणाधारें ’

याची चालू भाषेतील रूपे

प्र. पु. पाहिजे	पाहिजे
द्वि. पु. पाहिजे, पाहिजेस	पाहिजे, पाहिजेत
तृ. पु. पाहिजे	पाहिजे, पाहिजेत

५ नको

प्र. पु. नको	नको
द्वि. पु. नको, नकोस	नका
तृ. पु. नको	नकोत

६ नये = न + ये

प्र. पु. नये	नये
द्वि. पु. नये, नयेस	नये
तृ. पु. नये	नयेत

७ नलगे = न + लागे याचे झालेले रूप

प्र. पु. नलगे	नलगो
द्वि. पु. नलगस	नलगा,
तृ. पु. नलगे	न–लगत, नलगेत

८ अपेक्षार्थक हो धातू-विध्यर्थ

मी { व्हावा–वी–वे / हवा, हवी, हवे }   आम्ही { व्हावे–व्या–वी / हवे–व्या–वी }

तू { व्हावास–वीस–वेस / हवास–वीस–वेस }

तुम्ही { व्हावे–व्या–वी / व्हावेत–व्यात–वीत / हवा–व्या–वा / हवात–व्यात–वीत / हवेत–वत–व्यात–वीत }

तो हवा–व्हावा   ते { व्हावे, व्हावेत / हवे, हवेत }

ती हवी–व्हावी   त्या { व्हाव्या–व्यात / हव्या–हव्यात }

ते हवे–व्हावे   ती { व्हावी, व्हावीत / हवी, हवीत }

§ ८८ शक्य क्रियापदे

(१) मूळ धातूस **व** हे अक्षर लागून त्याचे शक्यार्थी अंग तयार होते व त्याला आख्यात-प्रत्यय लागून क्रियापदाची रूपे तयार होतात. एकाक्षरी धातू व इकारान्त धातू यांस **वव** अशी दोन अक्षरे लागतात.

(२) रूपे तयार होताना शक्य क्रियापदाला ' इ ' हा परस्मैपदी आदेश कधीच होत नाही.

(३) शक्य क्रियापदांचा कर्तरिप्रयोग होत नाही; म्हणजे त्यांचे लिंग

आणि वचन ही कर्त्याच्या लिंगवचनांप्रमाणे बदलत नाहीत. सकर्मक शक्य क्रियापदांपासून कर्मणिप्रयोग होतो, व अकर्मक क्रियापदांपासून भावेप्रयोग होतो. दोन्ही प्रकारच्या प्रयोगांत उद्देश्य चतुर्थीत किंवा प्रातिपदिकाच्या षष्ठीच्या रूपापासून तयार झालेल्या तृतीयेत असते.

रूपे-अकर्मक 'बस' धातू

मला—आम्हाला माझ्याने—आमच्याने तुला—तुझ्याने तुम्हाला—तुमच्याने त्याला—त्याच्याने तिला—तिच्याने त्यांना—त्यांच्याने	बसवते (वर्तमानकाळ) बसवले (भूतकाळ) बसवे (रीतिभूत) बसवेल (भविष्य) बसवो (आज्ञार्थ) बसवावे (विध्यर्थ) बसवते (संकेतार्थ)

१ वर्तमानकाळ 'मोड' धातू

	पु. स्त्री. नपु.	अनेकवचन
मला—आम्हाला माझ्याने—आमच्याने तुला—तुम्हाला तुझ्याने—तुमच्याने त्याला—त्याच्याने तिला—तिच्याने त्याला—त्याच्याने त्यांना—त्यांच्याने	मोडवतो—ते—तें	— तात

भूतकाळ	,,	मोडवला—ली—ले; ले—ल्या—ली
संकेतार्थ	,,	मोडवता ती—ते; ते—त्या—ती
विध्यर्थ	,,	मोडवावा—वी—वे; वे—व्या—वी

टीपः—बाकीच्या काळी व अर्थी लिंगाप्रमाणे रूपे बदलत नाहीत म्हणून ती येथे दिली नाहीत.

§ ८९ प्रयोजक क्रियापदे

मराठीत प्रयोजक अंगे दोन प्रकारांनी तयार होतात. (I) **मूळ धातूला अव हा प्रत्यय लागून, व (II) मूळ धातूला गुण, वृद्धी हे विकार होऊन.**

टीपः—संस्कृत भाषेत मूळ धातूपासून प्रयोजक अंग तयार होताना गुण-वृद्धी यांसारखे विकार होऊन मग अय् असा प्रत्यय लागतो. मराठीत यांपैकी कोणता तरी एक विकार होतो. मराठीतील अव हा सं. अय् पासून प्राकृताच्या द्वारे आलेला आहे.

तपशीलवार नियम

I (i) अकारान्त धातूंस प्रत्यय पररूप संधीने किंवा सामान्य संधि-नियमांनी लागतो. जसेः– (पररूप संधीने)– करव, बसव, निजव. (सामान्य नियमांनी) समजावणे, निभावणे वगैरे. पण, समजावणे.... याची समजवणे, निभवणे, अशीही रूपे होतात.

(ii) अनुकरणवाचक धातूंना सामान्य संधिनियम लागतात. जसेः— फडफडावणें, गटगटावणे.

(iii) एकाक्षरी धातूंस अवव असा प्रत्यय लागतो. जसे:—जाववणे, खाववणे, लिहववणे.

(iv) ह-कारान्त धातूंस अव, अवव हे प्रत्यय विकल्पाने लागतात. जसे:—लिहवणे, लिहववणे.

अव–अवव यांना अवि–अविव असे आदेश विकल्पाने होतात. जसेः— करवणे—करविणे, लिहवणे—लिहविणे.

II धातूस गुण किंवा वृद्धी होऊन प्रयोजक अंग तयार होणे हा दुसरा प्रकार आहे.

धातूत अकार असेल तर वृद्धी होते, व इकार—उकार असतील तर गुण होतो जसेः—

(i) गळणे	गाळणे	तरणे	तारणे
टळणे	टाळणे	दबणे	दाबणे
पडणे	पाडणे	चरणे	चारणे
(ii) फिटणे		फेडणे	
सुटणे		सोडणे	
गुतणे		गोवणे	
खुपणे		खोवणे	

टीपः—यात धातूतील दुसरे अक्षर **ट** असेल तर त्याचे जागी ड येतो; त–प–चे जागी **व** येतो हे लक्षात ठेवावे.

अनियमित प्रयोजक क्रियापदे

पाजणे	<	पिणे	लावणे	<	लागणे
भेडावणे, भेवडावणे	<	भिणे	दाखविणे	<	देखणे

टीपः—पाठविणे, बडविणे, टाकणे, कमावणे, सतावणे, ठेवणे इत्यादी प्रयोजक धातूंची मूळ रूपे मराठीत नाहीत. ‘ठे’ = राहणे हे फक्त कवितेत मात्र येते.

§ ९० सर्व प्रयोजक धातू सकर्मक आहेत; व ते अकारान्त सकर्मक धातूं-प्रमाणे चालतात, म्हणजे त्यांस व्यंजनादी आख्यात–प्रत्यय लागताना विकल्पाने, ‘इ’ असा आदेश होतो.

जसे :—बसवितो–बसवतो, करविले–करवले.

टीप :—१ यांपैकी ‘इकारयुक्त’ रूपे लिहिण्यात येतात व ‘अकारयुक्त’ रूपे बहुधा बोलण्यातच येतात.

२. स्वरादी प्रत्ययांपूर्वी ‘इ’ हा आदेश कोठेच होत नाही, तर फक्त ‘अ’ ची रूपे मात्र होतात. जसेः—बसवू, बसवा.

§ ९१ प्रयोजक क्रियापदांच्या उपयोगाविषयी काही नियम

(१) मूळ अकर्मक क्रियापदावरून प्रयोजक रूप केले असता मूळच्या

क्रियापदाचा कर्ता प्रयोजक क्रियापदाच्या प्रयोगात कर्म होऊन द्वितीयेत येतो. जसेः—रामा बसतो. गोविंदा रामाला बसवितो.

(२) मूळच्या सकर्मक क्रियापदापासून प्रयोजक रूप केले असता प्रयोजक क्रियापदाच्या प्रयोगात मूळच्या कर्त्याची तृतीया विभक्ती होते, व ती **कडून** या शब्दयोगी अव्ययाने होते. जसेः—रामा काम करितो. गोविंदा रामाकडून काम करवितो.

(३) प्रयोजक क्रियापदाला 'व' हा प्रत्यय लावून दुहेरी प्रयोजक क्रियापद तयार होते. जसे:—

(i) रामा बसतो—गोविंदा रामाला बसवितो. कृष्णा गोविंदाकडून रामाला बसवितो. (ii) रामा काम करितो. गोविंदा रामाकडून काम करवितो. कृष्णा गोविंदाकडून रामाच्या हाती काम करवितो.

टीप :—(ii) यातील उदाहरणात 'कडून' याची द्विरुक्ती टाळण्याकरिता एका ठिकाणी 'हाती' याचा उपयोग केला आहे.

§ ९२ कृदंते किंवा धातुसाधिते

धातूपासून क्रियेचा अर्थ अपूर्णत्वाने व्यक्त करणारी जी रूपे तयार होतात त्यांना धातुसाधिते असे म्हणतात. संस्कृत भाषेत अशीच धातुसाधिते आहेत, त्यांना कृदंते असे म्हणतात. ती संज्ञाही मराठी व्याकरणात रूढ आहे. कृत् यात जसा त् हा (अपूर्णार्थाचा द्योतक) प्रत्यय आहे, त्यासारखे प्रत्यय शेवटी लागून होणारे ते कृदंत.

धातुसाधिते तिन्ही काळीं होतात; त्यांचे प्रत्यय व अर्थ खाली देतो—

वर्तमानकाळ

त	अपूर्णार्थ द्योतक	जसे :—तो करीत आहे.
ता	त या प्रत्ययाचे कर्तृवाचक	तो चालता आहे (विशेषण)
ता ताना	अपूर्णक्रियावाचक	मी त्याला जाता पाहिले
		तो धावता धावता पडला.

भूतकाळ

ला–लेला <(सं.–त) पूर्णक्रियावाचक

ते पान पिकलेले आहे.

<(सं. त्वा. प्रा. तूण)—पिकले आहे.

ऊन कृदंत क्रियासमाप्तिवाचक–याने एक क्रिया दुसऱ्या क्रियेच्या आधी झाली असा अर्थ निघतो. जसेः–मी फिरावयास जाऊन आलो.

भविष्यकाळ

णार कृदंत (<सं. तृ–तार) उद्दिष्टक्रियावाचक–

जसेः—रामा गाणार आहे.

णारा (कर्तृवाचक विशेषण) रामा गाणारा आहे.

ऊ प्रत्ययान्त धातुसाधिते–करू, बसू..........यांची चतुर्थी व षष्ठी या विभक्तींची रूपें, करावयास–ला, बसावयाचा.......अशी होतात.

आ–कारान्त धातुसाधिते आ–कारान्त विशेषणांप्रमाणे चालतात. जसेः-

ती मुलगी चालती बोलती आहे.
तो मुलगा हिंडता फिरता आहे.
हे पुस्तक मनाचे रंजन करणारे आहे.
रमाबाई आज गाडीने जावयाच्या आहेत.
पिकला आंबा, पिकलेली चिंच, पिकले पान.

–ता–ताना या कृदंतांना विकार होत नाही.

§ ९३ सहाय्यक क्रियापदे

मुख्य काळांच्या रूपांपासून त्यांचे निरनिराळे गौण अर्थांचे प्रकार ज्या क्रियापदांच्या सहाय्याने होतात त्यांना सहाय्यक क्रियापदे असे म्हणतात. ही दोन प्रकारची आहेत.

(i) काळाचे प्रकार दाखविणारी

असणे, होणे, नसणे, न होणे, ही चार क्रियापदे या गटात येतात.

(ii) अर्थांचे प्रकार दाखविणारी

पाहिजे, नको, नये, नलगे, लागणे, ही क्रियापदे या गटात येतात. सहाय्यक

क्रियापदे सर्वकाळी सर्वपुरुषी वगैरे चालत नाहीत, म्हणून त्यांना गौण क्रियापदे असेही म्हणतात.

असणे याची रूपेः—

१ वर्तमानकाळ

मी अस—तो, ते—त्ये, ते	आम्ही असतो
तू अस—तोस, तेस—त्येस, तेस	तो असतो
ती असते—त्ये	ते, त्या, ती—असतात
ते असते	

किंवा

मी आहे	आम्ही आहो
तू आहेस	तुम्ही आहा
तो, ती, ते आहे	ते, त्या, ती आहेत

किंवा,

मी होय, होऊ	आम्ही हो, व्हो
तू होस	तुम्ही व्हा
तो, ती, ते होय	ते, त्या, ती होत

२ भूतकाळ

मी होतो, ते—त्यें, ते	आम्ही होतो
तू हो—तास, तीस, तेस	तुम्ही होता
तो होता	ते होते
ती होती	त्या होत्या
ते होते	ती होती

३ रीतिभूतकाळ

मी असे	आम्ही असू
तू असस	तुम्ही असा, असा
तो, ती, ते असे	ते, त्या, ती असत

४ भविष्यकाळ

मी असेन	आम्ही असू
तू असशील	तुम्ही असाल
तो, ती, ते असेल	ते, त्या, ती असतील

५ आज्ञार्थ

मी असू	आम्ही असू
तू अस, ऐस	तुम्ही असा
तो, ती, ते असो	ते, त्या, ती असोत

६ विध्यर्थ

मी असावा-वी-वे	आम्ही असावे–व्या–वी
तू असावास–वीस-वेस	तुम्ही असावेत–व्यात–वीत
तो असावा	ते असावे
ती असावी	त्या असाव्या
ते असावे	ती असावी

७ संकेतार्थ

मी अस–तो, ते–त्ये, ते	आम्ही असतो
तू अस–तास,तीस, तेस	तुम्ही असता
तो असतो	ते असते
ती असती	त्या असत्या
ते असते	ती असती

८ संशयवाचक संकेतार्थ

मी असलो, ले–ल्ये, ले	आम्ही असलो
तू असलास, लीस, लेस	तुम्ही असला
तो असला	ते असले
ती असली	त्या असल्या
ते असले	ती असली

§ ९४ संयुक्त-काळ

तीन मुख्य काळांची जी रूपे वर दिली आहेत त्यांवरून सर्व प्रकारचे अर्थ व्यक्त होत नाहीत. याकरिता क्रियापदे व धातुसाधिते यांना सहाय्यक क्रियापदांची योग्य ती रूपे जोडून काळांचे गौण प्रकार करावे लागतात, व या गौण प्रकारांच्या सहाय्याने प्रत्येक काळाचे विशेष भेद दाखविले जातात. हे भेद चार आहेत; त्यांची नावे :—**अपूर्णार्थवाचक; पूर्णार्थवाचक; रीतिवाचक**; व भविष्यार्थ, किंवा **उद्दिष्टार्थवाचक;** अशी आहेत. याप्रमाणे होणारे निरनिराळे भेद पुढील कोष्टकात दाखविले आहेत.

काळ	मुख्य रूप	रीतिदर्शक व अपूर्ण रूपे	पूर्ण	भविष्य...
वर्तमान	(मी) जातो	...जात असतो ...जात आहे	गेलो आहे	...जाणार आहे
भूत	(मी) गेलो	...जात असे ...जात होतो	गेलो होतो	...जाणार होतो
भविष्य	(मी) जाईन	...जात असेन ,, ,,	गेलो असेन	...जाणार असेन

याखेरीज खालील धातुसाधितांनी संयुक्त रूपे होतात.

१ **अपूर्ण वर्तमान**—स्पष्टार्थी रूप; जसे :—

तो रडतो आहे.
तो जातो (जात) आहे.
तो बोलतो (बोलत) आहे.

२ **वर्तमानकाळी**—संशयार्थी रूप—तो येत असावा.

३ **अपूर्णभूत**—स्पष्टार्थी रूप—सूत शौनकास म्हणता झाला (म्हणाला).

४ **संशयार्थी भूतकाळ**—रामा बोलला असावा.

५ **स्पष्टार्थी भविष्यकाळ**—तो चालता होईल (जाईल).

६ संशयार्थी भविष्यकाळ—रामा येणार असावा.

७ (१) संकेतार्थी व (२) संशयार्थी

वर्तमान-कृदंत	१	रामा येत असता तर मला जावे लागले नसते.
	२	रामा येत असला तर त्याला बोलावा.
भूतकृदंत	१	गाडी चुकली नाही तर तो आला असता.
	२	मी हे काम केले असले तर मला शिक्षा करावी.
भविष्य-कृदंत	१	रामा जाणार असता तर त्याला मी काम सांगितले असते.
	२	रामा जाणार असला तर मला सांगा.

विध्यर्थाची भूतकाळी व भविष्यकाळी रूपे

मी जावे — वर्तमानकाळी रूप

मी (जावे) जावयाचे होते —गेले पाहिजे होते	भूतकाळी रूप
मला जावे लागेल —जावयाचे पडेल	भविष्यकाळी रूप

विध्यर्थी अपूर्णवर्तमान

मी जात असावे

विध्यर्थी अपूर्णभूत

मी लिहीत असावयाचे (असावे) होते.

ता प्रत्ययान्त धातुसाधितांनी होणारे संयुक्त काळ

अवधिवाचक—तो राजा राज्य करीत असता—असताना ही गोष्ट घडली.

§ ९५ संयुक्त क्रियापदे

नामे व धातुसाधिते यांच्याशी संयोग होऊन संयुक्त किंवा जोड क्रियापदे तयार होतात. जसे :—

गोविंदरावांनी पुष्कळ पैसा संपादन केला.
परमेश्वराने जग उत्पन्न केले आहे.
रामा आपला अंगरखा धुऊन टाकितो.

टीपः—यांना संयुक्त क्रियापदें म्हणण्याचे कारण, ती तशी मानिल्याशिवाय या वाक्यांत अर्थच नीट लागत नाही हे होय. उदाहरणार्थ :—'संपादन केला' यात **संपादन** व **केला** ही दोन पदे वेगवेगळी केली, किंवा 'धुऊन टाकितो' यात **धुऊन** व **टाकितो** ही पदे वेगवेगळी केली तर अर्थ होतच नाही, किंवा भलताच होतो.

त्याचप्रमाणे '**उत्पन्न केले**' याचा अर्थ '**केले**' यापेक्षा वेगळा आहे. म्हणून या व या प्रकारच्या इतर वाक्यांत क्रियापद एकपदी न मानता जोड मानिले पाहिजे.

टीप :—रे० नवलकर हे आपल्या व्याकरणात थोडेसे याच्याही पुढे जाऊन प्रीती करणे, विश्वास धरणे, ही देखील संयुक्त क्रियापदेंच मानावी असे म्हणतात. पण हे सयुक्तिक दिसत नाही. प्रीती करणे, विश्वास धरणे, यांत 'प्रीती' व 'विश्वास' ही अनुक्रमे 'करणे' व 'धरणे' यांची कर्मे आहेत. तेव्हा ही जर संयुक्त क्रियापदे म्हणावयाची, तर सर्वच सकर्मक क्रियापदे, आंबा खाणे, पैसा मिळविणे, इ. संयुक्त का मानूं नयेत? इंग्रजीत 'प्रीती करणे,' to love, 'विश्वास धरणे' to believe यांना एकएकच प्रतिशब्द आहेत, या कल्पनेने रे० नवलकर चुकलेले दिसतात.

टीप :—प्रो० दामले यांनी आपल्या 'शास्त्रीय मराठी व्याकरणा'त वेगळ्या प्रकारची चूक केली आहे. सहाय्यक धातूंचे **निरर्थक** व **सार्थ** असे दोन भेद करून (५२१) या दोन्ही प्रकारच्या धातूंपासून संयुक्त क्रियापदे साधतात असे त्यांचे म्हणणे. ज्यांना ते निरर्थक सहाय्य क्रियापदें म्हणतात त्यांपासून होणारे भाषाप्रयोग पाहिले म्हणजे ते मुख्य काळ व मुख्य अर्थ यांपेक्षा निराळे दिसत नाहीत. मुख्य काळ आणि मुख्य अर्थ यांचे मागे जे गौण प्रकार सांगितले आहेत ते तसे न मानता रा० दामले त्यांस संयुक्त क्रियापदे मानितात. उदा०—तो जात नाही, तो करीत आहे, ही रा० दामले यांच्या मताप्रमाणे संयुक्त क्रियापदे होत. माझ्या मते रा० दामले यांची विचारसरणी नवलकरांच्या इतकीच चुकीची आहे. 'जात नाही' याने दोन क्रियांचा अर्थ दर्शविला जात नाही; किंवा मुख्य धातूच्या अर्थापेक्षा अगदी वेगळा आहे असा अर्थही येत नाही; तर, 'जाणे'

याचा एक प्रकार तेवढा सांगितला जातो. शिवाय, तो जातो, हे साधे क्रियापद, व त्याचे निषेधार्थी, तो जात नाही, हे संयुक्त क्रियापद मानावे हे जरा चमत्कारिक दिसते. तेव्हा **काळ व अर्थ यांचे धातुसाधितांनी साधणारे गौण प्रकार**, हे संयुक्त क्रियापदात घालू नयेत, असे मला वाटते. (प्रो. दामले यांचे शास्त्रीय मराठी व्याकरण कलमे ५२०, ५२४–५३३ पहा.)

तात्पर्य काय, की रा. दामले ज्यांना अर्थवान सहाय्य धातू असे म्हणतात त्यांच्या मदतीने साधणारी क्रियापदे, व संपादन करणे अशासारखे काही प्रयोग एवढेच संयुक्त क्रियापदांत येतात. यांचाच थोडासा जास्त विचार करू.

(I) संपादन करणे, भक्षण करणे, दान देणे...वगैरे प्रयोग

वास्तविक पहाता या क्रियापदांनी होणारे प्रयोग व्याकरणात अशुद्ध आहेत. उदा.—रामाने गाई दान केल्या, कृष्णाने लाडू भक्षण केले, हे प्रयोग रामाने गाईंचे दान केले, कृष्णाने लाडूंचे भक्षण केले असे, किंवा रामाने गाई दत्त (दिलेल्या अशा) केल्या, कृष्णाने लाडू भक्षित केले, असे व्हावयाला पाहिजेत. परंतु व्याकरणदृष्ट्या वरील प्रयोग मराठीत रूढ आहेत खरे. तेव्हा व्याकरणकाराने ते टाकून न देता त्यांची काही तरी व्यवस्था केलीच पाहिजे. अशा प्रयोगांत संयुक्त क्रियापद मानणे हीच व्यवस्था सर्वांत कमी त्रासाची वाटते.

(II) आता अर्थवान सहाय्य धातू तेवढे राहिले.
यांचे खालील प्रकार होतातः—

१ **शक्यार्थक**— ये, शक, पाव.

२ **कर्मणी** — जा.

३ **पराकाष्ठादर्शक**— घे, चूक, जा, टाक, ठेव, दे, बस, ये, सोड.

४ **सातत्य किंवा अभ्यासदर्शक** —आण, चल, चाल, जा, बस, ये, राह, सूट.

५ **कर्तव्यदर्शक**— पाहिजे, लाग, पड.

६ **इच्छादर्शक**— पाह, चाह, इच्छ.

७ **सहाय्यदर्शक**— घाल, लाग.

८ **अनुज्ञादर्शक**— दे.

९ **रीतिदर्शक**— अस.

वरील संयुक्त क्रियापदांच्या उपयोगाविषयी नियम व उदाहरणे

(१) **शक्यार्थक**— शक, पाव, ये.

'शक', 'पाव', यांचा प्रयोग ऊ–प्रत्ययान्त धातुसाधिताशी होतो. जसेः— " बुझावूं शकेना विधाता तयाला." मी येऊ शकेन.

मी तुला बळकट धरिले आहे, तू आता सुद्धं [पावणार] नाहीस. (हे क्रियापद चालू भाषेतून जवळ जवळ गेल्यासारखेच आहे.)

' ये 'चा प्रयोग ता–प्रत्ययान्त धातुसाधिताशी किंवा उ–प्रत्ययान्त धातुसाधिताच्या विभक्तीच्या रूपाशी होतो. जसेः—मला वाचता येते. रामाला गावयास येते.

(२) **कर्मणी जा**– रावण रामाकडून मारिला जातो.

टीप— (१) वरील प्रयोगाचा अर्थ त्या क्रियापदाचे अकर्मक रूप घालून सांगता येतो. जसेः—रावण रामाच्या हाते मरतो. तो तरेल (तारिला जाईल). किंवा (२) कर्ता न घालताच क्रियापदाचा सामान्य अर्थाने प्रयोग करितात. जसेः—असे म्हणतात; म्हटले आहे (म्हटले जाते) की……किंवा, (३) प्रातिपदिक (नाम अथवा त-प्रत्ययान्त धातुसाधित विशेषण) व क्रियापद घालितातः—

जसेः—रामाकडून रावणाचा वध होतो. तो संतुष्ट झाला आहे (संतोषविला गेला आहे).

(३) **पराकाष्ठादर्शक**—

मुख्य धातूची क्रिया पूर्णपणे होत आहे किंवा झाली आहे अशा अर्थी मुख्य धातूच्या ऊन प्रत्ययान्त रूपाने प्रयोग होतात. जसेः—

(घे) तू जेऊन घे. मी त्यास राहून घेतले आहे.

(चूक) तो बोलून चुकला, आता काही शब्द परत जात नाहीत.

(जा) माझ्या हातून ही गोष्ट होऊन गेली.

(टाक) रामाने आंबा खाऊन टाकिला.

(ठेव) पिठात पाणी घालून ठेव.
(दे) वाईट संगति टाकून द्यावी.
(बस) रामा मूग गिळून बसला.
(सोड) त्याने मला त्रास देऊन नकोसे करून सोडिले.

(४) **सातत्यदर्शक**—ऊन-त प्रत्ययान्त धातुसाधिताशी प्रयोग होतो.

रोज व्यायाम करीत जावे. व्यर्थ काळ घालवीत बसू नये. तो चार तास येथे बसून राहिला.

(५) **कर्तव्यबोधक**—

(पाह) मला आज पत्र लिहिले पाहिजे. मुलांनी झटून अभ्यास केला पाहिजे.
(लाग) मला पंधरा दिवसांनी मुंबईस जावे-जायास लागेल.
(पड) मला दररोज दोन मैल चालावयाचे पडते.

(६) **इच्छादर्शक**—ऊ-प्रत्ययान्त धातुसाधिताशी किंवा त्याच्या विभक्त्यंत रूपाशी प्रयोग होतो.

मी गावयाला शिकू पाहतो, चाहतो, इच्छितो.

रामा निसटावयाला पाहतो.

(७) **सहाय्यदर्शक**

(घाल) आईने मुलास जेऊ-जेवावयास, घातले.
(लाग) तू हे काम करू लाग; वेडाने तो बरळावयास लागला.

(८) **अनुज्ञादर्शक**—

मला जाऊ द्या, जावयाला द्या.

प्रयोगविचार—

§ ९६ **प्रयोग**—आतापर्यंत सांगितलेली जी क्रियापदाची वेगवेगळी रूपे त्यांनी अनेक प्रकारचे विवक्षित अर्थ व्यक्त होतात ही गोष्ट त्या त्या ठिकाणी दिलेल्या उदहरणांवरून स्पष्ट झालीच आहे. अर्थ व्यक्त करण्याच्या या प्रकारांचे निरीक्षण केले तर असे दिसेल की, वाक्यातील कर्ता, कर्म, व क्रियापद

या मुख्य भागांचा परस्परसंबंध लक्षात घेता या प्रकारांचे तीन स्थूल भाग करावे लागतात. ते असेः—

१ कर्त्याप्रमाणे ज्यांत क्रियापद चालते अशी सर्व वाक्ये.

२ कर्माप्रमाणे ज्यांत क्रियापद चालते अशी सर्व वाक्ये.

३ कर्ता व कर्म याप्रमाणे क्रियापद न चालतां ज्यांत त्याचे नपुसकलिंगी एकवचनी रूप येते अशी वाक्ये.

या तीन भागांत मिळून सर्व प्रकारच्या वाक्यांचा समावेश झालाच पाहिजे. कारण, कोणतेही मराठी वाक्य घेतले तरी ते या तीन भागांपैकी कोठे तरी येतेच; म्हणजे क्रियापद कर्त्याप्रमाणे चालते, किंवा कर्माप्रमाणे चालते, किंवा मुळीच या दोन्हीप्रमाणे न चालता नपु. एकवचनी येते.

या प्रकाराने वाक्याची व्याकरणदृष्ट्या व्यवस्था लावणे याला प्रयोग असे म्हणतात. वरील स्थूल भेद लक्षात घेता, हे प्रयोग तीन प्रकारचे आहेत असे म्हणता येईल. त्यांना त्यांच्या स्वरूपावरून १ कर्तरिप्रयोग, २ कर्मणिप्रयोग व ३ भावेप्रयोग अशी नावे व्याकरणकारांनी दिलेली आहेत.

§ ९७ मराठीतील प्रयोगव्यवस्थेचे मूळ तत्त्व वर थोडक्यात सांगितले आहे. ते (म्हणजे कर्त्याप्रमाणे क्रियापद चालणे, कर्माप्रमाणे क्रियापद चालणे, किंवा दोहोंपैकी कशाहीप्रमाणे ते न चालणे) डोळ्यांआड होऊ दिले नाही म्हणजे प्रयोगविचारांत कोणताच घोटाळा होण्याचे कारण नाही. पण, चालू मराठी व्याकरणात या प्रकरणात बराच घोटाळा केलेला सापडतो; आणि त्याचे कारण शोधू लागले तर तो, मराठी प्रयोगव्यवस्थेचे मूळतत्त्व सोडून इतर (इंग्रजी व संस्कृत या) भाषांतील प्रयोगव्यवस्था यांची मराठी प्रयोग-व्यवस्थेशी सांगड घालण्याचा प्रयत्न केल्यामुळे, निष्कारण उत्पन्न झालेला आहे असे दिसते. हा घोटाळा काढून टाकावयाचा असेल तर इंग्रजी व संस्कृत यांतील प्रयोगव्यवस्था मराठीतील प्रयोगव्यवस्थेपेक्षा मूलतःच भिन्न आहे ही गोष्ट पहिल्याने दाखविली पाहिजे, व या दोन प्रकृतिभिन्न व्यवस्थांची सांगड घालण्याने घोटाळा किती व कसा होतो हेही दाखविले पाहिजे. तेव्हा

या गोष्टींचा विचार पहिल्याने करून शेवटी मराठी प्रयोगरचना ही आपल्या परीने व्याकरणाला पुरेशी कशी आहे हे दाखवू व तिचे पुरेसे स्पष्टीकरण करू म्हणजे झाले.

§ ९८ संस्कृत व इंग्रजी या भाषांत क्रियापदे नेहमी कर्त्यांप्रमाणेच चालतात. उदा० **रामो** गच्छति, रामेण **व्याघ्रो** हतः (अस्ति), रामेण **कार्यं** क्रियते, या वाक्यांत **क्रियांचे व्याकरणदृष्ट्या कर्ते** जाड्या अक्षरात दाखविले आहेत. इंग्रजीत The man was bitten by the dog. The grapes were eaten by the fox. या वाक्यांत क्रियापदे कर्त्यांप्रमाणेच चालतात. संस्कृतातील 'तेन गम्यते' अशी वाक्ये घेतली तरी त्यांतील तृतीयान्त पदे ही त्या त्या क्रियापदांची कर्तृपदे नव्हेत व व्याकरणात या क्रियापदांचे कर्ते कोणते असा प्रश्न केला तर त्याचे उत्तर काही तरी वेगळे येईल.

तात्पर्य काय, की इंग्रजी व संस्कृत या भाषांत एकच प्रयोगव्यवस्था आहे, ती म्हणजे कर्त्यांप्रमाणे क्रियापद चालणे ही. मराठी **व्याकरणाच्या परिभाषेत बोलावयाचे तर इंग्रजीत कर्मणी व भावे हे प्रयोग नाहीतच.** मग, इंग्रजीत ज्याला Passive Voice असे म्हणतात त्याची वाट काय? हा प्रश्न मुख्यतः इंग्रजी भाषेचा आहे व त्याचे उत्तर मराठी व्याकरणकाराने देण्याचे कारण नाही. पण, ते द्यावयाचेच असेल तर असे देता येईल की, क्रियेचे मूळचे कर्म—ज्यावर क्रिया घडते ते—कर्तृपदी घालून, म्हणजे कर्मपदाचे कर्तृपद करून, इंग्रजीत जी रचना करतात तिला Passive Voice असे नाव आहे; व त्या रचनेने ती क्रिया घडली एवढाच अर्थ विवक्षित असतो. या भाषाप्रयोगाला मराठीत पारिभाषिक नाव द्यावयाचे तर ते कर्मकर्तरी असे द्यावे. यासारखे चालू मराठीतील प्रयोग 'जा' या धातूच्या मदतीने होतात.

१ देवांकडून / इंद्राकडून | राक्षस मारिले गेले.

२ उंदराकडून जाळे कुरतडले गेले.

मराठी परिभाषेप्रमाणे हे कर्तरिप्रयोगच आहेत; कारण, त्यांत कर्त्यांप्रमाणे

क्रियापदाचे रूप पुरुषलिंगवचनी चालते. पण यात आणि साध्या कर्तरिप्रयोगात फरक एवढाच की, **मूळ क्रियेचा खरा कर्ता व व्याकरणातील क्रियापदाचा कर्ता हे साध्या कर्तरिप्रयोगात एकच असतात; व या प्रकारच्या कर्तरिप्रयोगात मूळच्या कर्मपदाची कर्तृस्थानी योजना झालेली असते.** हा फरक व्याकरणात महत्त्वाचा नाही; पण निराळा दाखवावयाचा असेल तर **या दुसऱ्या, वर उद्धृत केलेल्या, प्रयोगाला कर्मकर्तरी हे नाव द्यावे म्हणजे झाले.**

§ ९९ **मराठीतील कर्मणी व भावे या प्रयोगांत असलेले मूलतत्त्व (म्हणजे कर्माप्रमाणे क्रियापद चालणे किंवा ते नपुसकलिंगी येणे हे) इंग्रर्ज व संस्कृत या भाषांना मान्य नाही.** तसेच, इंग्रजी व संस्कृतातील प्रयोगाचे मूलतत्त्वही मराठीला सर्वस्वी मान्य नाही हीही गोष्ट स्पष्टच आहे. त्याचप्रमाणे, इंग्रजीतील Passive व Active प्रयोगभेदातील मूलतत्त्वही मराठी व्याकरणाने महत्त्वाचे मानिलेले नाही. ते तसे मानिलेले असते तर मराठीत तीन प्रयोगांची जरूरीच नव्हती; व इंग्रजीत ज्याप्रमाणे दोन प्रकारांतच सर्व वाक्यांचा समावेश करिता येतो, तसाच प्रकार झाला असता. खरोखर सांगावयाचे म्हणजे, मराठीतील प्रयोगव्यवस्थेला संस्कृत व इंग्रजी या भाषांत जोडच नाही, व यामुळेच मराठी भाषा बोलणाऱ्या व लिहिणाऱ्या परकीय लोकांस शुद्ध मराठी लिहिणे बोलणे कठीण जाते. उदा०—रामा केळे खाल्ला; सीताबाई आंबे खाल्ली, रामाने आंबे खाल्ला, कृष्णाबाईने गेली, रामाने रावणास मारिला, कृष्णाने गोविंदास बोलला, मी म्हटलो; अशा प्रकारचे प्रयोग परकी लोकांच्या भाषेत ऐकू येतात.

तेव्हा, **इंग्रजीतील** Passive Voice **म्हणजे मराठी कर्मणिप्रयोग नव्हे.** तो मराठीत आणण्याचे कारणही नाही. त्याचा अर्थ मराठीत तशा प्रकारची वाक्य-रचना होत नाही असा मात्र नव्हे हे वर दाखविलेच आहे. मराठीत जे प्रयोग होतात–(त्वां काय कर्म करिजे–वगैरे) ते कर्तरिप्रयोगच मानता येतील. फार तर, त्यांना कर्मकर्तरी म्हटले म्हणजे झाले.

आता मराठीतील **कर्तरी, कर्मणी, व भावे** या प्रयोगांकडे परत वळू.

§ १०० कर्तरिप्रयोग

कर्तरिप्रयोगात कर्त्याप्रमाणे क्रियापद चालते. म्हणजे सर्व आख्यातांत कर्त्यांच्याप्रमाणे क्रियापदाचा पुरुष व वचन ही बदलतात, व काही आख्यातांत लिंगही बदलते. याचे दोन मुख्य प्रकार आहेत. कर्तरी (किंवा कर्तृकर्तरी) व कर्मकर्तरी. कर्तरिप्रयोग सकर्मक व अकर्मक अशा दोन्ही प्रकारच्या क्रियापदांना होतो म्हणून त्याचे अकर्मकर्तरी व सकर्मकर्तरी असेही दोन प्रकार करितात.

कर्तरिप्रयोग केव्हा होतो ?

१ अकर्मक क्रियापदाचा सर्वकाळी व आज्ञार्थ, संकेतार्थ, या अर्थी कर्तरिप्रयोगच होतो, दुसरा कोणताही होत नाही. जसे :—

रामा धावतो, धावला, धावत असे, धावेल, धावता, (तर) .... रामा, धाव.

२ विध्यर्थी विकल्पाने कर्तरी किंवा भावे प्रयोग होतो. जसे:—

रामा धावावा, रामाने धावावे.

३ (i) वर्तमान, (ii) रीतिभूत, (iii) भविष्य, या काळी, व (iv) आज्ञार्थ आणि (v) संकेतार्थ या अर्थी, सकर्मक क्रियापदांचा कर्तरिप्रयोग होतो. जसे :—

रामा (i) आंबा खातो, (ii) खात असे, (iii) खाईल, (iv) खा, (v) खाता (तर)....

४ काही अपवाद सोडून बाकीच्या सकर्मक क्रियापदांचा भूतकाळी व विध्यर्थी कर्मणिप्रयोग होतो. अपवादात्मक धातूंचा विकल्पाने कर्तरिप्रयोग होतो. हे अपवादात्मक धातू म्हणजे उमजगण व आचरगण यांतील धातू होत. जसे :—

माझा आशय काय होता हे रामा मनात उमजला (रामाने मनात उमजले). राम तप आचरला (रामाने तप आचरिले). रामा मनात... उमजावा असे वाटते. राम तप आचरावा.

§ १०१ कर्मकर्तरिप्रयोग

याला चालू मराठी व्याकरणात कर्मणिप्रयोग म्हटले आहे. पण त्यामुळे खरा कर्मणी व हा प्रयोग यांचा घोटाळा होतो ही गोष्ट वर दाखविलीच आहे. शिवाय, कर्मणिप्रयोगाचे मुख्य लक्षण (कर्माप्रमाणे क्रियापद चालणे हे) याला लागूच पडत नाही. उदा०—रामाकडून रावण मारिला गेला, हे वाक्य घ्या. यात धातू कोणता? मारणे हा, की 'मारिले जाणे' हा? 'मारणे' हा धातू असे म्हणावे तर 'कोण किंवा कोणी मारिला'? असा प्रश्नच विचारता येत नाही, किंवा त्याचे उत्तरही सरळ येत नाही. कोणी मारिला? रामाने. पण मग, वाक्य—रामाने रावण मारिला गेला—असे होणार नाही, रामाने रावण मारिला असे होईल. रामाने व रामाकडून ही दोन्ही जरी तृतीयेचीच रूपे असली तरी ती समान अर्थाची नव्हेत. एकाबद्दल दुसरे सर्व ठिकाणी येऊ शकत नाही.

तात्पर्य, वरील वाक्यात '**मार**' हा धातू असे मानिता येत नाही. **तर 'मारिला जा'** हा धातू धरावा लागतो; व **कोण मारिला जातो** या प्रश्नाचे उत्तर सरळ—**रावण मारिला जातो** असे येते. म्हणजे 'रावण' हा **व्याकरणदृष्ट्या** या वाक्यात कर्ता आहे.

क्रियापदाची व्याख्या (क्रियापदाच्या योगाने एखाद्या वस्तूची क्रिया, स्थिती, किंवा भोग यांपैकी एक गोष्ट दाखविली जाते- रे० नवलकर) लक्षात ठेविली म्हणजे तिला विसंगत असे या विवेचनात काहीच नाही. रावण मारिला जातो यात 'रावण' जे भोगतो, जे त्याला घडते ते सांगितले आहे. तेव्हा 'रावण' हा कर्ता व 'मारिला जातो' हे क्रियापद; पण, रावण हे मारणे या मूळ क्रियेचे कर्म असल्यामुळे हा कर्मकर्तरिप्रयोग असे म्हणावे.

सकर्मक धातूंच्या भूतकालवाचक कृदंताला 'जा' या सहाय्य धातूची मदत देऊन हा प्रयोग करितात. उदा०—

१ रावण रामाकडून मारिला जातो, गेला, जाईल.

२ चोर शिपायाकडून धरिला जातो.

३ "नळें इंद्रासी असें बोलिजेलें."

§ १०२ कर्मणिप्रयोग

कर्माप्रमाणे क्रियापद चालते तेव्हा त्या प्रयोगाला कर्मणिप्रयोग म्हणावे. चालू मराठीत बहुतेक सकर्मक क्रियापदांचा, भूतकाळी व विध्यर्थी वाक्यांतील कर्म प्रत्ययरहित असेल तेव्हा, कर्मणिप्रयोग होतो. जसे :—रामाने घोडा धरिला. घोड्याने गवत खावे. “ नारायणें आम्ही इंद्रियांचीं दीनें केलीं. ” कृष्णे, तू द्यूतात हारविलीस.

अपवाद १. उमजगण व आचरगण यांतील धातूंस भूतकाळी विकल्पाने कर्तरी किंवा कर्मणी प्रयोग होतो. जसे :—

रामा मनात उमजला की......(कर्म-वाक्य) रामा तप आचरतो.	कर्तरी
रामाने मनात उमजले की...... रामाने तप आचरिले.	कर्मणी

विध्यर्थी, उमज व आचर या गणांतील धातूंस कर्मणिप्रयोगच होतो. जसे :—

रामाने मनात उमजावे. रामाने तप आचरावे.	कर्मणी

टीप :—रामा उमजावा की, रामा तप आचरावा, असे प्रयोग मराठीत रूढ नाहीत.

जुना कर्मणिप्रयोग—हा विध्यर्थी जुन्या मराठीत येतो. जसे :—

“ त्वां काय कर्म करिजे लघु लेकरानें...... ”

“ जो जो कीजे परमार्थ लाहो...... ”

टीप :—याची उत्पत्ती—मूळ धातूला ‘ य ’ हा आगम होऊन त्यापासून संस्कृतात नवीन अंग तयार होत असे, व त्याला आत्मनेपदाचे प्रत्यय लागत. या नवीन क्रियापदाचा अर्थ ती क्रिया झाली, केली गेली, घडली अशा अर्थाने होई, व अशा वाक्यात कर्तृपदाला गौणत्व दिलेले असे. संस्कृतातील या ‘ य ’ पासून मराठीत ‘ ज ’ झाला; त्या आगमाने नवीन धातू जुन्या मराठीत होत. जसे :—

कर + ज=करिज, कीज......
जा + ज=जाइज.
बोलिज, म्हणिज, येइज....वगैरे.

जुन्या कवितेत या धातूंचा दोन अर्थांनी प्रयोग आढळतो. (१) साधा भूतकाळ, व (२) विध्यर्थ. साध्या भूतकाळाचा अर्थ असेल तेव्हा मूळ धातूच्या कर्त्याकडे गौणत्व असून केवळ क्रियाच विवक्षित असते व ते प्रयोग सर्वस्वी (म्हणजे रूपाने व अर्थाने) चालू मराठीतील 'रावण मारिला गेला' अशासारखे होतात. उदा०—"नळें इंद्रासी असें बोलिजेलें." यांना कर्म-कर्तरी प्रयोग म्हणावे.

(२) विध्यर्थी प्रयोग कर्मणिप्रयोग म्हणावयाला पाहिजेत. जसे :—

१ "त्वां काय कर्म करिजे लघु-लेकरानें."

२ "नित्य पोटीं वडवाग्नि पेट घेतो,
सागरानें तो काय सांगिजेतो."

§ १०३ भावेप्रयोग

भावेप्रयोगात मूळच्या क्रियेचे कर्म दाखविणारा शब्द सप्रत्यय द्वितीयेत असतो, व त्यामुळे कर्मपदाप्रमाणे क्रियापद चालत नाही. ते सप्रत्यय असल्यामुळे त्याचाही ताबा क्रियापदावर चालत नाही; व म्हणून, क्रियापदाचे अगदी सामान्य म्हणजे **नपुसकलिंगी एकवचनी** रूप मात्र वाक्यात येते. **या प्रयोगाला भावेप्रयोग म्हणतात, कारण यात क्रियापदाचा जो भाव किंवा आशय त्याकडे प्राधान्य असते, किंवा तोच मुख्यतः विवक्षित असतो, व त्या मानाने मूळ कर्ता व मूळ कर्म ही दोन्ही गौण असतात.** तेव्हा, वास्तविक पाहता भावेप्रयोगात क्रियेचा भाव हाच कर्ता असे मानिले पाहिजे व तसा प्रयोग (म्हणजे **कर्तरी**) झाला पाहिजे; म्हणजे मूळच्या धातूच्या भूतकालवाचक कृदंतापुढे सहाय्यक "अस" धातूचे रूप येऊन प्रयोग झाला पाहिजे. परंतु चालू मराठीत अस धातूचा लोप होऊन मूळचे भूतकालवाचक कृदंत हेच क्रियापद बनले आहे. (हीच व्यवस्था कर्मणिप्रयोगातही आहे.) तेव्हा, प्रयोग आहेत तसे मानून मूळक्रियेचा कर्ता

हाच वाक्यातील कर्ता, मूळक्रियेचे कर्म हेच वाक्यातील कर्म, (अर्थातच कर्म असेल तेव्हा) व मूळक्रियापदाचे नपु. रूप हेच क्रियापद मानावे हा मार्ग सोईचा दिसतो. भावेप्रयोग सकर्मक व अकर्मक अशा दोन प्रकारच्या क्रियापदांस होतो. कर्म असेल तेव्हा ते सप्रत्यय असते; कर्ता तृतीयेत असतो. जसे :—

मी, म्या, जावे, बसावे.
मला गेले पाहिजे. } अकर्मक भावे

रामाने रावणास मारिले, मारावे—सकर्मक भावे

टीप :—सकर्मक भावेप्रयोगाचे बद्दल जसा कर्मणिप्रयोग विकल्पाने होतो, (उदा० —रामाने रावण मारिला,मारावा)तसाच अकर्मक भावेप्रयोगाचे बद्दल कर्तरिप्रयोग होतो. (उदा०—तो जावा, रामा यावा, तू जावास).

टीप :—भावेप्रयोग ही मराठीत "एक अजब चीज आहे," असे विधान मागे सप्रत्यय द्वितीयेचा विचार करिताना केले होते; त्याचे रहस्य वरील विवेचनावरून वाचकांच्या लक्षात येईलच.

शक्य क्रियापदांच्या प्रयोगात क्रियेचा भाव हाच प्रधान असतो. म्हणून शक्यार्थक क्रियापदांचा नेहमीच भावेप्रयोग किंवा भावकर्तरी प्रयोग होतो असे मानले पाहिजे. जसे :—

माझ्याने
मला } जाववते, बसवते. (भावकर्तरी)

रामा (च्या) ने
रामाला } रावणास मारवते (सकर्मक भावे)

टीप :—या प्रयोगात क्रियेचा मूळचा कर्ता—ज्याला उद्देशून क्रिया घडते तो— चतुर्थीतही येतो; (उदा०—मला जाववते). याचे कारण प्राकृतात चतुर्थी (मूळची षष्ठी) ही सामान्य विभक्ती मानिली होती व तिचा प्रयोग प्रथमेखेरीज इतर सर्व विभक्तींच्याबद्दल होत असे.

मला कळमळते, सांजावले, मला फावले, हे भावेप्रयोगच आहेत. कारण यांत क्रियेचा भावच विवक्षित आहे. पण चालू भावेप्रयोगात क्रियेचा मूळ

कर्ता हाच कर्ता बनल्यामुळे त्या भावेप्रयोगापेक्षा हे जरासे वेगळे दिसतात. म्हणून कर्तरिप्रयोगाचा जसा कर्मकर्तरी हा पोटभेद मानणे सोईचे पडते, त्याच कारणाकरिता भावेप्रयोगाचा भावकर्तरी हा एक पोटभेद मानणे सोईचे पडते. अकर्मक शक्य क्रियापदांचे प्रयोग (मला जाववते) हे भावकर्तरी मानणे जास्त प्रशस्त वाटते.

म्या, मी, गेले पाहिजे.
मी, मला, जावे लागेल.
मी करावे लागेल.
} अशा वाक्यांत मूळची दोन वाक्ये व दोन क्रियापदे असली पाहिजेत.

म्हणजे, मी गेले (हे) पाहिजे (पडावे).—कर्मणी.

मी
मला
} जावे (हे) लागेल.

पण, मूळचे हे स्वरूप आता विसरल्यासारखे होऊन ‘ गेले पाहिजे ’, ‘जावे लागेल’ ही संयुक्त क्रियापदासारखीच झाली आहेत. ती तशी मानून वरील प्रयोग भावेप्रयोग मानावेत.

§ १०४ काळ व अर्थ यांचे विशेष उपयोग

१ [अ] वतमानकाळ

[१] नुकतीच संपलेली किंवा लवकरच सुरू होणारी क्रिया या काळाने दर्शविली जाते. जसे :—१ तुम्ही केव्हा आला ? हा येतो इतकाच. २ तुम्ही पुढे जा, मी येतोच.

[२] भविष्यकाळी क्रिया खात्रीने होणार अशा अर्थी वर्तमानकाळाचा उपयोग होतो. जसे:—आता तो खात्रीने जातो [जाईल] असे मला वाटले.

[३] अवतरण देण्याकरिता. जसे — तुकाराम म्हणतात :—

[४] ऐतिहासिक वर्तमान-गतकाळातील गोष्टींचे हुबेहुब वर्णन करिताना. जसे :—धर्माकरिता युद्ध कर असे श्रीकृष्ण अर्जुनास म्हणतात [म्हणाले].

[५] सर्वकाळी, सर्वत्र, खरी असणारी अशी एखादी गोष्ट सांगण्याकरिता. जसे :—दोन व दोन मिळून चार होतात. सूर्य सकाळी पूर्वेस उगवतो व संध्याकाळी पश्चिमेस मावळतो.

१ (आ) अपूर्णवर्तमान

[१] सातत्यार्थी—जसे :—तू येथे किती दिवस काम करीत आहेस ?

[२] वर्तमानकाळाच्या सामान्य अर्थाने. जसे :—पहा, मी लिहीत [लिहितो] आहे = [लिहितो].

[३] मुख्य वाक्यात भूतकाळी क्रियापद असता गौण वाक्यात अपूर्ण वर्तमानकाळी क्रियापद आले तर त्याला अपूर्णवर्तमानकाळाचा अर्थ येतो. जसे :—पाखरे उडत आहेत [होती] असे त्याने पाहिले.

[इ] रीतिवर्तमान

तो रोज सकाळी गातो, गात असतो.

२ (अ) भूतकाळ

[१] संकेतार्थी—जसे :—जर तू कधी इकडे आलास तर मला भेटून जा.

[२] भविष्यकाळी क्रिया खात्रीने होणार या अर्थाने. जसे — तुम्ही प्रयत्न मात्र करावा, म्हणजे यश मिळालेच म्हणून समजा.

[३] तावडतोब घडणाऱ्या क्रियेविषयी बोलताना. जसे :—पुढे व्हा, मी आलोच.

[४] अपूर्णवर्तमानकाळाच्या अर्थाने, क्रिया संपत आली आहे असा आशय व्यक्त करण्याकरिता—जसे :—ही पहा गाडी आली [येत आहे].

[५] संकेतार्थक भविष्यकाळी—जसे :—तो आला म्हणजे मी जाईन.

[६] विधानावर जोर देण्याकरिता प्रश्नार्थी—जसे :—मी म्हणतो ते बरोबर आहे, समजले ?

[७] नम्रतेने इच्छा व्यक्त करण्याकरिता—जसे :—मला एक रुपया उसना पाहिजे होता [आहे].

(आ) पूर्णभूत

(१) गतकाळी होऊन गेलेल्या गोष्टींबद्दल बोलताना पूर्णभूतकाळ घालितात–जसे :—मी काल फार जेवलो होतो.

(२) नम्रतेने इच्छा किंवा विनंती व्यक्त करण्याकरिता––जसे :––मी आपल्याकडे कामाकरिता आलो होतो.

(३) एखादी गोष्ट अपेक्षेप्रमाणे घडत नाही तेव्हा तिच्याविषयी बोलताना–जसे :—मला वाटले होते की तू येशील.

(४) झालेल्या गोष्टीविषयी कालनिर्देश विवक्षित नसून बोलावयाचे असता–जसे:—तो बसला होता. नौका दोरीने बांधिली होती. मावशीने मला एक आंगठी दिली होती.

(इ) रीतिभूत

(१) साध्या भूतकाळाचे किंवा वर्तमानकाळाचे अर्थाने याचा उपयोग कवितेत होतो; जसे :—‘ सूत म्हणे कृष्णेला; ’ तुका म्हणे.

(२) सुरू असलेल्या क्रियेची समाप्ती किंवा सातत्य दाखविण्याकरिता–जसे:—तो दिसेपर्यंत मी त्याजकडे पाहत होतो.

(३) एखाद्या क्रियेचा परिणाम दाखविण्याकरिता–जसे :–तो शरीरास श्रम न पडे असे वागतो.

(४) संभवार्थी (संकेतदर्शक पूर्ववाक्यात)–जसे :—जर तो अभ्यास करी तर तो परीक्षेत उतरू नये?

३ (अ) भविष्यकाळ

याने नुसत्या भविष्यकाळच्या अर्थाशिवाय खालील इतर अर्थ संभवतात–

(१) संमती, अनुकूलता—मी त्याला माझा वाटा देईन.

(२) शक्याशक्यता––सर्व लोक विद्वान कसे होतील ?

(३) औचित्य, अनौचित्य––तो का नुकसान सोशील ?

(४) संकेत – तुम्ही हे काम कराल तर माझ्यावर उपकार होतील.

(५) संशयार्थी (संकेतदर्शक वाक्यात, जसेः—मला राज्यावर बसवाल तर मी राज्य चालवीन.

(६) औदासिन्य (संकेतदर्शक वाक्यात,—तुम्ही जाल तर जा.

(७) विनंती—माझे एवढे काम कराल का ?

(८) संशय-संभव या अर्थांनी, 'अस' धातूचा उपयोग. तो आता लिहीत बसला असेल. रामा आज सकाळी मुंबईस पोचला असेल.

३ (आ) अपूर्णभविष्य.

(१) संभवार्थी— उद्या या वेळेस तो प्रवास करीत असेल.

(२) संशयार्थी— हा पाऊस आमचे गांवी पडत असेल.

३ (इ) भूतभविष्य

(१) संभवार्थी— तो गेला असेल (असावा).

४ आज्ञार्थ

(१) प्रथमपुरुषी—इच्छापूर्वक प्रश्नार्थी. जसेः— मी जाऊ काय ?

(२) इच्छादर्शक— चला, आपण फिरावयास जाऊ; पाहू बरे, तू कसे गातोस ते.

(३) आज्ञा, उपदेश, प्रार्थना—मुलांनो, खेळावयास जा; अभ्यास करा. राजा, माझे संकट दूर कर.

(४) संमती, सदिच्छा आशीर्वाद वगैरे व्यक्त करण्याकरिता —जसे :— "त्याचा संग नको मजलागी । त्याच्या तोंडा लागो आगी" ॥ ईश्वर तुमचे कल्याण करो.

(५) संकेतार्थी— काम करा म्हणजे यश येईल.

५ विध्यर्थ

याचे अनेक, विविध अर्थ होतात. ते—

(१) शक्यता—योग्यता. व्यापार मारवाड्यानेच करावा.

(२) कर्तव्य— मनुष्याने खरे बोलावे.

(३) आश्चर्य, विलक्षणपणा–त्या मौजेचे वर्णन शब्दांनी काय करावे !

(४) उद्देश, हेतु—त्याचे बरे व्हावे म्हणून मी त्याला उपदेश करून पाहिले.

(५) रीती–त्याने तिला एकसारखे मारावे (तो मारीत असे).

(६) संभव–आज पाऊस पडावा (पडेल).

(७) इच्छा–" पुत्र व्हावा ऐसा गुंडा। ज्याचा तिही लोकीं झेंडा ॥ "

(८) प्रार्थना–माझी विनंती आपण ऐकावी.

(९) आश्चर्यद्योतक (प्रश्नार्थक वाक्यात) – तुमच्या हातून हे कसे व्हावे !

(१०) आवश्यकता, अपरिहार्यता–दुष्काळात गरिबांनी चोरी न करावी तर काय करावे ?

(११) प्रश्नार्थक—मी काय करावे ?

(१२) संकेत—त्याने जावे तर मीही का जाऊ नये !

(१३) संभव—तो गेला असावा,...तो येणार असावा...

६ संकेतार्थ

(१) एक गोष्ट दुसरीवर अवलंबून असून दुसरी न घडल्यामुळे पहिलीही घडली नाही अशा अर्थी:–त्यास जर औषध पोचते तर तो जगता.

(२) केवळ काल्पनिक विधान करण्याकरिता–आपण जर पक्षी असतो तर आपणास आकाशात उडता आले असते.

§ १०५ धातुसाधितांचा उपयोग

क्रियावाचक नाम, णे–कृदंत, (नपु. एकवचनी)

हे खरोखर नामच आहे व त्याला नामाप्रमाणे विकार होतात. म्हणजे त्याला वचन आणि विभक्ती ही होतात. जसे:—असली तुमची बोलणी मला समजतात. त्याच्या बोलण्यावर माझा विश्वास नाही. तुझ्या येण्याने मला बरे वाटेल.

त्याचबरोबर हीही गोष्ट लक्षात ठेविली पाहिजे की हे जातीचे क्रियापद असल्यामुळे, नाम झाले तरी त्याचा मूळस्वभाव सर्वस्वी जात नाही. उदा.–

[१] त्याला क्रियाविशेषण लागते. जसे :––तुझ्या जलद चालण्याने मला त्रास होतो.

[२] सकर्मक धातूपासून झालेल्या नामाला कर्मही लागते. जसे :––तुझे पत्र लिहिणे संपेल तेव्हा ! नेहमी खेळ खेळणे चांगले नाही.

[३] त्याच्याबरोबर कर्तृपद येऊन त्याला प्रथमा, तृतीया, चतुर्थी, षष्ठी या विभक्ती होतात. जसेः––**तू** येण्याने मला आनंद होईल. **तो** येण्याचाच अवकाश [प्रथमा]. **त्याने** असे करणे बरे नाही. **त्याने** जाण्यापेक्षा मी जाणे बरे [तृ.] **त्याला** येण्याला काही हरकत नाही [च.]. **त्याच्या** येण्याने आम्हाला आनंद होईल [ष.].

[४]अगदी सामान्य अर्थाने उपयोग करावयाचा असेल तेव्हा कर्ता लुप्त असतो–जसेः––वडील माणसांचा मान राखणे हे मुलांचे कर्तव्य आहे.

[५] णे–प्रत्ययान्त धातुसाधिताचा उपयोग विध्यर्थी होतो. जसे—

" आयुष्याच्या साधने। सच्चिदानंद पदवी घेणे. "

[६] पड, अस या धातूंशी णे – कृदंताचा उपयोग, आवश्यकता, निरुपाय हे अर्थ व्यक्त करण्याकरिता होतो. जसे :––

मला व्यापाराकरिता नेहमी मुंबईस जाणे पडते.

त्याला नोकरी करणे आहे. मला हे काम करणे आहे.

टीपः–या ठिकाणी पडणे, असणे, हे सहाय्य धातू मानून, करणे आहे, देणे पडते, ही क्रियापदे मानावी असे रा. दामले शास्त्रीय मराठी व्याकरणात म्हणतात.

किंवा असणे, पडणे हेच मुख्य धातू मानून नामे ही कर्तृपदे मानावी.

ऊ–कृदंत —मूळच्या संस्कृत तुम्—प्रत्ययान्त धातुसाधितापासून मराठी ऊ-प्रत्ययान्त करू, जाऊ, अशी कृदंते झाली आहेत. मूळचे कृदंत सर्व विभक्तींत चालत असे; पण मराठीत त्याच्या द्वि. एकवचनाचा (मू–चा)

अवशेष तेवढा राहिलेला दिसतो. हे ऊ-कृदंत नामाप्रमाणे चालते. उदा.—तो लिहू इच्छितो (कर्म). तो लिहावयास बसतो (लिहू याचे सविभक्तिक रूप). मला जावयाचे आहे.

टीपः—कोकणी भाषेत या कृदंताच्या मूळरूपाला विकार न होताच विभक्तिप्रत्यय लागतात.

उदा.—तुझा **नेसूचा** पंचा कोठे आहे ? तुला **जाऊचे** आहे काय ?

टीपः— (१) लिहावयाचे, जावयास, यासारखी रूपे लिहावे-याचे, जावे-यास, यांपासून संक्षेपाने झाली आहेत. तेव्हा अशा वाक्यांत दोन वाक्ये करावी. (उदा.–मी जावयास इच्छितो=मी जावे यास इच्छितो); किंवा, (२) वा–कृदंताची ही रूपे मानावी; असे या संबंधात दोन पक्ष आहेत. ते दोन्ही मला बरोबर वाटत नाहीत. माझे म्हणणे मी वर स्पष्टपणे दिलेच आहे.

त–ता–तां–ताना कृदंते

मूळचे **त कृदंत** हे संस्कृत विशेषणात्मक धातुसाधित आहे व ते क्रियेची अपूर्ण स्थिती दाखविते. ता, तां, ताना–प्रत्ययान्त कृदंते ही त्याचीच सविभक्तिक रूपे आहेत. त्यांचे उपयोग सांगतो.

–त कृदंत

(१) याने सर्वकाळी अपूर्णार्थक रूपे होतात. जसे :—मी लिहीत आहे, होतो, असेन.

(२) अस धातूच्या विध्यर्थी रूपाशी याचे कर्तरी व भावे प्रयोग होतात. जसे :—

तो पोथी वाचीत असतो (अपूर्ण क्रियेचा संभव).

त्याने पोथी वाचीत असावे (संभव किंवा रीती याचे दर्शक).

(३) याचा रीतिदर्शक क्रियाविशेषणाप्रमाणे उपयोग होतो. जसेः—तो धावत चालतो, त्याने वाचीत असावे... "हासत कर्म करावे भोगावे रडत तेचि परिणामीं ।। ती रडत रडत आली (द्विरुक्तीने)."

(iv) इच्छा, खुषी, हे अर्थ व्यक्त करण्याकरिता निषेधार्थी—तू ही आंगठी घेत नाहीस ?

–ता कृदंत

मूळ क्रियेचा अर्थ विशेष जोराने सांगण्याकरिता याचा उपयोग सर्वकाळी होतो :—सूत शौनकास सांगते झाले. मूल चालते बोलते झाले. तू करिता होशील (करशील).

या **ता**-प्रत्ययान्त धातुसाधिताचा उपयोग दोन अर्थांनीं होतो. जसे :—

(१) रांगते मूल, धावता घोटा, कर्ता पुरुष, —यांत मूल, घोटा, पुरुष, हे त्या त्या क्रिया करितात असा अर्थ आहे.

(२) निघती वेळ, जाती वेळ,...........मी जाते वेळी, मी निघते वेळी; अशा प्रयोगांत त्या वेळेस त्या क्रिया घडतात असा अर्थ आहे.

ता–कृदंत

(१) रीतिवाचक– उदा०– त्याला न कळता मी त्याच्याजवळ जाऊन उभा राहिलो.

(२) एक क्रिया अपूर्ण असताच दुसरी घडते अशा अर्थी द्विरुक्तीने प्रयोग होतो. जसे :—तो धावता धावता पडला. तो मला जाता जाता म्हणाला.

–ताना कृदंत

(३) अपूर्णक्रियावाचक :—मी त्याला खेळताना पाहिले. या अर्थी 'अस' धातूच्या कृदंताशीही प्रयोग होतो. जसे :—मी त्याला खेळत असता पाहिले.

–ला कृदंत

हे मूळचे संस्कृत धातुसाधित विशेषण आहे. पण, मराठीत मात्र त्यास धातुसाधितनामाप्रमाणे सर्व विकार होतात. उदा०—

गेल्याचा शोक वृथा न करावा......
मी **गेल्यावर** तो येईल.
तो **जेवल्यास** त्याला दही वाढ.
त्याने घर **बांधल्यास** त्याची बिऱ्हाडाची अडचण दूर होईल.

टीप :—शेवटची दोन उदाहरणे रा० दामले यांच्या शास्त्रीय मराठी व्याकरणातून घेतली आहेत. अशा प्रकारच्या वाक्यात–मी गेलो यावर, तो जेवला यास, त्याने घर बांधिले यास–अशा रीतींने विग्रह करून **गेलो, जेवलो, बांधिले** ही क्रियापदे आहेत असे म्हणता येत नाही. त्याचप्रमाणे हे 'ला'–कृदंत आकारान्त विशेषणासारखे विशेष्याप्रमाणे बदलत नाही. 'तो आल्याने, ती बोलल्याने' असे सर्व प्रयोग सारखेच होतात. यावरून या कृदंताला नाम म्हणावे असे रा० दामले यांचे म्हणणेच ग्राह्य वाटते.

–ऊन कृदंत

सर्वकाळी क्रियापदांच्या साधारण रूपांच्या जागी संक्षेपाकरिता ऊन–कृदंताचा उपयोग होतो. जसे :–

(१) माकड झाडावर चढून बसले (चढले व बसले); मी जाऊन येतो (जातो व येतो); तो गाडीत बसून जाईल (बसेल व जाईल); अशा वेळी ऊन–कृदंताचा कर्ता व पुढील क्रियापदाचा कर्ता एकच असतो.

(२) मुख्य क्रियापदाचा कर्ता व ऊन–कृदंताचा कर्ता हे निराळे असतील तर ऊन–कृदंताने कारण व दुसऱ्या क्रियापदाच्या वाक्याने कार्य ही दाखविली जातात. जसे:—ताप येऊन तो मेला. नदीस पूर येऊन उतार नाहीसा झाला. नदीस पूर येऊन पिकाचे नुकसान झाले.

(३) ऊन–कृदंताने 'जरी तरी' यांचा अर्थ व्यक्त होतो. जसे :— तो शहाणा असून फसला.

(४) क्रियेचे पूर्णत्व दाखविण्याकरिता ऊन-कृदंताचा सहाय्यक क्रियापदाशी प्रयोग होतो. जसे :—ही जुनी वस्त्रे फेकून दे. मी सर्व खाऊन टाकितो.

(५) दोन क्रियांमधील कालावधी दर्शविण्याकरिता पहिलीच्या अर्थी ऊन कृदंत येते. जसे :—मला येऊन आठ दिवस झाले.

(६) या ऊन–कृदंताचा ऊ–कृदंताच्या जागी चुकीने प्रयोग करितात. जसे :–त्याचे लिहून झाले; यासारख्या वाक्यात 'लिहू' असे धातुसाधित नाम

(‘ लिहिणे ’ या अर्थाने) मूळात असले पाहिजे. पण ते समजावयाला कठिण म्हणून त्याच्या जागी त्या मानाने सोपे ऊन–कृदंताचे रूप येऊन बसले आहे, व त्यामुळे ‘त्याचे लिहून झाले’ या वाक्यात ‘लिहून’ हे ऊन–कृदंत की नाम, ‘झाले’ याचा कर्ता कोणता, ‘त्याचे’ याचे विशेष्य कोणते वगैरे प्रश्न उपस्थित होतात. यासारखे प्रयोग इतके रूढ झाले आहेत की ते भाषेतून घालवून देणे शक्यच नाही. तेव्हा ‘ लिहून ’ हे ‘ लिहू ’ याचे लौकिकी रूप असून नाम आहे असे व्याकरण करावे हाच मार्ग योग्य दिसतो.

प्रकरण दहावे

अव्ययविचार

§१०६ क्रियाविशेषण

क्रियाविशेषण म्हणजे क्रियेचे विशेषण. नामाच्या विशेषणाने ज्याप्रमाणे नामाचे गुणधर्म दाखविले जातात त्याचप्रमाणे क्रियेच्या विशेषणाने क्रियेचे गुणधर्म सांगितले जातात. क्रिया घडण्याची रीत असे क्रियेच्या गुणधर्मांचे सामान्य वर्णन केले तर या रीतीचे वेगवेगळे अनेक प्रकार करिता येतील. उदा०—क्रिया ज्या ठिकाणी, ज्या वेळी घडते, ते स्थळ किंवा ती वेळ, त्याचप्रमाणे क्रिया घडण्याचा हेतू, उद्देश किंवा रोख, क्रियेची साधने यांचे वर्णन करणे म्हणजे क्रियेचे प्रकार सांगण्यासारखेच आहे. म्हणून अशा रीतीने क्रियेचे प्रकार दाखविणारे जे शब्द त्यांना क्रियाविशेषणे असे म्हणतात.

ज्याप्रमाणे क्रियेचे गुणधर्म दाखविणारे शब्द आहेत त्याचप्रमाणे गुण· धर्मांच्याही वेगवेगळ्या छटा दाखविणारे शब्द असलेच पाहिजेत. उदा०-तो जलद चालतो, व तो **फार** जलद चालतो, यांपैकी पहिल्या वाक्यात चालण्याचा धर्म किंवा प्रकार सांगितला व **फार** याने ‘जलद’ याचा प्रकार सांगितला. या दुसऱ्या प्रकारच्या शब्दांनाही क्रियाविशेषणेच म्हणतात. म्हणजे,

क्रियाविशेषण ही संज्ञा केवळ खुणेकरिता दिलेली आहे असे समजून त्यात विशेषणांखेरीज निरनिराळ्या प्रकारच्या गुणधर्मवाचक इतर शब्दांचा समावेश होतो असे म्हटले पाहिजे.

§१०७ क्रियाविशेषणाचे प्रकार

क्रियेच्या प्रकारांची काही उदाहरणे वर दिलीच आहेत. तशाच तऱ्हेने सर्व निरनिराळ्या प्रकारांची यादी केली, व त्याचप्रमाणे गुणधर्मवाचक शब्दांच्या निरनिराळ्या छटा दाखविणाऱ्या शब्दांचीही त्यांचे प्रकार करून यादी केली तर एकंदर प्रकार इतके होतील की त्यांचे एक प्रस्थच होईल. उलटपक्षी, क्रियेच्या प्रकारांत आणखी उपप्रकार ते कसले करावयाचे, ते करण्याची काही जरूर दिसत नाही, असेही म्हणून चालणार नाही. केवळ तात्त्विक दृष्टीनेच पहावयाचे झाले तर एक, सर्व प्रकार करावे, किंवा दुसरे, मुळीच करू नयेत— यांपैकी एकच मार्ग पत्करणे श्रेयस्कर दिसते. पण दोन्ही मार्ग गैरसोईचे आहेत हे वर दर्शविलेच आहे. तेव्हा तात्त्विक किंवा शास्त्रीय दृष्टी जराशी बाजूला ठेवून काही ठळक ठळक प्रकार करावे; व शेवटी किरकोळ प्रकारांचा एक गट करावा व त्याला एखादे सामान्य नाव द्यावे हेच एकंदरीत सोईचे होईल. या दृष्टीने पाहता क्रियाविशेषणांचे खालील प्रकार करिता येतील.

स्थलवाचक, कालवाचक, संख्यावाचक, परिणामवाचक व **रीतिवाचक**. यांपैकी पहिली चार स्पष्टच आहेत. त्यांत ज्यांचा समावेश होत नाही असे क्रियेचे प्रकार पाहिले तरी ते पुष्कळच आहेत. पण, त्या सर्वांचे बारीकसारीक भेद न करिता, त्यांचा समावेश **रीतिवाचक** या प्रकारात केला आहे. अर्थात्, "ज्या ज्या क्रियाविशेषणांचा पहिल्या चार वर्गांत अंतर्भाव करिता येत नसेल त्या सर्वांचा या वर्गात समावेश होतो. म्हणून रीतिवाचक क्रियाविशेषणे म्हणजे क्रियाविशेषणांचे मायपोटच होय." दामले—शास्त्रीय मराठी व्याकरण.

क्रियाविशेषणांचे दुसऱ्याही एका दृष्टीने प्रकार करिता येतील. ते असे— काही क्रियाविशेषणे **सिद्ध** असतात; काही **साधित** असतात. यांपैकी साधितांचेही **नामसाधित, धातुसाधित** वगैरे उपप्रकार करिता येतील.

पुष्कळशी क्रियाविशेषणे मूळच्या नामांना किंवा धातूंना प्रत्यय लागून झालेली **विभक्तीची** किंवा **कृदंत** रूपे आहेत, हे या प्रकारची क्रियाविशेषणे पाहिली असता कळून येईलच. त्याचप्रमाणे काही क्रियाविशेषणांचा उपयोग क्रियाविशेषणे व शब्दयोगी अव्यये अशा दोन्ही रीतींनी होतो. त्याचप्रमाणे **प्रत्ययघटित** व **उपसर्गघटित, सामासिक** असेही प्रकार करिता येतील.

§१०८ **क्रियाविशेषण-साधन.**

उपसर्ग किंवा प्रत्यय लागून, समासांनी, व नामे आणि धातू यांना विकार होऊन, क्रियाविशेषणे होतात असे वर सांगितलेच आहे. त्याच क्रमाने क्रियाविशेषणे कशी साधतात हे येथे तपशीलवार सांगतो.

(१) **उपसर्गसाधित :संस्कृत** उपसर्ग :—**आ**—आमरण, आजन्म, आमरणान्त; **निः**—निःसंशय; **पर**—परोक्ष; अपरोक्ष; **प्रति**—प्रतिक्षण, प्रतिवर्ष, प्रतिदिन; **यथा**—यथापूर्वम्, यथाक्रम, यथाशक्ति; **यावत्**—यावज्जीव, यावच्चंद्र-दिवाकरौ; **वि**—व्यर्थ; **सम्**—समक्ष.

मराठी उपसर्ग दर—दररोज, दरमजल, दरसाल; **नि**—निखालस; **बर**—बरहुकूम; **बिन**—बिनहरकत, बिनचूक, बिनतोड; **बे**—बेमालूम, बेशक; **हर**—हररोज, हरघडी, हरवेळी.

प्रत्यय-घटित—संस्कृत (१) **चित्**=किंचित्, क्वचित्, कदाचित्; **तः**—स्वतः, यत्नतः, स्वरूपतः, अंशतः; **दा-धा**—एकदा, सर्वदा, द्विधा, त्रेधा; **त्र**—एकत्र, सर्वत्र, अन्यत्र; **था**—अन्यथा, सर्वथा, वृथा; **मात्र**—लवमात्र, लेशमात्र, बिंदुमात्र; **वत्**—पूर्ववत्, तृणवत्, तद्वत्; **शः**-क्रमशः, व्यक्तिशः; बहुशः.

मराठी—आ—कडकडा, भडभडा, दडदडा; **ऊ**—दुडुदुडु; **कन-कर**—झटकर, पटकन, ताडकन; **ती**—मागती, पुढती, वरती, खालती; **दा**—एकदा, दहादा, अनेकदा; **दिनी-शी**—चटादिशी, खाडदिशी, पटदिशी; **ना**—एव्हाना, उद्याना, परवाना; **भर**—क्षणभर, वर्षभर; **ला**—आजला, भोवताला; **वार**—एकवार, दोनवार, गांववार; **सा-शी से**—थोडासा, जराशी, पुष्कळसे; **शी**—मधाशी.

टीप:—नामापासून विभक्तीचे प्रत्यय लागून होणारी, व धातूपासून आख्यातप्रत्यय लागून होणारी क्रियाविशेषणे पुढे वेगळी दिली आहेत.

२. **सामासिक**—संस्कृत शब्दांच्या रूपांपासून समासाने क्रियाविशेषणे होतात. अशा शब्दांची यादी करू लागले तर ती फारच मोठी होईल. परंतु त्यांतील जी वारंवार येणारी आहेत त्यांची यादी येथे देतो.

संस्कृत–दृष्ट्या, रीत्या, पूर्वक, पुरःसर, वशात्, अनुसार, अनुरूप,...

मराठी–पेक्षा, पर्यंत, पावेतो, कडे, कडेस, कडून, कडने....

अभ्यस्त शब्द (द्विरुक्तीने)—**टीप**:–चमचम, मटमट, पटापट, लगबग, गपागप, फटाफटा, बदाबदा, (गटगट, गटागट, गटाटा, गटमटा, गटकन्, गटकर, गटदिनी, गटदिशी) अशी अनेक रूपे अभ्यस्त व प्रत्ययान्त मिळून होतात. यांत द्विरुक्तीने झालेल्या रूपांनी क्रियेचे पौनःपुन्य दाखविले जाते, व प्रत्ययान्त रूपांनी क्रियेची रीत दाखविली जाते.

(३) **विभक्तीचे प्रत्यय लागून होणारी**—मराठी–संस्कृत नामांची समासात येणारी रूपे–दृष्ट्या, रीत्या, वगैरे–यांची यादी वर दिलीच आहे. त्याशिवाय काही विभक्तिप्रत्ययान्त शब्द आता मूळच्या अर्थाने लुप्त होऊन निव्वळ क्रियाविशेषणेच बनले आहेत. उदा०–मुळे, साठी, पाशी.......वगैरे. यांची उदाहरणे :—

(तृ.) **ए–ने–ई–शी** या प्रत्ययांनी होणारी :—मुळे, इकडने, तिकडने, नेहमी (नेमी=नियमाने), दिवशी, प्रतिदिवशी...अगदी, प्रमाणे, पटदिनी, गटदिशी...मागे, पुढे, बुद्ध्या.

(च.) **स, ला, ते–कडे, कडेस**–आजला, अखेरीस, अलीकडे, पलीकडे, भोवताला.

(पंच.) **ऊन, हून** (**तः**)–पासून, खालून, वरून, मागून, पुढून, आतून, बाहेरून, दुरून, लांबून, इकडून, तिकडून, जिकडून, कोणीकडून, इतस्ततः, यत्नतः, अंशतः.

(ष.) **चा**–केव्हाचा, आजचा, कालचा, तेथचा, येथचा...

(स.) साठी, पाशी, तडकाफडकी, एकाएकी, इतक्यात, तितक्यात, अशात, तशात, यंदा, गुदस्ता, परवा, तेरवा, तेव्हा, एव्हा, सकाळी, मुदली, मुळी........

कृदंते—हसत, खेळत, करून, म्हणून, समजून, होऊन, हून, रगडून, खर्चून, हसता हसता... ...खेळताना, बसताना.

§ १०९ क्रियाविशेषणांची वर्गवारीप्रमाणे व्यवस्था

१ स्थलवाचक क्रियाविशेषणे

(१) अत्र, इकडे, इथे, येथे; तत्र, तिकडे, तेथे, तिथे; यत्र, जिकडे, जेथे, जिथे; कोठे, कुठे, कोणीकडे.

(२) जवळ, नजीक, समीप, संनिध, दूर, लांब, मागे, पुढे, समोर.

(३) वर, वरती, खाली, खालती, मध्ये, मधी, मधे, अलीकडे, पलीकडे, सगळीकडे, सर्वत्र, अन्यत्र, भलतीकडे.

(४) भोवता, भोवती, भोवताला, सभोवता, सभोवार, आसपास.

(५) इकडून, इकडने, येथून, येथपासून; तिकडून, तिकडने, तेथून, तेथपासून; जिकडून, जिकडने, जेथून, जेथपासून.

(६) वरून, खालून; मागून, पुढून; जवळून, लांबून; चोहीकडून, भोवतून; आतून, बाहेरून....ही ज्या ठिकाणापासून क्रियेला आरंभ झाला असेल ते दाखवितात.

(७) इकडे, तिकडे, जिकडे; दूर, लांब, जवळ, समीप; वर, खाली; मागे, पुढे; आत, बाहेर....गत्यंतदर्शक.

२ कालवाचक

(१) क्षणवाचक :—आज, अद्य, इतक्यात, तितक्यात, आधी, प्रथम, पहिल्याने, अशात, तशात, आता, सध्या, हल्ली, अमळशाने, जराशाने, साम्प्रत, सम्प्रति, अलीकडे, तूर्त, त्वरित, सत्वर, लवकर, लौकर, झटकन्, जलद, काल, उद्या, लागलीच, लगेच, तडक, यंदा, गुदस्ता, लगेहात, हातोहात, गतसाल, गतसाली, तडकाफडक–की, परवा, तेरवा, लागोपाठ, पाठोपाठ,

एरवा, तात्काळ, तत्क्षणी, अकस्मात्, एकाएकी, एकदम, अवचित, अखेर, अखेरीस, अंती, शेवटी, नुकता–ती–ते, एव्हा, तेव्हा, जेव्हा, केंव्हा, सकाळी, प्रातःकाळी, यदा, तदा, कदा, कधी, जों–तों, जेधवा–तेधवा (कवितेत), केव्हाशी, दिवसाउजेडी, दिवसाढवळ्या, पूर्वी, अगोदर, मागे, नंतर, पुढे, पश्चात्, मग, इ०.

(२) अवधिवाचक :—नित्य, सदा, सर्वदा, सर्वत्र, क्षणभर, दिवसभर, सदोदित, सर्वकाळ, सतत, नेहमी, हमेश–शा, इतका वेळ, येवढा वेळ, कधी कधी, अजून, अद्यापि, अद्याप, केव्हाचा, फार वेळ, अजून, तरी, रातोरात, आजकाल, इ०.

(३) पौनःपुन्यवाचक :—वारंवार, पुनः पुनः, पुनः, पुन्हा, फिरून, दररोज, हररोज, दरदिवस, प्रतिदिवशी, कधी कधी, मधून मधून, दरसाल, दरवर्ष, सालोसाल, पहिल्याने, दुसऱ्याने, एकवार, दोनवार, तीनवार, पहिल्यानदा, दुसऱ्यानदा, द्विवार, त्रिवार, दुबार, एकदा, दोनदा, तीनदा, एक डाव, दोन डाव, अनेकदा, पुष्कळदा, कितीदा, तीन वेळा, चार वेळा प्रतिक्षणी, क्षणोक्षणी, कैक वेळा, किती वेळा इ०.

३ **संख्यावाचक** किंवा **परिमाणवाचक**

(१) प्रकर्षवाचक :—अत्यंत, अगदी, बिलकूल, मुदलीच, किमपि, कधीही, उत्तम, उत्कृष्ट, सर्वथा, साफ, अलबत, खास, सर्वांशी, अवश्य, खचित, निःसंशय, निखालस, निभ्रान्त, बेशक, बेलाशक, खरोखर, अगत्य, हटकून, जरूर, थेट, निवळ, अवश्यमेव, निःसंदेह, निःशंक, निक्षून, इत्यादि.

(२) अपकर्षवाचक :— किंचित्, जरा, काही, काहीसा, थोडा, कदाचित्, काही अंशी, क्वचित्, यदाकदाचित्, दैववशात्, अल्पशः, इ०.

(३) आधिक्यवाचक :—अधिक, फार, अति, आतिशय, बहुत, बहुधा, बहुतकरून, बहुशः, प्रायः, पुष्कळ, रगडून, खच्चून, रगड, खूप, इ०.

(४) पर्याप्तिवाचक :—पुरे, पुरेसे, बस, बरोबर, पूर्णपणे, यथास्थित, बेताचा, बेतवार, इ०.

(५) श्रेणीवाचक :—हळुहळू, थोडथोडे, क्रमाने, क्रमाक्रमाने, पायरी-पायरीने, थेंबथेंबे, घासघास, अंशतः, उत्तरोत्तर, दिवसेदिवस, क्रमशः, क्रमवार यथाक्रम, इ०.

४ रीतिवाचक :—

असे, इतपत, तसे, तितपत, जसे, जितपत, कसे, कितपत, एरव्ही—वी, उगाच, उगीच, निरर्थक, निष्कारण, व्यर्थ, हटकून, सडकून, एतावता, उगेच, सहज, येणेप्रमाणे, सार्थ, फुकट, मोफत, जाणून, जाणूनबुजून, समजून, समजूनउमजून, काहीकेल्या, बरे, एकत्र, निदान, किमानपक्ष, यथार्थ, निमूट, आपाप, आपोआप, आपल्याआपण, मुद्दाम, जेवी, तेवी, दाटून, बुद्ध्या, केवी, बुद्धिपुरःसर, आपण होऊन, मी होऊन, तो होऊन, केवळ.

§ ११० क्रियाविशेषणांचा उपयोग

सामान्य नियम :—

१ आकारान्त विशेषणे ही विशेष्यनिघ्न आहेत, म्हणजे त्यांचे लिंग व वचन ही कर्त्यांच्या लिंगवचनांप्रमाणें बदलतात असे पूर्वी सांगितलेच आहे. या आकारान्त विशेषणांचा क्रियाविशेषणांप्रमाणे उपयोग झाला असताही ती कर्त्यांप्रमाणे चालतात. जसे :—रामा उभा राहिला. मूल उभे राहिले. बाहुली उपडी पडली आहे.

२ सकर्मककर्तरी व कर्मणी या प्रयोगांत येणारी आकारान्त विशेषणे कर्मांच्या लिंगवचनांप्रमाणे बदलतात. जसे :— मुलाने आपली बोटे शाईने काळी केली आहेत; कपाटात पुस्तक उभे ठेव; वैद्याने रोगी बरा केला.

३ पण भावेप्रयोगात प्रकृत क्रियाविशेषणे नपुसकलिंगी येतात. जसे :— शिपायाने कैद्याला मोकळे सोडले.

४ त्याचप्रमाणे, सकर्मक धातूंचा सामान्य अर्थाने अकर्मक प्रयोग होतो त्या ठिकाणीही आकारान्त क्रियाविशेषणे नपुसकलिंगीच येतात. जसे :—तो वाकडे लिहितो; यमुना बरे गाते.

§ १११ शब्दयोगी अव्यये

नामे व त्यांसारखे इतर शब्द यांच्याशीं विभक्तिप्रत्ययांप्रमाणे

संयोग पावून त्या शब्दांचा वाक्यांतील इतर शब्दांशी संबंध जोडण्याचे काम करणारे जे स्वतंत्र शब्द त्यांना शब्दयोगी अव्यये असे म्हणतात.

टीपः—काही शब्दयोगी अव्यये क्रियाविशेषणेही असतात. ज्यावेळी त्यांचा क्रियापदाशीच स्वतंत्र रीतीने संबंध येईल त्यावेळी त्यांना क्रियाविशेषणे म्हणावे, व ज्यावेळी त्यांचा नामांशीं वगैरे प्रत्यक्ष संबंध येईल, त्यावेळी त्यांना शब्दयोगी अव्यये म्हणावे हे स्पष्टच आहे. उदा०—मांजर झाडा**वर** चढते (शब्द०), **वर** काय पाहतोस ? (क्रियावि०), **पुढे** पाहून पाऊल टाकावे (क्रियावि०), उंदीर मांजरापुढे धावतो (शब्दयोगी.)

§११२ शब्दयोगी अव्ययांची अर्थानुसार यादी

कालवाचक :—आत, पर्यंत, पुढे, नंतर, अगोदर, पूर्वी, आधी, अलीकडे, वर, उपर, आड, अंती.

स्थलवाचक :—आत, ठायी, बाहेर, मध्ये (मधी, माझारी), जवळ, पाशी, नजीक, संनिध, शेजारी, निकट, समीप, समक्ष, अपरोक्ष, देखत, पुढे, समोर, खाली, वर, मागे, पिछाडीस, कडे, अलीकडे, पलीकडे, भोवता, सभोवता, आसपास.

गतिदर्शक:—आतून, वाटे, मधून, कडे, कडेस, कडून, पासून, पर्यंत, पावेतो, तागाईत, वरून, खालून, मधून.

करणवाचक :—करून, करवी, द्वारा, द्वारे, हाती, हातून, मुळे, योगे, कडून.

हेतुवाचक :—कारणे, करिता, अर्थी, निमित्त, साठी, खातर, प्रीत्यर्थ.

विषयवाचक :—विषयी, संबंधी.

व्यतिरेकवाचक :—खेरीज, शिवाय, वाचून, विना, विणे, वीण, व्यतिरिक्त, विरहित, परता, वेगळा, निराळा.

भाववाचक :—पैकी, आतून, पोटी.

विनिमयवाचक :—बद्दल, बदला, ऐवजी, जागी, मोबदला.

योग्यता, अनुरोध ... साम्यवाचक :— सम, योग्य, समान, सरसा, सारखा, बरहुकूम, अनुसार.

विरोधवाचकः—उलट, उलटे, विरुद्ध.

साहचर्यवाचकः—बरोबर, संगती, सह, सवे, सकट, सहित, सहवर्तमान, समवेत, निशी.

संग्रहवाचकः—देखील, ही, सुद्धा, पण.

कैवल्यवाचकः—च, मात्र, ना, पण, बरीक, केवळ, फक्त.

परिणामवाचकः—प्रत, प्रति, लागी, कडे.

पूर्णतावाचकः—पुरता, पुरेसा.

तुलनात्मकः—पेक्षा, परीस.

काही आकारान्त शब्दयोगी अव्यये मूळची विशेषणे असून विशेषणाप्रमाणेच चालतात. म्हणजे विशेष्याच्या लिंगवचनाप्रमाणे त्यांची रूपे बदलतात. जसेः—"पोटा**पुरते** देई। मागणे लइ नाही लइ नाही.॥" त्याच्याजवळ स्वतः**पुरता** पैसा आहे. ज्याला त्याला आपल्या**सारखीच** संगत मिळते.

§११३ काही शब्दयोगी अव्यये नामांच्या निरनिराळ्या विभक्तिरूपांपासून झालेली आहेत असे दिसते; उदा०—ठायी < ठाय=जागा; मध्ये < मध्य; विषयी, संबंधी, पायी, योगे, कारणे, शेजारी, कडेस, कडून, प्रमाणे, अर्थी, मुळे, द्वारे, द्वारा, पाशी < पास=पार्श्व=बाजू, मागे < माग.

काही धातूंपासून झालेली आहेत; जसेः—पावेतो, देखत, देखता, करिता, करून, लागी, लागून.

काही शब्दयोगी अव्ययांपासूनच झालेली आहेत; जसेः—वरून, आतून, खालून, जवळून, समोरून, बाहेरून......

§११४ शब्दयोगी अव्ययांचा उपयोग

शब्दयोगी अव्ययांपूर्वी शब्दांचे बहुधा सामान्यरूप होते. याला काही अपवाद आहेत ते येथे थोडक्यात सांगतो.

(१) 'भर' या शब्दयोगी अव्ययापूर्वी सामान्यरूप होत नाहीं. जसेः—कोसभर, दिवसभर, हातभर, पायलीभर, घरभर.

(२) संग्रहवाचक व कैवल्यवाचक अव्यये-ज्यांना शुद्ध शब्दयोगी अव्यये असे म्हणतात-यांचेपूर्वी सामान्यरूप होत नाही.

(३) पासून, पर्यंत, पावेतो या शब्दयोगी अव्ययांपूर्वी स्थलवाचक किंवा कालवाचक विशेषनामांपैकी अकारान्त नामाचे विकल्पेकरून सामान्यरूप होते; आकारान्त व एकारान्त विशेषनामाचे अवश्य होते.

(४) कालवाचक सामान्यनामांपैकी क्षणवाचक नामाचे सामान्यरूप बहुधा होत नाही. इतरांचे विकल्पेकरून होते.

(५) परकी भाषेतून नवीन येत असलेल्या शब्दांचे सामान्यरूप बहुधा होत नाही. याचे कारण, हे परकी शब्द, तेव्हा त्यांचे रूप कोणत्या नियमाप्रमाणे करावे याविषयी संदिग्धता असते हे असावे. पण शब्द एकदा भाषेत चांगल्या प्रकाराने रूढ झाला, त्याचे लिंग व वचन ही ठरली म्हणजे त्याचे इतर मराठी शब्दांप्रमाणेच सामान्यरूप होऊ लागते. उदा०—बुकास, बुकापासून, बुकावर, असे प्रयोग होतात; पण स्टेशनावर किंवा स्टेशनवर, इंग्लंडला किंवा इंग्लंडाला, असे प्रयोग विकल्पाने होतात.

टीपः—मात्र 'स' या चतुर्थीच्या प्रत्ययापूर्वी सामान्यरूप नेहमीच होते हे सांगितले आहे.

(६) अवधिदर्शक नामांचा प्रयोग कित्येक वेळा विभक्तिप्रत्यय व शब्दयोगी अव्यये यांच्या शिवायच होतो. जसेः—दोन दिवस (पर्यंत) वाट पहा. तो दहा कोस गेला.

शब्दयोगी अव्ययांपूर्वी होणारे सविकरणी सामान्यरूप

शब्दयोगी अव्ययापूर्वी नामाच्या षष्ठीच्या रूपाचे सामान्यरूप होऊन मग त्यास शब्दयोगी अव्यय लागते. जसेः—तो एका वस्त्रानिशी घराच्याबाहेर (घराबाहेर) पडला.

दोन घरांमधील अंतर, दोन घरांच्यामधील अंतर; शहरा (च्या) पलीकडील टेकडी.

हा प्रकार रूढ होण्याचे मुख्य कारण असे दिसते की संस्कृतात शब्दयोगी अव्यये विभक्तिप्रत्यय लागून झालेल्या रूपांपुढेच येत. अजूनही मराठीत **करून** (तेणेकरून) वगैरे अव्ययांचा उपयोग असाच होतो हे पुढे सांगितलेच आहे. या सर्व विभक्तींच्या जागी षष्ठीचा साधारणपणे उपयोग होऊ लागला त्याचा हा मराठीत अवशेष दिसतो.

करून या शब्दयोगी अव्ययापूर्वी नामसर्वनामांचे तृतीयेचे रूप येते. जसे :-जेणेकरून, तेणेकरून.

प्रमाणे, विना, विणे, वाचून, पाडे, यांचे पूर्वी विकल्पाने तृतीया येते. जसे :—येणेप्रमाणे.

३ उभयान्वयी अव्यये.

§११५ दोन शब्द, किंवा दोन वाक्ये, यांना केवळ जोडणारी जी अव्यये त्यांना उभयान्वयी अव्यये म्हणतात. म्हणजे या अव्ययांनी शब्द किंवा वाक्ये जोडण्याचे कार्य तेवढेच व्हावे, व त्यांनी इतर कोणतेही कार्य--उदा०--क्रियेचे प्रकार दाखविण्याचे--होऊ नये.

वरीलप्रमाणे व्याख्या केली म्हणजे संबंधी सर्वनामे किंवा विशेषणे वगळली जातात. उदा०--"**जेथे** जातो तेथे तूं माझा सांगाती," **जो** येतो तो घोड्यावर, या व अशा प्रकारच्या इतर वाक्यांत गौण व मुख्य वाक्यांचा परस्परांशी संबंध या इतर शब्दांनी घडवून आणिलेला आहे. पण हे शब्द उभयान्वयी अव्यये मात्र नव्हेत. कारण, त्यांचे मुख्य कार्य संबंध जोडणे हे नाही; तर, क्रियेचे किंवा वस्तूचे गुणधर्म दाखविणे हे त्यांचे खरे कार्य आहे. त्यांच्यामुळे वाक्यांचे परस्परसंबंध जोडण्याचे जे कार्य होते ते गौण असे समजले पाहिजे. पण उभयान्वयी अव्ययांची गोष्ट मात्र तशी नाही. शब्द व वाक्ये जोडावयाची हेच त्यांचे काम आहे.

§ ११६ उभयान्वयी अव्ययांचे प्रकार

प्रधान वाक्ये एकमेकांशी जोडणारी व प्रधान वाक्ये गौणवाक्यांशी जोडणारी असे उभयान्वयी अव्ययांचे मुख्य दोन प्रकार करता येतात. यांनाच अनुक्रमे, **समानाधिकरणी** व **व्यधिकरणी उभयान्वयी अव्यये** असे

म्हणतात. अर्थभेदाप्रमाणे यांचे आणखीही उपप्रकार होतात ते व त्यांत येणारी अव्यये खाली दिली आहेत.

(१) समुच्चयबोधक :—आणि, आणखी, व, आणिक.

(२) विकल्पबोधक :—वा, किंवा, की, अथवा, अगर.

(३) न्यूनत्वबोधक:—पण, परंतु, किंतु, बाकी, परी.

(४) परिणामबोधक :—म्हणून, अतएव, यास्तव, तेव्हा, याकरिता, सबब, त्यास, तस्मात् .

(५) कारणदर्शक :—कारण, की, का की, कारण की.

(६) उद्देशदर्शक :—सबब, म्हणून, यास्तव, याकरिता, कारण, की, का की.

(७) संकेतदर्शक :—जर--तर, जरी—तरी, यद्यपि--तथापि, म्हणजे, की.

§ ११७ **व्याख्या व उपयोग.**

(१) **समुच्चयबोधक**—या प्रकारच्या उभयान्वयी अव्ययांनी दोन किंवा अधिक शब्द, अथवा प्रधान वाक्ये, यांचा संग्रह होतो. एकावर एक वस्तू रचून त्यांची रास करण्यासारखे होते, समुच्चय होतो. जसे :—राम **आणि** सीता वनवासास गेली. राम फळ खातो **व** पाणी पितो.

(२) **विकल्पबोधक**—दोन किंवा अधिक विवक्षित वाक्यांपैकी (किंवा शब्दांपैकी) कोणते तरी एक ग्राह्य आहे असा अर्थ या प्रकारच्या अव्ययांनी दर्शविला जातो, म्हणून यांना **विकल्पबोधक** असे म्हणतात. तुम्ही या **किंवा** न या, मी जाणारच.

(३) **न्यूनत्वबोधक**—विवक्षित अर्थाचा कमीपणा या अव्ययांनी दर्शविला जातो. उदा०—मी गेलो, **पण** तो मला भेटला नाही.

(४) **परिणामबोधक**—आधीच्या वाक्यात कारण सांगून मागाहून येणाऱ्या वाक्यात त्या कारणाचे कार्य सांगितलेले असेल, तेव्हा त्या दोन वाक्यांचा संबंध परिणामबोधक उभयान्वयी अव्ययांनी दर्शविला जातो. उदा०—मी गेलो **म्हणून** तो मला भेटला.

(५) **कारणदर्शक**—आधीच्या वाक्यात परिणाम व मागाहून येणाऱ्या वाक्यात कारण सांगितलेले असेल, तेव्हा त्या वाक्यांचा संबंध कारणदर्शक उभयान्वयी अव्ययांनी जोडला जातो.

उदा०—काही प्राण्यांस सशृंग प्राणी असे म्हणतात, **कारण** त्यांना शिंगे असतात.

टीपः—यावरून कारणदर्शक व परिणामदर्शक उभयान्वयी अव्यये ही अर्थाला परस्परविरोधी आहेत हे दिसेलच.

(६) **उद्देशदर्शक**—मागाहून येणाऱ्या वाक्यात पूर्वीच्या वाक्यातील कार्याचा हेतु किंवा उद्देश सांगितला असेल तर अशा वाक्यांचा संबंध घडवून आणणाऱ्या उभयान्वयी अव्ययांस उद्देशदर्शक उभयान्वयी अव्यये असे म्हणतात. उदा०—विश्रांती घ्यावी **म्हणून** मला वैद्यांनी सांगितले आहे.

(७) **संकेतदर्शक**—जर तर, जरी तरी, यद्यपि-तथापि ही जोडीने येतात. पहिले गौणवाक्यात, व दुसरे प्रधानवाक्यात येते. कधी कधी गौणवाक्यातील अव्यय लुप्त असते.

४ केवलप्रयोगी अव्यये.

§११८ वाक्यातील अर्थामध्ये गर्भित असलेले बोलणाऱ्याच्या मनातील हर्ष, शोक, समाधान, इत्यादि विकार ज्या शब्दांनी दर्शविले जातात त्यांना उद्गारवाची शब्द असे म्हणता येईल. यांचा वाक्यातील इतर शब्दांशी व्याकरणरीत्या संबंध नसतो; तर, त्यांचा उपयोग वाक्यात स्वतंत्रपणे होतो. म्हणून त्यांना केवलप्रयोगी अव्यये असेही म्हणतात. भाषेतील यांच्या कार्याची रूपरेखा प्रिं. आगरकर यांनी आपल्या 'वाक्यमीमांसा' या पुस्तकात खालील शब्दांनी वर्णन केली आहे. ते म्हणतातः—

" या वर्गात, सुखदुःखादि उद्गार प्रगट करणारे जे शब्द बोलण्यात किंवा लिहिण्यात घालण्याची चाल पडली आहे, त्यांचा समावेश होतो. या शब्दांस व्याकरणात फारसे महत्त्व देण्याचा प्रघात नाही. कारण एक तर ते क्वचित् प्रसंगी येतात; दुसरे, काही तरी विधान करणे हे जे वाक्याचे मुख्य काम, त्यास यांच्यायोगाने म्हणण्यासारखी मदत होत नाही. या उद्गारवाची

अव्ययांत मुळीच अर्थ नसतो असे नाही. त्यांचा बारकाईने विचार केला तर त्यांपैकी प्रत्येकास समग्र वाक्याचा अर्थ असतो असे दिसून येईल. 'अरेरे' हा शब्द उच्चारिला असता 'ही गोष्ट ऐकिल्याने मला दुःख होते' अशा अर्थाचा बोध होतो. वाहावा! शाबास ! खाशी ! इत्यादि शब्दांनी आनंदादि वृत्ती व्यक्त होतात; व याचप्रमाणे इतर अव्ययांचा अर्थ करून दाखविता येईल. तथापि,—ज्याअर्थी त्यांचा उच्चार आकस्मिक होत असतो, म्हणजे हे उच्चारण्यापूर्वी मनाला विचार करावयाला सवड नसते त्याअर्थी,—भय, आश्चर्य किंवा अशाच प्रकारचा एखादा मनोविकार एकाएकी उत्पन्न करणाऱ्या कारणांनी शरीरावर जे परिणाम होतात त्यासारखेच या अव्ययांस गणतात. यांच्या योगाने विशेष प्रसंगी मनाची जी स्थिती झाली असेल तिचा समजण्यासारखा ध्वनी मात्र होतो—कोणत्याही प्रकारचे स्पष्ट विधान होत नाही.''

§ ११९ उद्गारवाचक अव्ययांचे तद्दर्शक विकार—भेदानुसार खालील प्रकार होतात. ते व त्यांत मोडणारी अव्यये सांगतो—

हर्षद्योतक—वा, वाहावा, अहा, अहाहा, ओहो, आहा.

शोकद्योतक—हाय, हायहाय, अयाई, आई ग, हरहर, शिवशिव, रामराम, अरे रे, अगई, देवा रे, अगग.

आश्चर्यदर्शक—अहा, अबब, अलल, .अहाहा, हा, ओहो, अरे बापरे अगबाई.

अनुमतिदर्शक—होय, ठीक, वाहवा, भले, तथास्तु, शाबास, खाशी, यव, मारू, फक्कड, ओहो, हं.

तिरस्कारद्योतक—छे, हत्, छत्, छी छी, छी, भलतेच, उ, अः, फुस्,

धिःकारदर्शक— धिग्, इश्श, थुत्, शुक्, ओ, ओय, हेः.

मौनदर्शक—चुप, चप, चीप, गप, गपचीप.

स्वीकारदर्शक—जी, ठीक, बरे, हं, हा, होय.

विरोधदर्शक—छे, छत्, छी, अंहं, उंहूं

संबोधनद्योतक पुल्लिंगी व नपुसकलिंगी } अरे, रे, अगा, अजि, बा, हो, गा, हे, ए, अरे, ए

स्त्री. एकवचन—अगे, गे, अगो, ग, अग

,, अनेकवचन—अहो, हो

उद्गारवाचकांच्या पुढे ! असे चिन्ह घालितात. विकाराची तीव्रता दर्शविण्याकरिता ! ची पुनरुक्ती करण्यात येते. पण, या प्रकारचा उपयोग बेतानेच केला पाहिजे.

या मराठी अव्ययांशिवाय, विष्णवे नमः, रामाय नमः, का होईना, वगैरे मराठी व संस्कृत वाक्यांचाही उपयोग अव्ययांप्रमाणे होतो.

§ १२० पालुपदे

वरील अव्ययांशिवाय केवळ निरर्थक असे काही शब्द वाक्यात येतात. त्यांचा अंतर्भाव वरील चार प्रकारच्या अव्ययांत करिता येत नाही. यांना पालुपदे किंवा पालवपदे म्हणतात. म्हणजे बोलणारा ती आपल्या पदरची घालतो. यांची यादी :—

आपले, बेटे, परत, बरीक, की, म्हणून, म्हणे, घ्या, मग, हो, अरे, अहो, नी, आता, आणखी.

भाग दुसरा

प्रकरण अकरावे

शब्दघटना

§ १२१ भाषेचा जिवंतपणा

भाषा ही जिवंत आहे; म्हणजे जिवंतपणाची मुख्य लक्षणे शास्त्रज्ञांनी सांगितली आहेत ती सर्व तिच्या ठिकाणी सापडतात. जन्माला येणे, जगणे, वाढणे, वाढ पूर्ण होणे, वार्धक्य येणे व नाश किंवा मरण येणे, ही जिवंतपणाची सहा लक्षणे म्हणून आमच्या प्राचीन वेदान्त्यांनी व युरोपातील अर्वाचीन शास्त्रज्ञांनी ठरविली आहेत. " **जायते, अस्ति, विवर्धते, विपरिणमते, वार्धक्य, संहरण** यासीच असे." या शब्दांनी मनुष्यदेहाचे वर्णन करून त्याच्या जिवंतपणाची लक्षणे मुकुंदराज या मराठी कवींनी सांगितली आहेत.

ही सर्व लक्षणे भाषेला लागू पडतात. गोंड, संताळ, वाघरी, रामोशी, वडार, वगैरे हिंदुस्थानातील, व शिद्दी, मावरी, झुलु, वगैरे बाहेरील रानटी लोकांच्या भाषांकडे पाहिले तर त्यांची शब्दसंपत्ती फार लहान असते; अगदी साध्या सामान्य कल्पना कशाबशा व्यक्त करण्याला ती पुरेशी असते किंवा नसतेही. म्हणजे नवीन जन्माला आलेल्या मुलासारखी त्या भाषांची स्थिती आहे असे दिसते. त्या भाषा **जायते** व **अस्ति** या अवस्थांच्या पलीकडे गेल्याच नाहीत. सर्वच भाषा एका काळी अशा अवस्थेत होत्या; पण त्यांपैकी काही वाढीस लागून पुढील सर्व अवस्थांतून त्यांचे संक्रमण झालेले आहे. उदाहरणार्थ, इजिप्तमधील प्राचीन चित्रभाषा, जुनी ग्रीक, वैदिक संस्कृत,

वगैरे. या भाषा वाढल्या, त्यांमध्ये लेख, ग्रंथ, सारस्वत ही तयार झाली, व हळूहळू त्यांना म्हातारपण येऊन त्यांचा क्षय झाला. आज त्या भाषा कोणी बोलत नाही; त्यांत नवीन लेखन होत नाही. जिज्ञासू विद्वान जुन्या संस्कृतीचे अवशेष किंवा पुरावे म्हणून त्यांचा जेवढा उपयोग करतात त्यापलीकडे त्यांचा फारसा उपयोग कोणी करीत नाही. म्हणजे व्यावहारिक दृष्टीने पहाता त्या मेल्या असेच म्हणावयाचे. काही मूळच्या बाल्यावस्थेतून वाढून आज कमीजास्ती पूर्णत्वाला आलेल्या आहेत, व अद्यापही वाढत आहेत अशा दिसतात. उदा०--इंग्रजी, फ्रेंच, वगैरे अर्वाचीन युरोपियन भाषा; व हिंदुस्थानातील हिंदी, बंगाली, उर्दू, गुजराथी, तामीळ, तेलगू, मराठी या चालू भाषा; कमी जास्ती प्रमाणाने या वाढत्या स्थितीत आहेत. यांच्या आजच्या स्वरूपाचा विचार यांच्या शब्दसंपत्तीच्या दृष्टीने केला तर खालील गोष्टी दिसून येतात. त्यांतील काही शब्दांच्या उत्पत्तीचा मागमूसही लागत नाही. (१) काही त्याच भाषेतील किंवा एखाद्या जुन्या मेलेल्या किंवा मृतप्राय भाषेतील शब्दांवरून झालेले असावेत; तर, (२) काही इतर भाषांतून अलग, जसेच्या तसेच येऊन रूढ झालेले आहेत; (३) काही नुकतेच आलेले, येऊ पहाणारे, डोकावणारे आहेत, काही उपयोगाने जीर्ण झालेले, मरू घातलेले, आहेत; (४) काहींना मूळचे अर्थ एक असून ते वेगवेगळ्या कारणांनी बदलून, वाढून, किंवा नष्ट झाल्यामुळे त्यांची अर्थक्षमता बदललेली आहे. यांपैकी (२) व (४) यांचे महत्त्व या प्रकरणात विशेष आहे. ते कसे होतात किंवा व्हावे हे या ठिकाणी सांगावयाचे आहे, म्हणून या प्रकरणाला शब्दघटना असे म्हटले आहे.

§ १२२ साधित शब्द

शब्दघटनेत अर्थातच साधित, म्हणजे जे दुसऱ्या शब्दांपासून तयार झालेले आहेत अशा शब्दांचा विचार येतो. मराठीत या शब्दांचे चार प्रकार करता येतात. ते असेः--

(१) **कृदंते**--काही शब्द संस्कृत व मराठी धातूंना प्रत्यय लागून त्यांपासून तयार होतात, त्यांना **कृदंते** असे नाव आहे. कृदंत [कृत् + अंत]

म्हणजे ज्याच्या शेवटी क्रियादर्शक प्रत्यय लागलेला आहे ते. उदा०—करून, करिताना, करित...ही कृदंते.

(२) **तद्धित शब्द**—काही शब्द धातूंखेरीज इतर प्रकारच्या शब्दांस मागे किंवा पुढे काही अक्षरे लागून होतात, यांस **तद्धित** शब्द म्हणतात. यांचे **उपसर्गघटित** (मागे अक्षरे लागून झालेले) व **प्रत्ययघटित** (पुढे अक्षरे लागून झालेले) असे दोन भाग करिता येतील.

(३) **सामासिक**--समासाने झालेले, किंवा **सामासिक शब्द** हा साधित शब्दांचा आणखी एक प्रकार आहे.

(४) **अभ्यस्त**--हा चवथा प्रकार म्हणजे मूळ शब्दांच्या द्विरुक्तीने वगैरे झालेले शब्द; यांना **अभ्यस्त** शब्द असे म्हणता येईल.

खाली दिलेल्या उपसर्ग व प्रत्यय यांच्या याद्या अक्षरक्रमाने दिलेल्या आहेत, व प्रत्ययांपुढे त्यांपासून कोणत्या प्रकारचे शब्द तयार होतात व ते कसे होतात हे थोडक्यात सांगितले आहे.

§ १२३ उपसर्गघटित शब्द :—

अ– } अजाण, अडाणी, असडीक (अभावार्थी विशेषण).
अन्– } अनोळखी, अनास्था, (स्वरादि शब्दांपूर्वी लागतो).
अनवाणी, अनहित...(अपवादात्मक उदा०)

अड, आड–अडसंधी, अडसर, अडमुठा, आडगाव, आडपंचा, आडवेळ, आडवळण, आडगल्ली, आडनाव.

अति=पलीकडे–अतिक्रम, अतिरेक, अतिस्नेह, अतिशहाणा.

अद=अर्धा–अदपाव, अच्छेर, अदमण, अदमुरे.

अधः=खाली–अधःपात, अधोमुख, अधोगति.

अधि–अध्यात्म, अधिदैवत, अध्यक्ष.

अनु=मागून–अनुक्रम, अनुवाद, अनुकरण, अनुकूल, अनुताप, अनुनासिक, अनुराग.

अन्तर्--अंतःकरण, अंतर्द्वार, अंतर्मुख, अंतःस्थ.

अप-अव = अभाव—अवजड, अवकळा, अवघड, अवलक्षण, अवगुण, अपकर्ष, अपभाषण, अपशब्द, अपयश.

अभि = जवळ—अभिमान, अभिसारिका, अभियुक्त, अभ्युदय.

आ = पर्यंत, थोडे—आकर्षण, आक्रोष, आक्रमण, आभास.

आविस् = उघड, बाहेर—आविष्करण, आविर्भाव.

इति = असे—इतिहास, इतिश्री, इत्यर्थ, इतिकर्तव्यता.

उत् = उंच, श्रेष्ठ—उत्कर्ष, उत्कृष्ट, उत्तेजन, उत्पत्ति, उन्मत्त, उन्मूलन, उदय, उत्कंठा.

उप = जवळ, गौण—उपनेत्र, उपग्रह, उपभोग, उपवर, उपदेवता, उपलक्षण, उपपत्नी.

कु = वाईट—कुकर्म, कुवासना, कुसंग, कुचाळी.

चिर = लांब, दीर्घ-चिरकाल, चिरंजीव, चिरंतन.

दुः—दुर् = वाईट, कठीण—दुर्वासना, दुराचरण, दुरुक्ति, दुर्घट, दुश्चिन्ह, दुर्लभ.

नाना = अनेक—नानाविध, नानाप्रकार.

नि = खाली-निग्रह, निपात, निक्षेप, निबंध, निकोप, निकामी, निजोरी (अभाववाचक).

निर्—निस् = रहित—निःस्वार्थी, निरपराध, निरर्थक, निर्लज्ज, निर्धन, निष्काळजी.

पड = प्रति, दुसरा—पडताळा, पडजीभ, पडचाकर, पडछाया.

परा = उलट—पराकाष्ठा, पराक्रम, पराजय.

परि = वाटोळा—परिचय, परिग्रह, परिणाम, परिजन.

प्र = अधिक—प्रकार, प्रकृति, प्रतारणा, प्रसार, प्रवेश, प्रवाह, प्रवृत्ति.

प्रति = उलट—प्रतिकूल, प्रतिकार, प्रतिपक्ष, प्रतिध्वनि.

पुरस् = पुरस्कार, पुरोगामी, पुरश्चरण.

पुनर् = पुनर्जन्म, पुनर्विवाह.

पुरा = मागे–पुरातन, पुरावृत्त.

प्राक् = पूर्वी–प्राक्तन, प्राक्कथन, प्राग्भाषण.

प्रादुर् = प्रादुर्भाव.

फट = फार–फटफजीती, फटकळ.

बहिर् = बाहेर–बहिष्कार, बहिर्द्वार.

भर = पुरा––भरदिवसा, भरपूर, भरसभेत, भरधाव, भरज्वानी.

वि = विशेष, निराळा–विकार, विचार, विदेश, विजातीय, विसंगति.

स–सह––सजीव, सजातीय, सफल, सहज, सहवास, सहगमन.

सत् = चांगले–सत्कृत्य, सत्समागम, सत्पुत्र, सदभिरुचि.

सम् = चांगले, बरोबर, सह–संतोष, संस्कार, संकल्प, संकोच, संयोग, संधान, संपात.

सु = चांगले––सुफल, सुगम, स्वागत, सुजन, सुकर, सुधारणा, सुलभ, सुलक्षण.

स्व––स्वदेश, स्वजन, स्वकीय, स्वरूप.

स्वयम्––स्वयमेव, स्वयंवर, स्वयंभू, स्वयंसेवक.

§ १२४ साधित शब्दांस लागणारे प्रत्यय.

अ–या प्रत्ययाने संस्कृत व मराठी धातूंपासून व इतर शब्दांपासून नामे व विशेषणे तयार होतात. प्रत्यय लागताना गुण किंवा वृद्धी होते. उदा० :–

(i) **संस्कृतनामे**–चोर, सर्प, नद, बुध, दीप, मेष, हर, भाग, विश्राम, आहार (धातुसाधित). काश्यप, शौर्च, मौन, लाघव, मार्दव. (तद्धित.)

(ii) **संस्कृत विशेषणे**–स्वस्थ, अंतस्थ (कृदंत); वैष्णव, सौर, शैव, चांद्र (तद्धित).

(iii) **मराठी नामे**--कर, उर, फूट, तूट, मेळ, फेर, झीज.

(iv) **मराठी विशेषणे**--भरड, जाड, पायघोळ.

अक--संस्कृतनामे व विशेषणे गुण, वृद्धी हे विकार होऊन होतात.जसे:--

(i) कारक, गायक, पावक, बाधक, लेखक. (ii) घातक, जनक, तारक, मीमांसक, नैय्यायिक.

अट--पररूपसंधीने मराठी नामसाधित विशेषणे होतात. जसे :--पिसाट, चिकट.

अड--पररूपसंधीने नामसाधित मराठी धातू होतात. जसे :--चिरमडणें.

अन--गुण, वृद्धी होऊन संस्कृत धातूंपासून कर्तृवाचक, क्रियावाचक, स्थितिवाचक नामे होतात. जसे :--नंदन, मदन, स्थान, मरण, साधन,सेवन, वदन, भवन.

अनीय--संस्कृत विशेषणे होतात :-- दर्शनीय, करणीय, रमणीय, आचरणीय [योग्य, जोगे--या अर्थाने].

अव--मराठी नामसाधित व विशेषणसाधित धातू होतात. जसे :-- पान्हवणे, ओलवणे.

अळ--मराठी नामसाधित धातू होतात. जसे :--चिघळणे, ओघळणे.

आ--संस्कृत कृदंत नामे व मराठी कृदंत व तद्धित नामे व विशेषणे अनेक अर्थांनी होतात. जसे :--(i) सं. नामे--इच्छा, कथा, तुला, शिक्षा, स्पृहा, पीडा, पूजा (क्रियावाचक).

(ii) मराठी नामे--वेढा, झगडा, धसरा;
ठेवा, ठेचा, भरणा, ठोका, चावा (क्रियावाचक व कार्यवाचक).

(iii) हेलकावा, ताठा, चिकटा, सफेता, गारठा (तद्धित नामे).

(iv) मराठी नामे--विळा, पोळा, सुरा, भाकरा (स्थूलत्वदर्शक).

(v) मराठी विशेषणे--उघडा, उलथा, पालथा, सुका, उलटा, सुलटा, नवशिका, सुटा, नाचा (च्या), खेळा (ळ्या), तान्हा, वेडा, खरता, लहाना, सामोरा.

आई–मराठी (i) कृदंत व (ii) तद्धित नामे होतात. जसे :—

(i) चढाई, लढाई, बढाई, कमाई (क्रियावाचक); घडाई, चराई, उतराई, खोदाई ('मजुरी' या अर्थी).

(ii) शीतळाई, दांडगाई, चतुराई, थंडाई, मिठाई, तिजाई (तिसरा हिस्सा), पेशवाई, मोंगलाई (स्थितिवाचक नामे.)

आईत–बागाईत, जिराईत (स्थलवाचक नामे व विशेषणे); कबुलाईत–यत, (धर्मबोधक).

आऊ–मराठी (i) कृदंत व (ii) ताद्धित विशेषणे, जसे :—

(i) टाकाऊ, दिखाऊ, विकाऊ, ओताऊ, शिकाऊ (कृदंत);

(ii) घराऊ; कुणबाऊ, कर्जाऊ (तद्धित).

आट–(i) मराठी नामे [द्विरुक्तीने] व (ii) विशेषणे. जसे :—

(i) भरभराट, लखलखाट, चकचकाट, चिपाट.

(ii) खालाट (खालचा) (म. वि.); वाचाट, खल्वाट, (सं. वि.).

आटा—हाकाटा, बोभाटा, सराटा.

आटी–आठी—वेलांटी, गोलांटी, तुराठी.

आड–(i) मराठी नामे व धातू–पाठाड, भोकाड, दाताड, भिंताड, छाताड (तिरस्कारार्थी नामे). चोंदाडणे, बुचाडणे, लुब्राडणे.

(ii) कृदंत व तद्धित विशेषणे.–नासाड, भ्याड, खादाड, उंचाड, मोठाड, ओसाड, रेंदाड, लाथाड.

आडा–(i) मराठी कृदंत व तद्धित नामे. जसे :—नासाडा, चुराडा, पोवाडा, सुताडा; (ii) लांबडा (तद्धित विशेषण).

आडी–नावाडी, सोंगाडी, पाणाडी, धिसाडी [कर्तृत्ववाचक मराठी नामे], नासाडी, राखाडी (स्वार्थी नामे).

आडी–आडू–खिलाडी–खेळाडू.

आंडी–चिळकांडी, धुकांडी, मुसंडी, मुसकांडी.

आडे–धुराडे, कोयांडे (कोयांचे केलेले एक तोंडीलावणे).

आण (<घाण)–उबठाण, पिकटाण, दिपुष्टाण.

आणा (<दाणा)–फुटाणा, भिजाणा, सोलाणा, मिठाणा.

आणू–सुकाणू, जिवाणू.

आर–(<कार–करणारा) मराठी नामे व विशेषणे होतात. जसेः—नामे–(१) लोहार, चांभार, सोनार, सुतार. विशेषणे–चुकार, लुटार, भटार, भिकार.

(२) स्वार्थी नामे होतात. जसे–शिवार (–शीव), माघार, खिंडार.

(३) विशेषणांपासून धातू साधतात. जसे :–उभारणे, तरारणे, भरारणे, एकारणे (=गोळा होणे, एकत्र होणे).

आरा–निरनिराळ्या अर्थांची मराठी नामे. जसेः—

(१) पिसारा, लिंबारा, पेटारा, बुंधारा, डोलारा (आधिक्यदर्शक).

(२) ओकारा, उबारा, बांधारा (क्रियावाचक नामे).

आरा–क्रियाविशेषणे होतात. जसे :–पुढारा, माघारा.

आरी–कर्तृत्ववाचक नामे. ओतारी, मापारी, लुटारी–रू, रंगारी, पुजारी, चितारी, भुसारी.

आव–नामे, विशेषणे, क्रियाविशेषणे यांपासून नवीन धातू तयार होतात. जसे :– सुखावणे, वेडावणे, आसावणे (<आस=आशा), खुणावणे, खालावणे, आंबटावणे.

आव-आवा–अनेक अर्थांची कृदंत व ताद्धित नामे. जसे : —

(१) चढाव, भराव, रिघाव, पाडाव, शिरकाव (क्रियावाचक).

(२) जमाव, जडाव, उठाव, ठराव, काढावा, देखावा, मेळावा (भूतकालवाचक नामे).

(३) कुणबावा, रयतावा.

आवट–विशेषणे होतात. जसे :–बनावट, धुवट, चिवट.

आळा–(<काल)–उन्हाळा, पावसाळा, डोंबाळा, लव्हाळा.

आळी–डरकाळी, कागाळी, वंडाळी.

आळ–आळा—मराठी नामे, कृदंत आणि तद्धित विशेषणे व धातू होतात. जसे :—आभाळ, विटाळ, नवाळ (स्थिति० नामे). गंगाळ, घंगाळ, घड्याळ, विटाळे, ओगराळे (<आलय = घर).

आळू–आळे — ओढाळ, खाजाळू, चोखाळ, तोंडाळ, फेंसाळ, (स्वभावाचा, अशा अर्थांची विशेषणे). फेसाळणे, चोखाळणे (धातू).

आ–अनुकरणवाचक धातूंपासून क्रियाविशेषणे होतात. जसे:– करकरा, घळघळा, गटगटा, खदखदा, पटपटा.

इ—(i) संस्कृत धातूंपासून नामे व (ii) नामांपासून विशेषणे होतात. जसे :—(i) हरि, उदरंभरि. (ii) दाशरथि (=दशरथाचा मुलगा); कार्ष्णि (=कृष्णाचा मुलगा, मदन).

इक—विशेषणे होतात. जसे :—वार्षिक, मासिक, धार्मिक, मानसिक, ऐहिक, धनिक.

इत—पुष्पित, फलित, खंडित, मुद्रित, हर्षित.

इन्—(ई–मराठी)–शास्त्री, धनी, विद्यार्थी, पक्षी, सुखी, दुःखी, त्यागी, द्वेषी (अमुक गुण असलेला अशा अर्थी).

इम—अग्रिम, अंतिम, पश्चिम (स्थितिवाचक विशेषणे).

इमा—गरिमा, लघिमा, महिमा (स्थितिवाचक नामे).

इय—राष्ट्रिय, श्रोत्रिय, क्षत्रिय (–चा, या अर्थी).

इल—तुंडिल, पंकिल.

इष्णु— सहिष्णु, वर्धिष्णु, विष्णु (–स्वभावाचा).

इष्ठ–चविष्ट, भ्रमिष्ट, नादिष्ट.

ई–अनेक अर्थांची कृदंत व तद्धित नामे होतात. जसे:—(i) उडी, बुडी, उलटी, उकळी, थुंकी, फेरी, झोळी (क्रियावाचक व कर्मवाचक नामे). (ii) खुरपी, थापी (साधनवाचक).

ईक——नामे व विशेषणे होतात. जसे:——नामे–सोयरीक, आगळीक, मोकळीक, वेगळीक, तिडीक. विशेषणे–खर्चीक, त्राशीक, सडीक, पढीक, भाविक.

इट–रागीट.

ईण–माळीण, तेलीण, परटीण.

ईत– विशेषणे — लखलखीत, भुसभुशीत, विसकळीत. नामे–भाकीत, भरीत, लिखित.

ईन–कुलीन, नवीन, शालीन.

ईय–मदीय, त्वदीय, स्वकीय, परकीय, राजकीय.

ईर–फुगीर, फुटीर.

ईल, ईळ–छापील, आडील, दोंदील, शेवटील, इकडील, तिकडील, खालील, पुढील, गोडीळ (–जरासे गोड).

ईव— सोलीव, रेखीव, ठरीव, भरीव.

उ— भिक्षु, हितेच्छु.

उक—कामुक, भावुक, भिक्षुक.

उकली—धनुकली, चांदुकली, चिंधुकली.

उडा——खरजुडा.

उर——भासुर, भंगुर, विदुर, चतुर (अल्पत्वार्थी नामे, विशेषणे).

उरडा–डे–भद्दुरडा, हिंगुरडें, नखुरडे (तिरस्कारद्योतक नामे).

ऊ–(i) कृदंत विशेषणे; (ii) तद्धित विशेषणे; (iii) नामे.

(i) मारू, लागू, चालू, उतारू, वाटसरू, भिडू. (ii) गरजू, गबरू, (iii) दांडू, रामू, जगू–परसू (अल्पत्व किंवा ममत्व दाखविणारी नामे).

ऊक–(i) जागरूक, अंधूक, विश्वासूक (विशेषणे). (ii) काटूक, किडूक, चिंधूक (अल्पत्वार्थी नामे).

ऊण–एकूण, एकूणतीस, एकोणीस……

ऊत–समजूत, काकळूत, घड्त.

ऊल–कणगूल, करंडूल, पडगूल, कणगुली (अल्पत्वार्थक नामे).

ए-(i) हसे, रडे, खुरपे, वल्हे, घोटे, कापे, मुरे, वळे, वाढे–ढे, (विविध नामे). (ii) चेपे, मेंगे—विशेषणे. (iii) बकरे, कुत्रे, घोडे—नपु. नामे. (iv) द्वारे, मुळे, कारणे, मध्ये—अव्यये.

एण–(< तृण) भातेण, हरकेण.

एय–(i) कौन्तेय, पांडवेय, राधेय, (–चा पुत्र, या अर्थी); (ii) आग्नेय, पौरुषेय, पाथेय.

एर-एरे–जुनेर, फणेरे.

एरा–पातेरा, मातेरा, घाणेरा, बोचेरा (विशेषणे).

एल–(तेल) (i) कवठेल, तिळेल. (ii) अर्धेल, तिर्धेल (वाटणी या अर्थी). (iii) चढेल, दंडेल, रंगेल, छटेल (विशेषणे).

एली—(i) कर्तृवाचक व (ii) क्रियावाचक नामे होतात. जसे :— (i) खांदेली, भागेली (भागीदार), ओझेली. (ii) दंडेली.

ओटी—चिंधोटी, धांदोटी, लंगोटी, रेघोटी (लघुत्वद्योतक नामे).

ओडा—(अडा) (i) नामे, (ii) विशेषणे होतात. जसे :—(i) हातोडा, (ii) लांबोडा, लांबडा....

ओती—ठरोती, धडोती (धर्मवाचक नामे).

ओत्रा—एकोत्रा, दुहोत्रा, पंचोत्रा.

ओपा—शिळोपा, एकोपा, सुखोपा (स्थितिवाचक नामे).

ओबा–(i) घरोबा (धर्मवाचक नाम), (ii) आजोबा, पांडोबा, रायबा (सन्मानार्थी प्रत्यय.), (iii) आयतोबा, दगडोबा (तिरस्कारार्थी प्रत्यय).

ओर–ओरा–ओरी–टपोर, टपोरा, पिठोरी, चिठोरा.

ओसा– अडोसा, पडोसा.

ओशी—कसोशी, आंबोशी (स्थितिदर्शक नामे).

ओळ--(i) (<आलय=घर)-आजोळ, पणजोळ. (ii) आंघोळ-आंग होळणे, धुणे.

ओळा-सातोळा, आठोळा (आठव्या महिन्यात जन्मलेला)....

ओळी-(i) चारोळी, निंबोळी (निंबाचे बी), (ii) फासोळी, मासोळी, चिरटोळी (लघुत्वद्योतक नामे).

ओळे—(<आलय) पिंडोळे, मेंडोळे, थारोळे.

अंड—भावंड, नातवंड......

अंडी—मुसंडी, पोतडी-पोतंडी, पुरचुंडी (लघुत्वद्योतक नामे)

क-(i) पुत्रक, बालक, युवक (अल्पत्व किंवा ममत्वदर्शक नामे), (ii) अटक, अडक, धडक, थडक (क्रियावाचक नामे.), (iii) पंचक, सप्तक, अष्टक (समुदायवाचक नामे), (iv) जाचक, मारक, रेचक (कर्तृवाचक विशेषणे), (v) इत्यादिक, अस्मादिक (स्वार्थी प्रत्यय).

कट-(i) संकट, प्रगट, उत्कट, निकट (ii) कुजकट, जळकट, मारकट, धुरकट, मेणकट, बळकट...(विशेषणे)

कन्—चटकन्, गपकन्, झटकन्...

कर-री-(i) विणकर-देणेकर, देणेकरी, घेणेकरी, शेतकरी, सेवेकरी, मेणेकरी (कर्तृवाचक नामे); (ii) रुचकर, ओढकर, खेळकर (कर्तृवाचक विशेषणे; (iii) महाडकर, मैराळकर (अमक्या गांवचे अशा अर्थी).

करू-यात्रेकरू, होतकरू (कर्तृवाचक विशेषणे).

कली—धनुकली, सोनुकली....(लघुत्वदर्शक, ममत्वदर्शक).

कळ—पचकळ, फटकळ, मोडकळ, पडकळ.

का-(i) थेंबका, चुलका, ओंडका, मेंढका, सुळका (अल्पत्वार्थी नामे); सुटका (भाववाचक नाम); (ii) भिजका, भाजका, सडका, परका पांढुरका, नेटका (विशेषणे).

कार-कारा-देकार, नकार, पुढाकार (भाववाचक नामे). होकारा (क्रियावाचक नाम).

की—फुशारकी, उनाडकी, खोतकी, पाटिलकी, शिंदळकी, लबाडकी (भाववाचक नामे). चांदकी, ओंडकी (लघुत्वदर्शक नामे); बेकी, शेणकी, टिमकी–(विविध नामे.)

कूट–कूर–कूल–हिरकूट, फटकूर, घरकुल, मडकुल (अल्पत्वार्थी, तिरस्कारार्थी प्रत्यय).

के–(१) ओंडके, नाळके, पेंडके, ढोलके (अल्पत्वार्थी नामे.); (२) पावके, निमके, पाउणके (समुदायवाचक नामे).

खोर, खुरा–भांडखोर, चिडखोर, डावखोरा.

गट–गळ–खोलगट, चारगट, दांडगट, वेडगळ.

गत– < गति–फसगत, दिवसगत, ओशाळगत.

गर-गार (फारशी)— सौदागर, कारागीर, गुन्हेगार, खिदमतगार, रोजगार, कामगार (कर्तृवाचक नामे).

गा-गी-गे—नामे-खळगा, पानगा, सोडगी, जुडगी, जुडगे.

गा–गेला—दांडगेला, रोडगेला, वेडगेला, बाडगा, माजगा.

गिरी—शिपाईगिरी, सावधगिरी.

चट—मेणचट, गुळचट, पाणचट.

चार—पाहुणचार, मेहुणचार (<आचार).

ची—(आरबी) मशालची–जी, बबरजी, पखालजी (काम करणारा या अर्थी).

जी—भटजी, दाजी, विठोजी, रघोजी, मालोजी (सन्मानार्थी प्रत्यय).

ट–टा–ड–(१) कृदंत व (२) ताद्धित विशेषणे. (१) आंबट, कुजट, भिजट, पुसट. (२) हेकट, माकड, वातड, जख्खड, रोगट, खारट, वातट.

ट-टा—लांबट, उंचट, जुनाट, पिचकट, रोपट, खोपट, मुसकट, घरटा, दिवटा–टी, चोरटा (अल्पत्वार्थी नामे व विशेषणे).

टी–(१) शेगटी, सालटी, शेपटी, सालडी (अल्पत्वार्थी नामे); (२) रानटी, तारवटी (तारवातून आलेला).

ठण—(< स्थान) गोठण, गावठण, पायठण.

ठा–ठी–(१) गावठा, उंबरठा (नामे). (२) गावठी (विशेषण).

डा—(१) कोनाडा, जिवडा, आकडा, बापुडा, गधडा (अल्पत्वार्थी, तिरस्कारार्थी नामे). (२) वावडा, भाबडा, कोरडा, वांकडा (स्वार्थी विशेषणे).

डी–डे–ढे–(१) गाठडी--डे, कातडी-,डे, पानडी, वावडी, (लघुत्वार्थी नामे). (२) पंचकडी, छकडी, दसकडी (समुदायवाचक नामे). (३) अंगडे, कुंचडे, टोपडे, रूपडे, गावढे (अल्पत्वार्थी नामे).

ण–अनेक अर्थांची कृदंत व ताद्धित नामे—

(१) तारण, पोषण, भांडण, वळण, घडण, दाटण, लांबण, दळण, नेसण, चाटण, ठेवण (क्रियावाचक, धर्मवाचक नामे). (२) झाडण–णी, कालवण, झाकण, कोंदण (करणार्थी नामे). (३) दडण, वाकण, चढण, उतरण....(अधिकरणार्थी नामे). तैलंगण (< स्थान).

णा–नामे व विशेषणे साधतात–(१) पाळणा, रमणा, भरणा, उगाणा= उगवून घेणे. (२) देखणा, पोसणा, राखणा, दुणा (विशेषणे).

णार–णारा-कर्तृवाचक नामे व विशेषणे होतात. जसे :—करणार, येणार, खाणारा, गाणारा....

णावळ–खाणावळ, देणावळ, धुणावळ, जेवणावळ (‘ मजुरी ’–या अर्थाने नामे).

णी–(१) करणी, पाहणी, पेरणी, देणी, घेणी, चाळणी, लेखणी, काढणी (साधनवाचक नामे). (२) चांदणी, नथणी (लघुत्वदर्शक). (३) दुधणी (करणवाचक नाम).

णूक–करमणूक, वागणूक.

णे--विविध अर्थांची नामे होतात. (१) बोलणे, करणे, येणे...(क्रियावाचक); (२) चांदणे; (३) लाटणे, कातणे, उलथने, कोरणे (करणवाचक).

त--ण–(१) भूतकालवाचक सं. कृदंते–गत, कथित, त्राण, पूर्ण. (२) वर्तमानकालवाचक मराठी कृदंते–करित, जात, घेत.

तन–सनातन, चिरंतन, नूतन, पुरातन.

तः-तस्–वर्णतः, स्वतः, उभयतः, प्रयत्नतः.

त्य–दाक्षिणात्य, पौर्वात्य, अमात्य, नित्य.

ता–(१) कविता, समता, नवीनता, जनता=लोक (भाववाचक नामे).
(२) देता, घेता, येता, वरता, मागता, पुढता (विशेषणे).

ती–गणती, बढती, पावती (क्रियावाचक नामे).
ते–गळते, भरते, पडते, दुमते, रायते (क्रियावाचक, स्थितिवाचक नामे).
त्व–गुरुत्व, लघुत्व, मातृत्व, पितृत्व (भाववाचक नामे).
त्र–नेत्र, मित्र, गात्र, परत्र.
थळ–(< स्थळ)–पाणथळ.
दर–एकंदर.
दा–एकदा, दोनदा.

दार=(१) छानदार, खुबीदार, कंठीदार (विशेषणे). (२) मोजणी-दार, राखणदार (नामे).

न–ण–णे–यत्न, रक्षण, स्वप्न, यज्ञ, उलथने.
प–कांडप, दळप, वाढप, रांधप (कृदंत नामे).
पण–पणा–शहाणपण, वेडेपण, भाविकपणा.
पट्टी–खरडपट्टी, तासडपट्टी, उधळपट्टी.
पा–वेडपा, टोणपा (अल्पत्वार्थी).
पी–कांडपी, दळपी, वाढपी.
मन्–(म)-दान, नाम, छद्म, हेम, वर्म (विविध नामे).

मत्
मंत }–श्रीमान्, धीमान्, श्रीमंत, बुद्धिमंत, धीमंत (विशेषणे).
मान्

मट–(१) जळमट; (२) घुसमटणे, चुरमटणे.
मय–काष्ठमय, अन्नमय, मांसमय.

मिन् (सं.)–**मी** (म.) –स्वामी, वाग्मी, संयमी.

य–(१) रम्य, गद्य, आचार्य, शिष्य (संस्कृत कृ.. विशेषणे व नामे).

(२) पाराशर्य. शांडिल्य, वन्य, जन्य, दंत्य... (त्यापासून उत्पन्न झालेला, या अर्थी विशेषणे).

या–(१) रड्या, उचल्या, उधळ्या, उपस्या, मस्कऱ्या, बायक्या (निंदाव्यंजक विशेषणे).

(२) गोंद्या (<गोविंदा), राम्या, बाप्या (नामे).

र- (१) मधुर, रुचिर, चुकर, चुकार, ताठर, नम्र (विशेषणे).

(२) ठोकर, फुंकर, माहेर, सासुर (नामे).

रा —देणारा, घेणारा, हसरा, लातरा, चावरा (विशेषणे).

रा–री–रे–विकरा, भोवरा, खुपरी, कापरे (नामे).

राव–(सन्मानदर्शक)–गोपाळराव, गोविंदराव.

राव–अरेराव, तिरशिंगराव (कुत्सितार्थी नामे व विशेषणे).

री–पुणेरी, सोनेरी, रुपेरी (विशेषणे).

री–रू–रे–डफरी, मेंढरू, म्हसरू, टोपरे (अल्पत्वार्थी).

ल–(१) वत्सल, पांसुल (विशेषणे). (२) तांबुल, डोंबल (अल्पत्वार्थी नामे).

ला–ली–ले–बाहुला, टिकली, सुपली, तांबले (अल्पत्वार्थी नामे).

ला–शिंपला, टिकला, खोकला, दाखला (विविध अर्थांची नामे).

लंड–अर्धलंड, धर्मलंड (न्यूनत्वबोधक).

व–(१) केशव (२) देवघेव (नामे). (३) सरवणे (धातू).

वट–वड–वटी–(१) लागवट, लागवड, फुगवटी, धुळवड, मळवट, हातोटी, हातवटी (क्रियादर्शक नामे). (२) पाथरवट. (३) रानवट, कडवट.

वटा—मुखवटा, दुखवटा, उंचवटा (स्थितिदर्शक नामे).

वठा—पाणवठा.

वडा—(१) म्हारवडा, पोरवडा, धिंडवडा (भाववाचक नामे, कुत्सितार्थी). (२) आठवडा, पंधरवडा.

वंड—नातवंड, भावंड, पणतवंड.

वण—धुवण, भिजवण, भरवण, आंबवण, आंबोण.

वणी—(<पाणी) चिंचवणी, उन्हवणी, गुळवणी.

वंत, वान्—गरजवंत, धैर्यवान्, गुणवंत.

वर—आजवर, तोवर, जोवर, येथवर.

वला—कान्हवला, गव्हला (वळलेला पदार्थ).

वली—वाकुली, न्हाणवली, करवली.

वळ—शितावळ, उष्टावळ, गयावळ, खेडवळ, रायवळ (नामे व विशेषणे).

वळा—तोंडवळा, अंगवळा, गोतवळा, कोठवळा, लेकवळा.

वा—(१) गारवा, ओलावा, थंडावा, गोडवा, थकवा, बोलवा, रुसवा, ठेवा, दोरवा (नामे). (२) बरवा, कडवा, नागवा, आडवा, तिडवा (विशेषणे).

वाईक— मासलेवाईक, तऱ्हेवाईक.

वाणा—लाजिरवाणा, गोजिरवाणा, केविलवाणा (<=रंग, रूप).

वान—गाडीवान, बागवान.

वार—बेतवार, शिस्तवार. (विशेषणे).

वाला—मोळीवाला, मोटवाला, गाडीवाला.

विन्-वी—मेधावी, मायावी, तेजस्वी, तपस्वी.

वी—ठाणवी, थोरवी.

व्य—(१) पितृव्य, भ्रातृव्य, (२) कर्तव्य, गंतव्य, भवितव्य.

शः-शा—अनेकशः; सहस्रशः, बहुशा (क्रियाविशेषणे).

शा-शी—दडपशा, मोडशी (स्थितिदर्शक नामे).

शीर—आटपशीर, आदबशीर, अनुभवशीर, वक्तशीर.

स—(१) डोळस, गोंडस, रूपस, नीटस, तिरकस (विशेषणें); (२) टिपूस, तडस, बापूस=बाप (स्वार्थी नामे).

सट-सर—मोळसट, आटपसर, मऊसर, गोडसर, काळसर.

सा—भलतासा, धडसा, थोडासा, मोठासा (स्वार्थी विशेषणे).

सुरा-सुडा—निजसुरा, आळसुडा (स्थितिदर्शक नामे व विशेषणे).

एरी-हेरी—एकेरी, दुहेरी, तिहेरी.

ळ—(१) मोंवळ, ओघळ (स्थितिवाचक नामे). (२) प्रेमळ, दयाळ, ठोंकळ (विशेषणे).

ळा—(१) मथळा < माथे (नामे). (२) आंधळा, पांगळा (विशेषणे).

ळी-ळे-मासळी, पाकळी, गठळी, गाठोळे (लघुत्वदर्शक नामे).

§ १२४ सामासिक शब्द

एखादा समाज किंवा लोक ज्या काळात अगदी साधेपणाने रहात असतात त्या काळात त्यांचे आचारविचार, व अर्थातच त्या आचारविचारांचे वाचक शब्द, हे सर्वच साधे, सरळ, सोपे असे असतात. पण समाजात ऐहिक संपत्ती वाढू लागून लोकांना थोडेस मनःस्वास्थ्य प्राप्त झाले व विचार करण्याला अवकाश मिळू लागला, म्हणजे त्या समाजात खोल व गुंतागुंतीचे विचार उत्पन्न होऊ लागतात; व त्याबरोबरच, साध्या, सरळ शब्दांनी बोलणे-लिहिणे हे अपुरे असे वाटू लागून, नवीन शब्द तयार करण्याची जरूरी भासू लागते, आणि त्याप्रमाणे प्रयत्नही होऊ लागतात. या प्रयत्नांचाच एक प्रकार म्हणजे समासाने शब्द तयार करणे हा आहे. एका दृष्टीने हा प्रकार सोईचा आहे; कारण, त्यात शब्दांचे परस्परसंबंध दाखविणारे प्रत्यय, अव्यये - वगैरे यांची बचत होते; व अशा रीतीने तयार केलेल्या जोडशब्दांमुळे जोडलेल्या विचारांचा निकटपणा श्रोत्याला किंवा वाचकाला तितका जास्तच पटतो. उदा०, राजाचा वाडा असे म्हणण्याने जो अर्थ व्यक्त व्हावयाचा त्यापेक्षा थोडासा वेगळा अर्थ राजवाडा असे म्हटल्याने व्यक्त होतो. राजाचा वाडा असे म्हटल्याने

राजाच्या मालकीचा वाडा असा अर्थ होतो. पण राजवाडा म्हणजे राजा सामान्यतः ज्यात रहातो तो वाडा-यात रहातो तो वाडा-यात राजाचा वाड्याशी जास्त जवळचा संबंध आलाच—असा अर्थ होतो.

समासांचा आणखीही एक उपयोग दिसतो. प्रत्यय, अव्यये वगैरे संबंध-दर्शक साधनांनी विचाराविचारातील व शब्दाशब्दातील सर्वच प्रकारचे संबंध व्यक्त करिता येत नाहीत. उदा,—घटि-घटका—वेळ दाखविण्याचे साधन असा अर्थ व्यक्त करावयाचा असेल तर तो प्रत्ययांनी किंवा अव्ययांनी सहज सांगता येणार नाही. पण घटिदर्शक यंत्र, किंवा त्याहून सुटसुटीत घड्याळ, या शब्दाने तो थोडक्यात व्यक्त करता येतो व व्यक्त होतो. म्हणजे गुंतागुतीचे, खोल, भानगडीचे विचार जस जसे एखाद्या समाजात येत जातील तसतशी सामासिक शब्द तयार करण्याची गरज त्या समाजाला जास्त भासू लागते. प्राचीन संस्कृत भाषेच्या इतिहासात ही गोष्ट ठळकपणाने दिसते. जोपर्यंत प्राचीन आर्य उत्तर हिंदुस्थानात लहान लहान वसाहती करून शेतीवर उपजीविका करीत होते तोपर्यंत त्यांना सामासिक शब्दांची फारशी जरूर लागलेली दिसत नाही. परंतु पुढे पुढे ही जरूर त्यांना वाटू लागली ही गोष्ट त्यांचे पुढल्या काळातील वाङ्मय पाहिले तर दिसून येते. हळू हळू तर सामासिक शब्दांचा प्रचार इतका वाढला की मोठ्यामोठ्या लांब लांब समासांनी लिहणे ही एक विद्वत्तेची खूणच समजली जात असे की काय अशी शंका **कादंबरी, उत्तररामचरित्र, दशकुमारचरित** वगैरे ग्रंथ वाचताना येऊ लागते. वाढते, गुंतागुंतीचे विचार व्यक्त करावयाला समासांची कशी गरज लागते. व त्यांनी काय सोय होते याचे आजच्या काळातले ताजे उदाहरण पाहिजे असेल तर ते गेल्या शंभर वर्षांतील जर्मन भाषेच्या इतिहासात सांपडेल. पण अर्थातच, वरच्या उदाहरणात दर्शविल्याप्रमाणे समासांचा जसा उपयोग आहे, तसाच त्यांचा दुरुपयोगही होणे शक्य आहे ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. आतां मराठीत समास कसे व कोणते होतात हे थोडक्यात सांगतो.

§ १२५ समास म्हणजे काय ?

मध्ये येणारे प्रत्यय किंवा अव्यये गाळून एकापेक्षा आधिक शब्द एकमेकांशी जोडून जो शब्द तयार करितात त्याला समास किंवा सामासिक शब्द

असे म्हणतात. त्यातील शब्दांच्या परस्परसंबंधांच्या अनुरोधाने समासांचे तीन प्रकार करिता येईल. ते असेः—

(१) ज्यांतील निरनिराळे शब्द सारख्या योग्यतेचे असतात असे समास.

(२) ज्यांतील आरंभीची पदे गौण असून शेवटचे पद मुख्य असते ते समास.

(३) व, ज्यांतील आरंभीची पदे मुख्य असून पुढील पदे गौण असतात ते समास.

१ यात द्वंद्व आणि बहुव्रीहि हे समास येतात.

§ १२६ द्वंद्व

या समासातील सर्व पदे महत्त्वाची असून त्या सर्वांचा मिळून जो अर्थ होतो तोच अर्थ सामासिक पदाचा बहुधा असतो. निदान, सामासिक पदाने व्यक्त होणाऱ्या अर्थात त्या अर्थांचा समावेश तरी होतोच.

आणि, व, अथवा, किंवा या समुच्चयवाचक व विग्रहवाचक उभयान्वयी अव्ययांचा लोप होऊन द्वंद्वसमास होतो. याचे तीन प्रकार आहेत तेः—

(अ) समाहारद्वंद्व (आ) वैकल्पिकद्वंद्व (इ) इतरेतरद्वंद्व

(अ) समाहारद्वंद्व

समाहारद्वंद्वात 'आणि', 'व' या समुच्चयवाचक अव्ययांचा लोप झालेला असतो; व पदांच्या अर्थाशिवाय, त्या जातीचे, किंवा त्यासारखे सर्व पदार्थ, अशा अर्थांचा सामासिकपदात अंतर्भाव होतो. जसे: —भाजीपाला, अन्न-पाणी, कुणबीमाळी, आचारविचार, ने-आण, पाऊसपाणी, सगेसोयरे, कागद-बिगद, दगडबिगड, ओबड-धोबड.

द्वंद्वाविषयी काही नियम.

१ एकाच लिंगाचे शब्द जोडले तर सर्व सामासिकपदाचे लिंग तेच होते. जसेः—सूर्यचंद्र (पु.). कारण, सूर्य व चंद्र हे दोन्ही शब्द पुल्लिंगी आहेत.

याची आणखी उदाहरणे:—आंबेफणस, मित्रावरुण, रामलक्ष्मण, हात पाय.......सीतासावित्री, कुत्रीमांजरे.

२ भिन्न-लिंगी शब्दांचा समास झाला तर सामासिकपदाचे लिंग नपुसकलिंग होते. जसे:—आईबापे, मातापितरे, बहीणभावंडे, मायलेकरें.......

किंवा, सामासिक शब्द शेवटच्या शब्दाच्या लिंगाचा असतो. जसे:—विटीदांडू, सुंठगूळ, नाकडोळे, दहीभात.

टीप:— या ठिकाणी निरनिराळ्या शब्दांनी दाखविल्या जाणाऱ्या पदार्थांचा मिळून जणू काय एकच पदार्थ झाला आहे असे समजले पाहिजे. जसे—दहीभात, सुंठसाखर.

३ (i) द्वंद्वसमासातील अवयवभूत पदे त्यांच्या परस्परयोग्यतेप्रमाणे समासात आली पाहिजेत. जसे:—रामलक्ष्मण, भीमार्जुन, राजा-प्रजा.

(ii) आईबाप, सासुसासरा (जास्त मान किंवा जास्त ममता दाखविण्यासाठी).

(iii) शेला-पागोटे, नारळ-सुपारी (पु. स्त्री. नपु. या क्रमाने)

(आ) **वैकल्पिकद्वंद्व**— 'अथवा', 'किंवा'—अशा विकल्पबोधक अव्ययांच्या लोपाने होणाऱ्या समासाला वैकल्पिकद्वंद्व म्हणतात. जसे:—खरेखोटे, बरेवाईट.......यांतील दुसरे पद पहिल्याच्या विरुद्ध असते; पण ते तसे नसताही वैकल्पिकद्वंद्व होईल. जसे:— पाचदहा=पांच किंवा दहा.

§ १२७ **बहुव्रीहि**—ज्या समासातील सर्व पदे सारख्याच योग्यतेची पण सर्वच गौण असतात व त्या पदांच्या वाच्यार्थाच्या समाहाराखेरीज निराळाच अर्थ सामासिकपदाने दाखविला जातो त्याला बहुव्रीहि समास म्हणतात. जसे, **चक्रपाणी**=चक्र आहे हातात ज्याच्या असा पुरुष—विष्णु किंवा कुंभार. **एकदंत**=एक दात आहे ज्याला असा,=गणपति.

बहुव्रीहि समासाचा विग्रह करिताना, म्हणजे त्यातील पदांची फोड करिताना, संबंधी सर्वनामास जी विभक्ती होते तिच्याप्रमाणे **द्वितीया बहुव्रीहि, तृतीया बहुव्रीहि** असे त्याचे प्रकार करिता येतात.

किंवा, दोन्ही पदे एकाच विभक्तीत असतील तर **समानाधिकरण बहुव्रीहि**, व भिन्न विभक्तीत असतील तर **व्यधिकरणबहुव्रीहि** असे प्रकार करितात.

विग्रह करितांना मध्येच एखादा नवीन शब्द घालावा लागला, म्हणजे समासात ते पद गळून समास होत असला, तर त्याला **मध्यमपदलोपी-बहुव्रीहि** म्हणतात. जसे :—**चंद्रानना** = चंद्राच्या आननासारखे आहे आनन जिचे अशी (स्त्री).

निषेधार्थक '**न**', '**अ**' या अव्ययांनी बहुव्रीहि साधत असेल तर **नञ्-बहुव्रीहि**; व पूर्वपद **सह**, किंवा **स** असेल तर **सह—बहुव्रीहि** हे बहुव्रीहि समासाचे किरकोळ प्रकार आहेत.

नञ्-बहुव्रीहि—अनंत=अंत नाही ज्याला, तो.

सह-बहुव्रीहि—सचैल, सांब.

किंवा, अवयवभूत पदांच्या जातीवरून, अथवा कार्यावरून या समासाचे खालील प्रकार करिता येतात. जसे :—

(i) **संख्यापूर्वपदबहुव्रीहि**—एकदंत, त्र्यंबक, पंचतुंड.

(ii) **संख्योत्तरपदबहुव्रीहि**—त्रिसप्त (=एकवीस), उपदश (दहांचे जवळची संख्या)=नऊ किंवा अकरा.

(iii) **विशेषणपूर्वपदबहुव्रीहि**—नीलकंठ, लंबोदर, सुग्रीव.

(iv) **विशेषणोत्तरपदबहुव्रीहि**,—जसे :—गुडप्रिय, तक्रप्रिय.

(v) **उपमानपूर्वपदबहुव्रीहि** —जसे :—कमलनेत्र, चंद्रमुखी.

(vi) **अव्ययपूर्वपदबहुव्रीहि**—निर्दय, विफल.

(vii) **विषयपूर्वपदबहुव्रीहि**—अहमहमिका.

§ १२८ **तत्पुरुष समास**—ज्या समासात उत्तरपद, किंवा शेवटचे पद, मुख्य असते व त्यापूर्वी येणारी पदे गौण असतात त्याला **तत्पुरुष समास** म्हणतात. याचे विभक्तितत्पुरुष व कर्मधारय असे दोन प्रकार करिता येतात.

विभक्तितत्पुरुष समासात पहिला शब्द नाम किंवा विशेषण असतो, व त्याला समासाचा विग्रह करिताना प्रथमा व संबोधन यांजखेरीज कोणती तरी विभक्ती लागते. जसे :—

द्वितीयातत्पुरुष—देशगत (देशास गेलेले).

तृतीयातत्पुरुष—ईश्वरनिर्मित (ईश्वराने निर्मित), कृपावलोकन (कृपेने पहाणें); भक्तिवश, गुणहीन, कष्टसाध्य.

चतुर्थीतत्पुरुष–काकबली (= कावळ्यास बळी), कृष्णार्पण (= कृष्णाला अर्पण), वाटखर्च, गायरान, मेंढवाडा.

पंचमीतत्पुरुष–चोरभय (=चोरापासून भय), ऋणमुक्त, पदच्युत, गर्भश्रीमंत, लंगोटीमित्र.

षष्ठीतत्पुरुष–देवालय (=देवाचे आलय),सूर्यप्रकाश (=सूर्याचा प्रकाश), देवभक्ती, केळफूल, धर्मवेड, वाघनख.

सप्तमीतत्पुरुष–कलाकुशल (=कलेत कुशल), स्वर्गवास, समयसूचक, कुलोत्पन्न, वनभोजन.

अलुक् समास किंवा अलुक् तत्पुरुष.

कधी कधी तत्पुरुषाच्या पूर्वपदातील विभक्तीचा लोप न होताच सामासिक पद तयार होते. अशा वेळी त्याला **अलुक् तत्पुरुष** असे म्हणतात. जसे :— **अग्रेसर** = अग्रभागी जाणारा = पुढारी; कर्तरिप्रयोग, युधिष्ठिर, सरसिज, तोंडीलावणे.

तत्पुरुष समासातील उत्तरपद जेव्हा कृदंत, किंवा धातुसाधित असते तेव्हा त्याला **उपपदतत्पुरुष** म्हणतात. जसे:- ग्रंथकार (=ग्रंथ करणारा), गृहस्थ, द्विज, खेचर, भूप, खग, भाजीविक्या, नाकतोडा, बोटचेपे, नवशिका.

काही गौण प्रकार.

(i) **नञ्तत्पुरुषः**— जेव्हा नाम किंवा विशेषण यांच्या मागे अ किंवा अन् लागून समास तयार होतो तेव्हा तो नञ् तत्पुरुष; जसे :—**अज्ञान, अनादर, नपुंसक.**

(ii) पूर्वपद अव्यय किंवा उपसर्ग असते त्यावेळीही समासाला तत्पुरुषातच गणतात; जसे :—पराजय, उत्कर्ष, पराभव, कदन्न (=वाईट अन्न).

(iii) कधी कधी मुख्यपद प्रथम येते; जसे :—राजहंस=हंसांचा राजा.

§ १२९ **कर्मधारय, द्विगु, मध्यमपदलोपी.**

तत्पुरुष समासाचा विग्रह करिताना पूर्वपद व उत्तरपद यांस एकच प्रथमा विभक्ती लागते त्या प्रकाराला कर्मधारय असे म्हणतात. जसे:—उत्तमपुरुष, शुक्लपक्ष, महादेव, रक्तचंदन.

टीप :—यात बहुधा उत्तरपद हे नाम व पूर्वपद हे विशेषण असते.

कर्मधारयात केव्हा केव्हा विशेषण शेवटी येते. जसे :—पुरुषोत्तम=उत्तम पुरुष, भाषांतर, देशांतर, (=अन्य भाषा, अन्य देश).

केव्हा केव्हा दोन्ही पदे विशेषणेच असतात. जसे :—श्यामसुंदर, कृताकृत (केलेले व न केलेले), ज्ञाताज्ञात.

द्विगु—केव्हा केव्हा पूर्वपद संख्यावाचक असते; या प्रकाराला द्विगु असे विशेष नाव आहे. जसे :—त्रिभुवन, पंचपाळे, पंचारती.

मध्यमपदलोपी—कित्येक कर्मधारय समासांचा विग्रह करिताना पदांचा परस्परांशी संबंध दाखविणारे, समासात अध्याहृत असलेले, शब्द स्पष्ट सांगून विग्रह करावा लागतो; म्हणजे मधला कोणता तरी शब्द लुप्त होऊनच समास झालेला असतो. या प्रकाराला मध्यमपदलोपी असे विशेष नाव आहे. कारण विग्रह करिताना मधील लुप्त झालेल्या पदाचा उल्लेख केल्याशिवाय अर्थ स्पष्ट होतच नाही. जसे :—चुलतभाऊ=चुलत्याच्या बाजूने, त्याचा पुत्र म्हणून, भाऊ. घरजावई=घरी ठेवून घेतलेला जावई. गुडदाणी, साखरभात, पुरणपोळी.

§ १३० **अव्ययीभाव**—ज्या समासाचे प्रथमपद मुख्य असून अव्यय असते, व त्यामुळे सर्व सामासिक शब्द क्रियाविशेषण अव्यय असतो त्याला **अव्ययीभाव** म्हणतात. जसे :—यथान्याय, प्रतिवर्ष, प्रत्यक्ष, दररोज, बिनहरकत, हरहमेष, दरदिवस, खालोखाल, वरवर.

टीप :— अव्यय किंवा उपसर्ग पूर्वपदी असून होणारे तत्पुरुष समास क्रियाविशेषणे नसतात, हा या दोन प्रकारांतील भेद व्याख्येत आलेलाच आहे, तो नीट लक्षात घ्यावा.

कित्येक अव्ययीभाव समास नामांच्या द्विरुक्तीने तयार होतात. जसे :— घरोघर, गावोगाव.

§ १३१ सामासिक शब्दांविषयी लक्षात ठेवावयाच्या काही सामान्य गोष्टी

(१) समासातील सर्व पदे एकाच भाषेतील असावी हा मुख्य नियम. याप्रमाणे 'हत्तीचे चामडे' या अर्थी समास करायचा असेल तर हस्तिचर्म (दोन्ही पदे संस्कृत) असा, किंवा हत्तीचामडे असा केला पाहिजे; हस्तिचामडे असा करिता येणार नाही. हस्तिचर्म, तांबडमाती, एकदंत, वाकडमान्या, हे समास शुद्ध; व शाळामास्तर (मराठी व इंग्रजी), पैसाफंड, हे अशुद्ध असे म्हटले पाहिजे.

परंतु पैसा—फंड, शाळा—मास्तर, रेल्वे—भाडे, जिल्हा—सभा हे व अशा प्रकारचे शब्द भाषेत इतके रूढ झाले आहेत की ते दुष्ट समास म्हणून त्यांची हकालपट्टी करणे शक्य नाही. तेव्हा, असे नवीन समास शक्य तर करू नयेत एवढेच याविषयी म्हणणे बरे.

(२) समासातील पदांचा संधिनियमांप्रमाणे संधी होत असेल तर केलाच पाहिजे. नृप + आज्ञा = नृपाज्ञा; नृपआज्ञा असे म्हणणे किंवा लिहिणे चुकीचे आहे. कवितेत मात्र या नियमांकडे दुर्लक्ष केलेले आढळते. जसे :— " आकाशअंत न कळोनिहि अंतरिक्षीं । "

(३) एकाच सामासिक पदाचा निरनिराळ्या रीतींनी विग्रह करिता येत असल तेव्हा अर्थाच्या संदर्भाला जुळत असेल तीच रीत पसंत करावी व तिला अनुरूप असे नाव समासाला द्यावे. उदा०—त्रिनयन = तीन डोळे असा अर्थ इष्ट असेल तर तत्पुरुष, (द्विगु); किंवा तीन आहेत डोळे ज्याला असा शंकर, या अर्थी बहुव्रीहि. तसेच, लक्ष्मीकांत = लक्ष्मीचा कांत हा षष्ठी तत्पुरुष; लक्ष्मी आहे कांता ज्याची तो विष्णु—हा बहुव्रीहि.

(४) संख्याविशेषणांची समासात येणारी रूपे.

	समासातले रूप.	
एक	एक	एकोत्रा, एकतीस.
दोन	दु	दुघई, दुआब, दुरंगी.
तीन	ती, ते	तिकोनी, तेवीस, तेहतीस.
चार	चौ, चव	चौतीस, चौचाल, चवघडा.
पाच	पंच	पंचरंगी, पंचपाळे.
सहा	छ	छकडी, छत्तीस, छदाम.
नऊ	नव	नवमास, नवटाक.
बारा	बार	बारभाई, बारमास.
सोळा	सोळ	सोळवंड, सोळन्हाण.

§ १३२ अभ्यस्त शब्द.

अभ्यस्त शब्द हे एक प्रकारचे सामासिक शब्दच होत. पण ते तयार होण्याची रीत व विशेषतः त्यांचा उपयोग या दोन गोष्टीत इतर शब्दांपेक्षा ते थोडेसे वेगळे असल्यामुळे, या दोन्हीपुरते त्यांचे स्वतंत्र विवेचन करणे जरूर वाटते. अभ्यस्त म्हणजे अभ्यासाने, किंवा वारंवार उच्चारण्याने झालेले किंवा केलेले शब्द. जसे:—वारंवार, घरोघर, गटागटा.

१ या शब्दांचा एक अगदी उघड, सहज दिसणारा प्रकार म्हणजे निरनिराळ्या ध्वनिवाचक शब्दांच्या पुनरुक्तीने झालेले शब्द. जसे :—कावकाव, चिवचिव, गटगटा, तडफड, कलकल. यांना अनुकरणवाचक शब्द असे म्हणतात. मराठीत अनुकरणवाचक नामे, विशेषणे, धातू व क्रियाविशेषणे होतात, ती अशी :—

नामे :—ध्वनिवाचक शब्दांच्या पुनरुक्तीने, किंवा—**आट**—प्रत्यय लागून नामे होतात. जसे :—किरकिर, मळमळ, चकचकाट, कलकलाट.

विशेषण—ईत प्रत्ययाने विशेषणे होतात. जसे :—गरगरीत, चमचमीत, टणटणीत.

धातू :—कडकडणे, गडगडणे, कडाडणे, चकाकणे, थरारणे.

क्रियाविशेषणे—पुनरुक्तीने तयार झालेल्या नामाला आ प्रत्यय लागतो. जसे :—गदगदा, चरचरा.

२ या अभ्यस्त शब्दांचा दुसरा एक प्रकार असा आहे की त्यात पहिला शब्द सार्थ असतो; व त्याचे अनुकरणाने तयार केलेल्या दुसऱ्या शब्दाचा आरंभ ब, ग, स, म यांपैकी कोणत्या तरी अक्षराने झालेला असून त्याचे पहिल्याशी यमक झालेले असते. या दुसऱ्या शब्दाला स्वतःचा काही अर्थ असणे शक्यच नाही ही गोष्ट उघडच आली. जसे :—दगडाबिगड, फलाणा-बिलाणा, काळाबिळा, कट्टूगिट्टू, आंबटगिंबट, कसेबसे.

टीप :—यांपैकी 'ब' चा प्रचार दक्षिणेत, व 'ग' चा प्रचार कर्नाटकात विशेष आहे.

३ सवरणे हे पालुपद लागून काही अभ्यस्त शब्द तयार होतात. जसे:—करणेसवरणे, जाणेसवरणे, बोलणेसवरणे.

४ आरंभीच्या व्यंजनाची पुनरुक्ती होऊन काही शब्द तयार होतात. जसे :—केकाटणे, फोफावणे, सोसावणे, भांबावणे.

टीप :—संस्कृतातही अशा प्रकाराने धातूंपासून रूपे साधतात.

५ मूळशब्दांच्या समासाने व थोड्याफार पुनरुक्तीने नवीन शब्द तयार होणे हा अभ्यस्त शब्दांचा आणखी एक महत्त्वाचा प्रकार आहे.

यात मूळच्या शब्दाची पुनरुक्ती होऊन नवीन शब्द तयार होतो; किंवा मूळच्या जवळ जवळ सारख्या अर्थांच्या शब्दांचा समास होऊन त्यात थोडेफार यमकही साधते व त्यामुळे शब्दालंकाराची जोड होऊन समासाला वैचित्र्य, चटकदारपणा, हे गुण येतात. या प्रकारांची उदाहरणे :—

मी **गावोगाव** हिंडलो; जीवनकलह **दिवसेदिवस** जास्त कठीण होत आहे.

६ पुनरुक्तीने नवीन अभ्यस्त शब्द तयार होताना अवयवांच्या मध्ये आ, ओ, च, चा (ची; चे), न, यांपैकी काही तरी एखादे अक्षर येऊन त्यामुळे जोड शब्द तयार होतो. जसे :—बांधाबांध; गावोगाव, देशोदेश, रानोमाळ, घरच्घर, पैसाचपैसा, गावचेगाव.

अभ्यस्त शब्दांचे उपयोग.

§ १३३ (१) **आ** मध्ये येऊन झालेल्या धातुसाधित अभ्यस्त शब्दांनी ती क्रिया आधिक्याने, जोराने झाली आहे असा अर्थ दर्शविला जातो. जसे:—त्याने आपली सर्व बांधाबांध केली आहे.

(२) **ओ** मध्ये आल्याने समुच्चय व्यक्त होतो. जसे:—तो गावोगाव हिंडला. गावोगाव = सर्व गावे.

(३) **च, चा, न** यांनी अतिशयत्वाचा अर्थ दर्शविला जातो. जसे:—

पावसाने जिकडे तिकडे पाणीचपाणी झाले.
गावचा गाव उठला. माशांचे थवेच्याथवे दृष्टीस पडतात.
सरकाराने पैसानपैसा वसूल केला.

(४) द्विरुक्तीने पुढील अर्थ दर्शविले जातात. जसे:—

१. वस्तूंचा पृथकत्वाने निर्देश—सर्वांना एक एक लाडू द्या. मी घर घर हिंडलो. कंवडी कवडी करून त्याने पैसा मिळविला.

२. समुच्चयाने निर्देश:—तेथे बायका बायका बसल्या होत्या. (बायका-बायका = सर्व बायकाच). भाऊभाऊ वेगळे रहातात. (= सर्व भाऊ).

३. पृथकत्वपूर्वक समुच्चयाने निर्देश:—त्या मुलाने दगडाने काचेचे तुकडे तुकडे केले. त्या माराने त्याची हाडे हाडे मऊ होऊन गेली. मोठे मोठे पेरू वेचून काढा.

४. अतिशयत्व:—दारिद्र्याने त्याचे हाल हाल झाले. तिला भीतीने घाम घाम सुटला. त्याला व्यापारात पैसाच पैसा मिळाला. ती मौज पहावयास लोकांचे थवेच्या थवे जमले होते. त्या शहरात मोठे मोठे वाडे आहेत.

५. पूर्णत्व:—मी त्याची पैनपै चुकती केली. त्याची मला खडानखडा माहिती आहे. यात्रेस गावचे गाव आले होते.

तुम्ही माझ्या मागोमाग चला. तो उघडानागडा बसला होता. त्याचा स्वभाव अगदी गोड गोड साखर आहे. पाणी मंदमंद वाहते. कित्येक प्राणी हळूहळू चालतात. ते कडकडून भेटले. तो भडाभडा बोलतो. गावातील

मोठे लोक सभेस आले होते. "काठोकाठ भरू द्या पेला, फेस भराभर मोठे उसळूं द्या."

६. परिमाण, मापः——ब्राह्मणांस रुपया रुपया दक्षिणा दे. तो शिंपी बोट बोट कापड चोरतो.

७. संशय, आनिश्चितपणाः——मी जाईन जाईन म्हणतो.

८. सातत्यः——"आला आला प्राणि जन्मासि आला। गेला गेला बापुडा व्यर्थ गेला ॥"; तो मुलगा चालता चालता थकला.

९. आग्रहः—"घेई घेई माझे वाचे। गोड नाम विठोबाचें ॥"

१०. प्रकार, रीतः—तो हसत हसत बोलतो, लंगडत लंगडत चालतो. मला हसता हसता पुरेवाट झाली. बोलता बोलता झोप येते.

११. पौनःपुन्यः——मी त्याला सांगून सांगून दमलो. तो मार खाऊन खाऊन निगरगट्ट झाला आहे.

भाग तिसरा

प्रकरण बारावे

वाक्यविचार

वाक्य म्हणजे काय हे या पुस्तकाच्या आरंभीच सांगितले आहे. वास्तविक भाषा वाक्यांचीच झालेली असते म्हणून तीच भाषेची घटक आहेत असे समजले पाहिजे. वाक्यांचे घटक शब्द, व त्यांना परस्परांशी जोडणारे प्रत्यय वगैरे यांचा अभ्यास हाच व्याकरणाचा मुख्य विषय आहे. त्या विषयांपैकी शब्दांचे वर्गीकरण, शब्दघटना, व प्रत्ययांनी शब्दांना होणारे विकार आणि येणारे अर्थ इतक्या गोष्टींचा विचार आतापर्यंत झाला. यापुढे, वाक्यात शब्दांचा परस्परसंबंध येतो कसा, त्याबद्दल काही नियम, आडाखे वगैरे आहेत किंवा काय, या गोष्टींचा विचार करावयाचा आहे.

§ १३४ वाक्याचे मुख्य भाग दोन असतात. ज्याविषयी बोलावयाचे त्याचे वाचक शब्द, हा एक भाग; व जे म्हणावयाचे ते, हा दुसरा भाग. पहिल्या भागात ज्या वस्तूविषयी बोलावयाचे तिचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष निर्देश, तिचे वर्णन, यांचे वाचक शब्द—नामे, सर्वनामे, विशेषणे—असतात; व दुसऱ्या भागात क्रियापद हे मुख्य असून, क्रियेचे प्रकार दाखविणारे शब्द किंवा क्रिया ज्यावर घडते त्याचे वाचक शब्द वगैरे असतात. म्हणजे दुसऱ्या भागात क्रियापदे, क्रियाविशेषणे, कर्मवाचक नामे ही येतात. इतर शब्द- शब्दयोगी व उभयान्वयी अव्यये - यांचा उपयोग मुख्य शब्द व वाक्ये यांचा संबंध परस्परांशी जोडण्याकडे होतो. आता, वाक्याच्या या भागाचा परस्परांशी संबंध कसा काय येतो हे पाहू.

§ १३५ **वाक्यातील शब्दांची मांडणी**—ज्याविषयी काही तरी म्हटलेले असते तो कर्ता—किंवा ते कर्तृपद—असे म्हणू. हे एखाद्या वस्तूचे नांव, (प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीने) असावे लागते. या वस्तूचे काही गुणधर्म सांगावयाचे असले तर तेही तिच्याबरोबर सांगितले पाहिजेत. म्हणजे कर्त्याची विशेषणे ही त्याच्याबरोबरच आली पाहिजेत, हे सयुक्तिकच आहे. त्याचप्रमाणे, क्रिया ज्या पदार्थावर घडली त्याचे गुणधर्म सांगावयाचे असले तर तद्वाचक विशेषणेही त्या नामाबरोबर आली पाहिजेत. तसेच, क्रियेचे प्रकार दाखविणारे शब्द क्रियापदाजवळ जितके येतील तितके बरेच. प्रत्येक गटामधील निरानिराळ्या शब्दांची एकमेकात व्यवस्था याप्रमाणे लागली. आता एका गटाची दुसऱ्याशी संगती कशी लागते ते सांगतो. ज्याविषयी बोलावयाचे ते, म्हणजे कर्ता - पहिल्याने आला पाहिजे व जे म्हणावयाचे ते मागाहून आले पाहिजे. मराठी वाक्यांतील शब्दांची रचना या सामान्य नियमांना धरूनच असते. म्हणजे पहिल्याने विशेषणासह कर्ता, नंतर असतील तर क्रियेचे प्रकार दाखविणारे शब्द, नंतर असेल तर (विशेषणासह) कर्म, व शेवटी क्रियापद; अशा अनुक्रमाने शब्द येतात. क्रियाविशेषणांपैकी नुसत्या प्रकारवाचकांपेक्षा विशेष प्रकार म्हणजे क्रियेचे स्थळ, काळ, वगैरे दाखविणारे शब्द आधी; क्रिया ज्याच्या रोखाने होते ते तद्वाचक शब्द त्यानंतर; व ज्या साधनांनी होते तद्वाचक शब्द त्याहूनही नंतर; असा क्रम साधारणपणे लागतो. उदा०— मी त्यास काल रोजी गावात पाहिले; रामाने येथे बसून चाकूने लेखणी केली.

क्रियेचा आरंभ किंवा उगम व तिचा रोख यांचा संबंध परस्परांशी फार जवळचा असल्यामुळे तद्वाचक शब्द होता होईल तो जवळ जवळ येतात. उदा०, मी पुण्याहून मुंबईस गेलो.

वाक्यात संप्रदानार्थी चतुर्थी (वाक्याच्या दृष्टीने ही क्रियाविशेषणासारखीच असते) व कर्मपद अशी दोन पदे अर्थाकरिता जरूर असतील तर संप्रदानार्थी चतुर्थी आधी व नंतर कर्म येते. जसे:—श्रीकृष्णांनी अर्जुनास उपदेश सांगितला...रामाने पाखराला दगड मारिला.

टीप:—वर जो सामान्य नियम म्हणून दिला आहे, त्यात हा नियम आलेलाच आहे.

संबोधन बहुधा वाक्याच्या आरंभी येते. जसे :- बाळ, इकडे ये. पण, दुसऱ्या एखाद्या शब्दावर जोर द्यावयाचा असेल तर, तो शब्द व क्रियापद आरंभी येऊन संबोधन शेवटी येते. जसे :--**जपून** जा बरे, बाळ.

षष्ठीने विशेषणाचा अर्थ दर्शविला जातो. म्हणून षष्ठ्यंत शब्द ज्याचे विशेषण असेल त्याच्यापूर्वी घालतात. जसे :–माझी सोन्याची आंगठी हरवली आहे.

जर, तर, जेव्हा, तेव्हा, वगैरे उभयान्वयी अव्यये त्या त्या वाक्यांच्या आरंभी येतात. जसे :--काम तसा दाम. जर तू हे काम करशील तर तुला मी बक्षीस देईन. जेव्हा पहावे तेव्हा तू रिकामाच दिसतोस.

शुद्ध शब्दयोगी अव्यये (च, मात्र, ही, केवळ, सुद्धा) ही ज्या शब्दांना उद्देशून येत असतील त्यांचे पुढेच घालावी. जसे :–

(१) मीच मात्र पुस्तक वाचीन. (दुसरा वाचणारा नाही असा भाव).
(२) मी पुस्तकच (मात्र) वाचीन. (दुसरे काही वाचणार नाही).
(३) मी तेच (मात्र) पुस्तक वाचीन. (दुसरे पुस्तक वाचणार नाही).

§ १३६ **मराठी वाक्यातील पदांचा हा अनुक्रम सर्व प्रकारच्या वाक्यांत तसाच असतो.** आज्ञार्थी किंवा विध्यर्थी वाक्ये असतील तर क्रियापदाच्या रूपावरून; संकेतार्थी असतील तर संकेत-सूचक शब्दांवरून; व प्रश्नार्थक, उद्गारवाचक, वाक्यांत चिन्हे किंवा शब्द यांवरून; त्या त्या वाक्यांच्या आशयाचा बोध होतोच. इंग्रजी भाषेत काही प्रयोगांत शब्दांच्या जागा बदलाव्या लागतात, तसे करण्याची मराठीत जरूर नाही. उदाहरणार्थ:–

काल चांगला पाऊस पडला.	स्वार्थी
काल चांगला पाऊस पडला ?	प्रश्नार्थक.
काल चांगला पाऊस पडला काय ?	
कालच्या चांगल्या पावसाने पिके बरी यावीत.	
जर काल चांगला पाऊस पडता तर पिके बरी येती.	
पाऊस चांगला पडू दे, पडो.	विध्यर्थ.
पावसा, चांगला पड.	आज्ञार्थ.

§ १३७ **अपवाद**——पदांच्या अनुक्रमासंबंधाने सांगितलेला वरील नियम सामान्यतः खरा आहे. पण तो अबाधितपणे पाळला जातोच असे मात्र नाही. बोलणाऱ्याच्या किंवा लेखकाच्या कलाप्रमाणे त्यात फेरफार होतात. यांपैकीं एकच प्रकार सर्वसंमत झाला आहे, तो म्हणजे ज्या शब्दावर वक्त्याला किंवा लेखकाला जोर द्यावयाचा असेल त्याची नेहमीची जागा बदलून तो वाक्याच्या आरंभी घालणे. जसे :——

मूळ वाक्यः——राम पायी, काशीस गेला.

पायी रामा काशीला गेला. (यात ' पायी ' यावर जोर).

काशीला गेला राम पायांनीं. (यात ' काशीला ' यावर जोर).

पुनरुक्ती करून एखाद्या शब्दावर जोर देण्याचा दुसरा एक प्रकार आहे. तोही याच ठिकाणी सांगून टाकतो. हा प्रकार बहुतकरून व्यावहारिक बोलण्यात तेवढा येतो. उदा०—बाबांनी आम्हांला **खाऊ** आणिला आहे, **खाऊ**.

तो **काठी** घेऊन चालतो, **काठी**.

मी तुला हाक मारीत आहे, **मी**.

मी तुला **हाक** मारिली, **हाक**.

§ १३८ (१) अर्थाकरिता एखाद्या शब्दाचा काही उपयोग नसेल तर तो शब्द वाक्यात गाळला तरी चालते. उदा०——(तुम्ही) जा येथून; (लोक) असे म्हणतात की पूर्वी दंडकारण्यात राक्षसांची वस्ती होती.

(२) म्हणी, संप्रदाय, वगैरेत चटकदारपणा येण्याकरिता शब्द गाळतात. जसे :——(जसा) भाव तसा देव. चांभाराच्या देवाला खेटराची पूजा (शोभते, चालते).

§ १३९ कर्ता.

कर्त्यांचा विचार करिताना पाच गोष्टी लक्षात घ्यावा लागतातः——(१) कर्तृपदाचे प्रकार, (२) कर्तृपदाची विभक्ती, (३) कर्तृपदे एकापेक्षा अधिक असतील तर त्यांचे परस्परसंबंध, (४) कर्तृपदाचा अध्याहार किंवा लोप, (५) कर्त्यांचा क्रियापदाशी संबंध.

(१) कर्तृपदाचे प्रकार.

§ १४० नाम, सर्वनाम, विशेषणात्मक नाम, शब्दसमूह किंवा वाक्य यांपैकी काहीही कर्तृपदी येते. जसें:—

(१) **रामा** धावतो (२) **तो** फार चपळ आहे (३)'सन्मार्ग टाकूनि भले न जाती' (४) **वडिलांचे ऐकणे** प्राप्त आहे; **माझे जाणे** तुम्हांला पसंत नसेल तर नसो (५) **कोणी कोणाच्या व्यंगास हसावे** हे बरे नाही.

जेव्हा एखादे सबंध वाक्य कर्तृपदी असते त्यावेळी त्याच्या पुढे (१) हे, **हा प्रकार, ही गोष्ट, असा प्रकार, अशी गोष्ट** यांपैकी काहीतरी येऊन वाक्य पुरे होते. जसें:—मी दररोज येथे यावे हे बरे नाही—**हा प्रकार** बरा नाही....किंवा (२) **ही गोष्ट** बरी नाही **की** मी दररोज येथे यावे, असेही वाक्य करिता येईल.

§ १४१ कर्तृपदाची विभक्ती.

(१) कर्तरिप्रयोगात व संशयार्थी कर्ता प्रथमेत असतो; (२) कर्मणी व भावे प्रयोगात व विध्यर्थी आणि शक्यार्थी कर्ता तृतीयेत असतो व (३) शक्यार्थी किंवा संयुक्त क्रियापदांच्या प्रयोगात ज्याच्याविषयी विधान करावयाचे ते पद चतुर्थीत असते. उदा०—(१) रामा वाचितो, गोविंदा म्हणाला, सूत शौनकास बोलता झाला, कृष्णा हे काम करील, आज पाऊस पडावा.

(२) रामाने वाघ मारिला, रामाने रावणास मारिले, मुलांनी आईबापांची आज्ञा ऐकावी, माझ्याने चालवते.

§ १४२ एकापेक्षा अधिक कर्तृपदे.

(१) जेव्हा एकाच पुरुषाचे व एकाच लिंगाचे अनेक कर्ते समुच्चयवाचक उभयान्वयी अव्ययाने (आणि, व, आणखी) जोडिलेले असतात, त्यावेळी क्रियापद त्याच लिंगी व त्याच पुरुषी असते. उदा०—धर्म, भीम व अर्जुन भाऊ होते. हत्ती व घोडे, उमदे प्राणी आहेत.

पण, अनेक कर्तृपदे एकाच वस्तूला उद्देशून योजिलेली असतील तर क्रियापद एकवचनीच येते. उदा०:—मालोजीचा नातू, व शहाजीचा पुत्र,

शिवाजी हा मराठी राज्याचा संस्थापक झाला. पंढरीचा वारकरी, देहूकर वाणी, तुकाराम हा प्रासादिक कवी होता.

(२) कर्तृपदे निरनिराळ्या पुरुषी समुच्चयाने येतील तर क्रियापदाचे रूप करिताना आधी प्रथम पुरुष, त्या अभावी द्वितीय पुरुष, व शेवटी तृतीय पुरुष असा अनुक्रम लागतो. उदा०—तू व मी जाऊ; जातो. तो व मी जाऊ; जातो. तो व तू जा; जाता. ते व त्या जातात.

(३) समुच्चयवाचक उभयान्वयी अव्ययाने जोडिलेले कर्ते भिन्नलिंगी असतील तर क्रियापदाचे रूप नपुसकलिंगी अनेकवचनी होते. जसे:—राजा व राणी आली. राम, लक्ष्मण व सीता ही वनवासास गेली. नद्या व तळी पाण्याने भरली आहेत.

(४) समुच्चयवाचक उभयान्वयी अव्ययाने जोडलेल्या कर्तृपदांपुढे हा किंवा असा या दर्शक सर्वनामाचे योग्य ते रूप घालून ती जोडण्याचाही प्रचार आहे. (अ) अशा वेळी सर्व कर्तृपदे एकाच लिंगी असतील तर दर्शक सर्वनामाचे त्याच लिंगी अनेकवचनी रूप होते; व (आ) कर्तृपदे भिन्नलिंगी असतील तर दर्शक सर्वनामाचे रूप नपु. अनेकवचनी होते. उदा०,

(अ) गंगा, यमुना, सिंधू, ह्या नद्या उत्तर हिंदुस्थानात आहेत. सह्य व विंध्य हे पर्वत.

(आ) राम व सीता ही वनवासास गेली.

कधी कधी वरील ठिकाणी दर्शक शब्दांबरोबर पदार्थ किंवा वस्तु अशा-सारखा सामान्य अर्थाचा एखादा शब्द येऊन त्याच्या लिंगवचनाप्रमाणे क्रियापदाचे रूप बदलते. उदा०—दूधदही, भाजीपाला हे पदार्थ उपजीविकेला अवश्य आहेत.

(५) कर्तृपदे विकल्पबोधक उभयान्वयी अव्ययाने जोडलेली असतात त्यावेळी क्रियापदाचे रूप शेवटच्या कर्त्याप्रमाणे होते.

उदा०—मनी किंवा गोविंदा आला तर बरे.

(६) अनेक वेगवेगळ्या नामांचे मिळून एकच कर्तृपद झालेले असेल, व त्याने एकाच वस्तूचा बोध होत असेल, तर क्रियापद एकवचनी असते. उदा०, 'रोमिओ आणि ज्यूलिएट' हे शोकपर्यवसायी नाटक आहे.

§ १४३ कर्तृपदाचा लोप.

कर्तृपदाचा लोप खालील ठिकाणी होतो.

(१) आज्ञार्थी प्रयोगात.

(२) कर्ता निश्चयाने सांगता येत नसेल तेव्हा.

(३) कर्ता विवक्षित नसेल तेव्हा.

(४) प्रथम व द्वितीय पुरुषी केव्हा केव्हा (क्रियापदाच्या रूपावरून कर्त्याचा बोध होण्यासारखा असतो म्हणून).

(५) सामान्य विधान करावयाचे असेल तेथे.

(६) भावकर्तरी प्रयोगात.

उदा०—(१) रामा, जरा इकडे ये.

(२) यंदा पीकपाणी बरें आहे म्हणतात.

(३) थंड देशात लोकरीचे कपडे घालितात. तूप, तेल हे पदार्थ तोलून विकतात.

(४) " नसेन दिसलों कसा, नयन सर्वसाक्षी रवी; " जातोस तर जा.

(५) गर्जेल तो पडेल काय ?

(६) मला कळमळते.

§ १४४ कर्ता व क्रियापद.

कर्तरिप्रयोगात कर्त्याच्या लिंगवचनपुरुषांप्रमाणे क्रियापदाचे रूप बदलते.

(१) कर्त्याचे सन्मानार्थी अनेकवचन असेल तेव्हा क्रियापदाचे रूप अनेकवचनी होते. उदा०—गोविंदराव आले. बाईसाहेब म्हणाल्या.

(२) एखाद्याला संबोधून सन्मानाने बोलावयाचे असेल तर कर्तृपद तृतीयपुरुषी असते, व क्रियापदाचे रूपही तसेच असते. उदा०—रावसाहेब सांगतील ते मी करीन.

(३) शक्यार्थवाचक व अकर्तृक प्रयोगात क्रियापदाचे रूप नपु. एकवचनी असते. उदा०—मला फावले तर येईन. मला हे करवत नाही.

(४) कर्तृपद विवक्षित नसेल तेव्हा क्रियापद तृतीयपुरुषी अनेकवचनी असते. उदा०—असे म्हणतात की आर्य लोक उत्तरेकडून हिंदुस्थानात आले.

(५) एकापेक्षा अधिक कर्ते असतील त्या ठिकाणी होणारी रूपे § १४२ मध्ये मागे सांगितली आहेत.

§ १४५ **कर्म**

कर्त्याप्रमाणेच कर्माचाही विचार करिताना पुढील गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत. १ कर्मांचे प्रकार, २ कर्मांची विभक्ती, ३ एकापेक्षा अधिक कर्मपदांचे परस्परसंबंध, ४ कर्मपदाचा लोप, ५ कर्म व क्रियापद यांचा परस्परसंबंध.

§ १४६ **कर्मपदाचे प्रकार**

नाम, सर्वनाम, विशेषणात्मक नाम, शब्दसमूह किंवा वाक्य यांपैकी काहीही कर्मपदी येते.

उदा०—गोविंदाने **आंबा** खाल्ला.
सुतार खुर्ची तयार करितो व **ती** विकतो.
कोणी कोणाचे **वाईट** करू नये.
प्रजेचे **बरेवाईट** करावे हे राजाच्या हाती असते.
तो मला म्हणाला, **तू येऊ नको.**

§ १४७ **कर्मांच्या विभक्ती.**

(१) **कर्मपद नेहमी द्वितीया विभक्तीत असते.** जसेः—ईश्वर माझे **रक्षण** करील. विठू **गाय** बांधितो. रामाने **रावणास** मारिले.

(२) प्रथमपुरुषी व द्वितीयपुरुषी सर्वनामे मी—आम्ही, तू—तुम्ही; यांनी व्याकरणातील पुरुषत्वाचा विशेष रीतीने, स्पष्टपणे, बोध होतो. ही सर्वनामे कर्मे असतील तेव्हा त्यांना नेहमी प्रत्यय लागतात. उदा०—मी **तुला** हाकून देईन. त्याने **मला** मारिले.

(३) मागील कलमातील उदाहरणांत गर्भित असलेला तर्क जर उकलला, व तसाच पुढे चालविला, तर कर्मपदासंबंधी एक सामान्य नियम बांधता येतो तो असा:--

कर्मपद हे (१) जिवंत प्राण्याचे नाम असेल तर, किंवा निर्जीव पदार्थांचे नाव असूनही त्याला महत्त्व द्यावयाचे असेल, त्याविषयी गौरवाने बोलावयाचे असेल तर, त्या कर्मपदाला विभक्तीचे प्रत्यय लागतातच.

उलटपक्षी, (२) कर्मपद हें निर्जीव वस्तूचे नाव असेल तेव्हा, किंवा त्याचे विशिष्टत्व विवक्षित नसेल तेव्हा (त्याविषयी लघुत्वाने बोलावयाचे असेल तर), कर्मपदाला विभक्तीचे प्रत्यय लागत नाहीत.

उदा०—(१) मुले बेडकांना मारितात. एका कावळ्याने चिमणीला खाऊन टाकिले. आईने मुलास पाळण्यात निजविले. मनुष्याने धर्माला अनुसरले पाहिजे. या विश्वाला कसे चालवावे हे देवाला कळते. मी या दगडाला घेऊन काय करू ? या नासक्या आंब्याला काय मी खाऊ ? (रे० नवलकर.)

§ १४८ एकापेक्षा अधिक कर्मपदांचे परस्परसंबंध.

समुच्चयवाचक व विकल्पवाचक उभयान्वयी अव्ययांना जोडलेल्या अनेक कर्तृपदांविषयी जे नियम मागे § १४२ मध्ये सांगितले आहेत, तेच अनेक कर्मपदे असतानाही लागू पडतात; म्हणून ते येथे पुन्हा न सांगता उदाहरणे मात्र देतो.

(१) आम्ही आंबे व पेरू खाल्ले; चिंचा व शेंगा खाल्ल्या.
(२) आम्ही आंबे व केळी खाल्ली; आम्ही चिंचा व केळी खाल्ली.
(३) मी त्याने दिलेले फळ, केळे, खाल्ले.
(४) (अ) आम्ही आंबे व पेरू हे खाल्ले; (आ) चिंचा व केळी ही खाल्ली; किंवा मी आंबे व पेरू हे जिन्नस खाल्ले; ही फळे खाल्ली.
(५) मी लाडू किंवा पोळी खाल्ली.
(६) मी **हरि आणि त्रिंबक** वाचिले.

§ १४९ एकापेक्षा अधिक कर्मे.

हा विषय संपविण्यापूर्वी मथळ्यावरून सुचणाऱ्या दुसऱ्या एका आनुषंगिक

बाबीचा ऊहापोह केला पाहिजे. ती बाब म्हणजे काही क्रियापदांत वेगवेगळ्या प्रकारची दोन कर्मे असतात की काय ही होय. या धातूंचे दोन वेगवेगळे गट पडतात ते असे.

गट १ ला—कर, बनव, मान, समज, नेम, ठरव व योज.

गट २ रा—म्हण, बोल, विचार, सांग, शिकव, दे, दाखव, माग, पाठव.

यांपैकी पहिल्या गटातील क्रियापदांना दोन कर्मे (ती एकाच प्रकारची असोत किंवा वेगवेगळ्या प्रकारची असोत) लागतात हे म्हणणेच चुकीचे आहे. वास्तविक पहाता, हे धातू अपुऱ्या अर्थाचे आहेत. अस, हो, बन, या अकर्मक धातूंचा अर्थ पुरा होण्याकरिता त्यांना जसे कर्त्याशिवाय एक वेगळे पूरक पद लागते तशीच अवस्था या सकर्मक धातूंचीही आहे; म्हणजे यांच्या कर्माला पूरक पद जोडल्याशिवाय त्या क्रियापदांचा अर्थ पूर्णपणे व्यक्त होत नाही. उदा०—

शाहूने बाजीराव पेशवा केला, शाहूने बाजीरावाला पेशवा केले. त्याने तुला मूर्ख बनविले, ठरविले. मी तुला या कामी गुरु मानतो, समजतो. शिवाजीने प्रतापरावाला सेनापती नेमिले, गागाभट्टाला पुरोहित योजिले—वगैरे.

या वाक्यांत त्या त्या क्रिया वस्तुतः एकाच पदार्थावर होतात. उदा०— करण्याची क्रिया बाजीरावावर होते, नेमण्याची क्रिया प्रतापरावावर होते, वगैरे; म्हणून, या वाक्यांत बाजीराव, बाजीरावाला, तुला, प्रतापरावाला, गागाभट्टाला हीच कर्मपदे समजली पाहिजेत. उलटपक्षी पेशवा, मूर्ख, गुरु, सेनापती, या शब्दांना त्या त्या क्रिया वेगवेगळ्या वस्तूंवर झाल्यानंतरचे परिणाम सांगितले आहेत. म्हणून ही पदे कर्मपूरक आहेत असेच समजले पाहिजे. कारण, समजणे, नेमणे, करणे यांच्या क्रिया अनुक्रमे मूर्ख, सेनापती, पेशवा यांवर घडतात असे काही म्हणता येणार नाही. तेव्हा, हे शब्द कर्मपूरक होत. यांची विभक्ती, अर्थातच, द्वितीया. पण व्याकरण चालविताना या द्वितीयेचा अर्थ मात्र 'कर्म' न करिता 'कर्मपदाचे उद्देश्य' असा केला पाहिजे.

आता दुसऱ्या गटातील क्रियापदे घेऊ. या क्रियापदांचे अर्थ पुरे होण्याकरिता दोन प्रकारचे शब्द त्यांच्याबरोबर योजावे लागतात. एक, ज्या वस्तूंवर ती

क्रिया घडते तद्वाचक शब्द घातल्याशिवाय वाक्य पुरे होतच नाही; व या शब्दांना त्या क्रियापदांची खरी कर्मे म्हटले पाहिजे. दुसऱ्या प्रकारच्या शब्दांनी त्या क्रियेची दिशा किंवा तिचा रोख कोणीकडे आहे हे कळते. दिशा किंवा रोख दाखविणारे हे शब्द वाक्यात नेहमी विवक्षित असतातच असेही नाही. ते नसले तरी अर्थ होतो, किंवा झाल्यासारखा वाटतो. उदा०— **तुकाराम म्हणतात**–"भला कुणबी केलों । ना तरि दंभेंचि असतों मेलों ॥" या वाक्यात तुकाराम कोणाला उद्देशून म्हणतात हे विवक्षित नाही; ते गौण आहे, न सांगितले तरी चालेल, असे आहे. दुसरे उदा०–**असे म्हणतात,** की सापाला दोन जिभा असतात. या ठिकाणीही कोणाला उद्देशून बोलावयाचे हे विवक्षित नाही. **त्याने मोठा पराक्रम दाखविला,** या वाक्यातही तोच प्रकार. तेव्हा (१) या प्रकारचे, क्रियेचा रोख दाखविणारे शब्द वाक्यांत असलेच पाहिजेत असा नियम नाही; व (२) ते असतील तेव्हा त्यांचा खरा उपयोग क्रियेची दिशा दाखविण्याचा असतो. हा अर्थ मराठीत चतुर्थीने बरोबर व्यक्त होतो. म्हणून या शब्दांची चतुर्थीच मानणे बरोबर आहे.

इंग्रजीत या शब्दांना अप्रत्यक्ष कर्मे (Indirect objects) असे म्हणतात; पण इंग्रजी प्रयोग पाहिले तरी या शब्दांचा उपयोग कर्मार्थी न होता संप्रदानार्थीच होतो असे दिसते.

He said *to* me ... He gave ten rupees *to* me. He showed a picture *to* me.

या वाक्यांत to हे अर्थातच दिशा दाखविणारे शब्दयोगी अव्यय आहे. शिवाय, इंग्रजीत कर्म व इतर कारके यांची एकच विभक्ती (Objective case) मानितात; तेथे He gave me ten rupees, अशा वाक्यात rupees याचा अर्थ कर्म, व विभक्ती objective असे म्हटल्यानंतर, me याचीही विभक्ती objective, तेव्हा त्याचा अर्थ सांगतांना Indirect, personal object असे सांगण्याची पाळी येतेच. मराठीत संप्रदानाचे स्वतंत्र कारक कर्माच्या कारकापेक्षा वेगळे आहे. म्हणून मराठीत दोन कर्मे–एक प्रत्यक्ष कर्म, व दुसरे अप्रत्यक्ष–मानण्याची जरूरी नाही.

मराठीत अप्रत्यक्ष कर्मे मानण्याची जरूरी नाही, हे वरील विवेचनावरून स्पष्ट झालेच आहे. पण काही प्रयोगांची या म्हणण्याला अडचण येते असे

प्रथमदर्शनी वाटण्याचा संभव आहे; म्हणून ते प्रयोग पाहून या विषयाचा कायमचा निकाल येथेच करणे बरे. उदा०—

शिक्षक मुलांस घडा शिकवितो, असा प्रयोग घेतला तर त्यात काही अडचण दिसत नाही. वरील विवरणाप्रमाणे या प्रयोगाची संगती नीटच लागते. म्हणजे, घडा हे कर्म व मुलांस ही संप्रदानार्थी चतुर्थी.

पण, शिक्षक मुलांस लिहावयास शिकवितो, ती लिहावयास शिकते, वगैरे 'प्रयोगांत' लिहावयास याचे व्याकरण कसे करावयाचे ? रे. नवलकर 'लिहावयास' हे प्रत्यक्ष कर्म व पहिल्या वाक्यात मुलास हे अप्रत्यक्ष कर्म करावे या मताचे आहेत. माझ्या मते पहिल्या वाक्यात मुलास हेच खरे कर्म आहे. शिकविण्याची क्रिया मुलांवर प्रत्यक्ष रीतीने घडली असा अर्थ या ठिकाणी विवक्षित आहे. तो मुलांस पढवितो, शिकवितो-हे मुख्य वाक्य; व क्रियेचा हेतू **लिहावयास** या शब्दाने दाखविला आहे. तो मुलांस शिकवतो. का ? लिहावे यास–लिहिण्याकरिता-लिहावयास. या ठिकाणी हा **लिह्** या धातुसाधित नामाचा सविभक्तिक प्रयोग आहे. त्याचा एकंदरीत गोळाबेरजेने अर्थ 'तो मुलांस लिहिणे शिकवतो' असाच होतो हे खरे. पण गोळाबेरजेच्या अर्थावरून व्याकरण करीत नाहीत. ती लिहावयास शिकते, या दुसऱ्या वाक्यात. (वरील तर्कपद्धतीचा अवलंब केला तर) लिहिणे हे अकर्मक क्रियापद आहे, (सकर्मक क्रियापदाचा अकर्मक प्रयोग कसा होतो हे पुढील कलमात सांगितले आहे.) व लिहावयास ही संप्रदानार्थी चतुर्थी आहे. ती लिहावयास शिकते, हे वाक्य, मी जेवावयास बसतो, या वाक्यासारखेच हुबेहुब, घटना व अर्थ या दोन्ही बाबतीत आहे. मग ' मी जेवावयास बसतो ' यात जेवावयास हे जर बसतो याचे कर्म नव्हे (आणि ते नाहीच) व बसतो हे सकर्मक क्रियापदही नव्हे, तर दुसऱ्या वाक्यात शिकते हेही सकर्मक क्रियापद नव्हे व लिहावयास हे कर्मही नव्हे.

§ १५० कर्मपदाचा लोप.

मूळच्या सकर्मक क्रियापदाचा अकर्मक उपयोग मराठीत काही अर्थांनी होतो. उदा०—बोलणे हा धातू घेतला, तर'मूल बोलते'याचे दोन अर्थ होतात.

एक, मूल म्हणते--(सकर्मक) व दुसरा, मुलाला बोलता येते. **ज्या ठिकाणी एखादी क्रिया करण्याची नुसती शक्ती किंवा सवय असणे एवढाच अर्थ विवक्षित असतो त्या वेळी क्रियापदाचे अकर्मक प्रयोग होतात.** अर्थातच, या प्रयोगात कर्म येत नाही. या ठिकाणी कर्माचा लोप झाला असे म्हणण्यापेक्षा ती क्रियापदे तेवढ्यापुरती अकर्मकच आहेत असे म्हणणे जास्त सयुक्तिक वाटते.

उदा०—मूल बोलते (= त्याला बोलता येते). रामा गातो=त्याला गाता येते, किंवा गाण्याची सवय आहे.

फार ताप आला असता रोगी बडबडतो (बडबडण्याची क्रिया वारंवार करतो). तो सभेत चांगले बोलतो (बोलण्याची सवय आहे, बोलता येते,— अशा अर्थी).

§ १५१ कर्म व क्रियापद यांचा परस्परसंबंध.

सकर्मक क्रियापदांचा (१) स्वार्थी, वर्तमान, भविष्य व रीतिभूतकाळी; (२) आज्ञार्थी (३) संकेतार्थी, वर्तमानकाळी व भाविष्यकाळी; अशा सहा ठिकाणी कर्तरिप्रयोग होतो. व (४) स्वार्थी भूतकाळी, (५) विध्यर्थी (६) संकेतार्थी भूतकाळी, बहुधा कर्मणी प्रयोग होतो.

टीपः—१. बहुधा म्हणण्याचे कारण 'शीक' वगैरे काही धातूंत तसे होत नाही.

२. सकर्मकर्तरी प्रयोगात क्रियापदाचे लिंगवचन कर्त्याप्रमाणे बदलते व कर्मणी प्रयोगात ते कर्माप्रमाणे बदलते हा सामान्य नियम आहे.

अपवाद :-

(१) कर्तृपद तू, तुम्ही, यांचे तृतीयान्त रूप असता, भ्रांतीने क्रियापदाच्या रूपास एकवचनी स व अनेकवचनी त असे प्रत्यय बोलण्यात लावितात. उदा०—

१. "वत्से, लिहिलेस उत्तम श्लोक"-मोरोपंत. २. तुम्ही हा वेष का घेतलात ते सांगा.

(२) भावे प्रयोगात क्रियापद नपु. असते. जसे :-रामाने रावणास मारिले.

अपवाद :—

१ वैद्याने रोग्यास बरा केला.

४ "काय दिनकरा । केला कोंबड्याने खरा."

५ मी मुलीला निजविली.

वरील ३, ४, ५ या वाक्यांत भावे प्रयोग व्हावयाला पाहिजे.

पण या प्रकारचे प्रयोग भाषेत इतके रूढ झालेले दिसतात की, त्यांचे उच्चाटन करणे कठीण आहे. प्रयोगशरणा वैय्याकरणाः हेच खरे.

प्रकरण तेरावे

वाक्यपृथक्करण

§ १५२ **केवल-वाक्य**—वाक्याचे मुख्य भाग उद्देश्य व विधेय असे दोन असतात हे पूर्वी सांगितलेच आहे. उद्देश्यात, ज्या वस्तूविषयी बोलावयाचे असेल तद्वाचक शब्द, व त्याप्रमाणे तिच्या गुणधर्मांविषयी माहिती देणारे (म्हणजे विशेषणात्मक) शब्द, असे दोन प्रकारचे शब्द येतात. विधेयात मुख्य शब्द क्रियापद हा असून त्या क्रियेचे प्रकार दाखविणारे शब्द त्याच्या अनुषंगाने येतात. हे आनुषंगिक शब्द कोणते ते थोडक्यात सांगतो. काही क्रियापदांची क्रिया कर्त्यापेक्षा वेगळ्या पदार्थांवर घडते, तद्वाचक शब्दांना आपण कर्मे असे म्हणतो. अर्थातच, कर्मवाचक शब्द व कर्मांचे गुणधर्म सांगणारे शब्द हे विधेयाचे आनुषंगिक असेच म्हटले पाहिजे. त्याचप्रमाणे, असणे, होणे, शोभणे, करणे, यांसारख्या अपूर्णार्थक क्रियापदांचा अर्थ पूर्ण करण्याकरिता वाक्यात जे पूरक शब्द घालावे लागतात तेही विधेयाच्या अनुषंगाने येणारे असेच म्हटले पाहिजे. क्रियाविशेषणे व विभक्त्यंत नामे ही तर उघड उघड क्रियेचे प्रकारच दाखवितात; तेव्हा तीही विधेयातच यावयाला पाहिजेत.

वरील विवेचनाप्रमाणे पडणारे वाक्याचे दोन मुख्य भाग (उद्देश्य व विधेय) पुढील कोष्टकात दाखविले आहेत. वरील कोष्टक एकेरी साध्या वाक्यांना पूर्णपणे उपयोगी पडते.

	उद्देश्य		विधेय			
	उद्देश्यविस्तार	मुख्य उद्देश्यपद	मुख्य विधेयक	वि. सहित कर्म	वि. सहित पूरक	विधेयविस्तार
१		रामा	जातो			
२	काळा	घोडा	धावतो			
३	तो काळा	घोडा	खातो	हिरवे गवत		
४	तुमची	गाय	आहे		दिसावयाला सुरेख	
५		रामाने	केले	बिभीषणास	राजा	
६	तो	घोडा	पळाला			गाडी घेऊन, मरधाव,
७	धर्मांचा भाऊ, भीम	याने	मारिले	दुर्योधनाला		गदायुद्धात
८		मला	गेले पाहिजे			उद्या, पुण्यास, परीक्षेकरिता
९	माझे हे व्याकरणावरील	पुस्तक	लिहून झाले			तीन महिन्यात
१०		(जाणे यातील भाव)	जाववते			मला रोज दहा मैल

या एकेरी, साध्या वाक्यांत एकच विधेय असते; याला कोणी कोणी **केवलवाक्य** असे म्हणतात. यात उद्देश्य व विधेय हे दोन भाग असलेच पाहिजेत. पण उद्देश्यविस्तारक शब्द, विधेयपूरक शब्द, विधेयविस्तारक शब्द हे असतील किंवा नसतील. आता या प्रत्येक भागात कोणकोणत्या प्रकारचे शब्द येतात हे थोडक्यात सांगतो.

(१) उद्देश्य–पूरक :—

१ विशेषण–तो **तांबडा** घोडा पडला.
२ क्रियाविशेषणासह विशेषण-**फार तांबडा** रंग झगझगीत दिसतो.
३ कृदंत–पुण्याकडे **जाणारी** गाडी निघून गेली. **पिकलेले** फळ (क्रि. वि. सह) झाडावरून पडले.
४ षष्ठ्यंत विशेषण–**आमचा** घोडा आजारी आहे.
५ समानाधिकरण शब्द–**तू** गरिबाने यात पडू नये.

(२) उद्देश्य :—

नाम–**घोडा** पळाला.
सर्वनाम–**तो** तांबड्या रंगाचा होता.
विशेषण–**गरिबांनी** श्रीमंतांचा हेवा करू नये.
वाक्यांग–**खोटे बोलणे** पाप आहे.

नामाप्रमाणे येणारे कोणतेही शब्द–तुझा '**क**' नीट आला नाही.

(३) **विधेय** नेहमी क्रियापदच असते.

(४) **कर्म** :—

नाम–	घोडा	**चंदी**	खातो.
सर्वनाम–	घोड्याला	**ती**	दे.
नामात्मक विशेषण–	दैवा, तू	**गरिबाला**	का छळतेस ?
वाक्यांग–	मी तुझे	**म्हणणे**	ऐकत नाही.

नामाप्रमाणे येणारा कोणताही शब्द–'**क**' ला काना दे.

टीप—कर्माचा विस्तार करणारे शब्द कर्त्यांचा विस्तार करणाऱ्या शब्दांसारखेच आहेत.

•

(५) (अ) **कर्तृगामी पूरक**

नाम – राम **राजा** झाला.
विशेषण–गोविंदा **शहाणा** आहे.
कृदंत – तो **भ्यालेला** दिसला.

(आ) **कर्मगामी पूरक**–वैद्याने रोग्यास **बरे** केले;
मी त्यास **जाताना** पाहिले.

(६) **विधेयविस्तारक**

विभक्त्यन्त नाम–रामा **गावास** गेला.
नाम –तो **दोन मैल** चालला.
क्रिया. वि.– घोडा **खाली** पडला.
विशेषण – तो **चांगले** वाचितो.
कृदंत – तो **धावताना** पडला.

§ १५३ संयुक्त व मिश्र वाक्ये

केवलवाक्यांचे पृथक्करण कसे करावे हे आतापर्यंत सांगितले. आता एकापेक्षा अधिक क्रियापदे ज्यांत आहेत अशा वाक्यांचे पृथक्करण कसे करावे हे सांगतो. एकापेक्षा अधिक क्रियापदे असतील तर जितकी क्रियापदे तितकी निराळी वाक्ये आहेत असेच म्हटले पाहिजे. उदा०, रामा आंबा पाडतो व खातो, ही दोन वाक्ये आहेत,–रामा आंबा पाडतो, रामा आंबा खातो–व कर्त्यांची द्विरुक्ती टाळण्याकरिता ती एक केलेली आहेत. पण, ती एकमेकांपासून वेगळी, स्वतंत्र, अशीही लिहिता येतील; किंवा वरच्यासारखी ती एकत्र लिहिली तरी ती खरोखर अलगच आहेत, व त्यांचा परस्पराशी संबंध फारसा जिव्हाळ्याचा नाही. मोळीतील लाकडे, एखाद्या पेटीत ठेविलेले चेंडू, किंवा कपाटात ठेविलेली पुस्तके, यांचा जितका परस्परसंबंध असतो, तितकाच,–कदाचित् थोडासा जास्त पण तत्त्वतः त्याच स्वरूपाचा–संबंध अशा वाक्यांचा एकमेकाशी असतो; व म्हणूनच अशा वाक्यांना समुच्चयाने एकत्र केलेली वाक्ये, संयुक्त वाक्ये, असे म्हणतात; व ही जोडणाऱ्या उभयान्वयी अव्ययांस समुच्चयबोधक उभयान्वयी अव्यये असे म्हणतात.

एकापेक्षा अधिक वाक्ये एकत्र जोडण्याचा हा एक प्रकार आहे. तसाच व तितक्याच महत्त्वाचा दुसरा प्रकार आहे, आणि त्या रीतीने एकत्र येणाऱ्या वाक्यांना मिश्रवाक्ये असे म्हणतात. मिश्रवाक्यातील परस्परसंबंध केवळ समुच्चयाच्या स्वरूपाचे नसून त्यापेक्षा थोडेसे जास्त जिव्हाळ्याचे असतात. मिश्र वाक्यातील वाक्ये परस्परावलंबी असून ती एकमेकांपासून अगदी अलग अशी कधीच करिता येत नाहीत. उदा०,

१ तुम्ही जावे हे मला पसंत आहे.

२ "जैसा बोले तैसा चाले."

३ जर तू मला दहा रुपये देशील तर मी तुला हे पुस्तक विकीन.

४ असे म्हणतात की रावणाला दहा तोंडे होती.

५ त्याने जावे म्हणून मी पराकाष्ठा केली.

या मिश्र वाक्यांतील घटकभूत वाक्ये एकमेकापासून अगदी अलग, वेगळी करिता येणार नाहीत. या वाक्यांचा आणखी पुढे विचार केला तर असे दिसेल की प्रत्येकात एक वाक्य मुख्य आहे व दुसरे स्वतंत्र नाही, तर मुख्य वाक्यावर अवलंबून राहणारे गौण आहे. उलटपक्षी, संयुक्त वाक्यात सारख्याच योग्यतेची स्वतंत्र अशी दोन तरी वाक्ये असली पाहिजेत. याशिवाय तिसराही एक प्रकार कल्पिता येईल, तो म्हणजे संयुक्तमिश्र वाक्याचा. पण, वाक्यपृथक्करणाच्या दृष्टीने त्याचे वेगळे महत्त्व काहीच नसल्यामुळे त्याचा अंतर्भाव संयुक्त वाक्यातच केला आहे. आता या दोन प्रकारच्या (मिश्र व संयुक्त) वाक्यांचे पृथक्करण कसे करावे हे तपशीलाने सांगतो.

§ १५४ मिश्र वाक्ये

मिश्र वाक्यात एक मुख्य किंवा प्रधान वाक्य, व एक किंवा अधिक गौण वाक्ये असतात; व प्रधानवाक्य व गौणवाक्य (अथवा गौणवाक्ये) यांचा परस्परसंबंध जिव्हाळ्याचा असतो. या संबंधाच्या स्वरूपावरून व्याकरणकारांनी गौणवाक्याचे तीन प्रकार केले आहेत, व त्यांना वेगवेगळी नावे दिली आहेत. ती अशी :—

नाम–वाक्य, विशेषण–वाक्य, क्रियाविशेषण–वाक्य.

(१) **नाम–वाक्य**–केवलवाक्यात ज्या ठिकाणी नाम येते त्या ठिकाणी त्याच अर्थाचे वाक्य येऊन त्यामुळे केवलवाक्याचे मिश्रवाक्य होते. अशा वेळी त्यातील गौणवाक्याला, (नामाबद्दल येणाऱ्या वाक्याला, कारण, तेच गौण असते) **नाम–वाक्य** असे म्हणतात. उदा०:—

तू बोलतोस ते (तुझे बोलणे) मला आवडत नाही.

रामभाऊंनी मला **काय घडले** ते (वर्तमान) सांगितले.

(२) **विशेषण–वाक्य**–केवलवाक्यात ज्या ठिकाणी विशेषण येते, त्या ठिकाणी त्याचेबद्दल एक वाक्य येऊन त्यामुळे केवलवाक्याचे मिश्रवाक्य होत असेल तेव्हा त्या विशेषणाचे जागी येणाऱ्या वाक्याला **विशेषण–वाक्य** म्हणावे. जसे :—

रामा **जो आंबा पिकला आहे तो** खातो.

(३) **क्रियाविशेषण–वाक्य**–केवलवाक्यात जेथे क्रियाविशेषण किंवा त्यासारखे वाक्यांश येतात, त्या ठिकाणी त्याच अर्थाचे वेगळे वाक्य येत असेल तेव्हा त्या वाक्याला **क्रियाविशेषण–वाक्य** असे म्हणावे. जसे :—

(**ताप आला असता**) तापात रोग्याने अन्न खाऊ नये.

तो आला तर (त्याच्या येण्याने) मला आनंद होईल.

§ १५५ नाम–वाक्यांचा उपयोग.

नामवाक्ये खालील जागी येतात :—

उद्देश्य––**तो यावा** हे बरे नाही.

कर्म—रामा म्हणतो की **मी परीक्षेत उतरेन**. **तू काय केलेस** ते मला सांग.

समानाधिकरण पद—माझी कल्पना की **तो आज यावा** ती अगदीच चुकली.

नामवाक्याचा प्रधानवाक्याशी संबंध जोडण्याचे दोन प्रकार आहेत. एक, नामवाक्य पहिल्याने घालून त्यापुढे **तो, हा, असा,** यांपैकी कोणत्या तरी दर्शक सर्वनामाचे स्वतंत्र, किंवा नामासकट रूप घालणे हा; या प्रकारात नामवाक्य विधेयापूर्वी येते. दुसरा, विधेय पहिल्याने घालून 'की' या उभयान्वयी अव्ययाने त्याला नामवाक्य जोडावयाचे. या दोन्ही प्रकारांची उदाहरणे वर आलीच आहेत.

§ १५६ विशेषण–वाक्यांचा उपयोग.

वाक्यात ज्या ज्या ठिकाणी नाम किंवा तत्समान शब्द येतात, त्या ठिकाणी त्यांचे गुणधर्म दाखविण्याकरिता विशेषणवाक्ये घालणे शक्य आहे. जसे :—

उद्देश्यविस्तारक—जो माणूस व्यर्थ वेळ घालवितो तो मूर्ख आहे.

कर्मविस्तारक—जो माणूस व्यर्थ वेळ घालवितो अशाला लोक मूर्ख म्हणतात.

विधेयपूरकाचे विस्तारक—ज्याने लोभाकरिता शेकडो पापे केली असा तो मनुष्य आहे.

क्रियाविशेषणार्थक नामाचे विशेषण—ज्या दिवशी सण असतो त्या दिवशी लोक घरी गोडधोड करितात.

टीप :—विशेषणवाक्ये विशेष्याशी 'जो,' 'जसा,' 'जितका,' 'जेवढा' इत्यादी संबंधी सर्वनामे किंवा विशेषणे यांनी जोडण्यात येतात, व त्यांचे अनुसंधी 'तो,' 'तसा' 'तितका' 'तेवढा' इत्यादी शब्द मुख्य वाक्यात येतात. उदाहरणे वर दिलीच आहेत.

क्रियाविशेषणवाक्याचा संबंध प्रधान वाक्यातील क्रियापदांशी, विशेषणांशी, धातुसाधितांशी, किंवा क्रियाविशेषणांशी येतो.

संबंधी क्रियाविशेषणे (जेथे, जेव्हा, जसे), कारणदर्शक क्रियाविशेषणे व उद्देशदर्शक, संकेतदर्शक व (केव्हा केव्हा) स्वरूपदर्शक उभयान्वयी अव्यये, यांचे योगाने गौण क्रियाविशेषण–वाक्यांचा प्रधान वाक्याशी संबंध जोडिला जातो. यांची उदाहरणे वेगळी देत नाही. पण ती पुढील कोष्टकात मिश्रवाक्यांचे पृथक्करण करून दाखविले आहे तेथे सांपडतील.

§ १५७ **मिश्र-वाक्यांचे पृथक्करण**–हे केवलवाक्याच्या पृथक्करणाहून मुळीच वेगळे नाही. फक्त, प्रधानवाक्य व गौणवाक्य अगर गौणवाक्ये यांचा परस्परसंबंध स्पष्ट करून सांगण्याकरिता संबंधवाचक शब्द व संबंधांचा प्रकार या दोन नवीन बाबी कोष्टकात घालाव्या लागतात. उदाहरणे पुढे कोष्टकात दिली आहेत.

§ १५८ **संयुक्त वाक्ये**

संयुक्त वाक्यात दोन सारख्याच योग्यतेची मुख्य विधेये असतात, म्हणजे दोन किंवा अधिक प्रधान वाक्यांचे मिळून संयुक्त वाक्य होते, असे पूर्वी सांगितलेच आहे. त्याचप्रमाणे, संयुक्त वाक्यात गौणवाक्य किंवा वाक्ये आली तरी पृथक्करणाच्या दृष्टीने ती गोष्ट फारशी महत्त्वाची नाही हेही तेथेच सांगितले आहे. तेव्हा, हे पोटभेद बाजूला ठेवून, संयुक्त वाक्यांचे स्वरूप कसे काय असते, म्हणजे त्यांत येणाऱ्या अंगभूत प्रधान वाक्यांचे परस्परांशी संबंध कसे जडतात, अंगभूत वाक्ये कशी ठरवावयाची, या मुख्य विषयाकडेच वळू

संयुक्त वाक्य कशाला म्हणावे या संबंधाने काही ठिकाणी तरी बराच वादविवाद करण्याला जागा आहे असे दिसते. उदा०—

राम व सीता वनवासास गेली.
रामा आंबा पाडितो व खातो.
रामा आंबा पाडून खातो.
सिंह हा उमदा, पण क्रूर पशू आहे.
त्याने गरिबांस पैसे, अन्न व कपडे दिले.

इत्यादी वाक्यांत एकापेक्षा जास्ती विधाने आहेत हे उघडच आहे. पण काहीत ती स्पष्ट आहेत, (रामा आंबा पाडितो, रामा आंबा खातो) म्हणजे तेथे दोन वेगवेगळी विधेये, क्रियापदे, आहेत व काहीत दुसरे विधेय गर्भित (रामा आंबा पाडून खातो), तर काहीत एकच विधेय पण अनेक उद्देश्ये, अनेक कर्मे...आहेत असा प्रकार आहे. या सर्वांना **अस्पष्ट-संयुक्त वाक्ये** म्हणावे असे रा. दामले (शास्त्रीय मराठी व्याकरण) यांचे मत दिसते.

याच विषयाची मीमांसा करिताना कै. प्रिं. आगरकर म्हणतात :—

" अशा प्रकारे अनेक उद्देश्ये, अनेक विधेये, किंवा कर्मे, विस्तारके एकत्र मिळविली म्हणजे संयुक्त वाक्यांची संख्या वाटेल तेवढी वाढते. " व याप्रमाणे भूमितिश्रेढीने वाढणाऱ्या वाक्यांचे उदाहरण म्हणून आगरकर देतात—" त्यांनी व आम्ही, पुण्यास व वसईस, पेरू व केळी, वाटिली व खाल्ली " (एकंदर वाक्ये सोळा).

तार्किक पद्धतीनेच जावयाचे म्हणजे पृथक्करणात ही सोळा वाक्ये निरनिराळी करावी लागतील. पण ही रिकामी दगदग टाळण्याकरिता सोईचा म्हणून जो मार्ग रा. दामले सुचवितात तो असा – " ज्या वाक्यांत अनेक उद्देश्ये किंवा अनेक विधेये एका किंवा अनेक विधेयोद्देश्यांशी संयुक्त असतात, त्यांचे वाक्यांस पृथक्करणात अस्पष्ट संयुक्त वाक्ये म्हणतात. कारण की, मूल उद्देश्य व मूल विधेय यांनी वाक्य होते; बाकीचे अवयव वाक्यदृष्ट्या गौण असल्यामुळे, त्यांच्या बाहुल्याने वाक्यबाहुल्य होत नाही. "

सोईकरिताच पहावयाचे तर, आणि रा. दामले यांच्यापेक्षा जास्त तर्कशुद्धपणाने देखील, असे म्हणता येते की " विधानाचे (वाक्याचे) सारे अवसान विधेय किंवा क्रियापद यावर असते. ती जितकी असतील तितकी निराळी वाक्ये आहेत असे समजणे साहजिकच आहे. संकुचित व संक्षिप्त वाक्यात क्रियापदाशिवाय इतर शब्दांचा अध्याहार केला असल्यास, ते सांगणे किंवा न सांगणे हे वाक्य पाहून ठरविले पाहिजे. त्याविषयी ठरीव नियम घालिता येत नाही. " – आगरकर : वाक्यमीमांसा.

या सर्व चर्चेचे थोडक्यात तात्पर्य असे की, वाक्यात निदान दोन सारख्याच योग्यतेची, समानाधिकरणी विधेये स्पष्ट क्रियापदांनी (कृदंतांनी नव्हे) सांगितलेली असतील, म्हणजे **निदान दोन क्रियापदांनी दोन वेगळाल्या क्रिया** (कर्ता एक असो किंवा अनेक कर्ते असोत) **सांगितल्या असतील, तरच ते वाक्य संयुक्त म्हणावे.**

संयुक्त वाक्यातील अंगभूत वाक्यांचा संबंध मिश्र—वाक्यातील संबंधाइतका जिव्हाळ्याचा नसतो. त्याचे स्वरूप समुच्चयाचे आहे ही गोष्ट मागे आलीच आहे. तिच्या तपशिलात शिरावयाचे तर असे म्हणता येईल की, संयुक्त

वाक्यातील अंगभूत प्रधान वाक्ये परस्परांशी चार प्रकारच्या उभयान्वयी अव्ययांनी जोडिलेली असतात, ती अशी :—

१ **समुच्चयवाचक उभयान्वयी अव्यय** :— वारा आला **आणि** पाऊस गेला.

२ **न्यूनत्वबोधक** :—मी त्याला बोलाविलें, **पण** तो आला नाही.

३ **विकल्पबोधक** :—तुम्ही तो जिन्नस तरी परत दिला पाहिजे, **किंवा** त्याची किंमत दिली पाहिजे.

४ **परिणामबोधक**:—मी सांगतो **म्हणून** तुम्ही ते काम केले पाहिजे.

§ १५९ संयुक्त वाक्यांचे पृथक्करण.

मागे मिश्रवाक्यांच्या पृथक्करणाविषयी जे लिहिले आहे तेंच या ठिकाणीही तंतोतंत लागू पडते. म्हणून ते येथे वेगळे सांगण्याची जरूरी नाही.

§ १६० मिश्र व संयुक्त वाक्यांच्या पृथक्करणाचे कोष्टक.

उद्देश्य		विधेय				वाक्याची जात	संबंध-दर्शक शब्द
उद्देश-विस्तार	मुख्य उद्देश्य-पद	मुख्य विधेय-पद	विशेषणा-सहित कर्म	विशेषणासहित पूरक	विधेय-विस्तार		
१	असे	नाहीं		आमचे म्हणणे		प्रधानवाक्य	
२ सारखा उद्योग करण्याची स्वाभाविक कृत्रिम	साधने	असतील			सगळ्याच देशातील लोकात	गौण नामवाक्य संबंध (१) पैकीं 'असे' याकडे	—
३ सारखे	वैभव	प्राप्त करून घेता येईल			सर्वांस	गौण नामवाक्य क्रमांक २ शीं समानाधिकरणी	व
४ एक	गोष्ट	आहे		पक्की ठाऊक	आम्हास	प्रधानसमानाधिकरणी	
५	ते	प्राप्त होणार नाहीं			त्यांना; कधीही; वर सांगितलेल्या पद्धतीने उद्योग केल्याशिवाय;	गौण नामवाक्य उद्देशार्थी	की

६ जे	सुख	असेल		प्राप्त होण्या-सारखे	कोणत्याही देशातील लोकांस	गौण, विशेषण वाक्य, याचा संबंध (५) पैकी तें सुख याकडे आहे.	जे
७ उद्योगाचा	कंटाळा	(असतो)			ज्या लोकांस	गौण, विशे. वाक्य, याचा संबंध (१०) 'असे लोक' याकडे आहे.	जे
८ काही	हौस	असली				गौण, क्रि. विशेषणवाक्य वाक्यसंबंध (९) कडे.	जर
९ नियामक	उद्योगाची (हौस)	असते				गौण, विशेषणवाक्य-संबंध (१०) कडे.	तर
१० असे	लोक	चढणार नाहीत			मोठेपणास कधीही	प्रधान	
११ आमची तशी	स्थिति	होऊन गेली आहे			सध्या तर	प्रधान समानाधिकरण	पण

प्रकरण चवदावे

विरामचिन्हे

विराम म्हणजे विश्रांती किंवा विसावा घेणे, किंवा क्रिया करिताना थांबणे. आपण बोलताना किंवा लिहिताना वाक्यांच्या शेवटी किंवा मध्ये थांबतो त्याला विराम असे म्हणतात. कमी-जास्ती थांबतो, किंवा थांबावे, हे दाखविण्याकरिता ज्या खुणा उपयोगात आणतो त्यांना विरामचिन्हे असे म्हणतात. बोलताना किंवा लिहिताना वाक्यांच्या शेवटी किंवा मध्ये थांबण्याचा उद्देश बोलणाराला किंवा लेखकाला विश्रांती मिळावी एवढाच नसतो, तर अर्थ कळण्याला, ऐकणाराला व वाचणाराला मदत व्हावी असाही असतो. वाक्यातील भागांचे तारतम्याने महत्त्व, आणि त्यांचा व वाक्याचा परस्परसंबंध या गोष्टी लक्षात घेऊन कमीजास्ती किती थांबावयाचे हे ठरवावे लागते; व त्याप्रमाणे चिन्हे द्यावी लागतात.

§ १६१ **विरामचिन्हे एकंदर दहा आहेत :—**

स्वल्पविराम (,)	प्रश्नचिन्ह (?)	कंस ( ) [ ]
अर्धविराम (;)	उद्गारचिन्ह (!)	
अपूर्णविराम (:)	अपसारणचिन्ह (—)	विग्रहचिन्ह (-)
पूर्णविराम (.)		अवतरण ('—' "—")

§ १६२ **स्वल्पविराम** (,)—वाक्यात अगदी कमी थांबावयाचे असेल तेथे स्वल्पविराम घालतात; उदा०

१ एकाच प्रकारचे दोहोंपेक्षा जास्त शब्द एका ठिकाणी आले असता ते एकमेकांपासून तोडून दाखविण्याकरिता (,) योजितात.

कर्ते—रामा, गोविंदा व कृष्णा हे गावास गेले.
कर्मे—आम्ही आंबे, पेरू व केळी ही खाल्ली.

पूरके—घोडा हा चपळ, उमदा व देखणा प्राणी आहे.

विस्तारके—हा चपळ, उमदा व देखणा घोडा शर्यत खास जिंकील.

टीप--याचप्रमाणे कर्मांच्या व पूरकांच्या विस्तारकांचा प्रकार समजावा. उदा०, मी हा करार तुम्हास स्वखुषीने, अक्कलहुशारीने व बिनतक्रार करून देतो.

२ समानाधिकरणी शब्दांच्या मध्ये--रावणाचा भाऊ, बिभीषण हा रामाकडे जाऊन मिळाला. रामाचा भाऊ, लक्ष्मण यास बाण लागून तो घायाळ झाला.

३ संबोधनापुढे स्वल्पविराम येतो, व अशा रीतीने ते वाक्यातील इतर शब्दांपासून निराळे होते. रामा, तू इकडे ये.

४ अवतरणचिन्हांत एखादे वाक्य यावयाचे असेल तर त्यापूर्वी स्वल्पविराम येतो. जसे--रामा म्हणाला, " मी कृष्णाकडे जातो. "

५ पण, परंतु, अथवा, किंवा, की, या उभयान्वयी अव्ययांपुढे स्वल्पविराम देतात.

६ वाक्यांश, अस्फुटवाक्ये, ही विशेष लांबलचक असतील तर ती निराळी दाखविण्याकरिता स्वल्पविराम घालितात. उदा०—

अशा प्रकारे राम अयोध्येचे राज्य करीत असता, तेथे एक दिवस ही गोष्ट घडली.

अहमद याप्रमाणे आपले चऱ्हाट वळत असता, दोन घटका निघून गेल्या.

वितंडवादात शिरणे, किंबहुना-शेषं कोपेन पूरयेत्-ही युक्ती लढविणे, यातही तो मागे घेत नसे.

७ गौणवाक्ये प्रधानवाक्यापासून वेगळी करण्याकरिता स्वल्पविराम घालितात :—

मी काही पुराणिक नाही, की विष्णूचे पुराण सांगू लागलो म्हणजे विष्णूसारखा देव सर्व देवांत नाही असे म्हणावे, शिवाचे पुराण सांगू लागलो की शिवाच्या महात्म्यासच सर्वांत वर चढवावे !

८ पण, संबंधी वाक्यांनी विशेषणाचा अर्थ येऊन विशेष्य मर्यादित होत असल्यामुळे, त्यांचे व विशेष्यांचे मध्ये स्वल्पविराम बहुधा घालू नये. उदा०—

मागचा येतो तो पुढच्यास बरे म्हणवितो. जसे करावे तसे भरावे.

९ समानाधिकरणी वाक्ये (अनेक प्रधान वाक्ये, अगर अनेक गौण वाक्ये) किंवा वाक्यांगे, एकमेकांपासून अलग करण्याकरिता स्वल्पविराम घालितात. जसे :—आम्ही बोलत पुढे गेलो इतक्यात सूर्य मावळला, सायंकाळची गार झुळूक मनाला आनंद देऊ लागली, पक्षी आपापल्या घरट्यांकडे परतले, शेतकरी व गुराखी आपापली कामे आटोपून गावाकडे परतू लागले.........

§ १६३ अर्धविराम.

अर्धविराम हा स्वल्पविरामापेक्षा दीर्घ आहे, व याचा उपयोग वाक्ये एकमेकांपासून अलग दाखविण्याकडे होतो. एखाद्या मोठ्या (संकीर्ण) वाक्यात एक विधान मुख्य असून इतर विधाने त्याची उदाहरणे म्हणून, किंवा त्याच अर्थाची वेगळ्या शब्दांनी पुनरुक्ती करण्याकरिता, किंवा त्याचेच विशेष स्पष्टीकरण करण्याकरिता, येत असतील तर अशी वाक्ये मुख्य विधानापासून व एकमेकांपासून अर्धविरामाने वेगळी दाखवितात. जसे :—

‘ अलेक्झांडर, सीझर, नेपोलियन...इत्यादी जगप्रसिद्ध शूरांना ज्या सुखाचा अनुभव कधी झाला नाही; तुर्कस्थान, इराण, चीन........इत्यादी देशांच्या बादशहांस अगणित द्रव्यापासून जे सुख कधीही प्राप्त झाले नाही; रमणीय मंदिरे व विशाल उद्याने यात जे सांपडावयाचे नाही; जे सुवासात, सुग्रासात किंवा अत्यंत रूपवती स्त्रियांच्या सहवासात नाही;....ते सुख विद्वानास प्राप्त होते. ’ आगरकर—निबंध.

‘ त्याचप्रमाणे त्या वेळची लोकस्थिती कशी होती—म्हणजे, बापलेक, नवरा-बायको...धनीचाकर....इत्यादिकांचे परस्परसंबंध कसकसे होते; धर्मावर लोकांची कितपत श्रद्धा होती, व त्यांचे आचरण कसे होते; मेकॉलेप्रभृती तत्त्वज्ञान्यांच्या मताप्रमाणे सर्व येथून तेथून लबाड होते किंवा कसे;...लोकात

कोणत्या विद्यांचा अभ्यास कितपत सुरू असे, व अभ्यासाची रीत कशी होती; ...याप्रमाणे लोकातील उत्सव, रीतिरिवाज, पेहेरावाच्या तऱ्हा वगैरे सर्व काही इतिहासात समाविष्ट झाले पाहिजे.' चिपळूणकर—इतिहास.

'बाळासाहेब नेन्यांचे स्थळ जसे तुम्हाला हवे तसे आहे. घरी श्रीमंती आहे; खायला प्यायला कमी नाही; सासुसासरे नाहीत; आणखी....' वाईकर भटजी.

§ १६४ अपूर्णविराम.

याचा एक विशेष उपयोग आहे. एखादे अवतरण द्यावयाचे असता किंवा अनेक वस्तूंची गणती करावयाची असता अपूर्णविराम घालून त्यावेपुढे अपसारणाचे चिन्ह घालितात. जसे :—

तुकाराम म्हणतात :— जेथे जातो तेथे तू माझा सांगाती.

§ १६५ पूर्णविराम.

वाक्य पूर्ण झाले म्हणजे शेवटी पूर्णविराम घालितात. जसे :—रामा काल गावाहून आला. तो म्हणाला, "वाटेत मला पाऊस फार लागून माझा बराच खोळंबा झाला, पण मी कसा तरी घरी पोहोचलो."

प्रत्येक वाक्यांच्या शेवटी पूर्णविराम येत नाही हे उघडच आहे. मिश्र व संयुक्त वाक्यात मध्ये मध्ये स्वल्पविराम, अर्धविराम, अपूर्णविराम वगैरे येतात हे मागील नियमात स्पष्ट केलेच आहे. तेव्हा अर्थ व वाक्य यांना खरोखरीच विश्रांतीची जरूर असेल तर त्या ठिकाणी पूर्णविराम यावयाचा हे उघडच झाले. आता, एकंदरीत सर्वच वाक्ये लहान लहान, साधी, सोपी, सरळ असून पूर्णविराम पुष्कळ यावे; की, भाषाशैलीत मिश्र, संयुक्त व सोपी वाक्ये सरसहा येऊन पूर्णविराम कमी यावे; ही लेखकाच्या अभिरुचीचीच गोष्ट आहे. तिच्यासंबंधाने नियम असा काही करता येणार नाही. पण, एवढे मात्र सांगता येईल, की पूर्णविराम लवकर आले तर भाषेचा ओघ संथपणे वहात नाही, तर नदीच्या पात्रात जागजागी खडक असले म्हणजे जसा प्रवाह अडखळतो व त्याला खळखळाट असतो, अशासारखा प्रकार होतो. उलटपक्षी असे अडथळे नसले तर प्रवाह शांत व गंभीर असा वाटतो. पण त्याचबरोबर

ठोही गोष्ट लक्षात ठेवावयाला पाहिजे, की जसे उथळ प्रवाहातून पलीकडे जाणे हे सोपे असते तसेच लहान लहान स्वतंत्र वाक्ये असलेल्या भाषेचा अर्थ समजणे हे देखील सोपे असते. परंतु, गंभीर भाषा समजावयाला कठीण असते. मुलांकरिता लिहिलेल्या पुस्तकात लहान लहान वाक्ये पुष्कळ असावी; त्याचप्रमाणे प्रत्येक विधान स्वतंत्रपणे व स्पष्टपणे श्रोत्याच्या किंवा वाचकाच्या मनावर बिंबले पाहिजे, व अनेक विधानांचे समुच्चयाने वाचकाच्या मनावर वजन, दडपण, पडले पाहिजे अशी वक्त्याची किंवा लेखकाची इच्छा असेल तर वाक्ये तुटक करावीत एवढेच सामान्यतः सांगता येईल.

उदा०—१. ते वसंतऋतूचे दिवस होते, पण " सुखाः प्रदोषा दिवसाश्च रम्याः । सर्वं प्रिये चारुतरं वसंते " ।। याप्रमाणे कविकुलगुरूंनी केलेले वर्णन प्रत्ययास आले नाही. दिवस रम्य नसून दुर्दिन होते. आकाश रविप्रकाशमय नसून दुःखसंवेदक व उद्वेगकर होते. प्रदोषसमय सुखकर नसून शैत्यसंस्कार-युक्त होते; व जनमनास उपभोगप्रवण न करिता सुखास्वादपराङ्मुख करीत होते.

उदा०—२. " उभयता कार्यभागी माया करितात, व मुख्य श्रीमंत व यजमान स्वामींची पूर्ण कृपा, यास्तव त्यांचे कल्याण करावे, फौज ठेवावी, प्रसंगी पडली सेवा करून दाखवावी, हे तुमचे कर्म. राजकीय कार्यभागात आपण शिरावे तेथे चार क्षुल्लक, एखादा दगा केला तरी धण्याचे दौलतेस अपाय आणि आपली हाणी...एक दोन कुफार तोडले म्हणजे सर्वांवरी दाब बसेल; भारीपणा होईल; शत्रूस भयप्रदर्शन होईल ! फौज जथेल, सरदार हुकमात रहातील. कळेचना तेथे काय सांगावे ! रुपया मिळेल. सर्व गोष्टी होतील."

सरदार गोविंद हरी पटवर्धन मिरजकर यांचे

चि. गोपाळ हरी पटवर्धन यास पत्र.

§ १६६ **अपसरणचिन्ह**—याचा अपूर्णविरामाबरोबर होणारा उपयोग पूर्वी सांगितलाच आहे. याशिवाय त्याचा दुसरा मुख्य उपयोग म्हणजे विवक्षित अर्थाशी प्रत्यक्ष संबंध नसलेली अशी एखादी नवीन, वेगळीच, गोष्ट वाक्यात सांगावयाची असेल त्यावेळी अपसरण चिन्ह घालितात. उदा०,

माझे मत असे आहे की–पण ते वेगळे असे सांगावयाला कशाला पाहिजे !– माणसाने सचोटीने वागावे.

§ १६७ **कंस**––वाक्यात गाळला तरी चालेल अशा प्रकारचा, थोडासा आगंतुक अशा प्रकारचा, मजकूर घालावयाचा असेल तर तो कंसात घालितात.

§ १६८ **विग्रहचिन्ह**––समासातील शब्द जोडण्याकरिता याचा उपयोग करितात.

वंशी नाद–नटी तिला कटि-तटीं खोवोनि पोटी-पटीं ॥

वेणु-ध्वनीं तो सुर-गायकांनी । त्यांच्या विमानातहि वायकांनी । आश्चर्य कानीं पडताचि केलें ।......

§ १६९ **अवतरण** (" – ") तुकाराम म्हणतात :–"सत्य संकल्पाचा दाता भगवान."

§ १७० **प्रश्नाचिन्ह** (?)––प्रश्नार्थक वाक्याच्या शेवटी येते. उदा०, रामा, तू परत कधी येशील ?

टीप––एखाद्या साध्या विधानात प्रश्न अंतर्भूत झालेला असेल तर तेथे प्रश्नचिन्ह घालीत नाहीत. जसे :––रामा, तू कधी येशील ते मला सांग.

§ १७१ **उद्गारचिन्ह**––(!) हर्ष, खेद, तिरस्कार, आश्चर्य वगैरे विकार दाखविण्याकरिता (!) चा उपयोग करितात. जसे :––

'नद्यांच्या या आक्रस्थाळी सपाट्यात कितीक दगडागोट्यांचा चुराडा झाला असेल ! कित्येक झुडपांना त्यांनी आपल्याबरोबर ओढीत नेले असेल ! कित्येक मातीच्या ढिगाऱ्यांचा स्वाहा केला असेल ! कित्येक किड्यांना जलसमाधी दिली असेल !'

वा. ब. पटवर्धन––विरोळ्याने काय शिकविले !

प्रकरण पंधरावे

अलंकार व त्यांचा उपयोग

चांगल्या लेखनाचे गुणधर्म सांगावयाचे असतील तर मांडणी व भाषा यांचा मनोवेधकपणा हा एक त्यांतील गुण म्हणून सांगता येईल. लेखनातील विचार वाचणाराला समजले पाहिजेत, इतकेच नव्हे, तर ते त्याला रुचले पाहिजेत, त्याचे रंजन झाले पाहिजे, विचार परिणामकारक झाले पाहिजेत. विशेषत: एखादी कविता वाचीत असताना आपल्याला हा अनुभव येत असतो. करुणेचे शब्द ऐकून मन सद्गदित होते, डोळ्यांतून अश्रू वाहू लागतात; वीरश्रीचे शब्द ऐकून स्फूर्ती उत्पन्न होते आणि भयवाचक शब्दांनी अंगावर भीतीचे रोमांच उभे राहतात; अशा प्रकारचा अनुभव सर्वांना सर्वत्र येतो. भाषेच्या या सर्व गुणांना मिळून मनोवेधकपणा किंवा चटकदारपणा असे म्हणता येईल. हा गुण साधण्याच्या अनेक प्रकारांपैकी एक म्हणजे अलंकारिक भाषेचा उपयोग, याविषयी येथे थोडे विवेचन करितो.

§ १७२ **"भाषेस शोभा आणणारा जो धर्म त्यास अलंकार असे म्हणतात."** अशी अलंकाराची व्याख्या करून अलंकारिक भाषेचे उपयोग कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी सांगितले आहेत, ते असे :—अलंकारांच्या योगाने एकीकडे "मनाचे रंजन होते," व त्याबरोबरच "मन अर्थ सुखाने ग्रहण करीत असते," व त्या नादात मुख्य अर्थ "चांगला व खरा आहे अशी बुद्धी होते." जसे औषधात साखर मिसळली असता तिच्या गोडीमुळे औषधाचा कडूपणा किंवा तुरटपणा अनुभवास न येता औषधच गोड आहे असे वाटते तशीच ही गोष्ट आहे. बोलणारा किंवा लिहिणारा जर चतुर असला तर तो आपल्या भाषणाच्या किंवा लिहिण्याच्या रसाने दुर्बल अर्थसुद्धा ऐकणारास किंवा वाचणारास सबळ आहे असे भासवितो; मग मूळच्या खऱ्या व सबळ गोष्टी तो अधिकच रंगवून सांगेल यात काय आश्चर्य आहे !

§ १७३ अलंकार दोन प्रकारचे आहेत; एक शब्दालंकार व दुसरे अर्थालंकार.

शब्दाच्या नादापासून सुख किंवा दुःख ही होतात. काही शब्दांचे नाद कानाला गोड लागतात, तर काहींचे कर्कश लागतात. भाषेत ज्या प्रकारचा रस आणावयाचा असेल त्या प्रकारचे विकार, किंवा ज्या भावना वाचकांच्या मनात उद्दीपित करावयाच्या असतील त्या भावना, यांना अनुकूल नाद उत्पन्न होतील अशी शब्दांची रचना करणे याला शब्दालंकार म्हणतात. उदाहरणार्थ, कृष्णाबरोबर वनात खेळावयाला गेलेल्या गोपबालांची उत्सुकता वर्णन करताना वामन पंडित म्हणतातः— "**गडबडोनि समस्तहि धावले....**"

या ठिकाणी "**गडबडोनि**" या शब्दाच्या नादानेच गडबड व्यक्त होते. हा शब्दालंकार.

§ १७४ **अनुप्रास** व **यमक** हे मुख्य शब्दालंकार आहेत.

"एक, दोन, तीन वर्णांची वारंवार आवृत्ती होत असली म्हणजे अनुप्रास होतो." जसे :—

हस्तीते धुतले, जळीं बसविले मालिन्यही नाशिलें

या ओळीत 'ले' या अक्षराने अनुप्रास साधिला आहे.

दोन तीन अक्षरे जवळजवळ असून ज्या क्रमाने ती असतील त्याच क्रमाने त्यांची पुन्हा पुन्हा आवृत्ती होणे याला **यमक** म्हणतात.

कड्यावरुनिया **उड्या** प्रथम टाकुनी त्या **गड्या**
गडे पशुप **भेटती** तटातटां भुजीं **आंगड्या**
फुगोनि तनु **फाटती** मनगटीं कडीं **दाटती**
सुखें बहुत **वाटती** विरहसिंधु ते **आटती**. —वामन.

शब्दालंकारांपासून आनंद होण्यास अर्थ समजावा लागतोच असे नाही. केवळ नादावरून अर्थाची अंधुक कल्पना येण्याला मदत होते, किंवा नादामुळे आनंद होतो. या कारणाने विद्वान व रसिक लोक या अलंकारांना "गौण" मानितात.

गद्यलेखनात शब्दालंकारांचा उपयोग करण्याने भाषेला कृत्रिमपणा येतो म्हणून गद्यात त्यांचा उपयोग करीत नाहीतच म्हटले तरी चालेल. भावना-प्रधान गद्यभाषेत क्वचित् एखादा दुसरा शब्दालंकार आला, व तोही अर्थाची हानी न होता आला, तर भाषेला थोडासा चटकदारपणा येतो एवढेच फार तर म्हणता येईल.

§ १७५ **अर्थालंकार**—आता अर्थालंकाराविषयी लिहितो. भाषा परिणाम-कारक व्हावयाला तिच्या योगाने वाचकाच्या मनात कोणता तरी भाव उत्पन्न झाला असला पाहिजे, कोणती तरी मनोवृत्ती उचंबळली पाहिजे. याला ज्यांनी सहाय्य होते असे अर्थाचे प्रकार म्हणजे अर्थालंकार. उदा:—'शिवाजी शूर होता,' या साध्या विधानापेक्षा 'शिवाजी सिंहाप्रमाणे शूर होता' या विधानाने त्याच्या शूरत्वाची कल्पना वाचकाला जास्त स्पष्टपणे व जास्त चटकदारपणे कळते. हाच अलंकारांचा खरा उपयोग आहे.

एखादी गोष्ट चटकदारपणाने सांगण्याचे अनेक विविध प्रकार आहेत. ती मूळची समजावयाला सोपी असो किंवा कठीण असो, ती दुसऱ्या कोणत्या तरी वस्तूसारखी आहे, किंवा वेगळी भिन्न आहे, असे सांगितल्याने तिचा चटकदारपणा वाढतो. त्याचप्रमाणे ती प्रत्यक्षपणाने न सांगता ती ज्या कारणांनी घडून येते ती कारणे सांगून, किंवा तिच्यापासून होणारे परिणाम सांगून, ती अप्रत्यक्ष रीतीने सुचविणे यानेही चटकदारपणा साधतो; किंवा तिचा दुसऱ्या वस्तूशी इतर कोणत्या तरी प्रकारचा संबंध दाखवून दिल्यानेही चटकदारपणा साधतो. या दृष्टीने विचार करिता अर्थालंकारांचे एकंदर तीन मुख्य प्रकार करिता येतील; ते असे :—

(१) सादृश्य-विरोध यांच्या आधाराने होणारे अलंकार. (२) कार्यकारणसंबंधाचे अलंकार. (३) इतर.

आता याचे तपशिलाने वर्णन करितो.

(१) साधर्म्यमूलक अलंकार.

§ **१७६ उपमा.** सादृश्यमूलक अलंकारांतील सर्वांत सोपा व सर्वांत महत्त्वाचा अलंकार **उपमा** हा आहे. सादृश्यमूलक इतर अलंकारांत उपमा

स्पष्ट किंवा गर्भित असतेच. म्हणून प्रथम **उपमा** म्हणजे काय हे पाहिले पाहिजे. दोन वस्तूंमधील सादृश्य सांगणे ही उपमा. अर्थातच, उपमेला एक उपमेय (ज्याला उपमा द्यावयाची ती **प्रस्तुत** वस्तू), एक उपमान (जिची उपमा द्यावयाची ती **अप्रस्तुत** वस्तू), साधारणधर्म व तद्वाचक शब्द, अशा चार गोष्टी लागतात. या सर्व वाक्यात व्यक्त केलेल्या असतील तर त्या उपमेला **पूर्णोपमा** म्हणतात, व त्यांपैकी काही निर्दिष्ट केलेल्या नसतील तर तिला **लुप्तोपमा** म्हणतात. अलंकारादर्शकारांनी उपमेचे लक्षण असे केले आहे :—

लक्षण—दोघांमध्ये भासे सादृश्यश्री तरीच उपमा ते ॥

उदा०—(पूर्णोपमा) "हे कृष्ण तुझी **कीर्ती हंसी सी** स्वर्धुनींत **न्हाते**." यात **कीर्ती** हे उपमेय, **हंसी** हे उपमान, **सी** साधारणधर्मवाचक शब्द, **न्हाणे** हा साधारणधर्म.

उदा०—माघारा नृप फिरतां बळ परते **अब्धिचें जसें अंबु**।
स्वरथावरुनि उतरुनी कोपावेशें तदा गदापाणी।
कुरुकटकांत मिळाला तोहि धनंजय **धनंजयावाणी** ॥
नव नव निघति विजयशर, **माहेरीं गीत जेविं दळपांत** :
संशप्तकांत शिरती, **हरिणांच्या सिंह जेविं कळपांत** ॥

मालोपमा—एकाच उपमेयाला अनेक उपमाने असली म्हणजे मालोपमा.

उदा०—जो धैर्ये धरसा, सहस्रकरसा तेजें, तमा दूरसा।
जो रत्नाकरसा गभीर......

उत्प्रेक्षा—जेव्हा उपमेय हे **जणू काय** उपमानच आहे असे वर्णन केलेले असते तेव्हा उत्प्रेक्षा होते.

या अलंकारात **की, काय, जणो, जणो काय, जसे काय, गमे, वाटे, भासे**—अशा प्रकारचे उत्प्रेक्षावाचक शब्द असतात.

उदा०—शास्त्रप्रोक्तविधीनें रथ कल्पुनि शीघ्र आणिला शल्यें।
जेवि मनोरथ साक्षात् केला दैवेंचि सिद्ध वात्सल्यें ॥

गेला सबळ सहरि नृप निजपरकटका हतां पहात रणीं ।
वाटे भूवरि आला सुतवधसंजाततताप हा तरणी ॥

मालोत्प्रेक्षा—एकाच उपमेयावर अनेक उपमानांची संभावना केलेली असते तेथे मालोत्प्रेक्षा.

उदा०—समरीं मत्त मतंगज, कीं दीघे व्याघ्र, कीं मृगाधिपती ।
कीं वृष, कीं घन, कीं ग्रह, कीं अंधक स्मरारातीं ॥

टीप :—की, जणो की, की काय, जणो काय, यांसारखे उत्प्रेक्षावाचक शब्द स्पष्टपणे सांगितलेले असतात ती वाच्योत्प्रेक्षा. **तसे व्यक्त नसतात ती व्यंग्योत्प्रेक्षा** होते.

व्यंग्योत्प्रेक्षा—

उदा०—होऊनि शैलशिखरावरि लंबमान ।
हे गर्जतात घन दुंदुभिच्या समान ॥
ऐकोनि शब्द उडती शिखि पक्षपातें ।
तें वीजती मणिमयव्यजनें नभातें ॥

रूपक—उपमेयाचे उपमानाशी सादृश्य दाखविताना उपमेय हे उपमानच आहे असे म्हणण्याने रूपक अलंकार होतो.

उदा०—मदन-शत्रु-शरासन हें महा ।
मदनमूर्तिच केवळ राम हा ॥
करिल सज्ज कसा धनु आपण ।
अहह दारुण, तात, तुझा पण ॥

तो शर कृत्यानळसा दुर्घटचक्रोद्धति-क्रियानळसा ।
गांठी कुरुबळविजयप्रासादाच्या रविप्रभा कळसा ॥
कुंतीनंदन चंदन, झाली तत्खंडनक्षणीं जागी ।
धांवे कर्णांवरि भुजशाखेपासूनि शक्ति ते नागीं ॥

परंपरा-रूपक—एक रूपक केल्यामुळे दुसरेही त्यामुळे करावे लागते अशा ठिकाणी परंपरित रूपक होते.

उदा०—माझा **मनोपघुप** लुब्ध बहूत झाला ।
तुझे **पदांबुजयुगीं** रहिवास केला ॥

टीप—यात मनाला भ्रमराचे रूपक केल्यामुळे पदांना कमळाचे रूपक करणे आलेच.

माला—रूपक—उदा०—कवी सभेचें मंडन । कवी भाग्याचें भूषण ॥
नाना सुखांचें संरक्षण । ते हे कवी ॥

अतिशयोक्ती—ही रूपकाची अखेरची पायरी आहे असे म्हटले तरी चालेल. वर्णनात मर्यादा नसली म्हणजे **अतिशयोक्ती** होते. हिचे प्रकार अनेक आहेत. येथे एक दोन उदाहरणेच देतो.

उदा०—जो अंबरीं उफळतां खुर लागला हे ।
तो चंद्रमा निजतनूवरि डाग लाहे ॥
जो या यशास्तव कसें धवलत्व नेघे ।
शृंगारिला हय, तयावरि भूप वैघे ॥—रघुनाथ पंडित.

जरि सगण सकळ हरि, यम, वरुण, कुबेरादि लोकपति आले ।
जिंकीन तेहि; मद्गुरु—शक्तिपुढे काळशक्तिहि न चाले ॥

निदर्शना—उपमान व उपमेय यांचे वाक्यार्थ सारखेच होणे म्हणजे निदर्शना. हे करणे काय, ते करणे काय, दोन्ही सारखीच असे वर्णन—

उदा०—सर्पांते बिसतंतुनें सुदृढ जो बांधावया इच्छितो ।
किंवा, वज्रमणी शिरीषकुसुमें भेदावया धावतो ॥
किंवा, तो मधुबिंदुनें मधुरता क्षाराब्धिला आणितो ।
जो मूर्खास सुभाषितें वश करूं ऐसें झणी बोलतो ॥

अपन्हुती—वस्तु पाहून ही ती नव्हेच तर दुसरीच आहे असे कल्पनेने म्हणणे म्हणजे अपन्हुती.

उदा०—न हें नभोमंडल, वारिराशी ।
न तारका, फेंसचि हा तयाशी ॥
न चंद्र हा, नावचि चालताहे ।
न अंक तो, तीवर शीड आहे ॥

छेकापन्हुती—या अलंकारात केलेले वर्णन दोन पदार्थांस लागते; व त्यांपैकी एकाचे हे वर्णन आहे काय असा प्रश्न विचारिल्यावर "त्याचे नव्हे" असे उत्तर देऊन कवी ते दुसऱ्या पदार्थांचे आहे असे सुचवितो.

उदा०—अंबरगत परि पयोधरांते रगडुनि पळतो दुरी।
काय हा धीट म्हणावा तरी ॥
तो नंदाचा मूल काय, गे, सांग कन्हया हरी।
नव्हे, गे, मारुत मधोदरीं ॥—रामजोशी.

भ्रांतिमान

लक्षण—होतो पदार्थ देखुनि भ्रम तरि तो भ्रांतिमान् अलंकार।

उदा०—वदन तुझें देखुनिया मानितसे कमल मत्त हा भ्रमर ॥

—अलंकारप्रकाश.

भृंगें विराजित नवीं अरविंदपत्रें।
पाहून मानुन तिचींच विशाल गात्रें ॥
घालीन अंजन अशा मतिनें तटाकीं।
आहा! वृथा उतरलों, भिजलों, विलोकीं ॥ —रघुनाथ पंडित

संदेह—पदार्थ पाहून मनाला हा अमुक पदार्थ की नव्हे असा संशय येतो असे वर्णन असते तेथे संदेहालंकार होतो.

उदा०—जरी मुख कशास सोम, जरि नेत्र हे पाहिले।
कशास कमले, जरि भ्रुकुटि—चाप हें देखिलें ॥
अनंगधनु कासया, जरिहि कुंतलें कासया।
पयोदपटलें, जरी सुतनु ही रमा कासया ॥

अनन्वय—जेव्हा उपमेयाला तोड नाही, "त्याच्यासारखे तेच" असे म्हणतात, त्यावेळी **अनन्वय** अलंकार होतो.

उदा०—अर्जुनसम वीर नसे, मागे पुढे न व्हायाचा।
गगन कसें गगनासम, सागर भासे जसाचि सागर तो।

उल्लेख—

लक्षण—एकच वस्तू अनेकांना अनेक दृष्टींनी दिसते तेव्हा उल्लेख हा अलंकार होतो.

उदा०—भीमावरि नैषादी जातो उचलून भुज सतोमर तो ।

अन्यासि काळ, भीमा ज्वलनाला शलभ भासतो, मरतो ॥

स्मरण-एखादी खुणेची वस्तू पाहिल्याबरोबर गतानुभवाची आठवण होते हा **स्मरणालंकार**..

उदा०, अलि-पुंज देखतां मज सीतेचे केश लक्ष्मणा स्मरती ॥

अप्रस्तुतप्रशंसा (अन्योक्ती)—

या अलंकारात, ज्या गोष्टीचे वर्णन करावयाचे तिचे न करिता, ज्या गोष्टीचे उदाहरण घ्यावयाचे तिचेच वर्णन केलेले असतेः—

उदा०—वत्सा धनंजया ! बहू झालीं तरि रोधितील काय तणें ।

करिती निजपथदूषककंटकमुखभंग सुज्ञ पायतणें ॥

येथे समस्त बाहिरे बसतात लोक ।

कां भाषणें मधुर तूं करिशी अनेक ॥

हे मूर्ख, यांस किमपीहि नसे विवेक ।

रंगावरूनि तुजला गणितील काक ॥

टीप—यात " लेकी बोले सुने लागे " असा प्रकार असतो.

चेतनागुणोक्ती—जड किंवा अचेतन पदार्थांवर सचेतन पदार्थांच्या धर्मांची कल्पना करणे म्हणजे चेतनागुणोक्ती.

उदा०—बहुयत्न करी, प्रार्थी, परि धरिलें सोडिनाच चाक रसा ।

द्विजशाप मान्य परिसा गुरु, तीस न कर्ण मान्य चाकरसा ॥

दृष्टांतः—एखादा विशेष प्रकृतार्थ मनात येण्याकरिता दुसऱ्या विशेष अप्रकृत अर्थाचें उदाहरण दिले म्हणजे दृष्टांत.

उदा०—जगलां तिघे पृथेचे सुत, दोघे साधु तेहि माद्रीचे।

लंघावे दवदहनें कूट कसें निजबळें हिमाद्रीचें ॥

अर्थांतरन्यास—प्रस्तुत सामान्याचे समर्थन अप्रस्तुत विशेषाने, किंवा प्रस्तुत विशेषाचे समर्थन अप्रस्तुत सामान्याने केलेले असते तेथे अर्थांतरन्यास होतो.

उदा०—आली जरी कष्ट—दशा अपार । न टाकिती धैर्य तथापि थोर ॥	प्रस्तुत सामान्य
केला जरी पोत बळेंचि खालें । ज्वाळा तरी ते वरती उफाळे ॥	अप्रस्तुत विशेष
तादितर खग भेणें वेगळाले पळाले । उपवनजलकेली जे कराया मिळाले ॥	प्रस्तुत विशेष
स्वजन गवसला जो त्याजपाशी नसे तो । **कठिण समय येतां कोण कामास येतो** ॥	अप्रस्तुत सामान्य

तूं या महाप्रसादें व्यसनीं बुडसी म्हणोनिया हित मी ।
कथिन पुन्हाहि तुज, **भले भ्रमतां पथ दाविती खळा हि तमीं** ॥
नेत्रें उघडुनि त्यांच्या लक्षुनि हर्षांसि, मारिले अरिते ।
ऐसे समजे राजा, **तर्क खरा चित्त साधुचें करितें** ॥

दीपक—याला दीपक म्हणतात याचे कारण लक्षात ठेवण्यासारखे आहे. राजवाड्यात लावलेल्या दिव्याचा उजेड जसा रस्त्यातही पडतो, तसाच वर्ण्य प्रस्तुत वस्तूचा धर्म अप्रस्तुताला लागू पडतो असे यात दाखविलेले असते.

उदा०—शोभे मदानें कलम, प्रतापानें महीपती ।

विरोध किंवा विरोधाभास—

लक्षण—दोन वस्तूंत खरा विरोध नसता बाहेरून विरोध भासतो तेथे हा अलंकार होतो. जसेः—

उदा०—वज्रापेक्षाहि कठिणें पुष्पाहूनि मृदू अशीं ।
लोकोत्तरांचीं हृदयें कोण जाणवतील तीं ॥

॥ § १७७ **कार्यकारणसंबंधाचे अलंकार**—

विशेषोक्ती—कारण असूनही कार्य घडत नाही तेथे विशेषोक्ती.

उदा०--रत्नाकराचा सुत शांत दांत। श्रीचा असे बंधु कलानियुक्त ॥ सुधाकरांनी सुखवी अनेकां। अशा सर्वे पद्मिनि, रुष्ट तूं का ॥	तीन कारणे सांगितली आहेत; पण, कार्य मात्र होत नाही.

चंद्राचा चांगल्या कुळात जन्म, लक्ष्मीशी नाते व स्वत: परोपकारी, पण पद्मिनीला तो आवडत नाही हे कसे ?

विभावना--सुप्रसिद्ध कारणाशिवाय कार्योत्पत्ती म्हणजे **विभावना.**

उदा०--तिखट कठिण नसुनि त्या अस्त्रांनी जिंकितो मदन जगती ॥

अतद्गुण:--आपणाशी संयुक्त अशा वस्तूचा गुण जेव्हा एखादा पदार्थ घेत नाही तेव्हा अतद्गुण हा अलंकार होतो.

उदा०--पंकांत पद्म न मळे, काकाच्या दुर्गुणा शिके न पिक।

असंभव--अर्थाची उत्पत्ती होण्याचा संभव नसून ती होते तेथे असंभव.

उदा०--गज गोष्पदीं बुडाला ! हा दैवा ! सिंधु शोषिला मशकें
न शके सोसाया हें, वधिला तो केसरी कसा शशकें ॥
त्या दोघां कृष्णांते म्हणसी मारीन, मोह हा; कवणें।
वधिला सिंह शृगालें ऐसे लोकांत ऐकिलें श्रवणें ॥
कंठीं बांधोनि शिळा बाहुबळें जेवि सागरीं तरण।
की भृगुरतन् तसें हें जें तूं करणार त्या अरींत रण ॥

असंगती--कारण एक, कार्य भलतेच, असा प्रकार असतो तेव्हा असंगती. जसे :--

उदा०--खलरूप भुजंगाचा मारायाचा विचित्र विधि जाणा।
एकाचे कानाचा चावा घेतां दुजा मुके प्राणा ॥

समुच्चय--एकाच कारणाने कार्य घडून येत असता दुसरीही तशाच अनेक कारणे तेथे हजर असतात असे सांगणे म्हणजे **समुच्चय.**

उदा०--चंद्राला दिवसा प्रकाश नसणें, ये कामिनीला जरा।
पद्मावीण तळें, निरक्षर मुखीं जो साजिरा गोजिरा ॥

दात्याला धनलोभ, नित्य असणें दारिद्य विद्वज्जनीं ।
दुष्टाचा पगडा महीपति–गृहीं, हीं सात शल्यें मनीं ॥

III १७८ एखादी गोष्ट सरळ न सांगता ती वेगळ्या तऱ्हेने सांगणे किंवा सुचविणे कित्येक वेळा आनंददायक असते. अन्योक्ती हा अशा तऱ्हेने एखादी गोष्ट सांगण्याचा प्रकार वर आलाच आहे. अशाच सारखे स्वभावोक्ती, प्रश्न, वगैरे चमत्कृतिजनक उक्तीचे वेगवेगळे प्रकार होतात ते सहज लक्षात येण्यांसारखे आहे. या प्रकारच्या अलंकारांची काही उदाहरणे पुढे दिली आहेत.

स्वभावोक्ती—वस्तूंच्या जाती, स्वभाव, व्यापार इत्यादिकांच्या स्वभाविक वर्णनाने **स्वभावोक्ती** होते. जसे:

उदा०——परोपरी खेळति जीं वनांत ।
अर्पूनि चित्तें जगजीवनांत ॥
धरूनिया मर्कटपुच्छ हातीं ।
तयासवें वृक्षिं उडों पहाती ॥

मुखें वासुनी, लोचनभ्रूतटातें ।
उभारूनिया, वांकुल्या मर्कटातें ॥
अहो दाविती, शब्द तैसे करीती ।
असे खेळती बाळ निःशंक रीती ॥

ऐसें वदे, रडे बहु, खाय गटकळ्या, जळांत, करि का का ।

लोकोक्ती

उदा०——मजला झाला होता ताप, **असा शत्रुलाहि, होय न हो** ।
बहु वधिलें पार्थानें **धरिला पोटांत धाक** कटकांनीं ।
केलेंचि धन्य दर्शनदानें घेऊनि कानना मातें ।
अजि देवेश, **निवावे बहु हे सेवूनि कान नामाते** ॥

—मोरोपंत.

पर्यायोक्ती—पर्यायाने सांगणे.

उदा०—झालें युद्ध उपस्थित आजि, पळेनासि तरि तुला पार्थ ।
मारील निश्चयें, हें कर्म करिसि निजवधूविलापार्थ ॥
ऐसें बोलत धर्म स्वरथीं बैसे निघे पहायास ।
तो गेला सुतशोकाकुल दिनकर सागरीं नहायास ॥

व्याजोक्ती—वाक्यात निंदागर्भ स्तुती किंवा स्तुतिगर्भ निंदा असेल तर व्याजोक्ती होते.

उदा०—दोहीं पक्षीं व्हाया वीरक्षय हेतु हे तुझे पाय ।
हा यज्ञ भला केला; गावें माहात्म्य हें तुझें काय ॥

किंवा, एखादी लपवून ठेविलेली गोष्ट उघडकीस आल्यावर ती कधीतरी झाकण्याकरिता खोटेच काही तरी कारण सांगणे याला व्याजोक्ती असे म्हणतात.

जसें०— का हा कंप, सखे ? प्रभो, अहिभयें; का घर्म ? नेत्रानलें ।
का रोमांच तनूवरी ? प्रियतमा, गंगातुषारांमुळे ॥
झाल्या सात्त्विकवृत्ति उत्थित पतिप्रेमें; तयांते उमा ।
पाहे जी लपवूं शिवानिकट ती सौख्यास देवो तुम्हां ॥

समः—अनुरूप पदार्थांचा संबंध म्हणजे समालंकार. जसेः—चांभाराच्या देवाला खेटरांची पूजा.

उदा०—निंबा, तुझीं कटु फळें परिपक्व जीं का ।
चाखावया रसिकता दिलि काकलोका ॥
ज्याचे पल्लव मंगलप्रद, शिणा छाया जयाची हरी ।
गंधें युक्त फुलें, फळेंहि असती ज्याचीं सुधेच्या परी ॥
वाटे जो रमणीय भूषण वनश्रीच्या मुखींचें भला ।
आम्रा त्या पिक सेवितां समसमा संयोग कीं जाहला ॥

विषमः—अनुरूप वस्तु नसता योग तयांचा तदा विषम जाण ।
उदा०—कोठे शिरीषकुसुमापरि मृदु तनु ही कुठे मदनबाण ॥

सार:—उत्तरोत्तर उत्कर्षी सारालंकृति जाणिजे ।

उदा०—आधीच मर्कट, तशांतहि मद्य प्याला ।
झाला तशांत जरि वृश्चिकदंश त्याला ॥
झाली तयास तदनंतर भूतबाधा ।
चेष्टा वदूं मग किती कपिच्या अगाधा ॥

× × × ×

कुंतीस काय सांगूं, कृष्णेला दाखवूं कसें वदन ।
दुष्कर मला सुभद्रा-सांत्वन, दुर्दर्श उत्तरा-सदन ॥

प्रकरण सोळावें

वृत्ते व छंद

§ १७९ आपण नेहमी ज्या रीतीने बोलतो ती व मनोवृत्तीचा क्षोभ झाला म्हणजे बोलतो ती या दोन रीती एकमेकींपेक्षा वेगळ्या आहेत. हर्ष, राग, दुःख इत्यादी मनोविकार प्रबळ झाले म्हणजे लहान मुलांच्या बोलण्याचालण्यात तेव्हाच फरक पडतो ही साधी गोष्ट कोणाच्याही लक्षात सहज येण्यासारखी आहे. अतिशय आनंद झाला म्हणजे मुले टाळ्या पिटतात, नाचतात, व सुरावर गाऊही लागतात. क्षुब्ध झालेले मनोविकार व्यक्त करण्यात एक प्रकारचा तालबद्धपणा असतो. गाताना आपण टाळी वाजवितो तोच ताल. ताल म्हणजे काही ठरीव कालानंतर बोलण्यात अक्षरावर आघात येणे. प्रक्षुब्ध मनोविकार किंवा त्यामुळे सुचणारे विचार यांचे अंतःस्वरूप दूर बाजूला ठेवून, केवळ मांडणीच्याच दृष्टीने विचार केला, तर असे दिसून येईल की तालबद्धपणा हा, ज्याला आपण गाणे किंवा काव्य असे म्हणतो, त्याचा अगदी अवश्य असा धर्म आहे. तालबद्धतेशिवाय गाणेच नाही.

§ १८० आता, हा तालबद्धपणा बोलण्यात व लिहिण्यात कसा साधता येतो ते पाहू. ठरीव वेळाने, ठरीव क्रमाने अक्षरावर ठेका किंवा आघात येणे

म्हणजेच ताल हे वर सांगितलेच आहे. तेव्हा बोलतांना, वेळ किंवा अंतर कसे मोजावयाचे हेच काय ते पाहिले पाहिजे, व मोजण्याचे काही तरी माप, साधन, पाहिजे. ऱ्हस्व स्वर उच्चारावयाला जेवढा वेळ लागतो तेवढ्या वेळाचे एक परिमाण कल्पून त्याला **मात्रा** असे म्हणतात व ऱ्हस्वाची एक मात्रा, दीर्घस्वराच्या दोन मात्रा, असे मोजतात. **याप्रमाणे चार मात्रांचा एक गट झाला म्हणजे त्याला गण म्हणतात.**

किंवा, हे **अक्षरांनीही मोजितात**, व **तीन अक्षरांचा एक गण असे म्हणतात.** अक्षरे लघु किंवा गुरु (अनुक्रमें ऱ्हस्व किंवा दीर्घ) आहेत हे लक्षात घेता, तीन अक्षरांचा गण केला तर खालील आठ प्रकारचे **अक्षरगण** होतात—

यमाचा (ल, ग, ग,) = **य** गण
राधिका (ग, ल, ग,) = **र** गण
मागील (ग, ग, ल,) = **त** गण
नमन (ल, ल, ल,) = **न** गण
भास्कर (ग, ल, ल,) = **भ** गण
जनास (ल, ग, ल,) = **ज** गण
समरा (ल, ल, ग,) = **स** गण
मानावा (ग, ग, ग,) = **म** गण

टीप—ल = लघु अक्षर, ग = गुरु, दीर्घ अक्षर.

लघु व गुरु यांच्यासंबंधाने एक नियम असा आहे की, पुढे जोडाक्षर, विसर्ग किंवा अनुस्वार (अनुनासिक नव्हे) आले असता मागील स्वरावर आघात येऊन तो उच्चाराला दीर्घ, गुरु होतो. याचे लक्षण वृत्तदर्पणकार परशुरामपंत गोडबोले यांनी केले आहे ते:—

ऱ्हस्व स्वराते **लघु** बोलताती । दीर्घ स्वराते **गुरु** नाम देती ॥
पुढे अनुस्वार विसर्ग येतो । संयोग* ऱ्हस्वास गुरुत्व देतो ॥

टीप—चरणाच्या अंती लघुस्वराला गुरुत्व येते.

---

* संयोग म्हणजे जोडाक्षर.

मात्रागण

मेधा (ग, ग,) = **म** गण
सविता (ल, ल, ग,) = **स** गण
जनास (ल, ग, ल,) = **ज** गण
भास्कर (ग, ल, ल,) = **भ** गण
नवरस (ल, ल,ल,ल,) = **न** गण

यासंबंधाने वृत्तदर्पणकार म्हणतात:—लघूची तो **एक** मात्रा। गुरूच्या दोन मानिती ॥

§ १८१ अक्षरगणांनी किंवा मात्रागणांनी भाषेची जी रचना होते तिला **पद्य** किंवा **छंद** असेही म्हणतात. **पद्य** म्हणजे **पद** किंवा **चरण** असलेली रचना. ठरीव क्रमाने मात्रा किंवा अक्षरे येऊन जी गीताची ओळ तयार होते तिला **चरण** म्हणतात, व अशा दोन किंवा चार चरणांच्या गटाला **पद्य** म्हणतात.

यति—चरणाच्या मध्ये ठिकठिकाणी ठेके येतात, ती विश्रांतीची ठिकाणे आहेत. त्यांना **विराम** किंवा **यति** असे म्हणतात.

यमक—निरनिराळ्या चरणांच्या शेवटी तेच अक्षर किंवा तीच अक्षरे येणे याला यमक असे म्हणतात.

प्रास—चरणातच एखाद्या किंवा अनेक अक्षरांची पुनरावृत्ती होणे याला प्रास म्हणतात.

§ १८२ मराठीत बहुतेक वृत्ते संस्कृतातून घेतलेली आहेत; पण काही केवळ मराठीतच सापडतात; उदा०—ओवी, अभंग, दिंडी, घनाक्षरी, ही वृत्ते मराठीतच सापडतात. घनाक्षरी, कटाव, फटका, लावणी, पोवाडा, भूपाळी हे पद्याचे प्रकार मूळचे मराठीतच तयार झाले; उलटपक्षी, संस्कृत विद्येत पारंगत असलेल्या विद्वान आणि पंडित कवींनी संस्कृतातील वृत्ते मराठीत आणिली, असा थोडक्यांत मराठी छंदोरचनेचा इतिहास आहे. आधुनिक काळातही गझलसारखी फारशी वृत्ते मराठीत येत आहेत.

आता नेहमीच्या प्रचारात असलेल्या अक्षरगणवृत्तांची व मात्रागणवृत्तांची लक्षणे व उदाहरणे देतो.

§ १८३ अक्षरगणवृत्ते—

प्रमाणिका—(गण)-ज र ल ग

उदा०—तया वनांत एकली । विलासिनी विलोकिली ॥
मदें भरूनि डोलतो । तियेस हंस बोलतो ॥

—रघुनाथपंडित.

कामदा—र य ज ग

उदा०—पायिं चालतां सर्प थोरले । अजगरादि ते मत्त पाहिले ॥
पाहि जों पुढे व्याघ्र एकला । महिष फाडुनी खात बैसला ॥

ललित—र ज स ल ग

उदा०—संपदा असे बहुत ज्या घरीं ।
खावया तिथे मिळति सोयरीं ॥

इंद्रवज्रा—त त ज ग ग

उदा०—पक्ष्यांचिया साउलिच्याच संगें ।
ते धावती हास्यरस-प्रसंगें ॥
हंसाचिया दाखविती गतीते ।
जे लाधले हंस-गुरू-गतीते ।

उपेंद्रवज्रा—ज त ज ग ग

उदा०—पिता सुखी कीं म्हणतांचि रामा ।
रडोनि त्या सांगति सूपरामा ॥
रडे अहो रामहि लोकरीती ।
स्त्रिया पुन्हा शोक महा करीती ॥

उपजाती—इंद्रवज्रा व उपेंद्रवज्रा यांचे मिश्रण. याचे अनेक प्रकार होतात.

शालिनी—म त त ग ग

उदा०—कैकेयीच्या दुष्ट भावें जळाला ।
इच्छी रामाच्या पदाच्या जळाला ।।
तों स्वामीच्या देखिले आश्रमाते ।
कांही चित्तें टाकिले हो श्रमाते ।।

स्वागता—र न भ ग ग

उदा०—तो वदे भरत गोष्टि मनाची ।
प्रार्थना बहुत आगमनाची ।।
मांडिली, परि न राघव मानी ।
देखतां सुरवरांस विमानीं ।।

रथोद्धता—र न र ल ग

उदा०—मोकळा करुनि कंठ तेधवा ।
आठवूनि मनिं जानकी–धवा ।।
ते रडे, भरतहि तसा रडे ।
जोंवरी नयन होति कोरडे ।।

भुजंगप्रयात—य य य य

उदा०—म्हणे वासरा घात झाला असा रे ।
तुझ्या माउलीचेचि हे खेळ सारे ।।
वृथा धाडिला राम माझा वनासी ।
न देखों शके त्या जगज्जीवनासी ।।

स्रग्विणी—र र र र

उदा०—माझिया लोचनांनो पहा हो पहा ।
श्रीनिशादेविचा राष्ट्रविस्तार हा ।।
केवढा हा अवाढव्य भव्याकृती ।
याचिया दर्शनें गुंग झाली मती ।

द्रुतविलंबित—न भ भ र

उदा०—भरत शोक अनेक तिचे असे ।
परिसतां मग बोलत तो असे ।।

जननि, गोष्ट समस्तहि हे खरी।
परिस येविषयीं मम वैखरी ॥

वसंततिलका--त भ ज ज ग ग

उदा०—द्रव्यास हे गमन-मार्ग यथावकाश ।
की दान, भोग अथवा, तिसरा विनाश ।
जो घे न भोग, जरि पात्र–करीं न दे ही ।
त्याच्या धनास मग केवळ नाश पाही ॥

मालिनी--न न म य य

उदा०—तरुवर सुफलांच्या आगमीं नम्र होती ।
जलदहिं जलभारें खालती फार येती ॥
सुपुरुष विनयाते भाग्यकाळीं धरीती ।
उपकृति करि त्यांची जाणिजे हीच रीती ।

चामर—विषम गुरु व सम लघु. एकंदर अक्षरे १५.

ग ल ग ल ग ल ग ल ग ल ग ल ग ल ग

उदा०—रिक्त पाणि काय जाउं सांग सांग सुंदरी ।
कृष्णाजीस काय नेउं, बोल, बोल, लौकरी ॥

पंचचामर—विषम लघु व सम गुरु–एकंदर अक्षरे १६.

ल ग ल ग ल ग ल ग ल ग ल ग ल ग ल ग

उदा०—कुशासि देखुनी सिता रडोनि आळवी शुरा ।
कुमार होय घाबरा पुसे नमूनि सुंदरा ॥

शिखरिणी--य म न स भ ल ग

उदा०—कदा नेर्गी वोढी शरधितुनि काढी शर कदा ।
कदा धन्वीं जोडी वरिवरिहि सोडी तरि कदा ॥
विपक्षाच्या वक्षावरि विवरलक्ष्यास्तव रणीं ।
कळे राजेंद्राची त्वरित शरसंधानकरणी ॥

—रघुनाथपंडित..

पृथ्वी––ज स ज स य ल ग

उदा०––प्रसाद तुमचा कलानिधिहुनी गुणें आगळा।

मोरोपंत–केका

मंदाक्रांता–म भ न त त ग ग

उदा०––हा हा देवी हृदय फुटतें देह माझा गळाला।
वाटे शून्य त्रिभुवन मला अंतरात्मा जळाला॥

शार्दूलविक्रीडित––म स ज स त त ग

उदा०––तोयाचें परि नांवही न उरतें संतप्त लोहावरी।
तें भासे नलिनीदलावरि पहा सन्मौक्तिकाचे परी॥
तें स्वातीस्तव अब्धिशुक्तिपुटकीं मोतीं घडे नेटकें।
जाणा उत्तममध्यमाधम दशा संसर्गयोगें टिके॥

स्रग्धरा–म र भ न य य य

उदा०––माझा प्रेमा सुदामा हरिसख दुबळा शब्दसंदोह जो हे।

सवाई––हिचे अनेक प्रकार आहेत. लक्षणे व उदाहरणे थोडक्यात देतो.

१ लक्षण––भ भ भ भ भ भ भ ग ग

उदा०–पाहुनि दीनजनास जळाविण मीन तसा अति दुःखित होतो।

२ लक्षण––भ भ भ भ र न भ ग ग

उदा०–राम रघूत्तम कामरिपुप्रिय लोकशोकहर यापरि भावें।

३ लक्षण––न ज ज ज ज ज ज ल ग

उदा०––शिवहृदयाला कीं सुखदायक निर्जरनायक सेव्यपदा।

§ **१८४ अर्धसमवृत्ते**––विषम चरणांत व सम चरणांत वेगवेगळे गण येतात त्या वृत्तांना अर्धसमवृत्ते म्हणतात.

माल्यभारा– विषम–स स ज ग ग
सम–स भ र य

उदा०––निजकाव्यरसेंच तृप्त होती।
पण काव्यें परकीय साधु गाती॥

निज पुष्परसें अळें बुडालें ।
पण तो कुंभजळेंच वृक्ष डोले ॥

वियोगिनी—विषम—**स स ज ग**
सम—**स भ र ल ग**

उदा०—प्रभु राम सखा निकेतनीं ।
मजला त्यागुनि जातसे वनीं ॥
गमतें जग शून्य मन्मनीं ।
धरुं मी प्राण कसे वियोगिनी ॥

टीप—कालिदासाच्या रघुवंशातील अजविलाप प्रकरणाचे हे वृत्त आहे. करुणरसाच्या पोषणाला उपयोगी.

§ १८५ मात्रावृत्तें

१ प्रकार—**गीती**—विषम चरण मात्रा १२
समचरण मात्रा १८

उदा०—हा सीते, हा सीते, टाकुनि जावें तुवां न रामातें ।
राहूते जेवि सुधा, देवि न जिरलीस तूं नरा मातें ॥

टीप—हिला मराठीत आर्या म्हणतात.

२ प्रकार—विषमचरण मात्रा १२, सम १८–१५.

उदा०—हे भगवति जगदंबे, देशी भक्तांसि इच्छितें दानें ।
मद्वांछितासिद्धि घडो, मातें तुझिये प्रसादानें ॥

साकी—दोन ओळींची असून शेवटीं यमक असते. शेवटचें अक्षर दीर्घ, प्रत्येक ओळीत अठ्ठावीस मात्रा, व सोळाव्या मात्रेवर अवसान असते.

उदा०—जनक-मखातें मुनिसह जातो, प्रभुनें गौतमभार्या ।
उद्धरिली ती पतिसह पूर्जी, स्तवुनि अहल्या आर्या ॥

§ १८६ मराठी वृत्तें

ओवी—हिला चार चरण असतात. पहिल्या तीन चरणांत यमक असते. अक्षरांचा नियम नाही. चवथा चरण बहुधा इतरांच्या मानाने तोकडा असतो. उदाहरणे—

१ जें ब्रह्म सगुण । तोचि परमात्मा जाण ।
परमपुरुष ऐसी खूण । तेथेचि बोलिजे ।।

२ नसता कवींचा व्यापार । तरी कैसा असता जगदुद्धार ।
म्हणोनि कवी हे आधार । सकळ सृष्टीसी ।।

३ प्रधान म्हणती पाठवावा अक्रूर ।
स्थिरबुद्धि परम चतुर ।।
त्याचिया बोलें क्षणमात्र ।
न लागतां येतील ते ।।

अभंग

१ ला प्रकार--**दोन चरणांचा**

१ यात प्रत्येक चरणात आठ अक्षरे—क्वचित् पहिल्या चरणात सहा असतात—व यमक असते.

उदा० —जरी व्हावा तुज देव । तरी सुलभ उपाव ।।
करी मस्तक ठेंगणा । लागे संतांच्या चरणा ।।
भावें गावें गीत । शुद्ध करोनिया चित्त ।।

२ दुसऱ्या चरणाची सात अक्षरे असून चौथे अक्षरास यमक असते.

उदा०—पुढे आतां कैचा जन्म । ऐसा श्रम वारेसा ।।

चार चरणी अभंग—

३ पहिल्या तीन चरणांस प्रत्येकी सहा अक्षरे व चौथ्यास चार अक्षरे असतात. दुसऱ्या व तिसऱ्या चरणास यमक असते.

उदाहरण—काय वाणूं आतां । न पुरे ही वाणी ।
मस्तक चरणीं । ठेवियेला ।।

किंवा

४ पहिल्या तीन चरणांस यमक असते.

उदाहरण—पंढरीस जावे । जीवन्मुक्त व्हावे । केशवा भेटावे । जीवलगा ।।

५ आठ आठ अक्षरांचे चार चरण, वं पहिल्या तीन चरणांत यमक असते.

उदा० —देवापायीं नाहीं भाव । भक्ति वरिवरि वाव ॥
समर्पिला नाहीं जीव । जाणावा हा व्यभिचार ॥

दिंडी—एकंदर चरण चार, व चरणांच्या शेवटी अनुप्रास किंवा यमक असते. कोठे दोन चरणांची दोन दोन यमकें निराळी असतात. प्रत्येक चरणास एकोणीस मात्रा असतात व नवव्या मात्रेवर अवसान असतें. चरणाचे दोन भाग केले तर पहिल्या भागात तीन मात्रांचा एक गण; व सहा मात्रांचा दुसरा गण. दुसऱ्या भागात तीन तीन मात्रांचे दोन गण व शेवटी दोन गुरु असतात. अक्षरांचा नियम नाहीं.

उदा०—कथा बोलूं हे, मधुर सुधाधारा ।
होय श्रृंगारा करुणरसा थारा ॥
निषध-राजा नळनामधेय होता ।
वीरसेनाचा तनय महा होता ॥

परिशिष्ट : १

मराठी भाषेचे शुद्धलेखन

'शुद्ध कसे बोलावे, व शुद्ध कसे लिहावे, हे व्याकरण शिकल्याने समजते' अशी व्याकरणाची व्याख्या आमच्या लहानपणी शाळांत चालू असलेल्या व्याकरणाच्या क्रमिक पुस्तकांतून पाठ केलेली मला आठवते.

व्याख्या म्हणून ती सदोष असली तरी प्रस्तुत विषयाचा विचार करिताना ती बरीच उपयोगी पडेल असे वाटते. भाषेत शब्दांची वेगवेगळी रूपे कशी होतात, का होतात, आणि कोणती शुद्ध व कोणती अशुद्ध मानावी हे सांगणे हाच व्याकरणाचा विषय आहे. अथपासून इतिपर्यंत व्याकरणकार तेच सांगत असतो. तेव्हा, शुद्धलेखनाचे निराळे विवेचन करण्याची खरोखर जरूरी नाही. काही ठोकळ नियम विद्यार्थ्यांच्या सोईकरिता वेगळे काढून सांगावयाचे असतील तर सांगावे; तसे करण्याचा थोडासा व्यावहारिक उपयोग आहे एवढेच.

पण, हे प्रकरण लिहिण्याचा उद्देश केवळ तेवढा व्यावहारिकच नाही, तर **शुद्धलेखन** म्हणजे काय, भाषेत एक प्रकार शुद्ध असे मानितात व अमुक अशुद्ध असे मानितात ते कां, शुद्धाशुद्धाची खरी कसोटी कोणती, हे ठरविण्याचा थोडासा प्रयत्न या ठिकाणी मला करावयाचा आहे. या दिशेने आजच्या विद्यार्थ्यांनाही विचार करावयाला शिकवावयाला पाहिजे. कारण गेल्या चार-दोन वर्षांत काही आगंतुक कारणांनी शुद्धलेखनाच्या प्रश्नाला मराठीत थोडेसे महत्त्व आलेले आहे. मराठी लेखनावर भाषेच्या परंपरेचा हक्क किती रहावा, व संस्कृत भाषेच्या नियमांचा पगडा किती रहावा; तसेच, शुद्धाशुद्ध ठरविताना उच्चारावरूनच मुख्यतः ठरवावे काय; असे दोन मुख्य प्रश्न या बाबतीत उपस्थित झालेले आहेत. तेव्हा, आरंभी या दोन प्रश्नांचा व त्यांच्या मूळाशी असलेल्या तत्त्वांचाच विचार करून, मग तपशीलवार नियम कसे काय ठरविता येतील ते पाहू.

प्रत्येक भाषेचे कोणत्याही काळात एकच स्वरूप सर्वत्र दिसत नाही; तर प्रांतभेदाप्रमाणे तिची वेगवेगळी रूपे एकाच काळी चालू असतात. तसेच, कालगतीनुसार भाषेत फरक होत जातो. हे दोन सिद्धांत सर्व भाषाकोविदांना मान्य झालेले आहेत. आपल्या मराठीचाच प्रकार पाहिला तर **ज्ञानेश्वरीची** भाषा आज आपल्याला दुर्बोध वाटते. इतकेच काय, तर सुमारे तीनशे वर्षांपूर्वीच्या लोकांनाही ती दुर्बोध वाटत होती व म्हणूनच **एकनाथांनी ज्ञानेश्वरी** शुद्ध केली, किंवा सुबोध केली, त्या काळच्या चालू भाषेत लिहिली. आज इंग्रजीत **चॉसर**सारख्या कवीचे ग्रंथ दुर्बोध वाटतात म्हणून त्याच्या काव्यांची जशी चालू इंग्रजीत रूपांतरे झाली आहेत, तसाच प्रकार **एकनाथांनी ज्ञानेश्वरी**च्या संबंधात केला असेच म्हटले पाहिजे. मूळच्या **ज्ञानेश्वरी**ची भाषा अशुद्ध होती, व ती **एकनाथांनी** शुद्ध केली असा काही प्रकार नाही. तेव्हा भाषेविषयी लिहिताबोलताना आपण 'शुद्ध' किंवा 'अशुद्ध' असे जे प्रयोग करितो तेथे शुद्ध म्हणजे कालदेशपरत्वाने चार शिष्ट लोकांना समजण्याजोगे व मान्य, व अशुद्ध म्हणजे तसे नसेल ते, असाच त्या शब्दांचा अर्थ केला पाहिजे.

तसेच, कोणत्याही एका काळाविषयी बोलताना जेव्हा आपण शुद्ध, अशुद्ध असे शब्द भाषेविषयी योजितो त्याचाही प्रकार असाच आहे. त्या काळात प्रांतभेदाने भाषेचे निरनिराळे प्रकार रूढ असतात, त्यांपैकी शिष्टसंमत जो प्रकार असेल तो शुद्ध व इतर अशुद्ध. ज्या भाषेत साहित्य पुष्कळ आहे; काव्ये, नाटके, निबंध, तात्त्विक विषयांवरील ग्रंथ अशा प्रकारची विविध ग्रंथसंपत्ति आहे, व तयार होत आहे; ज्या भाषेत पुस्तके छापिली जातात, वर्तमानपत्रे आहेत; सभांतून, देवळांतून व्याख्याने, पुराणे, प्रवचने इत्यादी होतात; जी भाषा शाळांतून व विद्यालयांतून शिकवण्यात येते; त्या भाषेत ती बोलणारांपैकी विचारवंत व पुढारलेल्या लोकांच्या बोलण्या-लिहिण्याची भाषा एकच असते. ती एकच असावीही लागते, व त्या भाषेत, किंवा भाषेच्या त्या प्रकारातच, त्या लोकांचा बौद्धिक संसार होत असतो. त्या प्रकाराबरोबरच त्याच्याहून थोडेसे भिन्न प्रकार, भिन्न रूढी, भिन्न संप्रदाय, भिन्न प्रयोग, कमी विचारवंत किंवा मागासलेल्या लोकांत रूढ असतात, व या इतर प्रकारांचा उपयोग बहुत-

करून बोलण्यात तेवढा होतो, लिहिण्यापर्यंत त्यांची मजल पोचत नाही. या इतर प्रकारांना **बोली** असे म्हणतात, व प्रौढ आणि पुढारलेल्या लोकांच्या लिहिण्याबोलण्यात– विशेषत: लिहिण्यात–येणाऱ्या प्रकाराला **भाषा** असे म्हणतात. भाषेचा हा शिष्टसंमत प्रकार म्हणजेच शुद्ध भाषा, किंवा रूढ भाषा.

तेव्हा, भाषेत शुद्ध काय? तर, जे लोकांना–अर्थातच, विचारवंत, शिकलेल्या, पुढारलेल्या माणसांना–शिष्टांना–संमत असेल, व जे त्यांच्या लिहिण्याबोलण्यात असेल ते शुद्ध. बाकीचे अशुद्ध.

याप्रमाणे शुद्ध काय व अशुद्ध कोणते याची कसोटी ठरविल्यानंतर प्रत्यक्ष व्यवहारात ती कशी लाविता येते ते पाहू.

आजच्या मराठीतील शुद्धलेखनासंबंधाने वादाचा प्रश्न तत्त्वत: एकच आहे व तो म्हणजे उच्चाराप्रमाणे लेखन करावे की नाही? याच्याच तपशिलात शिरले, म्हणजे दोन बाबी विचाराकरिता येतात त्या अशा:— १ इ, उ, हे स्वर कोठे ऱ्हस्व लिहावे व कोठे दीर्घ लिहावे? २ अनुस्वार किंवा अनुनासिक कोठे द्यावे व कसे द्यावे? तेवढ्यांचा येथे विचार करावयाचा आहे.

मूळ मुद्याची गोष्ट अशी की, उच्चाराप्रमाणे लिहावे की नाही? या प्रश्नाचे तात्त्विक उत्तर अगदी सोपे आहे; पण प्रत्यक्ष व्यावहारिक उत्तर तितकेच कठीण आहे. तात्त्विक उत्तर असे:—भाषा ही ध्वन्यात्मक आहे; ध्वनीतच भाषेचा उगम व तेथेच तिचा लय हे खरे. पण ध्वनी हे अनित्य, बोलणे थांबताच हवेत नाहीसे होणारे, तेव्हा त्यांना नित्य किंवा टिकाऊ स्वरूप येण्यासाठी, त्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी, विचारपरंपरा, संस्कृती या कायम टिकण्यासाठी, लिपीचा उपयोग आहे. लिपी हे अर्थातच साधन; म्हणून जसे आपण बोलतो तसे लिहावे. लिपीने ध्वनीचे चित्र हुबेहुब कागदावर उमटले पाहिजे हे तत्त्व खरे असे म्हणता येईल.

पण, प्रत्यक्ष व्यवहाराकडे पाहिले तर लिपी व ध्वनी यांची अशी सांगड घातलेली कोठल्याच भाषेत दिसत नाही; व ती तशी घालणेही शक्य दिसत

नाही. अगदी सामान्य इंग्रजी कोश घेतला तर त्यात शब्दाच्या पुढे कंसात त्याचा उच्चार काही वेगळ्याच तऱ्हेने दिलेला असतो असे दिसते. उदा०, Marriage (marij)...यासारखे शब्द.

म्हणजे, काही अक्षरे शब्दात असून त्यांचा उच्चार होतच नाही असे दिसेल. ज्या अर्थी अक्षरे आहेत त्या अर्थी त्यांबरहुकुम उच्चार केव्हा तरी होत होता हे खरे. आज उच्चार बदलले, पण लिहिण्याची पद्धत मात्र जुनीच कायम राहिली. दुसराही एक प्रकार इंग्रजीत दिसतो. तो हा की, एकाच अक्षराचे अनेक उच्चार होतात. याची उदाहरणे देत नाही.

आता, आपल्या मराठीकडे पाहिले तर—इंग्रजीइतका नसला तरी-थोडासा कमीपणा लिपीत आहे असेच दिसते. उदा०—**अ, आ, ए, ओ,** या स्वरांचे उच्चार स्थलपरत्वाने कमीअधिक लांबट किंवा तोकडे होतात. ते वेगवेगळे दाखविण्याला वेगवेगळी अक्षरे नाहीत. त्याचप्रमाणें, **च्, ज्, झ्** यांचे जे दोन उच्चार होतात तेही वेगवेगळ्या अक्षरांनी दाखवीत नाहीत; किंवा, अनुस्वार व (अर्धवट उच्चारलेले) अनुनासिक ही देखील (ं) या एकाच चिन्हाने दाखवितात; असा एकंदरीत प्रकार आहे. परकी भाषेतील शब्द जे आपल्या भाषेत आपण घेत आहोत व घेतले आहेत त्यांचे खरे उच्चार दाखवावयाला आपल्या भाषेत चिन्हे कोठे आहेत ? उदा०—Cat यातील a, Not यांतील o, Van यांतील V, Soul यांतील ou, हे उच्चार मराठीत नीटपणे दाखविता येत नाहीत. किंवा, काझी, दरजी, मशालजी, फिर्यादि, या आरबी—फारशी शब्दांचे उच्चारही नीट दाखविता येत नाहीत, ही गोष्ट उघड आहे. अशा शब्दांना आपण मराठीत कोणता नियम लावितो ? जोपर्यंत ते शब्द मराठीत पूर्णपणे मिळालेले नाहीत, थोड्याशा परकीपणानेच वागतात व आपण त्यांना वागवितो, तोपर्यंत त्यांचे उच्चार मूळच्या उच्चारांसारखे करण्याकडे बोलणारांची प्रवृत्ती असते. मूळातल्याप्रमाणे त्यांचे उच्चार करिता येत नसतील तर निदान ते त्यांसारखे तरी जितके करिता येतील तितके करण्याकडे बोलणारांचा कल असतो. पण, परकी शब्द भाषेत एकदा रुळले म्हणजे भाषेची बंधने इतरांप्रमाणेच त्यांनाही पाळावी लागतात.

सांगावयाचे तात्पर्य, आपण बोलताना जितके विविध प्रकारचे ध्वनी उच्चारितो तितके सर्व नीटपणे दाखवावयाला पुरेसे वर्ण कोणत्याही लिपीत नाहीत. तेव्हा, उच्चाराप्रमाणे लिहावे हा नियम व्यवहारात कोणत्याही भाषेला लाविता येणार नाही.

पण, याशिवाय आणखी एक अडचण आहेच. उच्चाराप्रमाणे लिहावे असा नियम तत्त्वतः बरोबर आहे असे जरी म्हटले, तरी ग्राह्य उच्चार तरी कोणते मानावयाचे ही अडचण उरतेच. कारण भाषा बोलणारे सर्व लोक प्रत्येक शब्दाचा उच्चार तरी एकसारखाच करितात असे थोडेच आहे! कोकणी लोक काही ठिकाणी अनुस्वार देतात, तेथे देशावरील लोक देत नाहीत, ही एकच बाब उदाहरणाकरिता घेतली तरी अशा शब्दांत सानुस्वार किंवा सानुसानिक रूप ग्राह्य, किंवा निरनुस्वार रूप ग्राह्य ही अडचण येणारच. दुसरे एक उदाहरण घेऊ. चमचा, सरकार, मारतो, अशा प्रकारच्या शब्दांत अनुक्रमे म, र, र, यांचे उच्चार फारच तोकडे होतात. तेव्हा, हे शब्द, चम्चा, सर्कार, मार्तो, असे लिहावयाचे की काय?

एकंदरीत पहाता, उच्चाराप्रमाणे लिहावे हा नियम दिसावयाला कितीही साळसूद दिसला तरी तो आचरणात आणताना फार अडचणी येतील, व आणला तर भाषेत येथून तेथून बेबंदशाही माजेल असे मला वाटते.

आता तपशिलाचे म्हणून जे दोन मुद्दे वर सांगितले ते विचाराकरिता घेऊ.

१ शब्दांच्या अंतीचे इ व उ आणि वर्तमान कृदंतातील इ कार (मारित, करित अशांसारखी रूपे यांतील स्वर) ऱ्हस्व लिहावे की दीर्घ लिहावे हा आजच्या शुद्धलेखनचर्चेतील एक विषय आहे. मराठी भाषेची प्रकृती पहाता अंतीचा स्वर दीर्घ करण्याकडे तिची प्रवृत्ती दिसते. मराठीतील आघात पुरोगामी आहे, त्याचा झोक पुढे पुढे जाण्याचा आहे, याचा तो परिणाम आहे. तेव्हा, मराठीत पूर्णपणे रुळलेल्या शब्दांत अंतीचे इकार, उकार, दीर्घ करावयाला कोणतीच हरकत नाही. हरी, भानू, यांसारख्या विशेष नामांतील; कवी अशासारख्या पूर्णपणे मराठी झालेल्या शब्दांतील इ-कार

उकार दीर्घंच लिहावे. पण, मराठीत नुकतेच येत असलेले मूळचे संस्कृत शब्द, जे अद्यापि अर्धेअधिक संस्कृत असेच वाटतात, त्यांच्या संबंधाने हा नियम कडकपणे पाळता येणार नाही.

आता, अनुस्वार व अनुनासिके यांचा प्रश्न विचाराकरिता घेऊ. या बाबतीत अनुच्चारित अनुस्वारांच्या अडगळीचे बंड अगोदरच बरेचसे मोडलेले आहे, अशी आजची स्थिति आहे. तेव्हा त्याविषयी येथे विशेष लिहीत नाही.

* * *

मराठी साहित्य महामंडळ

लेखनविषयक नियम

(१) अनुस्वार

नियम १ ला :— स्पष्टोच्चारित अनुनासिकाबद्दल शीर्षबिंदू द्यावा.

उदाहरणार्थ :— तंटा, चिंच, आंबा, संस्कृत.

अनुनासिकाबद्दल विकल्पाने पर-सवर्ण लिहिण्यास हरकत नाही.

[(अ) मराठी शब्दात अनुनासिकाचा उच्चार जेव्हा खणखणीत, स्पष्ट असतो त्यावेळी शीर्षबिंदू लिहावा. म्हणजे अनुनासिकपूर्व अक्षरावर टिंब लिहून तो उच्चार दर्शवावा. परंतु काही शब्दांत हा उच्चार अगदी अस्पष्ट असतो, किंबहुना उच्चारला जातच नाही, तेथे ती अक्षरे अनुस्वारविरहितच लिहावी. उदा., हसणे, धावणे, सावळा, आतडे, मेंढरू, लेकरू, मी, आम्ही, तुम्ही (तृतीयेची रूपे), जातो-गेलो (प्रथमपुरुषी रूपे), हे, ते, जे, ही, ती, जी (नपुसकलिंगी), जेव्हा-तेव्हा, जो-तो (कालवाचक अव्यये) इत्यादी.

(आ) जेथे अनुनासिकाचा उच्चार स्पष्ट होतो, तेथे तो सामान्यतः शीर्षबिंदूनेच व्यक्त करावा. तथापि तत्सम म्हणजे संस्कृतामधून जसेच्या-तसे मराठीमध्ये आलेले जे शब्द, त्यांमध्ये पर-सवर्ण लिहून तो व्यक्त करण्यास हरकत नाही. या सवलतीप्रमाणे कंकण, शंख, कुंज, पंडित, चंद्र, पंचमी यांसारखे शब्द कङ्कण, शङ्ख, कुञ्ज, पण्डित, चन्द्र, पञ्चमी असे लिहिण्यास हरकत नाही. वेदान्त, देहान्त हेही असेच शब्द आहेत. परंतु तत्सम नसणारे मराठी शब्द शीर्षबिंदू देऊनच लिहावे. उदा., दंग, चिंच, खंत, उंट, संप असे शब्द दङ्ग, चिञ्च, अथवा चिन्च, खन्त, सम्प असे लिहू नयेत. पर-सवर्ण लिहिण्याची सवलत फक्त तत्सम शब्दांपुरती मर्यादित आहे.].

नियम २ रा :— य्, र्, ल्, व्, श्, ष्, स्, ह्, यांच्यापूर्वी येणाऱ्या अनुस्वारांबद्दल संस्कृताप्रमाणे केवळ शीर्षबिंदू द्यावा. उदा. सिंह, संयम, मांस.

[सिंह, संयम, मांस इत्यादी शब्दांत अनुस्वाराचा स्पष्ट उच्चार करीत असता त्यानंतर व पुढील अक्षराआधी मध्ये 'य'कार किंवा 'व' कार उच्चारात येतो. उच्चारानुसारी लेखन व्हावे, म्हणून कित्येक लोक सिंव्ह, संय्यम, मांव्स

असे त्यांचे लेखन करिताना दिसतात. अनुस्वाराचा उच्चार स्पष्ट व पूर्ण केला, की आपोआपच 'य' वा 'व' उच्चारिला जातो, म्हणून तो लिहून दाखविण्याची गरज नसते. लेखनात अनेक वेळा येणारे असे आणखी काही शब्द पुढे दिले आहेत :—संशय, संरक्षण, संसार, संस्तुति, संहार, किंवा, संस्था, संवाद, संयोग, अंश, संस्कार इत्यादी. ' ल ' पूर्वी असे स्पष्टोच्चारित अनुनासिक आल्यास आणखी एक ' ल 'कार मध्ये लिहिण्याची क्वचित पद्धत होती; तसेही करण्याचे कारण नाही. सं-लाप = संलाप (सल्लाप नको).

नियम ३ रा :—नामांच्या व सर्वनामांच्या अनेकवचनी सामान्यरूपांवर विभक्तिप्रत्यय व शब्दयोगी अव्यय लावताना अनुस्वार द्यावा. उदा. लोकांना, मुलांनी, तुम्हांस, लोकांसमोर, घरांपुढे.

[वरील नियमातच ' नामांच्या ' आणि ' सर्वनामांच्या ' या शब्दांत अनुस्वाराचा उच्चार स्पष्ट होतच आहे. तो दर्शविण्यासाठी तेथे, म्हणजे त्या शब्दांच्या सामान्यरूपांच्या अंत्य अक्षरावर, अनुस्वार येतोच. उदाहरणांदाखल घेतलेल्या शब्दांत तो तितकासा स्पष्ट नसला, तरी अस्पष्टपणे उच्चारला जातो, व त्यान्ला, लोकान्ला असेही उच्चार कित्येकांच्या तोंडी असलेले आढळतात. तेव्हा तो उच्चार सरसकट लिहून व्यक्त करावा, हे युक्त होय.

या नियमाप्रमाणे चतुर्थीचे एकवचनी व अनेकवचनी स, ला हे प्रत्यय, आणि सप्तमीचे एकवचनी व अनेकवचनी:प्रत्यय 'त', किंवा 'मध्ये' हे शब्दयोगी अव्यय नाम सर्वनामांस लावताना होत असणारा फरक विशेष लक्षात घ्यावा.

उदा. मुलास (एक वचन),	मुलांस (अनेक वचन)
मुलाला (एक वचन),	मुलांला-ना (अनेक वचन)
घरात (एक वचन),	घरांत-मध्ये (अनेक वचन)

इतर विभक्तिप्रत्यय आणि शब्दयोगी अव्यये यांच्या बाबतही हाच नियम समजावा. उदा. मुलाशी-मुलांशी, मुलाते-मुलांते, मुलाने-मुलांनी, गावाहून-गावांहून, घरावर-घरांवर, इत्यादी.

नियम ४ था:—वरील नियमांव्यतिरिक्त कोणत्याही कारणासाठी व्युत्पत्तीने सिद्ध होणारे वा न होणारे अनुस्वार देऊ नयेत,

[ज्यांचा उच्चार स्पष्टपणे किंवा अस्पष्टपणेही होत नाही, ते अनुस्वार

देण्याचे कारण नाही, ही भूमिका येथे घेण्यात आली आहे. यामुळे आतापर्यंत दिले जाणार पुढील वेगवेगळ्या प्रकारचे अनुस्वार लेखनातून गळतील :–

(१) नपुसकलिंगी ई-कारान्त व ऊ-कारान्त व ए-कारान्त नामांच्या शेवटी उभयवचनी येणारे अनुस्वार; उदा. घरें, घरटीं, घोडें, घोडीं, लेकरूं, लेकरें, मोतीं, मेत्यें, नामें, रूपें, करणें, बोलणें इत्यादी. हे अनुस्वार लिहिता येणार नाहीत. (२) लिंगानुसार बदलणाऱ्या विशेषणांच्या नपुसकलिंगी रूपांवर येणारे अनुस्वार; उदा. काळीं–गोरीं (मुलें), चांगलीं (फळें), पांढरीं (फुलें), वेडीं, शहाणीं इत्यादी. यांतील अंत्याक्षरावरील अनुस्वार देता येणार नाहीत. (३) अर्थभेद स्पष्ट व्हावा म्हणून दिले जाणारे अनुस्वार; उदा. नाव (नौका), नांव (नाम); पांच (पंच), पाच (रत्नप्रकार); कां (कारण), का (काय); जो तो (सर्वनामे), जों तों (कालवाचक क्रियाविशेषणे); कीं (किंवा), की (इतर अर्थाने). तसेच, घांट घाट, कांच, काच, वाचणे-वांचणे, इ. हे अनुस्वार देण्याची गरज नाही. (४) क्रियापद रूपांवरील पुरुषवाचक अनुस्वार; उदा. मी–आम्ही जातों, गेलों, करितों-करीं, असें, करीत असूं; तुम्ही करितां, करां, गेलां, करीत असां; हे प्रथम-पुरुषवाचक व द्वितीयपुरुषवाचक अनुस्वार देण्याचे कारण नाही, देऊ नयेत. (५) नपुसकलिंगी एकारान्त सर्वनामांवरील अनुस्वार; उदा. जें, तें, हें (जीं-तीं-हीं ही अनेकवचनी रूपेसुद्धा). हे अनुस्वार आता गळाले आहेत. (६) विभक्तिमूलक अनुस्वार सर्वच्या-सर्व वरील नियमाप्रमाणे गळतात. तृतीयेचे नें, नीं, एं, हीं, शीं, चतुर्थीचा तें, सप्तमीचे त, ई, या प्रत्ययांवरील अनुस्वार देण्याची गरज नाही. रामें, रामानें, लोकांनीं, त्यांहीं, लोडाशीं, रामातें, घरांत, घरीं, दारीं हे शब्द अनुक्रमे रामे, रामाने, लोकांनी, त्यांही, लोडाशी, रामाते, घरात, घरी, दारी असे लिहावे. (७) तां, तांना, ऊं य प्रत्ययांनी साधिलेल्या धातुसाधितांवरील अनुस्वारही गळतात. जातां-येतां जातांना-येतांना, जाऊं–करूं इत्यादी प्रयोगांतील अनुस्वार आता उरले नाहीत.

(२) ऱ्हस्व दीर्घ

नियम ५ वा:–तत्सम (ऱ्हस्व) इ-कारान्त आणि उ-कारान्त शब्द प्रथमेत दीर्घान्त लिहावे; उदा. कवी, मती, गती, गुरू. इतर शब्दांच्या अंती येणारा

इ-कार व उ-कार दीर्घ लिहावा. उदा. पाटी, जादू, पैलू, विनंती, ही (शब्द-योगी अव्यय). अपवाद : आणि, नि. स्पष्टीकरण :—परंतु, यथामति, तथापि इत्यादी तत्सम अव्यये ऱ्हस्वान्त लिहावी. तसेच सामासिक शब्दांतही तत्सम (ऱ्हस्व) इ-कारान्त व उ-कारान्त शब्द पूर्वपद असताना ऱ्हस्वान्तच लिहावे. उदा. बुद्धिवैभव, कविराज, गतिमान, गुरुवर्य.

[प्रथमेत म्हणजे प्रथमेच्या दोनही वचनांत. त्याप्रमाणे प्रथमेबरोबर अप्रत्ययी द्वितीयाही अभिप्रेत आहे. तत्सम ऱ्हस्वान्त शब्द मुळामध्ये ऱ्हस्वान्तच आहेत, ही भूमिका येथे मान्य आहे. त्यामुळे समासांमधून ते तसेच उच्चारिले जातात, म्हणून समासांत उत्तरपद नसताना ते तसेच म्हणजे ऱ्हस्वान्तच लिहावे. सामासिक शब्दांबरोबर गतिमान, गुरुवर्य इत्यादी साधित शब्दांनाही हाच न्याय लागू आहे. विभक्तिप्रत्यय आणि शब्दयोगी अव्यये लावताना ते दीर्घान्त उच्चारले जातात, म्हणून पूर्वीही दीर्घान्त लिहिले जात; परंतु प्रत्यय किंवा शब्दयोगी अव्यये लागलेली नसतानाही मराठीच्या स्वभावानुरूप ते बहुधा दीर्घान्तच उच्चारिले जातात. म्हणून प्रथमेत आणि अप्रत्ययी द्वितीयेत असता ते दीर्घान्त लिहावे, असा या नियमाचा अभिप्राय आहे. कवि, गति, मति, स्थिति, दृष्टि, वृष्टि, अग्नि, अतिथि, अद्रि, पति इत्यादी शब्द याप्रमाणे दीर्घान्त लिहावे. अप्रत्ययी द्वितीयेची उदाहरणे:— (१) मी तुझे हेतू जाणतो; (२) कौरवांनी विराटाच्या धेनू पळविल्या.]

नियम ६ वा :—(दीर्घ) ई-कारान्त व ऊ-कारान्त शब्दांतील उपान्त्य इ-कार व उ-कार ऱ्हस्व लिहावे. उदा. गरिबी, माहिती, हुतूतू, सुरू.

अपवाद : नीति, भीति, रीति, कीर्ति इत्यादी तत्सम शब्द.

[तत्सम शब्दांची ही यादी आणखी पुष्कळ वाढविता येईल. प्रीति, भूमि, स्फूर्ति, दीप्ति, ऊर्मि, वीचि, विभूति, इ. शब्द असे आहेत. हे तत्सम शब्द मुळात दीर्घान्त नसल्याने वस्तुतः प्रस्तुत नियमाच्या कक्षेत येऊ नयेत. परंतु नवीन लेखनाप्रमाणे ते प्रथमेत आणि अप्रत्ययी द्वितीयेत दीर्घान्त लिहावयाचे असल्याने ते दीर्घान्त शब्दच मानिले जाण्याचा संभव आहे. म्हणून अपवादरूपाने त्यांचा वेगळा उल्लेख केला आहे. इतर दीर्घस्वरान्त शब्दरूपात सुद्धा उपान्त्य इ-कार व उ-कार उच्चाराप्रमाणे ऱ्हस्व लिहावे. उदा. बोलवितो, मिळवितो, ठेविले, इ.]

नियम ७ वा :—अ-कारान्त शब्दांचे उपान्त्य इ-कार व उ-कार दीर्घ लिहावे. उदा० गरीब, वकील, वीट, सून, वसूल. अपवाद :—ऱ्हस्वोपान्त्य अ-कारान्त तत्सम शब्द; उदा० गुण, विष, मधुर, प्रचुर.

[असे आणखीही काही शब्द पुढे दिले आहेत :—

(आ) विहीर, उंदीर, अमीर, फकीर, भरीव, कणीक, ठरीव, हुरूप, नाजूक, पूर.

(आ) अपवादभूत तत्सम शब्द :—शुक्र, विधुर, मंदिर, जटिल, भिन्न, अखिल, अधिप, छिन्न, छिद्र, अंकुश, अंकुर, अद्‌भुत, अरुण, इ. सर्वसाधारणपणे तत्सम शब्दांच्या मूळ रूपात बदल होऊ नये; मुळात त्यांचे जसे उच्चार होतात तसेच ते कायम रहावे व केवळ विभक्तिरूपात किंवा शब्दयोगी अव्यये लागताना अपरिहार्य असे उच्चारानुसारी फरक त्यांत करावे, इतर करू नयेत, अशी या नियमामागील भूमिका आहे. हे लक्षात घेऊन सामाजिक, कायिक, वाचिक, स्थानिक, इत्यादी इक-प्रत्ययान्त तत्सम शब्द ऱ्हस्वोपान्त्यच लिहावे. इतरत्रही हीच भूमिका लक्षात ठेवावी. तत्सम नसणारे भिंत, धुंद यांसारखे शब्द उच्चाराप्रमाणे ऱ्हस्वोपान्त्यच लिहावे.]

नियम ८ वा :—उपान्त्य दीर्घ ई-ऊ असलेल्या शब्दांचा उपान्त्य इकार-उकार उभयवचनी सामान्यरूपाच्या वेळी ऱ्हस्व लिहावा; उदा. गरिबास, वकिलांना, सुनेला, वसुलाची, नागपुरास, जिवाला, (प्राण, मन या अर्थी). अपवाद :—दीर्घोपान्त्य तत्सम शब्द; उदा. शरीरास, गीतेस, सूत्रास, जीवास (प्राणी या अर्थी).

[तांदूळ, बेडूक, कापूस, ढेकूण इत्यादी शब्दांचे सामान्यरूप करिताना उपान्त्य 'ऊ' राहत नाही. त्या ठिकाणी वरील नियमाचा उपयोग नाही, हे उघड आहे. त्यांची रूपे बेडकांनी, कापसाची, ढेकणांना, अशी होतात. येथे उ ऱ्हस्व वा दीर्घ होण्याचा प्रश्न उपस्थित होत नाही. दीर्घोपान्त्य तत्सम शब्दांत उपान्त्य ई-कार वा ऊ-कार ऱ्हस्व होत नाही, याची आणखी उदाहरणे पुढे दिली आहेत. क्रीडा, लीला, वीणा, वीर, शीत, गीत, संगीत, दूत, पूजा, मयूर, भूत, पूर्व, चूर्ण, धूलि, दीप, नीच, दीन, परीक्षा, पीठ, पीडा, नवीन, प्रवीण, इत्यादी.]

(३) किरकोळ

नियम ९ वा :—पूर हा ग्रामवाचक शब्द कोणत्याही ग्रामनामास लावताना दीर्घोपान्त्य लिहावा; उदा. नागपूर, संबळपूर, तारापूर.

नियम १० वा :—कोणता, एखाद्या ही रूपे लिहावी; कोणचा, एकादा ही रूपे लिहू नये.

नियम ११ वा :—हळूहळू, मुळूमुळू, खुटूखुटू, या शब्दांतील दुसरा स्वर व चौथा स्वर दीर्घ लिहावा.

नियम १२ वा :—ए-कारान्त नामाचे सामान्यरूप या-कारान्त करावे. उदाहरणार्थ-करण्यासाठी, फडक्यांना (म्हणजे फडके यांना), पाहण्याला. करणेसाठी, फडकेना, पाहणेला यांसारखी ए-कारान्त सामान्यरूपे करू नये.

नियम १३ वा :—लेखनात पात्राच्या किंवा वक्त्याच्या तोंडी बोलण्याची भाषा घालावी लागते. त्यावेळी तिचे स्वरूप बोलण्यातील उच्चाराप्रमाणे असावे. अन्य प्रसंगी तसे लिहू नये.

नियम १४ वा :—क्वचित्, कदाचित्, अर्थात्, अकस्मात्, विद्वान्, इ. मराठीत रूढ झालेले तत्सम शब्द अकारान्त लिहावे.

असे आणखी काही शब्द पुढे दिले आहेत :–किंचित्, तद्वत्, तस्मात्, दैववशात्, श्रीमान्, धनवान्, भगवान्, विद्युत्, परिषद्, संसद्, सम्राट्, इत्यादी. हे शब्द क्वचित, कदाचित, अर्थात, अकस्मात, विद्वान, असे लिहावे.

परिशिष्ट : २

मराठीची व्याकरण–परंपरा

(लेखकः–सु. बा. कुलकर्णी, एम्. ए.,
मराठी विभाग, पुणे विद्यापीठ)

व्याकरण : स्वरूप

'मूळ आशयाशी कार्यकारणसंबंध नसलेल्या सांकेतिक मौखिक प्रतीकांनी बनलेली समाज-व्यवहारास साह्यभूत अशी एक पद्धत' अशी भाषेची व्याख्या केली जाते.[1]

भाषा ही सांकेतिक असल्याने तिचे घटक बव्हंशी विशिष्ट नियमांना धरूनच वागताना आढळतात. तिच्यामधील ध्वनींची आणि अर्थवाहक घटकांची रचना व कार्य ही विशिष्ट तत्त्वांना धरूनच होत असतात. अशी ही तत्त्वे, त्यांच्या मर्यादा, नियम व अपवाद शोधून काढण्याचे शास्त्र म्हणजे व्याकरणशास्त्र. या शास्त्रानुसार विशिष्ट भाषेतील अगर बोलीतील घटकांच्या रचनेचा व कार्यपद्धतीचा केलेला व्यवस्थित अभ्यास म्हणजे व्याकरण होय. पतंजलीच्या 'व्यक्रियते अनेन इति व्याकरणम्' या व्याख्येतही हाच अर्थ अभिप्रेत आहे.

व्याकरण : प्रकार

व्याकरणांचे आदेशात्मक (Normative), ऐतिहासिक (Historical), तौलनिक (Comparative), व वर्णनात्मक (Descriptive) असे चार प्रकार आहेत. आदेशात्मक व्याकरणे (यांना Didactic अथवा Prescriptive असेही संबोधिले जाते) विशेषतः शाळांतील विद्यार्थ्यांसाठी लिहिलेली असतात. अशा व्याकरणांचा हेतु प्रामुख्याने मुलांना स्वभाषेतील शब्दांचे उच्चारण व लेखन शुद्धपणे करता यावे आणि वाङ्मयीन व शासकीय भाषेत एकसूत्रता रहावी असा असतो एकाच भाषेच्या वेगवेगळ्या बोलींचा

1. 'A language is a system of arbitrary vocal symbols by which members of a social group cooperate and interact'. Sturtevant: An Introduction to Linguistic Science, 1948 p. 2.

वापर करणाऱ्या व्यक्तींना परस्परांचे बोलणे पूर्णपणे कळावे म्हणून अशी व्याकरणे त्या भाषेच्या प्रमाण बोलीची व प्रमाण बोलीतच लिहिलेली असतात.

ऐतिहासिक व तौलनिक व्याकरणांची निर्मितीही बरीच आधुनिक, गेल्या दीड-दोन शतकांतील असून, पाश्चात्यांचे संस्कृत व तद्भव प्राकृत भाषांसंबंधीचे औत्सुक्य त्यास कारणीभूत झाले. एखाद्या भाषेच्या दोन अगर अधिक अवस्थांची तुलना ऐतिहासिक व्याकरणात अभिप्रेत असते. याच कारणाने या व्याकरणांना कधीकधी द्वैकालिक (Diachronic) असेही संबोधिले जाते. वर्ण, रूप, शब्द व वाक्यरचना यांच्या संदर्भात भाषेची सामान्य व प्रभावी अवस्थांतरे केव्हां झाली व शक्यतर का झाली याचा विचार अशा व्याकरणांतून होतो. तौलनिक व्याकरणात दोन अगर अधिक समकालीन व एकवंशीय भाषांच्या अगर बोलींच्या स्वरूपाची तुलना अभिप्रेत असून, त्यामधील साम्य-भेदांचे विवेचन केलेले असते. ऐतिहासिक व तौलनिक व्याकरणे प्राय: भाषाकोविदांसाठीच लिहिलेली असतात.

वर्णनात्मक व्याकरणे ही भाषेचा शास्त्रीय अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी व विद्वानांसाठी लिहिली जात असून त्यांमधून एखाद्या भाषेच्या अगर बोलीच्या विशिष्टकालीन स्वरूपाचे शुद्धाशुद्धविवेक न बाळगता विश्लेषण केलेले असते. अशा व्याकरणांतून भाषा कशी असावी यापेक्षा कशी आहे याकडे विशेष लक्ष पुरविले जाते.

मराठीची प्राचीन व्याकरण-परंपरा

मराठी व्याकरणांची परंपरा ही मराठी वाङ्मयाइतकीच प्राचीन आहे. सध्या उपलब्ध असलेल्या व्याकरण-ग्रंथांचा विचार केल्यास मराठीच्या आद्य व्याकरणकाराचा मान पंडित **भीष्माचार्य** (तेरावे शतक) या महानुभाव ग्रंथकाराला देण्यास हरकत नाही. याची बहुतेक सर्व रचना तत्त्वज्ञानपर व आध्यात्मिक स्वरूपाची असली तरी संस्कृत कोशरचना व व्याकरणशास्त्राचा याचा काही अभ्यास असावा असे याच्या ' धनंजय ' कोशाच्या टीकेवरून व **नामविभक्ति** आणि **पंचवार्तिक** या व्याकरण-ग्रंथांवरून वाटते. **पंचवार्तिक** हा ग्रंथ अतिशय लहान (सुमारे २५–३० पृष्ठे) असून, सूत्रलक्षण, सूत्रप्रकृति, सूत्रकारक, सूत्रव्याख्यान व सूत्रस्वरूप अशा

पाच प्रकरणांत विभागलेला आहे. भाषास्वरूपाच्या विवेचनाचा थाट पाणिनीय व्याकरणाच्या धर्तीवर असून त्यात महानुभाव सूत्रग्रंथांतील उदाहरणे दिलेली आढळतात. मोने यांच्या **मराठी भाषेचे व्याकरणकार व व्याकरण-प्रबंधकार** या पुस्तकात हा ग्रंथ समाविष्ट केलेला आहे. **भीष्माचार्यां**खेरीज **आनेराज व्यास, कवीश्वर व्यास, पंडित विश्वनाथ वर्धनस्थ** इत्यादी महानुभाव पंडितांनी व्याकरण-रचना केल्याचे उल्लेख आढळतात; परंतु मूळ ग्रंथांच्या अभावी त्यांच्या रचनेचे स्वरूप आज आपल्याला कळू शकत नाही. 'समर्थप्रताप'कार **गिरिधर** (समाधी श. १६५१) यांच्या त्रुटित स्वरूपात उपलब्ध असलेल्या **व्याकर्ण** या श्लोकबद्ध ग्रंथाचा अपवाद सोडल्यास मराठी व्याकरणांची ही प्राचीन परंपरा तिच्या ग्रंथकारां-बरोबरच जी नष्ट झाली, तिचे पुनरुज्जीवन व्हावयास चार शतके जावी लागली.

मराठी व्याकरणांचे अर्वाचीन युग

धर्मप्रसाराच्या व राज्यविस्ताराच्या हेतूने हिंदुस्थानात आलेल्या पाश्चात्यांना एतद्देशीय लोकांशी संपर्क साधण्याकरिता त्यांच्या भाषा शिकणे अत्यावश्यक झाले. या गरजेतून भारतीय भाषांचा अभ्यास सुरू झाला व त्यांची व्याकरणे व कोश बनविले गेले. प्रारंभकाली, भारतीय भाषांकडे पहाण्याचा पाश्चात्यांचा दृष्टिकोन हा संकुचित, त्या निव्वळ बोलभाषा आहेत असाच होता. परंतु पुढे विविध भारतीय भाषांतील वाग्वैभव व त्यांचे संस्कृत–प्राकृत या भाषांशी व परस्परांशी असलेले साम्य ध्यानात आल्यावर त्यांचा तौलनिक व ऐतिहासिक अभ्यासही सुरू झाला. आजच्या प्रगत भाषाशास्त्रीय विचारांचा पाया या घटनेने घातला गेला. मराठी भाषाही या घडामोडीपासून अलिप्त राहू शकली नाही. मराठीची प्रारंभकालीन व्याकरणे मिशनऱ्यांसाठी इंग्रजी व पोर्तुगीज भाषांतून लिहिली गेली. शिक्षणाच्या प्रसाराबरोबर मराठीत लिहिलेल्या शालेय व्याकरणांचा सुकाळ झाला. मराठीची शास्त्रीय व ऐतिहासिक व्याकरणेही लिहिली गेली. मराठी बोलींचा अभ्यास आता आता सुरू झाला आहे. त्यांचीही व्याकरणे लिहिली जात आहेत.

मिशनऱ्यांसाठी लिहिलेली व्याकरणे

गेल्या दोन शतकांतील वर्णनात्मक व्याकरणांचे अवलोकन केल्यास लेखनाचा हेतू व कार्य या दृष्टिकोनातून त्यांचे तीन प्रकार करता येतील. पहिल्या प्रकारात युरोपियनाना मराठी भाषेचे ज्ञान व्हावे या हेतूने त्यांनी स्वतःसाठी लिहिलेली व एतद्देशीयांनी त्यांच्यासाठी लिहिलेली प्रारंभीची सर्व व्याकरणे मोडतील. **पंडित वैजनाथ** यांच्या मदतीने तयार केलेले व कलकत्त्याजवळील श्रीरामपूर येथे प्रसिद्ध झालेले **कॅरे** याचे Grammar of the Mahratta Language (१८०५) हा अशा स्वरूपाचा इंग्रजी भाषेतील एक आद्य प्रयत्न होय. **बॅलेंटाईनचे** A grammar of the Mahratta Language (१८३९) **बर्जेसचे** Grammar of the Marathi language (१८५४) आणि **ड्रमंड, मखबा, सेट्टॉन, आसखेडकर** वगैरेंची व्याकरणे ही इंग्रजांना मराठी भाषेचे ज्ञान व्हावे याच हेतूने लिहिलेली आढळतात.

पोर्तुगीज मिशनऱ्यांनी धर्मप्रसारार्थ लिहिलेली गोमंतकी व तत्कालीन इतर बोलींची व्याकरणे याच प्रकारात मोडतात. अशा प्रकारच्या उपलब्ध व्याकरणांत **स्टीफन्सचे 'आर्ति-द-लिंग्व कानारी'** (Arte da Lingua Canarim) हे गोमंतकी बोलीचे व्याकरण सर्वांत प्राचीन असून ते १६४० साली प्रसिद्ध झाले. हे व्याकरण पोर्तुगीज भाषेत लिहिलेले असून, याच्या पहिल्या आवृत्तीची एक प्रत लिस्बनच्या सरकारी वाचनालयात आहे. **ग्रामातिक माराष्ट** (Gramatica Marastta) नावाचे १८०५ साली लिस्बनला छापलेले मराठीचे एक पोर्तुगीज भाषेतील व्याकरण **अ.का. प्रियोळकर** यांनी संपादून व इंग्रजीत भाषांतर करून प्रसिद्ध केले आहे. (Journal of the University of Bombay, Vol. XXIII, Part 2. Sept, 1954). त्यांच्या मते हे व्याकरण मुंबईच्या परिसरातील ठाणे, वसई वगैरे भागात बोलल्या जाणाऱ्या उत्तर कोकणी बोलीचे आहे.

प्रारंभीची ही सर्व इंग्रजी व पोर्तुगीज भाषांतील व्याकरणे लॅटिन व्याकरणांच्या धर्तीवर लिहिलेली असून, लॅटिनचे ज्ञान असलेल्या मिशनऱ्यांना मराठी भाषेचे ज्ञान सुलभतेने व्हावे हाच त्यांचा हेतू दिसतो.

शालेय व्याकरणे

महाराष्ट्रात इंग्रजांचे बस्तान व्यवस्थित बसल्याबरोबर त्यांनी शिक्षण-प्रसारार्थ पाठशाळा उघडल्या. या पाठशाळांतील विद्यार्थ्यांना व्याकरण विषयाचे प्राथमिक ज्ञान असणे इंग्रजी भाषा सुलभतेने समजण्याच्या दृष्टीनेही अत्यावश्यक ठरले. या कारणाने शाळांतील मुलांसाठी मराठीची मराठी भाषेतील व्याकरणे लिहिली गेली. ही सर्व व्याकरणे दुसऱ्या प्रकारात मोडतात.

या प्रकारच्या व्याकरणांत **जगन्नाथशास्त्री क्रमवंत, गंगाधरशास्त्री फडके** व **बाळशास्त्री घगवे** या शास्त्रीमंडळींनी तयार केलेले **महाराष्ट्र भाषेचें व्याकरण** हे आद्य होय. हा ग्रंथ १८२५ च्या सुमारास तयार होऊन हस्तलिखित स्वरूपातच अनेक वर्षे वापरात होता. याची एक नक्कल इंग्लंडमधील इंडिया ऑफिस लायब्ररीत एक शतकाहून अधिक काळ पडून होती. **प्रियोळकर** यांनी १९५४ साली तिचे संपादन करून ती प्रकाशात आणली. अर्वाचीन काळात मराठी लोकांसाठी, मराठीत लिहिलेले, मराठीचे हे पहिलेच व्याकरण होय. 'संस्कृत व्याकरणाध्यायन बलेकरून' याची रचना झालेली असली तरी इंग्रजी व्याकरणरचनेचा प्रभाव यावर कमी नाही.

शास्त्रीमंडळींतील **गंगाधरशास्त्री फडके** यांनी एकट्यांनी पुढे **महाराष्ट्र भाषेचे व्याकरण** (१८३६) या नावाचे याच धर्तीचे एक शालेय व्याकरण लिहिले. हे शिळाछापावर छापलेले असून, मराठीतील पहिले छापील व्याकरण होय.

यानंतर **जांभेकरांचे बालव्याकरण** (१८३६), **अमेरिकन मिशनचे मराठी भाषेचे व्याकरण** (१८४८), **टिळकांचे लघु व्याकरण** (१८५८), **दादोबांचे मराठी लघु व्याकरण** (१८६५), **सोहनींचे व्याकरण-संवाद** (१९०६), **शेडळेकरांचे मराठी भाषेचे पद्यात्मक व्याकरण** (१९३२), वगैरे अनेक प्राथमिक व माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांना उपयुक्त अशी पुस्तके निघाली. यांतील **दादोबांचे मराठी लघु व्याकरण** व **रा. भि. जोश्यांचे बालबोध मराठी व्याकरण** या पुस्तकांच्या अनेक आवृत्त्या निघाल्या. **दादोबांच्या लघुव्याकरणाच्या** तर

१९५० पर्यंत ३३ आवृत्त्या निघाल्या! अलीकडे याच धर्तीची **भावे** यांचे **व्याकरणप्रवेशिका** (१९२६), **ग. ह. केळकरांचे मराठी व्याकरणाची मूलतत्त्वें** (१९३३), **मोने** यांचे **मराठी साहित्य व व्याकरण** (१९३४), **गोखले** यांचे **माध्यमिक व्याकरण** (१९३७), **प्र. न. जोश्यांचे मराठी व्याकरण** (१९६३), **नवलकरांचे** Students' Marathi Grammar(१८८९),**देवधरांचे** A Resume of Marathi Grammar (१९२६) वगैरे अनेक व्याकरणे लिहिली गेली आहेत.

लॅम्बर्टचे Marathi Language Course आणि **कवडी** व **साउथवर्थ** यांचे Spoken Marathi (१९६५) ही पुस्तके इंग्रजीतून मराठी शिकणाऱ्यांसाठी असून, **न. चिं. जोगळेकर** यांचे **मराठीका वर्णनात्मक व्याकरण** (१९४९) व **साठे** यांचे **हिंदी मराठी स्वयंशिक्षक** (१९६०) ही पुस्तके हिंदी भाषिकांसाठी आहेत.

शास्त्रीय व्याकरणे

मराठीच्या वर्णनात्मक व्याकरणांचा तिसरा प्रकार म्हणजे शास्त्रीय व्याकरणे. मराठीच्या व्याकरणकारांत संस्कृत व्याकरण-परंपरेचे अभिमानी व इंग्रजी व्याकरण-पद्धतीचे अनुयायी असे दोन्ही प्रकारचे व्याकरणकार आहेत. यामुळे ध्वनिसंख्या, विभक्तिसंख्या, सहाय्य-क्रियापदें, शब्दांच्या जाती, वाक्यपृथक्करण वगैरे विषय अनेक वेळा वादग्रस्त झालेले आढळतात. प्रायः अशा चर्चेतून व विचारमंथनातून मराठीची शास्त्रीय व्याकरणे तयार झाली. यांतील बहुतेक व्याकरणकारांनी प्रत्ययादिकांच्या बाबतीत व्युत्पत्तीची कास धरलेली असली तरी दोन्ही परंपरांचा समन्वय साधण्याचा प्रयत्नच अधिक आढळतो. शाळकरी मुलांसाठी अगर परकीयांसाठी लिहिलेल्या व्याकरणांहून या व्याकरणांचा दर्जा खचित श्रेष्ठ आहे. मराठीच्या स्वरूप-रचनेचा पद्धतशीर उलगडा करावा, अशी आंतरिक तळमळ या व्याकरण-कारांमध्ये दिसून येते; परंतु त्याबरोबरच भाषाशास्त्रीय सामान्य तत्त्वांचे अज्ञानही पदोपदी जाणवते.

मराठीचे शास्त्रीय स्वरूपाचे व्याकरण लिहिण्याचा पहिला प्रयत्न **दादोबा पांडुरंग तर्खडकर** यांच्या **महाराष्ट्र भाषेचे व्याकरण** (१८३६) या

ग्रंथामध्ये आढळतो. याच्या पुढे अनेक आवृत्त्या निघाल्या व सुधारणांची एक पूरणिकाही (१८८१) प्रसिद्ध झाली. या व्याकरणात **दादोबांच्या** स्वतंत्र विश्लेषण-पद्धतीचा व सखोल निरीक्षणाचा प्रत्यय वारंवार येतो; व तत्कालीन व्याकरण-ज्ञानाच्या पार्श्वभूमीवर 'मराठीचे पाणिनि' ही दादोबांस दिलेली पदवी सार्थ वाटू लागते. दादोबांच्या व्याकरणाचा अंमल तीस-चाळीस वर्षे अबाधित चालला. त्यानंतर मात्र अशा स्वरूपाची अनेक व्याकरणे जन्माला आली.

कृष्णशास्त्री **गोडबोल्यांचे मराठी भाषेचे नवीन व्याकरण** (१८६७), आगरकरांची **वाक्यमीमांसा** (१८८८), रा. भि. **जोश्यांचे प्रौढबोध मराठी व्याकरण** (१८८९) व त्याचे इंग्रजी रूपांतर **A Comprehensive Marathi Grammar** (१९००), **खेरांचे A Higher Marathi Grammar** (१८९५), **दामल्यांचे शास्त्रीय मराठी व्याकरण** (१९११) व **सबनिसांचे मराठीचे उच्चतर व्याकरण** (१९५१) ही शास्त्रीय स्वरूपाची व्याकरणे होत. यांतील **दामले** यांचे **शास्त्रीय मराठी व्याकरण** अधिक विवेचक, खंडन-मंडनात्मक, किंचित आग्रही, पण साक्षेपाने लिहिलेले आडळते. **चिपळूणकर, गुंजीकर** व **मोडक** यांच्या मराठी व्याकरणांमधील विविध प्रश्नांसंबंधीच्या निबंधांनी मराठी व्याकरण-विचाराच्या प्रगतीस हातभार लावला. या दृष्टीने **अरविंद मंगरूळकर** यांचे **मराठी व्याकरणाचा पुनर्विचार** (१९६४) हे पुस्तकही उल्लेखनीय आहे.

गेल्या वीसपंचवीस वर्षांत जागतिक भाषाशास्त्रविषयक विचारांत बरीच क्रांती झालेली आहे. वर्ण [phoneme) व रूप (morpheme) या भाषिक घटकांच्या तत्त्वांचा शोध लागल्याने भाषेच्या अर्थाधिष्ठित विश्लेषणापेक्षा रचनाप्रधान (structural) विश्लेषणास महत्त्व प्राप्त झाले आहे: दुर्दैवाने हे नवीन विचार मराठीच्या व्याकरण-प्रांतात अजून शिरलेले नाहीत. भाषाशास्त्राच्या नवीन दृष्टिकोनातून अमेरिकेतील विद्यापीठांच्या डॉक्टरेट पदवीसाठी लिहिलेले **अशोक केळकर** व **म. ल. आपटे** यांचे अनुक्रमे **Phonology and Morphology of Marathi** आणि **Transformationl Grammar of Marathi** हे प्रबंध अजून अप्रकाशितच आहेत.

मराठी बोलींची व्याकरणे

मराठी भाषाभ्यासात सर्वांत उपेक्षित विभाग मराठी भाषेच्या बोली होत. **ग्रियर्सनने भारतीय भाषांच्या सर्वेक्षणाच्या** सातव्या खंडात मराठीच्या जवळ जवळ शंभर बोली- उपबोलींचा निर्देश केला आहे. त्यांतील कोंकणी व तिच्या उपबोलींव्यतिरिक्त इतर बोलींचा फारसा अभ्यास झालेला नाही. **फादर स्टीफन्स**च्या १६४० साली प्रसिद्ध झालेल्या कोंकणीच्या व्याकरणाचा उल्लेख मागे आलाच आहे. स्टीफन्सनंतर कोंकणीची कमीतकमी डझनभर व्याकरणे पोर्तुगीज भाषेत लिहिली गेली. अगदी अलिकडे डयुआर्ट, पिरास, डिसूझा, रेंजील वगैरेंनी कोंकणीची व्याकरणे लिहिलेली आढळतात. **कत्रे** यांनी लिहिलेले. The Formation of Konkani (१९४२) हे ऐतिहासिक व्याकरण व घाटगे यांनी लिहिलेली Konkani of South Kanara (१९६४) व Kudali (१९६५) ही पुस्तके बोलीभाषांचा अभ्यास करणाऱ्यांस व करू इच्छिणाऱ्यांस मार्गदर्शक ठरतील. मराठीच्या अन्य काही बोलींची व्याकरणे डॉक्टरेटच्या प्रबंधाच्या रूपाने अजून अप्रकाशित स्वरूपात पडून आहेत. अशा व्याकरणात **नरेश कवडी** यांचे Folk-songs from Dangs-A Linguistic study, **सुहासिनी लद्दू** यांचे Linguistic Analysis of Koli, **विजया चिटणीस** यांचे The Khandeshi Dialect, **ज. के. रानडे** यांचे **वारली बोली व लोकगीते यांचा अभ्यास**, **शं. गो. वाळिंबे** यांचे Descriptive Analysis of Mangi Marathi (Malwa) या व्याकरणांचा उल्लेख करता येईल. **प्रभुदेसाई** यांच्या **सतराव्या शतकातील गोमंतकी बोली** (१९६३) या ग्रंथात पोर्तुगीज मिशनऱ्यांच्या साहित्यातील शब्दांची विचिकित्सा असून व्याकरणविषयक वैशिष्ट्ये थोडक्यात सांगितली आहेत. **मीना जोशी** यांच्या **उत्तर कोंकणी बोलीचा भाषाशास्त्रीय अभ्यास** या अप्रकाशित प्रबंधात गेल्या शतकातील वसई-साष्टीकडील उत्तर-कोंकणी बोलीचा अभ्यास केलेला आढळतो.

ऐतिहासिक व तौलनिक व्याकरणे

मराठीच्या ऐतिहासिक स्वरूपाच्या अभ्यासाचे दोन ठळक प्रकार दिसतात.

पहिल्या प्रकारच्या अभ्यासात मराठीच्या उगमाचा शोध घेऊन संस्कृत व प्राकृत या दोन, किंवा संस्कृत, प्राकृत व अपभ्रंश या तीन टप्प्यांनी ती कशी उत्क्रांत होत गेली हे दाखवून त्याची कारणमीमांसा केलेली आढळते. **रा. भि. जोशी** यांचे **मराठी भाषेची घटना** (१९१९), **कृ. पां. कुलकर्णी** यांचे **मराठी भाषा : उद्गम व विकास** (१९३३), **दाते** यांचे **महाराष्ट्र भाषाभ्यास** (१९३८) ही पुस्तके या स्वरूपाच्या अभ्यासाची उदाहरणे म्हणून सांगता येतील. मध्य-आर्यभारतीय किंवा नूतन-आर्य भारतीय भाषांच्या संदर्भात मराठीच्या इतिहासाविषयी मराठीत फारसे लिहिले गेलेले नाही. **भांडारकर, आपटे, कत्रे, घाटगे** यांची Wilson Philological Lectures, **बीम्सचे** Comparative Grammar of Modern Indo—Aryan Languages of India (१८७२ ते १८७९), हॉर्न्लेंचे Comparative Grammar of the Gaudian Languages(१८८०), झुल ब्लोकचे L'Indo—Aryen (१९३४) वगैरे ग्रंथांतून व **टर्नर, चतर्जी, ग्रियर्सन, कोनौ, राजवाडे** वगैरेंच्या निबंधांतून मराठीची प्राकृत व प्रचलित आर्यभारतीय भाषांशी तुलना केलेली आढळते; परंतु प्रामुख्याने मराठीच्या संदर्भात तिचे इतर आर्यभारतीय भाषांशी साम्यभेद दाखविणारे तौलनिक व्याकरण **झुल ब्लोक** यांच्या **La formation de la Langue Marathe** (१९१९) या पुस्तकाचा अपवाद वगळल्यास दुसरे कोणतेही नाही. **ब्लोकच्या** पुस्तकात मराठीचा ऐतिहासिक व तौलनिक या दोन्ही दृष्टींनी शास्त्रीय व ससंदर्भ अभ्यास झालेला दिसतो. या पुस्तकाचे मराठी भाषांतर **वा. गो. परांजपे** यांनी **मराठी भाषेचा विकास** या नावाने १९४१ साली प्रसिद्ध केले.

मराठीच्या पूर्वेतिहासाप्रमाणे तिच्या विविध कालखंडांतील भाषिक वैशिष्ट्यांचे दिग्दर्शन करणारी व्याकरणे तयार झालेली आहेत. **शं. गो. तुळपुळे** यांचे **यादवकालीन मराठी भाषा** (१९४२) व **An Old Marathi Reader** (१९६०), आणि **आल्फ्रेड मास्टर** यांच्या **A Grammar of Old Marathi** (१९६४) या ग्रंथांतून शिलालेख, ताम्रपट व ग्रांथिक साहित्यावर आधारलेले, मराठीच्या प्रारंभकालीन भाषिक वैशिष्ट्यांचे दर्शन घडते. एखादा ग्रंथ अगर ग्रंथकाराची सर्व रचना

यावर आधारलेली व्याकरणे मराठीत लिहिलेली आढळतात. अशा व्याकरणातून ग्रंथनिर्मितीकालीन भाषेच्या सामान्य स्वरूपाचे दर्शन घडते. **राजवाड्यांचे ज्ञानेश्वरीतील मराठी भाषेचे व्याकरण** (१९०९), **पानसे** यांचे **Linguistic Peculiarities of Jnanesvari** (१९५३) या ग्रंथांतून व **कृष्णाजी जोशी** यांच्या **Declension of Nouns in Marathi as seen in Dnyaneshwaras works** (१९१४) या पुस्तिकेत ज्ञानेश्वरीतील भाषिक वैशिष्ट्यांचे दिग्दर्शन आढळते. **राजवाड्यांनी** आपले **ज्ञानेश्वरीचे व्याकरण** पाणिनीय व्याकरणाच्या चौकटीत बसविण्याचा प्रयत्न केला आहे; पण त्यांच्यामागून मात्र या पद्धतीचे कोणी अनुकरण केले नाही. **ग्रामोपाध्ये** यांच्या **पेशवे दप्तरातील मराठी भाषेचे स्वरूप** (१९४१) या ग्रंथात मुंबई सरकारने प्रसिद्ध केलेल्या पेशवे दप्तरातील पत्रांच्या आधारे अठराव्या शतकातील दरबारी व शासकीय भाषेचे स्वरूप स्पष्ट केलेले आढळते. **मार्डीकर** यांचा **शिवकालीन मराठीची भाषिक पहाणी** हा अप्रकाशित प्रबंध प्रामुख्याने रामदासांच्या वाङ्मयावर आधारलेला आहे. **मु. श्री. कानडे** यांच्या **दासबोधाचा भाषाशास्त्रीय अभ्यास** या प्रबंधात दासबोधातील भाषेची वैशिष्ट्ये सांगितली आहेत. **स. गं. मालशे** यांचा 'क्रिस्तपुराणाचा वाङ्मयीन व भाषिक अभ्यास, हा प्रबंधही याच स्वरूपाचा आहे **यू. म. पठाण** यांच्या **मराठी बखरीतील फार्सीचे स्वरूप** या प्रबंधात मराठी शब्द व वाक्यरचनेवर फार्सीने केलेल्या परिणामांचे विवेचन बखरींतील भाषेच्या आधारे केलेले आढळते. हे सर्व प्रबंध अप्रकाशितच आहेत.

निवडक संदर्भ

गावस्कर सु. आ.–मराठी दोला-मुद्रिते (१९६१)

घाटगे अ. मा.–' Marathi Linguistics ' Indian Linguistics Vol. 22, 1962.

जोग रा. श्री. (संपा. . मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड चौथा (१९६५)

दाते, कर्वे इ०–महाराष्ट्र शब्दकोश, विभाग सहावा (१९३८) प्रस्तावना

दाते शं. ग.–मराठी-ग्रंथ-सूची (१९४३, १९६१)

प्रियोळकर अ. का.–मराठी व्याकरणाची कुळकथा (१९३६)

प्रियोळकर अ. का. (संपा.) महाराष्ट्र भाषेचे व्याकरण (१९५४) प्रस्तावना

मोने मो. स.–मराठी भाषेचे व्याकरणकार व व्याकरण-प्रबंधकार (१९२७)

सरदार गं. बा.–अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका (१९५६)

सूची

—*—